काही महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक करावी लागणार आहे. तसा शासन निर्णय आहे. परंतु, अनेक महाविद्यालयांकडून त्याचे पालन केले जात नाही. जेईई मेन्स, जेईई ॲडव्हान्स, नीट आदी परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना क्लास लावावा लागतो. त्यामुळे विद्यार्थी महाविद्यालयांमध्ये हजर न राहता क्लासमध्ये हजेरी लावतात. त्यामुळे अनेक क्लासचालक आणि महाविद्यालये सामंजस्याने विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्ये उपस्थित राहण्याचे बंधन ठेवत नाहीत. शासकीय यत्रंणांना हे माहीत आहे की क्लासचालक आणि महाविद्यालये यांचे लागेबांधे आहेत. अशा परिस्थितीत क्लासचालकांवर आणि संबंधित महाविद्यालयांवर कारवाई करायचे सोडून सरसकट सर्वच प्राचार्यांना जबाबदार धरणे कितपत योग्य आहे, असा सवाल प्राचार्यांनी उपस्थित केला आहे. तसेच, बारावीचा अर्ज भरताना हजेरी पूर्ण भरली आहे का, याचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करणे गरजेचे आहे. पालकांकडूनच महाविद्यालयांवर दबाव टाकला जातो की विद्यार्थ्यांना महाविद्यालयात उपस्थित राहण्याचे बंधन टाकण्यात येऊ नये, कारण आमचा विद्यार्थी कोचिंग क्लासमध्ये जातो आणि त्या ठिकाणी त्याचा अभ्यास घेण्यात येत आहे. त्यामुळे केवळ प्राचार्यच या गोष्टीला जबाबदार कसे, असा प्रश्नदेखील निर्माण झाला आहे.

- **अकरावी- बारावीसाठी विद्यार्थ्यांची ७५ टक्के हजेरीची जबाबदारी प्राचार्यांवर**
- **विद्यार्थ्यांचा महाविद्यालयांमध्ये केवळ नावालाच प्रवेश**

> विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीची विविध कारणे लक्षात आली आहेत. त्यामुळे केवळ प्राचार्यांना जबाबदार धरून ही समस्या सुटणार नाही. प्रश्न मुळातून सोडविण्यसाठी विद्यार्थी आणि पालकांची मानसिकता बदलण्याच्या दृष्टीने पावले उचलणे गरजेचे आहे.
> - **डॉ. राजेंद्र झुंजारराव**, प्राचार्य, मॉडर्न कॉलेज

My Pune Edition Edition
Jul 08, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

लोकमत

नवे धोरण

डॉ. हर्ष गायकवाड
सहायक प्राध्यापक



**रसायनशास्त्र अकरावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना अनिवार्य विषय आहे. आयआयटी कॉलेजमध्ये विविध विषयांत बी-टेक पदवीसाठी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी हा विषय महत्त्वाचा आहे. या विषयात पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर शासकीय, तसेच खासगी क्षेत्रात करिअर करण्याचे मार्ग खुले होतात.**

# रसायनशास्त्रातून नोकरीचे अनेक मार्ग

रसायनशास्त्राच्या विविध विषयांत पदव्युत्तर पदवी घेतल्यानंतर शाळा, महाविद्यालयात अध्यापनासह विविध शासकीय विभागात नोकरीच्या संधी निर्माण होतात. यांसह औद्योगिकीकरणामुळे फार्मास्युटिकल, पेंट, सिमेंट आदी या कंपन्यांमध्येही विद्यार्थी नोकरीसाठी पात्र ठरतात. तसेच, अनालिटिकल केमिस्ट, बायोकेमिस्ट, बायोमेडिकल केमिस्ट, फिल्ड ऑफिसर, फूड आणि ड्रग इन्स्पेक्टर, इंडस्ट्रियल रिसर्च सायंटिस्ट, लॅबरोटरी असिस्टंट, मटेरिअल टेक्नॉलॉजिस्ट, प्रोडक्शन केमिस्ट, क्वालिटी कंट्रोलर, संशोधक म्हणून विविध संधी उपलब्ध होत आहेत.

## औद्योगिक क्षेत्रातील नोकरीची संधी

फार्मास्युटिकल, प्लास्टिक, रबर, टेक्स्टाइल, जिओलॉजी, पेंट, डेअरी, प्रिंटींग टेक्नॉलॉजी, वायनरी अँड फर्मेटेशन, केमिकल्स, फर्टिलायझर्स, शुगर, सिमेंट, सोप अँड डिटर्जेंट, पेट्रोलियम, कॉस्मेटिक, ग्लास आदी उद्योगांत विविध पदांवर नोकरीची संधी आहे. तसेच, पदवीधर विद्यार्थी स्वतःचा स्वतंत्र उद्योग व्यवसायही सुरू करू शकतात.

## शासकीय विभागात नोकरीची संधी

फॉरेन्सिक लॅबरोटरी, मेटरोलॉजी, आर्किओलॉजी, एफडीए, सीडब्ल्यूपीआरएस, इस्रो, पोल्युशन कंट्रोल बोर्ड, फॉरेस्ट, हनी बी रिसर्च, मायनिंग, ग्राउंड वॉटर सर्व्हे, जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, ओएनजीसी, तसेच डीआरडीओ या केंद्र आणि राज्य सरकारच्या शासकीय विभागांत पदवी, तसेच पदव्युत्तर विद्यार्थ्यांना शासकीय नोकरीची संधी मिळू शकते.

## अध्यापन क्षेत्रातही करता येईल करिअर

पदव्युत्तर पदवीनंतर बीएड पदवी, तसेच सेट, नेट आणि पीएच डी केल्यानंतर शाळा, कनिष्ठ तसेच पदवी, पदव्युत्तर महाविद्यालयात, विद्यापीठे, आयआयटी, आयआयएसईआर, अभियांत्रिकी कॉलेज, फार्मसी कॉलेज, कृषी महाविद्यालयात शिक्षक ते सहायक प्राध्यापक म्हणून नोकरी करता येते.



## विविध संस्थात व्हा संशोधक अन् शास्त्रज्ञ

रसायनशास्त्र या विषयात पदवी, तसेच पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण उमेदवारांना संशोधन क्षेत्रातील विविध नामांकित संस्थांमध्ये संशोधक म्हणून काम करता येऊ शकते. त्यामध्ये प्रामुख्याने भाभा अॅटोमिक रिसर्च सेंटर, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूट, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरॉलॉजी, डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, हाई एनर्जी मटेरिअल रिसर्च लॅबरोटरी, युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इंडियन इन्स्टिस्ट्यूट ऑफ सायन्स, न्युक्लिअर अँड रेडिओ अॅक्टिव्हीटी, अर्मामेंट ऑफ रिसर्च अँड डेव्हलपमेंट इस्टाब्लिशमेंट, नॅशनल एन्व्हायर्मेंटल इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिट्यूट, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशियनोग्राफी, कौन्सिल ऑफ सायन्टिफिक इंडस्ट्रिअल रिसर्च, डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, युजीसी, सेंट्रल ड्रग रिसर्च इन्स्टिट्यूट, राष्ट्रीय केमिकल फर्टिलायझर्स, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रापिकल मेटरोलॉजी, ड्रग डिस्कव्हरी अँड केमिकल.

## कोठे घेता येईल प्रवेश ?

कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी आणि बारावी विज्ञान शाखेसाठी रसायनशास्त्र हा विषय अनिवार्य आहे. महाविद्यालयात विविध विषयांत पदवी, तसेच पदव्युत्तर पदवी घेता येते. राज्यातील शासकिय खासगी विद्यापीठांमध्ये रसायनशास्त्र विषयांत पदव्युत्तर पदवीसह इतर कोर्सेस विद्यार्थ्यांना करता येतील.

edit@gmail.com (9527581038 / 8087815275)

Hello Pune
Page No. 7 Jul 18, 2024
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# अकरावी प्रवेशाच्या तिसऱ्या फेरीत पात्रता गुणांमध्ये लक्षणीय वाढ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

### १३ हजार २७३ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर

> **पसंतीचे महाविद्यालय मिळण्यासाठी गुणवंत विद्यार्थी थांबून राहिलेले असू शकतात. त्यामुळे तिसऱ्या फेरीचे पात्रता गुण वाढले असण्याची शक्यता आहे. पात्रता गुण वाढणे किंवा कमी होण्याच्या वेगवेगळ्या शक्यता असू शकतात.**
> - डॉ. राजेंद्र झुंजारराव, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील तिसऱ्या फेरीत १३ हजार २७३ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. त्यातील ५ हजार ४३ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले असून, २४ जुलैपर्यंत विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे. मात्र, तिसऱ्या फेरीत प्रवेशासाठीच्या आवश्यक पात्रता गुणांमध्ये वाढ झाल्याचे चित्र आहे.

केंद्रीय अकरावी प्रवेशप्रक्रिया समितीच्या सदस्य सचिव डॉ. ज्योती परिहार यांनी ही माहिती दिली. यंदा ३४० कनिष्ठ महाविद्यालयांतील १ लाख १९ हजार ७०५ जागांवर प्रवेशप्रक्रिया राबवण्यात येत आहे. तिसऱ्या फेरीत केंद्रीभूत प्रवेशांसाठी ६५ हजार ३७ जागा उपलब्ध होत्या. या फेरीच्या गुणवत्ता यादीमध्ये कला शाखेसाठी १ हजार २७६, वाणिज्य शाखेसाठी ४ हजार ९९४, विज्ञान शाखेसाठी ६ हजार ९२८, व्यावसायिक शिक्षण शाखेसाठी १७५ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. आतापर्यंत केंद्रीभूत प्रवेशांद्वारे २९ हजार ९८३, कोट्यातून ६ हजार ५०८ अशा एकूण ३६ हजार ४९१ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे, तर एकूण ८३ हजार २१४ जागा रिक्त आहेत.

प्रवेशप्रक्रियेत आतापर्यंत दोन फेऱ्या पूर्ण झाल्या आहेत. मात्र, तिसऱ्या फेरीतील प्रवेशासाठी पात्रता गुणांमध्ये वाढ झाल्याचे चित्र आहे. उदाहरणार्थ, दुसऱ्या फेरीत डॉ. श्यामराव कलमाडी महाविद्यालयात कला शाखेसाठी ४४८, वाणिज्य शाखेसाठी ४५३, विज्ञान शाखेसाठी ४६८ गुण आवश्यक होते. तिसऱ्या फेरीत कला शाखेसाठी ४५७, वाणिज्य शाखेसाठी ४५६, विज्ञान शाखेसाठी ४८४ गुण आवश्यक असल्याचे दिसून आले. बीएमसीसीमध्ये दुसऱ्या फेरीत असलेले ४७८ पात्रता गुण तिसऱ्या फेरीत ४८२ गुणांवर पोहोचले. शिवाजीनगरच्या मॉडर्न महाविद्यालयात दुसऱ्या फेरीत कला शाखेसाठी ३३७, वाणिज्य शाखेसाठी ४३७, विज्ञान शाखेसाठी ४४७ गुण आवश्यक होते, तर तिसऱ्या फेरीतील पात्रता गुण कला शाखेसाठी ४००, वाणिज्य शाखेसाठी ४३६, विज्ञान शाखेसाठी ४५० गुणांवर पोहोचले. सिम्बायोसिस महाविद्यालयात तिसऱ्या फेरीत कला आणि वाणिज्य शाखेसाठी ४६९ पात्रता गुण आहेत, तर दुसऱ्या फेरीत कला शाखेसाठी ४६५, वाणिज्य शाखेसाठी ४६६ गुण आवश्यक होते.

क्रीडा कोट्यातून महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्यांच्याकडे जिल्हा क्रीडा अधिकारी किंवा विभागीय क्रीडा उपसंचालक यांचे प्रमाणित प्रमाणपत्र असल्याची खात्री करून प्रवेश द्यावा. स्वातंत्र्यसैनिकांच्या पाल्यांना आरक्षणाचा लाभ देताना जिल्हाधिकारी, जिल्हा सैनिक मंडळाचे प्रमाणपत्र असल्याची खात्री करावी, अशा सूचना डॉ. परिहार यांनी महाविद्यालयांना दिल्या.

23/07/2024 | Pune | Page : 15
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# विद्यापीठाला मिळणार नवे कुलसचिव

## कुलसचिवपदासाठी अनेकांची फिल्डिंग; वादग्रस्त व्यक्तीची नेमणूक होणार का याकडे लक्ष

पुढारी विशेष

गणेश खळदकर
पुढारी प्रतिनिधी

**पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिवपदी नेमणूक करण्यासाठी १० आणि ११ जुलैला मुलाखती घेण्यात आल्या. परंतु, एका वादग्रस्त व्यक्तीची कुलसचिवपदी नियुक्ती होणार असल्याची चर्चा झाल्यामुळे विद्यार्थी संघटनांसह विद्यापीठातील कर्मचारी संघटनांनी आंदोलन केले. परंतु, येत्या दोन ते तीन दिवसांमध्येच कुलसचिवपदाची नियुक्ती केली जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठाला याच आठवड्यात नवे कुलसचिव मिळणार असल्याची माहिती विद्यापीठातील वरीष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे.**

विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिवपद विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राचे संचालक आणि संरक्षण व सामारीक शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजय खरे यांच्याकडे आहे. विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांचा कार्यकाल संपुष्टात आल्यानंतर रिक्त झालेल्या कुलसचिव पदाचा पदभार डॉ. खरे यांच्याकडे देण्यात आला. त्यानंतर विद्यापीठ प्रशासनाने प्राध्यापक, अधिष्ठाता पदाबरोबरच कुलसचिव पदभरतीची जाहिरात दिली होती. विद्यापीठाने दिलेल्या मुदतीत विद्यापीठाकडे ३६ अर्ज प्राप्त झाले. त्यातील पात्र उमेदवारांच्या मुलाखतीची प्रक्रिया पूर्ण झाली असून अनेकांनी कुलसचिव पदासाठी फिल्डिंग लावली आहे. कुलसचिव पदाच्या मुलाखती झाल्यानंतर कुलसचिवपदी कोणाची वर्णी लागणार याबाबत उत्सुकता निर्माण झाली होती. मात्र, काही संघटनांनी नियुक्ती जाहीर होण्यापूर्वीच कुलसचिवपदी एका व्यक्तीची निवड निश्चित होणार असल्याची असल्याची शक्यता व्यक्त करत या निवडीला विरोध केला आहे. संबंधित व्यक्तीवर महिलांना त्रास दिल्याच्या तक्रारी असून, अशा व्यक्तीची निवड कुलसचिवपदी होणे योग्य नाही, अशी भूमिका काही विद्यार्थी संघटनांनी घेतली आहे. यासंदर्भात युवा सेना (ठाकरे) सहसचिव कल्पेश यादव, स्टुडंट हेल्पींग हॅण्डसचे कुलदिप आंबेकर, विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुनील धिवार आदींनी आंदोलनाचा पवित्रा घेत विद्यापीठ प्रशासनाला इशारा दिला आहे.



### कोण आहेत स्पर्धेत?

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या माजी सदस्या व प्राचार्या शर्मिला चौधरी, माजी अधिसभा सदस्य राजकुमार शेटे यांच्यासह किवळे येथील सिंबायोसिस स्किल अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचे सुधाकर शिंदे, हर्ष गायकवाड, मनोहर सानप, संजय सानप, पंडित राधाकृष्ण, मिलिंद सूर्यवंशी, हेमांगिनी पाटील, महेश देशपांडे, सुनील कांदळकर, भारत जितुरकर, पंढरीनाथ पाटील, कैलास चंद्रात्रे, राजूसिंग चव्हाण, दिनेश डोके, तानाजी दवडे, संजयकुमार गांगुर्डे, सुगत बनसोडे, वंदना निकम, महादेव कोकाटे, जितेंद्र भोसले, नंदकुमार मंडलिक, सुनील म्हस्के, प्रसाद बाविस्कर, अमोल बापट, प्रशांत वानखडे, ज्योती भाकरे, बाळासाहेब आगरकर, वर्षा वानखडे, संध्या चव्हाण, कैलास सापनर, नानासाहेब साठे, अश्विनीकुमार सोनोने यातील पात्र उमेदवारांच्या मुलाखती पूर्ण झाल्या आहेत.

### प्रशासनावर दबाव

विद्यापीठातील कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव आदी पदांच्या नेमणुका होत असताना राजकीय हस्तक्षेप केला जातो हे काही लपून राहिलेले नाही. कुलसचिव पदासाठी एका वादग्रस्त व्यक्तीची नेमणूक राजकीय हस्तक्षेपातून होत असल्यामुळे आंदोलने करण्यात येत आहेत. त्यामुळे प्रशासनावर देखील दबाव आहे. राजकीय हस्तक्षेपाचा विचार करायचा की संघटनांच्या आंदोलनाचा विचार करून निर्णय घ्यायचा अशा कात्रीत विद्यापीठ प्रशासन सापडले आहे. तरीदेखील कायदेशीर सर्व बाबी तपासून आणि संघटनांच्या आंदोलनांची दखल घेऊन येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये योग्य तो निर्णय होणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

My Pune Edition Edition
Jul 23, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# विद्यापीठ कुलसचिवांची निवड जाहीर होण्यापूर्वीच आक्षेप

**लोकसत्ता प्रतिनिधी**

> साविित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अमृतमहोत्सव साजरा करीत असताना कुलसचिवपदी निष्कलंक आणि चारित्र्यसंपन्न व्यक्तीची नियुक्ती झाली पाहिजे. निवड समितीने उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र तपासण्याची गरज होती. मात्र, तसे झालेले नाही. त्यामुळे आक्षेपार्ह व्यक्तीची निवड केल्यास जनआंदोलन उभे करावे लागेल. - **हर्ष गायकवाड**, अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे

> विद्यापीठाच्या कुलसचिव पदासाठी मुलाखती होऊन दहा दिवस झाले तरी निवड गोपनीय का ठेवण्यात आली आहे? विद्यापीठ निवड जाहीर करत नाही, ही कृती विद्यापीठ कायदा तरतुदीचा भंग करणारी आहे. - **धनंजय कुलकर्णी**, माजी अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव पदासाठी मुलाखती झाल्या आहेत. या पदासाठी अद्याप अधिकृत निवड झालेली नसताना त्यापूर्वीच चर्चेतील नावावर आक्षेप घेण्यात आला आहे. राजकीय पक्ष, विद्यापीठातील संघटनांकडून संबंधितांची निवड रोखण्यासाठी आंदोलने, उपोषणे करण्यात येत आहेत.

विद्यापीठाच्या कुलसचिव पदासाठी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने १० आणि ११ जुलै रोजी मुलाखती घेतल्या. मुलाखती होऊन दहा दिवस उलटल्यानंतरही निवड जाहीर करण्यात आलेली नाही. मात्र एका व्यक्तीच्या नावाची सातत्याने चर्चा होत आहे. संबंधित व्यक्तीवर गंभीर स्वरुपाचे आरोप असल्याचा आक्षेप नोंदवत विरोध करण्यात येत आहे.

विद्यापीठाच्या कारभाऱ्यांनी आरोप होत असलेल्या व्यक्तीला नियुक्तीनंतर काही वाद निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी तुमचीच राहणार, अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र मुद्रांकावर देण्यास सांगितल्याची चर्चा आहे.

संबंधित व्यक्तीची कुलसचिव म्हणून निवड होणार असल्यास कर्मचारी संघटनांकडून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कर्मचारी संघाने दिला. युवासेनेचे शहरप्रमुख राम थरकुडे यांनी आंदोलन करून कुलसचिव निवड तातडीने जाहीर करण्याची मागणी डॉ. गोसावी यांच्याकडे केली.

विद्यापीठाच्या प्रतिष्ठेला साजेशी व्यक्ती न मिळणे ही खेदाची बाब आहे, समाजघटकांकडून होत असलेला विरोध लक्षात घेऊन विद्यापीठाने कुलसचिव पदाबाबतची भूमिका स्पष्ट करावी. कुलसचिव पदासाठी चारित्र्य तपासण्याची गरज नाही का, असा प्रश्न युवासेनेचे सहसचिव कल्पेश यादव यांनी उपस्थित केला.

24/07/2024 | Pune | Page : 03
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# स्टॅम्पपेपरवर लिहून द्या अन् कुलसचिव व्हा

### विद्यापीठात ठरावीक व्यक्तीसाठी कारभाऱ्यांचा आग्रह

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिवपदी आरोपीच्या पिंजऱ्यात एका ठरावीक व्यक्तीला बसविण्यासाठी विद्यापीठाच्या कारभाऱ्यांनी संबंधिताला स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र देण्यास सांगितले आहे. 'तुमच्या नियुक्तीनंतर काही वाद निर्माण झाल्यास, त्याची जबाबदारी तुमचीच राहील,' अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र स्टॅम्पपेपरवर लिहून देण्यास सांगितल्याची चर्चा आहे. त्यामुळे स्टॅम्पपेपरवर लिहून द्या आणि कुलसचिव व्हा, असा नवा फंडा विद्यापीठाच्या कारभारी मंडळींनी काढल्याचे चित्र आहे. विद्यापीठाला मुलाखतीला आलेल्या उमेदवारांपैकी केवळ संबंधित व्यक्तीच्या नियुक्तीसाठी अट्टाहास का, अशी चर्चा सुरू आहे.

पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव पदासाठी निवड प्रक्रिया सुरू आहेत. या पदांसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीची प्रक्रिया १० आणि ११ जुलै रोजी पार पडली. त्यासाठी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली समिती होती. मात्र, अजूनही कारभारी मंडळींना कुलसचिवपदासाठी निवड झालेल्या उमेदवारांचे नाव जाहीर करता आलेले नाही. कुलसचिव पदावर एका ठरावीक व्यक्तीची निवड होणार असल्याची चर्चा आहे. या व्यक्तीविरोधात महिलेला त्रास देण्याची तक्रार असून, गंभीर आरोप आहेत. याबाबत राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगानेही ठपका ठेवून, त्यांच्या नोकरीबाबत सूचना दिल्या होत्या. अशा व्यक्तीची कुलसचिव म्हणून निवड होणार असल्यास, कर्मचारी संघटनांच्या वतीने तीव्र स्वरूपात आंदोलन करण्यात येईल, असा इशारा विद्यापीठ कर्मचारी संघाच्या वतीने देण्यात आला. कर्मचारी संघाच्या शिष्टमंडळाने कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांची भेट घेऊन, त्यांना संबंधित व्यक्तीची निवड होऊ नये, याबाबत निवेदन दिले. युवासेनेचे शहरप्रमुख राम थरकडे यांनी आंदोलन करून, कुलसचिव निवड तातडीने जाहीर करण्याची मागणी डॉ. गोसावी यांच्याकडे केली.

**"कुलसचिवपदी निष्कलंक व चारित्र्यसंपन्न व्यक्तीची नियुक्ती व्हावी. निवड समितीने उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र तपासण्याची गरज होती. मात्र, तसे झालेले नाही. वादग्रस्त व्यक्तीची निवड केल्यास कुलगुरूंच्या विरोधात जनआंदोलन उभे करावे लागेल.**

– हर्ष गायकवाड, अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**विद्यापीठाच्या कुलसचिव पदाची निवड प्रक्रिया पूर्ण होऊनही निवडीचा निर्णय गोपनीय का? मुलाखती होऊन १० दिवस पूर्ण झाले, तरी निर्णय विद्यापीठ जाहीर करीत नाही, ही कृती कायद्याचा भंग करणारी आहे. निवड कोणाची करायची, याबाबत निवड समितीला पूर्ण स्वातंत्र्य असून, यावर काही कर्मचारी, प्राध्यापक संघटना दबाव आणत आहेत.**

– धनंजय कुलकर्णी, माजी अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**■ चारित्र्य प्रमाणपत्र तपासले?**

स्त्रियांचा अनादर करण्याचा आरोप असणाऱ्या व्यक्तीची विद्यापीठाच्या कुलसचिवपदी निवड केली जाणार असल्याची माहिती आहे. साध्या शिपाई पदावर नियुक्ती करायची असेल, तर संबंधित व्यक्तीचे चारित्र्य तपासले जाते. मात्र, कुलसचिव पदावर नियुक्त केल्या जाणाऱ्या व्यक्तीच्या चारित्र्याबाबत अनेक तक्रारी असताना, त्याच व्यक्तीचे नाव कुलसचिव पदासाठी पुढे केले जात आहे. कुलसचिव पदासाठी चारित्र्य तपासण्याची गरज नाही का, असा प्रश्न यामुळे निर्माण होतो, असा सवाल 'युवासेने'चे राज्य सहसचिव कल्पेश यादव यांनी सांगितले.

Maharashtra Times 25.7.2024

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

**लोकमत**

# कुलसचिव निवडीवर आक्षेप घेणारे 'हाजीर हो'

## समितीपुढे पुरावे, कागदपत्रे सादर करण्याची सूचना

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव निवडीवरून निर्माण झालेला वाद सोडविण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. कुलसचिव नियुक्तीवरून कुलगुरूंना प्राप्त झालेले निवेदन तसेच तक्रारींची समितीकडून मंगळवार, दि. ३० जुलै रोजी पडताळणी करण्यात येणार आहे. त्यासाठी तक्रारदारांनी प्रत्यक्ष हजर राहत म्हणणे मांडावे आणि त्यानुसार पुरावे आणि कागदपत्रे सादर करावे, असेही सांगण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या कुलगुरूंना कुलसचिव नियुक्तीवरून अनेक तक्रारी आणि निवेदने प्राप्त झाली आहेत. त्यानुसार पुणे विद्यापीठाच्या प्रशासन शिक्षकेतर कक्षाच्या उप कुलसचिवांनी सोमवारी, दि. २९ रोजी तक्रारदारांना ई-मेल पाठविले आहेत तसेच मंगळवारी, दि. ३० जुलै रोजी दुपारी बारा वाजता उपस्थित राहावे, यासंदर्भात आवाहन केले आहे. विद्यापीठाने स्थापन केलेल्या समितीसमोर आपले म्हणणे मांडणे तसेच केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पुरावे आणि कागदपत्रे सादर करण्यासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहावे, असे ई-मेलमध्ये नमूद केले आहे. त्यानुसार समितीसमोर उपस्थित राहून आम्ही आमची बाजू मांडणार आहोत, अशी माहिती विविध संघटनांच्या तक्रारदारांनी दिली.



> कुलसचिव नियुक्तीबाबत असंख्य तक्रारींचे निरसन करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने समिती स्थापना करण्यास १५ दिवस घेतले. मात्र, अचानकपणे ई-मेल करून तक्रारदारांकडून २४ तासांत स्पष्टीकरण मागण्यात येत आहे.
>
> **- डॉ. हर्ष गायकवाड, अधिसभा सदस्य, एसपीपीयू**

महिला कर्मचाऱ्याचा छळ केल्याप्रकरणी तक्रार दाखल असलेल्या उमेदवाराची कुलसचिवपदी नियुक्ती करू नये यावरून वादंग निर्माण झाले आहे. त्यामुळे मागील दोन आठवड्यापासून कुलसचिव पदाची निवड रखडली आहे. विद्यापीठ प्रशासनाकडूनही आक्षेप असलेल्या उमेदवाराचीच कुलसचिवपदी नियुक्तीचा हट्ट का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. युवासेनेच्या वतीने आंदोलन करण्यात आले तसेच विद्यापीठ कर्मचारी संघटना तसेच सिनेट सदस्याने याप्रकरणी कुलगुरूंची भेट घेत विरोध दर्शविला होता.

### विद्यापीठाकडून गुप्ततेचे धोरण

कुलसचिव निवडीवरून आलेल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी विद्यापीठाने समिती स्थापन केली आहे. मात्र, त्या समितीमध्ये किती सदस्यांचा समावेश आहे. अध्यक्ष तसेच सदस्यांची नावे जाहीर करावीत, अशी विचारणा केली असता कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी त्याबाबत बोलण्यास नकार दिला.

### चुकीच्या व्यक्तीची निवड नको

विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव आहे. महिला तसेच मागासवर्गीय कर्मचाऱ्याची छळवणूक केल्याचे आरोप असलेली व्यक्ती कुलसचिवसारख्या महत्त्वाच्या पदावर विराजमान होत असेल, तर त्याला आम्ही अखेरपर्यंत विरोध करू. राजकीय पक्ष व संघटनांच्या दबावाखाली कुलगुरू, कुलसचिव निवड समिती चुकीच्या व्यक्तीची निवड करण्याच्या प्रयत्नात आहेत, असे विद्यार्थी संघटनांतर्फे सांगण्यात आले.

Pune Main
Page No. 2 Jul 30, 2024
Powered by: erelego.com

## News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

# ठरावीक व्यक्तीसाठी विद्यापीठाचा बालहट्ट सुरूच

### विरोधक संघटनांच्या प्रतिनिधींशी 'लंच डिप्लोमसी'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची कुलसचिवपदाची निवड दिवसेंदिवस क्लिष्ट होत असून, ठरावीक व्यक्तीलाच हे पद देण्याचा चंग विद्यापीठाने बांधला आहे. कुलसचिव पदासाठी 'फिल्डिंग' लावलेल्या विरोधात तक्रारी देणाऱ्या, संघटनांच्या प्रतिनिधींना विद्यापीठात बोलावून त्यांची 'लंच'वर मनधरणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यासाठी चहा, नाश्ता आणि जेवणाची सोय करण्यात आली होती. तरीही तक्रारी केलेल्या सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी पुराव्यानिशी आपले म्हणणे मांडले.

विद्यापीठाची कुलसचिवपदाची निवडप्रक्रिया सुरू असून, इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती २० दिवसांपूर्वी पार पडल्या. मात्र, विद्यापीठाकडून निवड झालेल्या व्यक्तीचे नाव अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही. निवड समितीने निवड केलेल्या व्यक्तीचे नाव जाहीर होण्यापूर्वीच बाहेर आले. त्याच वेळी संबंधित व्यक्तीच्या विरोधात महिलांनी तक्रारी केल्या. त्यातील एका तक्रारीच्या अनुषंगाने केंद्र सरकारच्या अनुसूचित जाती आयोगाने संबंधित व्यक्तीवर कारवाईचा आदेश दिला होता. अशी पार्श्वभूमी असूनही संबंधित व्यक्तीलाच कुलसचिवपदी बसविण्याचा बालहट्ट विद्यापीठाने धरला. या पार्श्वभूमीवर विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींनी विद्यापीठाकडे तक्रारी केल्या होत्या.

तक्रारींचा अभ्यास करण्यासाठी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी माजी न्यायाधीश श्रीकृष्ण पानसे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. समितीसमोर तक्रार करणाऱ्या व्यक्तींना आपले म्हणणे पुराव्यानिशी मांडण्यासाठी मंगळवारी विद्यापीठात बोलावण्यात आले होते. पानसे यांनी तक्रारदारांची बाजू ऐकली. या वेळी संबंधित व्यक्तीची कुलसचिवपदी निवड करू नये, अशी एकमुखी मागणी करण्यात आली. या प्रक्रियेत अधिसभा सदस्य हर्ष गायकवाड, माजी अधिसभा सदस्य संतोष ढोरे, युवासेना सहसचिव कल्पेश यादव, स्टुडंट हेल्पिंग हँडचे कुलदीप आंबेकर, विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समितीचे राहुल ससाणे आदींनी आपले म्हणणे मांडले.

> संबंधित व्यक्तीने मुलाखतीच्या वेळी चालू असलेली चौकशी, आयोगाची कारवाई आदींची माहिती दडवली. त्यामुळे संबंधिताने विद्यापीठाची फसवणूक केली आहे. त्याच्यावर गुन्हा नोंद होण्याची शक्यता आहे. विद्यापीठाने मुलाखतीला आलेल्या सर्व व्यक्तींची माहिती उघड करावी. माहिती लपवणाऱ्यावर गुन्हा दाखल करावा.
>
> - कुलदीप आंबेकर, 'स्टुडंट हेल्पिंग हँड'



> समितीसमोर उपस्थित राहून म्हणणे सादर केले. विद्यापीठ प्रशासनाने अर्ज मागविण्याची प्रक्रिया राबविताना चौकशी सुरू आहे का अथवा चारित्र्य प्रमाणपत्र मागविणे गरजेचे होते.
>
> - डॉ. हर्ष गायकवाड, अधिसभा सदस्य

> विद्यापीठाच्या कुलसचिवपदी अनेक आरोप असलेल्या व्यक्तीची नियुक्ती का केली जाऊ नये, याची कारणे समितीसमोर मांडली. पुरावेही सादर केले. कुलसचिवपदी स्वच्छ चारित्र्याच्या व्यक्तीची निवड व्हावी, हीच आमची मागणी आहे. कुलसचिवपदी निवड न झालेल्या व्यक्तीची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याची शंका येते.
>
> - कल्पेश यादव, सहसचिव, युवासेना

स्टॅम्पपेपरवर लिहून द्या अन् कुलसचिव व्हा



Maharashtra Times 31.7.2024

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

प्रभात

Pune City 01 July 2024_005
01 Jul 2024
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

# यूजीसी-नेट परीक्षेत आता आपत्ती व्यवस्थापन विषयाची भर

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ३०** - विद्यापीठ अनुदान आयोग राष्ट्रीय पात्रता परीक्षेत (यूजीसी नेट) आता नव्या विषयाची भर पडणार आहे. डिसेंबरमध्ये होणाऱ्या परीक्षेत आपत्ती व्यवस्थापन विषयाचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी या बाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले. सहायक प्राध्यापक पदासाठी, संशोधन पाठ्यवृत्तीसाठी यूजीसी नेट परीक्षा वर्षातून जून आणि डिसेंबर अशी दोनवेळा घेतली जाते. यंदापासून पीएच.डी.च्या प्रवेशासाठीही याच परीक्षेचे गुण ग्राह्य धरण्याचा निर्णय यूजीसीने घेतला आहे. यूजीसी नेट परीक्षेत सध्या ८३ विषय उपलब्ध आहेत. त्यात आता आपत्ती व्यवस्थापन विषयाचा समावेश करण्यात येणार आहे.

तज्ज्ञ समितीने केलेल्या शिफारसीनुसार, यूजीसी नेटसाठी उपलब्ध असलेल्या विषयांमध्ये आपत्ती व्यवस्थापन हा अतिरिक्त विषय म्हणून यूजीसी नेटमध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय आयोगाच्या ५८० व्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार आता डिसेंबरमध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी आपत्ती व्यवस्थापन हा विषय उपलब्ध असणार आहे. या विषयासाठीचा अभ्यासक्रम यूजीसीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले.

सकाळ

# शिक्षण विभाग घेणार महाविद्यालयांचा 'क्लास'

## खासगी शिकवणी वर्गांशी 'टाय-अप' करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा

**पुणे, ता. ३० : इयत्ता अकरावीच्या पहिल्या नियमित फेरीचा कट-ऑफ जाहीर झाला असला, तरीदेखील नामांकित महाविद्यालयांबरोबरच अन्य फारशा प्रचलित नसलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांचा कट-ऑफदेखील तुलनेने अधिक असल्याचे दिसून येत आहे.**

'महाविद्यालयात प्रवेश घ्या आणि खासगी शिकवणीला हजेरी लावा,' अशी सवलत देणाऱ्या इंटिग्रेटेड महाविद्यालयांवर यंदा शिक्षण विभागाची करडी नजर असणार आहे. यंदा इंटिग्रेटेड महाविद्यालयांची कडक तपासणी करण्यात येईल, असे आश्वासन शिक्षण विभागाने दिले आहे. दरम्यान, खासगी क्लासवाल्यांशी 'टाय-अप' करणाऱ्या अशा महाविद्यालयांना शिक्षण विभाग पाठीशी का घालत आहे, असा प्रश्न विविध संघटना उपस्थित करत आहेत.

"नवीन स्वयं अर्थसहाय्यित कनिष्ठ महाविद्यालयांमधील काही महाविद्यालयांनी खासगी क्लासवाल्यांशी टाय-अप केल्याचे निदर्शनास येत आहे. याची पाहणी करण्यासाठी सर्व इंटिग्रेटेड महाविद्यालयांची कडक तपासणी करण्यात येणार आहे", अशी माहिती पुणे विभागाच्या सहाय्यक शिक्षण संचालक आणि इयत्ता अकरावी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समितीच्या सदस्य सचिव डॉ. ज्योती परिहार यांनी 'सकाळ'शी बोलताना दिली. त्या म्हणाल्या, "या इंटिग्रेटेड महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन संबंधित महाविद्यालयांची कडक तपासणी होईल. त्यात विद्यार्थ्यांची उपस्थिती, महाविद्यालयातील सुविधा अशा आवश्यक सर्व निकषांची पाहणी करण्यात येईल. त्यात काही त्रुटी आढळल्यास संबंधित महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात येईल. याशिवाय संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अकरावी आणि बारावीच्या परीक्षेला बसू दिले जाणार नाही." खासगी क्लासवाले आणि कनिष्ठ महाविद्यालयांतील टाय-अप उघड असतानाही, अशा कनिष्ठ महाविद्यालयांवर अद्याप कारवाई का करण्यात आलेली नाही, अशी विचारणा विविध संघटनांनी शिक्षण विभागाकडे केली आहे.

> दहावीला १०० टक्के, ९९ टक्के, ९८ टक्के मिळालेले विद्यार्थी नामांकित महाविद्यालयांत प्रवेश न घेता अकरावीचे वर्ग न भरणाऱ्या इंटिग्रेटेड महाविद्यालयात प्रवेश घेत असल्याचे अकरावी प्रवेशाच्या पहिल्या यादीतून दिसले आहे. पुण्यात नीट परीक्षेचे कोचिंग घेणारे खासगी क्लासवाले आणि महाविद्यालयांचे टाय-अप आहे. अशा महाविद्यालयांवर शिक्षणाधिकारी कोणतीही कारवाई का करत नाहीत, असा प्रश्न आहे.
>
> — **सुरेश जैन**, अध्यक्ष, महाराष्ट्र नागरी कृती समिती

### 'टाय-अप' म्हणजे काय?

- शहरातील काही इंटिग्रेटेड महाविद्यालयांनी खासगी क्लासवाल्यांशी टाय-अप केल्याचे दिसून येते
- अशा महाविद्यालयांत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील हजेरीत मुभा मिळते आणि हे विद्यार्थी संबंधित खासगी शिकवणी वर्गात उपस्थिती लावतात
- साधारणतः इयत्ता अकरावीपासूनच जेईई, नीट, सीईटी या प्रवेश परीक्षांची तयारी करणारे अनेक हुशार विद्यार्थी अशा इंटिग्रेटेड महाविद्यालयांमध्ये अकरावीला प्रवेश घेतात
- यंदाही अकरावीच्या प्रवेशाची पहिली नियमित यादी गुरुवारी जाहीर झाली
- या यादीतही फारसे प्रचलित नसणाऱ्या महाविद्यालयांचा कट-ऑफ हा ८० ते ९० टक्क्यांच्या आसपास असल्याचे दिसले

Pune, Pune-Today
01/07/2024 Page No. 2

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

लोकसत्ता

# विद्यापीठांतील अविवेकामागे लोकशाहीचा ऱ्हास

**महाराष्ट्रातील विद्यापीठांत** अलीकडे 'प्राचीन भारतीय विज्ञानांचे' शिक्षण देण्याची मोहीमच सुरू झाली आहे. २०२० च्या नवीन शैक्षणिक धोरणात 'भारतीय ज्ञान परंपरे'चे शिक्षण व संशोधन करण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार 'पारंपरिक शास्त्र' आणि 'प्राचीन विद्या' यांचे अभ्यासक्रम तयार करून ते राबवविले जात आहेत. माजी कुलगुरू डॉ. वसंत शिंदे हे 'सल्लागार' असलेल्या पुण्यातील एका उच्च शिक्षणसंस्थेत 'पुष्पक विमानविद्या' शिकविली जाते, मुंबई विद्यापीठाने 'मंदिर व्यवस्थापन' शिकवणे सुरू केले आहे. रामटेकच्या कालिदास संस्कृत विद्यापीठात 'फलज्योतिष्या'चा अभ्यासक्रम राबविला जातो. तर नागपूर विद्यापीठाने अलीकडेच हिंदू धर्म-संस्कृतीचे धडे देण्यासाठी एका धार्मिक संस्थेशी करार केला आहे. धोरणात तरतूद असलेल्या 'भारतीय ज्ञान परंपरे'चा नेमका उद्देश कोणता होता आणि जगातील कोणत्याही विद्यापीठांच्या अभ्यासक्रमाच्या कक्षेत येत नसलेले तथाकथित 'शास्त्र' आणि 'विद्या' भारतीय विद्यापीठांत शिकविण्यामागे नेमका उद्देश कोणता असे गंभीर प्रश्न निर्माण होतात. वस्तुतः विद्यापीठ हे संशोधनाचे आणि ज्ञान निर्मितीचे केंद्र असते. त्यामुळे तिथे कोणताही विषय वर्ज्य असू शकत नाही. पण शास्त्रकाट्याच्या कसोटीवर पूर्वीच निरर्थक ठरलेल्या अशास्त्रीय विषयांना छद्म-विज्ञानाच्या स्वरूपात पुनरुज्जीवित का केले जात आहे? आणि एकाच सांस्कृतिक व धार्मिक परिघातील प्राचीन परंपरा व कर्मकांडांचे प्रशिक्षण देण्याचे 'आदेश' जेव्हा विद्यापीठांना देण्यात येतात, तेव्हा संशय निर्माण होतो.

असा संशय निर्माण होण्याची कारणे समजून घेण्याची आणि अशा प्रकारच्या निर्णयाला विरोध करण्याची आवश्यकता का आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे. उदा. फलज्योतिष्य हे शास्त्र नाही, जनतेने त्याला बळी पडू नये असे एक पत्रक १९७५ साली जगातील १८६ शास्त्रज्ञांनी प्रसिद्ध केले आहे, ज्यात १८ नोबेल पुरस्कार विजेत्या शास्त्रज्ञांचा समावेश आहे. फलज्योतिष्याच्या सत्यतेविषयी पाश्चात्त्य देशांत वस्तुनिष्ठपणे अनेक चाचण्या घेण्यात आल्या. त्यावरून ते निव्वळ थोतांड असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे जगातील कोणत्याही नामवंत विद्यापीठात विज्ञान शाखेत असे अवैज्ञानिक अभ्यासक्रम राबवविले जात नाहीत. परंतु भारतातील अलीकडच्या काळात राजकीय वर्चस्व असलेल्या पुनरुज्जीवनवादी विचारव्यूहात नव्या ज्ञाननिर्मितीपेक्षा राजकीय महत्त्वाकांक्षेसाठी विद्यापीठांचा वापर केला जात आहे. यातून तर्क व विज्ञानाला डावलून समाजात अवैज्ञानिक तत्त्वे प्रस्थापित करण्याचे प्रयत्न होत आहेत.

याच प्रकारचे दुसरे एक उदाहरण तथाकथित प्राचीन विमानविद्येचे घेता येईल. आपल्या प्राचीन पुराणात 'पुष्पक विमाना'सारख्या अनेक कल्पना आहेत. पण विमान कसे बनवायचे असे शास्त्र सांगणारे कोणतेही साहित्य उपलब्ध नसल्याने विमानशास्त्र अस्तित्वात नाही. असा खुलासा ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी फार पूर्वीच केला आहे.

१९९८ मध्ये डॉ. मुरली मनोहर जोशी केंद्रात मानव संसाधन विकासमंत्री असताना नागपूर विद्यापीठाला 'पौरोहित्य' व 'फलज्योतिष' यांचे अभ्यासक्रम सुरू करावेत, असे वरून आदेश आले होते. त्यावरून सिनेटमध्ये ठराव मांडण्यात आला होता. सिनेटमधील अनेक सदस्यांनी त्या ठरावाला विरोध केला आणि 'दलित जातीतील मुलांनी या पदव्या घेतल्या तर त्यांची मंदिरात पुजारी म्हणून निवड होईल का?' यासारखे काही प्रश्नही उपस्थित केले होते. तेव्हा नागपुरात प्राध्यापक संघटना व पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांनी विद्यापीठाच्या प्रवेशद्वारासमोर आंदोलन केले होते. त्यानंतर तो प्रस्ताव मागे घेण्यात आला. त्या काळात प्रगतिशील विचारांच्या विद्यार्थी संघटनाही क्रियाशील होत्या. कारण तेव्हा विद्यापीठात विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका होत असत. त्याही आता बंद झाल्याने विद्यापीठाच्या राजकारणात लोकशाही पाळून होत असलेला हस्तक्षेप थंडावला आहे.

विद्यापीठातीलच नव्हे तर देशातील कोणत्याही क्षेत्रांत बुवाबाजी व अवैज्ञानिक प्रकार घडत असतील त्यांना विरोध करण्याची जबाबदारी विद्यापीठांतील प्राध्यापक व संशोधकांचीच असते. जगभरच्या विद्यापीठांत अशी आंदोलने होत असतात. महाराष्ट्रात मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना एके दिवशी गणपतीची मूर्ती दूध पीत आहे, अशी अफवा वाऱ्यासारखी पसरली. खुद्द मुख्यमंत्र्यांच्या हातून गणपती दूध प्यायल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. तेव्हा विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष प्रोफेसर यशपाल होते. त्यांनी टीव्हीवर प्रात्यक्षिक करून ती कशी अंधश्रद्धा आहे, हे समजावून सांगितले होते. प्रात्यक्षिक करण्यासाठी त्यांनी चप्पल बनविण्याचे हत्यार वापरले होते. (वर्तमानकाळात एखाद्या विद्यापीठाचा कुलगुरू किंवा एखादा भौतिकशास्त्राचा प्राध्यापक तरी असे धाडस करू शकेल का, याची कल्पना करा.) पण अलीकडे कोणत्याही विद्यापीठातील कोणीही संशोधक किंवा प्राध्यापक सामाजिक प्रबोधनासाठी पुढे येत नाही. उलट नवीन शैक्षणिक धोरणाचे कारण पुढे करून इतिहासाच्या पुस्तकातील मुस्लीम राजवटींचा कालखंड का वगळला पाहिजे, हेच आपल्याला ठासून सांगतात. याचे कारण एक 'अदृश्य शक्ती' त्यांच्या प्रत्येक कृतीकडे लक्ष ठेवून असल्याचे त्यांना माहीत आहे. त्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन किंवा सामाजिक बांधिलकीपेक्षा स्वतःचे करिअर महत्त्वाचे वाटणे स्वाभाविक आहे. याचे आणखी एक कारण असे की त्यांच्या पाठीशी उभ्या राहतील, अशा शिक्षण संघटनाही आता अस्तित्वात नाहीत. राजकीय विश्लेषण किंवा सत्यशोधन करू पाहणाऱ्या संशोधकांना व प्राध्यापकांना विद्यापीठांनी कार्यमुक्त केल्याच्या घटनाही घडल्या आहेत. बुद्धिप्रामाण्यवाद शिकविताना धार्मिक भावना दुखावल्याच्या कारणावरून मागील वर्षी पुण्यातील सिम्बॉयसिस संस्थेतील प्राध्यापकाला अटक झाली होती. फेब्रुवारी महिन्यात पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रात एका नाटकाच्या प्रयोगाच्या वेळी काही संघटनांनी गोंधळ घातला, पण अटक केंद्रप्रमुखाला झाली.

### निवडणुकीऐवजी नेमणुका

विद्यापीठ क्षेत्रातील प्राध्यापक संघटना एकाएकी कशा अस्तंगत झाल्या, याचे उत्तर शोधण्यासाठी मागे जावे लागते. पूर्वी विद्यापीठांचे व्यवस्थापन करणारी प्राधिकरणे तेव्हा लोकशाही पद्धतीने अस्तित्वात येत असत. त्यासाठी निवडणुका होत आणि या निवडणुकांमध्ये प्राध्यापक संघटना उतरत असत. आता त्या निवडणुकांचे काय झाले? जुन्या महाराष्ट्र विद्यापीठअधिनियमात (युनिव्हर्सिटी ॲक्ट) अभ्यास मंडळापासून ते सिनेट या सर्वोच्च प्राधिकारिणीतील सदस्यांची निवड निवडणुकीने करण्याची तरतूद होती. विविध सामाजिक, राजकीय व वैचारिक गटातील विद्वान निवडणूक लढवून तिथे येत असत. त्यामुळे एकांगी निर्णय होत नसत.

परंतु २०१४ नंतर, २०१६ मध्ये महाराष्ट्रातील विद्यापीठांसाठी नवीन विद्यापीठ अधिनियम अस्तित्वात आले. विद्यापीठांच्या वैधानिक मंडळे आणि समित्यांवरील सदस्यांची निवड निवडणुकांमधून होण्याचे प्रमाण जवळपास शून्यावर आणले गेले. अधिकाधिक सदस्य हे एक तर राज्यपाल वा कुलगुरू यांनी नामांकन करण्याची तरतूद या कायद्यात आहे. २०१४ नंतर महाराष्ट्रातील राज्यपालांच्या नेमणुका कशा झाल्या हे सर्वश्रुत आहे. कुलगुरूंची निवडसुद्धा 'प्राचीन भारतीय संस्कृतीचे संवर्धन व रक्षण' या व्यापक तत्त्वासाठी कार्य करणाऱ्या देशातील संघटनांच्या, राजकीय पक्षांच्या आणि संस्थांच्या प्रभावाखाली झाल्याचे उघडपणेच दिसून येते. त्यामुळे केंद्रातील सरकार, राज्यातील राज्यपाल व विद्यापीठातील कुलगुरू हे एकाच उद्दिष्टपूर्तीसाठी कार्य करण्याची साखळी कधी नव्हे ती महाराष्ट्रात तयार झाली. अशा २०१६ च्या महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमातील लोकशाहीविरोधी तरतुदींमध्ये सुधारणा करण्यासाठी यूजीसीचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांची एक समिती नियुक्त करण्यात आली होती. पण २०१९ नंतरच्या सुंदोपसुंदीत त्यांच्या अहवालाचे काय झाले कळलेच नाही.

परिणामी अभ्यासमंडळातील दहा सदस्यांपैकी आठ सदस्य हे विशिष्ट विचारसरणीच्या संस्थांत कार्य करणारे, प्राचीन संस्कृतीचे संवर्धन व रक्षण करणाऱ्या संघटनांशी कटिबद्ध असलेले किंवा तशा संस्था व व्यवसायांत अग्रेसर असलेले लोकच नियुक्त केले गेले. परिणामी मंडळाच्या बैठकीत विरोध करू शकणारे सदस्यच उरले नाहीत. २०१४ नंतर प्रत्येक संस्थांमधील लोकशाही रचना उद्ध्वस्त करण्याचे पद्धतशीर प्रयत्न केले गेले; त्यात विद्यापीठ तर नवीन पिढी घडविणारी, समाजाच्या संरचनेवर दीर्घकाळ परिणाम घडवून आणणारी संस्था आहे.

एका विशिष्ट संकुचित विसरसरणीच्या प्रसारासाठी फार व्यापक व दीर्घकाळचे धोरण आखून, ते धोरण अमलात आणण्याची महत्त्वाकांक्षा असलेल्या संघटना जेव्हा लोकशाहीच्याच (तथाकथित मार्गाने) मार्गाने सत्ताबाह्य सत्ताकेंद्र बनतात, तेव्हा या गोष्टी घडत असतात. ज्ञानाच्या क्षेत्रात लोकशाही तत्त्व टिकवून ठेवण्यासाठी निरपेक्ष ज्ञानच कामी येते. अजूनही वेळ गेलेली नाही. समाजाला आणि देशाला मूलतत्त्ववादी विचारव्यूहापासून आणि राजकीय हुकूमशाहीपासून वाचवायचे असेल तर, लोकशाहीवर विश्वास असलेल्या प्राध्यापक व विद्यार्थी संघटनांनी निर्भयपणे पुढे येणे आवश्यक ठरते.

02/07/2024 | Pune | Page : 07
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

लोकमत

# 'त्या' शिक्षकांना जुनी पेन्शन देण्याबाबत ३ महिन्यांत निर्णय

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची विधानसभेत घोषणा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील निमशासकीय व अनुदानित संस्थांमध्ये काम करणारे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ पूर्वी निघालेल्या जाहिरातीनुसार त्यानंतरच्या कालावधीत सेवेत रुजू झाले असल्यास त्यांनाही जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय देण्याचा निर्णय पुढील तीन महिन्यांच्या आत घेण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत प्रश्नोत्तरांच्या तासात सोमवारी दिली.



या संदर्भातील प्रश्न संजय केळकर (भाजप) यांनी उपस्थित केला होता. बाळासाहेब थोरात, आशिष शेलार यांनी उपप्रश्न विचारले. अजित पवार म्हणाले की, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिराती निघालेल्या व त्यानंतर शासन सेवेत रुजू झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय देण्याचा निर्णय शासनाद्वारे नुकताच घेण्यात आला आहे. या निर्णयात केवळ शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती नियम-१९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण नियम-१९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक पर्याय निवडण्याचा विकल्प देण्यात आला आहे.

निमशासकीय व अनुदानित संस्थांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने त्यांच्या बाबतीत हा निर्णय लागू करण्यात आलेला नाही. सर्वोच्च न्यायालय जो निर्णय देईल, त्याची कार्यवाही राज्य शासनामार्फत करण्यात येईल, असे आश्वासनही अजित पवार यांनी दिले.

### निवृत्त अधिकाऱ्यांची अभ्यास समिती

१ देशाच्या, इतर राज्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून तत्कालीन केंद्र सरकारने जुनी निवृत्ती वेतन योजना बंद करून नवीन निवृत्ती वेतन योजना सुरु करण्याचा निर्णय घेतला होता.

२ त्यानंतरच्या काळात विविध राज्यांतील शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी जुनी निवृत्ती वेतन योजनाच लागू करण्याची मागणी केली होती. याबाबत केंद्र सरकार सकारात्मक आहे. राज्य शासनानेही केंद्राकडे माहिती मागितली आहे.

३ अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मागणीचा अभ्यास करून शिफारस करण्यासाठी राज्य सरकारने देखील निवृत्त सनदी अधिकाऱ्यांची समिती नेमली आहे. याबाबत शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या संघटनांशी चर्चा केली आहे.

४ जुन्या निवृत्ती वेतन संदर्भातील राज्य सरकारच्या भूमिकेबाबत नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात निवेदन करण्यात आले आहे. काही राज्यांनी घेतलेल्या निर्णयासंदर्भातील माहिती देखील मागविली आहे.

५ सरकार अधिकारी-कर्मचाऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. पेन्शनबाबत योग्य पद्धतीने न्याय दिला जाईल, असेही अजित पवार यांनी सांगितले.

Pune Main
Page No. 4 Jul 02, 2024
Powered by: erelego.com

लोकसत्ता

# एनसीसी वैकल्पिक विषयासाठी महाविद्यालयांना संलग्नता आवश्यक

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** देशभरातील महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) हा वैकल्पिक विषय म्हणून देण्यास या पूर्वीच मान्यता देण्यात आली आहे. मात्र आता त्यासाठी महाविद्यालयांना एनसीसीची संलग्नता घ्यावी लागणार आहे.

यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले. एनसीसी हा वैकल्पिक विषय म्हणून उपलब्ध करून देण्याबाबत यूजीसीने २०२१मध्ये दोन वेळा परिपत्रक प्रसिद्ध केले होते. मात्र एनसीसी हा वैकल्पिक विषय म्हणून



उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्यालयांनी एनसीसीची संलग्नता प्राप्त करून घेणे आवश्यक असल्याबाबत एनसीसीच्या महासंचालकांनी स्पष्ट केले आहे. एनसीसी छात्र म्हणून नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच एनसीसी हा वैकल्पिक विषय म्हणून उपलब्ध करून देता येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर या संदर्भात महाविद्यालयांनी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतची सूचना यूजीसीकडून करण्यात आली आहे.

एनसीसी हा वैकल्पिक विषय म्हणून उपलब्ध करून देण्याचा निर्णय २०१६मध्ये घेण्यात आला होता. मात्र विविध कारणांमुळे तो सुरू होऊ शकला नाही. मात्र राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०मधील तरतुदीनुसार एनसीसीचा अभ्यासक्रम वैकल्पिक विषय म्हणून विकसित करून २०२१मध्ये उपलब्ध करण्यात आला. एनसीसीचा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचे श्रेयांक मिळतील. तसेच एनसीसीचे ब आणि क प्रमाणपत्रही दिले जाईल.

02/07/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

*News Paper Clippings During July 2024*

*Section: Education*

लोकमत

# बीबीए, बीबीएम, बीसीएच्या सीईटी अर्जास सुरुवात

## ३ जुलैपर्यंत करता येणार उमेदवारांना अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी सेल)तर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या सीईटी परीक्षेच्या गुणवत्ता यादीनुसार केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे बी.बी.ए., बी.सी.ए, बी.बी.एम. आणि बी.एम.एस. पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश दिला जाणार आहे. इच्छुक उमेदवारांना दि. २९ जून ते ३ जुलै या कालावधीत सीईटी परीक्षेसाठी ऑनलाइन माध्यमातून अर्ज करता येणार आहेत.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई)मार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून बी.बी.ए., बी.सी.ए., बी.बी.एम. आणि बी.एम.एस. पदवी अभ्यासक्रम नियंत्रित केले जाणार आहेत, असे विद्यापीठ अनुदान आयोगाने स्पष्ट केले आहे, तसेच उच्च शिक्षण संचालनालयामार्फत या पदवी महाविद्यालयांचे नियंत्रण करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

दरम्यान, सीईटी सेलतर्फे गत महिन्यात दि.२९ मे रोजी महा- बी.बी.ए., बी.सी.ए., बी.बी.एम. आणि बी.एम.एस. सीईटी २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. मात्र, या प्रवेश परीक्षेमार्फत प्रवेश मिळणार आहे, याबाबत बारावी उत्तीर्ण झालेल्या बहुतांश विद्यार्थी, तसेच पालकांना माहिती नव्हती. त्यामुळे या पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी पुन्हा एकदा सामायिक प्रवेश परीक्षा घेण्याचे सीईटी सेलतर्फे काही दिवसांपूर्वी स्पष्ट करण्यात आले होते. त्यानुसार इच्छुक उमेदवारांना दि.२९ जून ते ३ जुलै या कालावधीमध्ये https://cetcell.mahacet.org/ या संकेतस्थळावर सीईटी या टॅबमध्ये महा- बी.बी.ए., बी.सी.ए., बी.बी.एम. आणि बी.एम.एस. सीईटी-२०२४ साठी नोंदणी अर्ज भरता येणार आहे.

Pune Main
Page No. 8 Jul 02, 2024
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

लोकमत

# अकरावी प्रवेशाकडे विद्यार्थ्यांची पाठ; पहिल्या फेरीत केवळ २० हजार प्रवेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावी प्रवेशाकडे विद्यार्थ्यांनी पाठ फिरविल्याचे चित्र आहे. पहिल्या फेरीत प्रवेश जाहीर झालेल्या ३८ हजार ८९० विद्यार्थ्यांपैकी सुमारे २० हजार विद्यार्थ्यांनीच महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे.

अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया सुरू आहे. पहिल्या फेरीची प्रवेश यादी दि. २६ जून रोजी प्रसिद्ध करण्यात आली. त्यामध्ये नोंदणी केलेल्या ६६ हजार १३४ पैकी ३८ हजार ८९० विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाले होते. या विद्यार्थ्यांना सोमवार, दि. १ जुलै रोजी सायंकाळी साडेसात वाजेपर्यंत २० हजार ५६२ विद्यार्थ्यांनी कागदपत्रे आणि शुल्क भरून प्रवेश निश्चित केला आहे. उर्वरित सुमारे १८ हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नसल्याचे दिसून येत आहे. यातील अनेकांना पहिल्या पसंतीचे कॉलेज प्रवेशासाठी जाहीर झाले होते. त्यामुळे या विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे अनिवार्य होते. मात्र, त्यांनी प्रवेश घेतला नसल्यास, त्यांना दुसऱ्या फेरीत सहभागी होता येणार नाही. अकरावी प्रवेश प्रक्रियेच्या अधिक माहितीसाठी https://pune.11thadmission.org.in/Public/Home.aspx या संकेतस्थळावर भेट द्यावी.

### दि. ३ जुलैपासून दुसरी फेरी

अकरावी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीने दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना बुधवार, दि. ३ जुलैपासून महाविद्यालयांचा पसंतीक्रम भरता येणार आहे. त्याचप्रमाणे आतापर्यंत नोंदणी न केलेल्या विद्यार्थ्यांना नोंदणी करता येणार आहे.

### दुसऱ्या प्रवेश फेरीचे वेळापत्रक

- नोंदणी न केलेल्यांना नाव नोंदणी, महाविद्यालय पसंतीक्रम भरणे, प्रवेश जाहीर न झालेल्या विद्यार्थ्यांना कॉलेजचे पसंतीक्रम बदलण्याची संधी : दि. ३ ते ६ जुलै
- कोटा प्रवेशासाठी ऑनलाइन प्रक्रिया सुरु : दि. ३ ते ६ जुलै
- प्रवेशाची दुसरी निवड यादी प्रसिद्ध करणे : १० जुलै
- प्रवेश निश्चित करून, महाविद्यालयांत कागदपत्रे आणि शुल्क भरून प्रवेश घेणे : १० ते १२ जुलै (सायं. ६)

Pune Main
Page No. 12 Jul 02, 2024
Powered by: erelego.com

# पुणे विद्यापीठातील प्राध्यापक भरती विधानसभा निवडणुकीनंतर होणार?

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध विभागांमधील प्राध्यापकांच्या १११ रिक्त जागांसाठी विद्यापीठातर्फे भरती प्रक्रिया राबवली जात आहे. मात्र मराठा आरक्षणाचा अंतर्भाव करून नव्याने सर्व प्रक्रिया करावी लागणार आहे. त्यासाठी विद्यापीठाने पत्रव्यवहार सुरू केला आहे. सध्या मंत्रालयात नवी बिंदुनामावली तपासणीसाठी देण्यात आली आहे. त्यास सुमारे आठ ते पंधरा दिवसांचा कालावधी लागू शकतो. त्याचप्रमाणे विद्यापीठाला उमेदवारांना मराठा आरक्षणानुसार पुन्हा अर्ज करण्याची संधी द्यावी लागणार आहे. या सर्व प्रक्रियेस सुमारे दोन महिन्यांचा कालावधी जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठातील प्राध्यापक भरती विधानसभा निवडणुकीनंतर होण्याची शक्यता विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

प्राध्यापक पदाच्या १११ जागांसाठी विद्यापीठाकडे ५ हजार ५०१ अर्ज प्राप्त झाले आहेत. मात्र, १० टक्के मराठा आरक्षणाचा अंतर्भाव करून नवीन बिंदुनावामावली तयार करून पुण्यातील मागासवर्गीय कक्षाकडून दोन दिवसांपूर्वी तपासून घेतली आहे. आता ही बिंदुनामावली मंत्रालयात तपासणीसाठी पाठवण्यात आली आहे. त्यामुळे पुढील सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन प्राध्यापक भरती करण्यासाठी बराच कालावधी जाणार आहे.



विद्यापीठातील प्राध्यापकांची पदभरती लवकरात लवकर व्हावी, यासाठी विद्यापीठ व शासनस्तरावर पाठपुरावा केला जात आहे. विधानसभा निवडणूकीपूर्वी भरती पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

– **डॉ. देविदास वायदंडे,** परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

तसेच विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या अर्जात आणखी वाढ होऊ शकते. त्यातच विधानसभा निवडणुकीची आचार संहिता पुढील दोन–अडीच महिन्यात जाहीर होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. तत्पूर्वी नव्याने अर्ज मागवणे किंवा केवळ मराठा आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना संकेतस्थळ उपलब्ध करून देणे आणि त्यानुसार प्राप्त अर्जांची छाननी करणे, ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आव्हान विद्यापीठासमोर असणार आहे.

निवडणुकीची आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वी या सर्व बाबी पूर्ण झाल्या तरीही प्रत्येक विषयासाठी निवड कमिटी स्थापन करावी लागणार आहे.

तसेच पात्र उमेदवारांना कमीत कमी १५ दिवस आधी मुलाखतीची तारीख कळवावी लागणार आहे. त्यामुळे पुढील दोन–अडीच महिन्यात सर्व प्रक्रिया पूर्ण करणे शक्य दिसत नाही. त्यामुळे भरती प्रक्रिया विधानसभा निवडणुकीनंतर होण्याचा अंदाज विद्यापीठातील अधिकाऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे.

प्राध्यापक भरतीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. त्यातच गेल्या तीन दिवसांपासून उच्च शिक्षण संचालक कार्यालयासमोर प्राध्यापक संघटनेचे बेमुदत उपोषण सुरू आहे. लाखो पात्र उमेदवार नोकरीच्या शोधात आहेत. मात्र, तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांची संख्या वाढवून शासन या उमेदवारांची आर्थिक पिळवणूक करत आहे. त्यामुळे शासनाने १०० टक्के प्राध्यापक भरती करावी. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील रिक्त जागांसह राज्यातील इतर रिक्त जागांची भरती जलद गतीने करावी.

– **संदीप पाथ्रीकर,** अध्यक्ष, महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटना

Kesari 2.7.2024

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

सकाळ

# 'यूजीसी-नेट'चा ढिसाळ कारभार

**विद्यापीठ अनुदान आयोगाने 'नेट' परीक्षा रद्द केल्याने लाखो इच्छुक उमेदवारांच्या इच्छा-आकांक्षांवर पाणी फेरले गेले आहे. एकूण परीक्षा प्रक्रियेपासून ते अंमलबजावणी यंत्रणेपर्यंत अनेक बाबतीत ढिसाळ नियोजन दिसून आले.**

**■ राजश्री साकळे**

विद्यापीठ अनुदान आयोगाची 'यूजीसी-नेट' ही प्रवेश परीक्षा १८ जून २०२४ रोजी झाली. सहाय्यक प्राध्यापक, जेआरएफ (कनिष्ठ व्याख्याता शिष्यवृत्ती) आणि पीएचडीसाठी ही प्रवेशपरीक्षा होती. ती १९ जून रोजी रद्ददेखील झाली. परीक्षेच्या वेबसाईटपासूनच 'यूजीसी-नेट'चा ढिसाळ कारभार दिसून आला. साठ वर्षे वयाच्या विद्यार्थ्याला फक्त पीएचडीसाठी परीक्षा अर्ज भरायचा असला तरी सहाय्यक प्राध्यापक हा पण पर्याय निवडला जात होता. साठाव्या वर्षी प्राध्यापक निवृत्त होतात, मग ते नेट परीक्षा का देतील? यामुळे फक्त पीएचडी करू इच्छिणाऱ्या आणि पंचावन्न वयापुढील विद्यार्थ्यांची स्वतंत्र वर्गवारी करावी किंवा त्यांची पेट परीक्षा विद्यापीठांकडे सोपवावी म्हणजे काही कारणांमुळे पीएचडी करण्याचे राहून गेलेल्या व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, महिला अशा अनेकांना संशोधन करण्याची संधी मिळेल. वेगवेगळ्या क्षेत्रांतील संशोधनाला चालना मिळेल.

अनेक मोठमोठ्या शहरांत शाळा, महाविद्यालये मोठ्या प्रमाणात उपलब्ध असताना 'यूजीसी-नेट'ने परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना ऐंशी-नव्वद किलोमीटरवरील, खेड्यातले परीक्षाकेंद्र दिले. तिथपर्यंत पोहोचण्यासाठी दळणवळणाची सोय नसल्याने तब्बल दोन लाख तेरा हजार विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिले. याला 'यूजीसी-नेट' जबाबदार आहे. 'यूजीसी-नेट' भरमसाठ परीक्षा शुल्क घेते, पण सेवा देत नाही.

### प्रश्नपत्रिकेत सावळा गोंधळ

प्रश्नपत्रिका दोन भाषांमध्ये होती. इंग्रजी भाषेतील प्रश्न आणि त्याच्याखाली हिंदी भाषांतर. या दोन्हीत पुरेशी जागा सोडलेली नसल्याने विद्यार्थ्यांचा गोंधळ झाला. वरचा प्रश्न कुठे संपला आणि नंतरचा प्रश्न कुठे सुरू झाला, हे लक्षात येण्यातच वेळ गेला. सेट परीक्षेत कागदाच्या डाव्या बाजूला इंग्रजी भाषेत प्रश्न आणि उजव्या बाजूला त्याचे मराठी भाषांतर, दोन्हीच्या मध्ये उभी रेष असा सुटसुटीतपणा असल्यामुळे विद्यार्थ्यांचा खूप वेळ वाचतो. अशा पद्धतीची 'यूजीसी-नेट'ची प्रश्नपत्रिका असायला काय हरकत आहे? प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांचे स्वरूपही कोड्यात टाकणारे होते. प्रवास वर्णनांचा प्रकाशन वर्षानुसार



क्रम लावा, कादंबरींचा प्रकाशन वर्षानुसार क्रम लावा, कथासंग्रहातील कथांचा क्रम लावा, कवितासंग्रहातील कवितांचा क्रम लावा, कादंबरीतील घटनांचा क्रम लावा, कथासंग्रहाचा प्रकाशन काळानुसार क्रम लावा, दलित साहित्य कृतींचा इसवी सनाप्रमाणे क्रम लावा, जन्मानुसार शाहीर कवींचा क्रम लावा, कथालेखकांच्या कथासंग्रहांचा काळानुसार क्रम लावा, लोकसाहित्याच्या ग्रंथांचा कालानुक्रम लावा, असेही प्रश्न विचारले होते. राष्ट्रीय पातळीवरील प्रश्नपत्रिकेचे असे स्वरूप कसे काय? त्या स्वरूपावर विश्वास ठेवणेही कठीणच होते.

### 'यूजीसी'चे उलटे फतवे

पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या (मास्टर डिग्री) वर्गासाठी ज्यांची पूर्णवेळ प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली आहे, केवळ अशाच प्राध्यापकांना पीएचडीसाठी गाईड म्हणून काम करता येईल, असा विद्यापीठ अनुदान आयोगाने डिसेंबर २०२२ मध्ये फतवा काढला. त्यामुळे डिसेंबर २०२२ पूर्वी ज्या प्राध्यापकांनी गाईड म्हणून काम केले, त्यांच्याकडे जागा रिकाम्या असल्यातरी ते पीएचडीसाठी विद्यार्थी घेऊ शकत नाहीत. दुसरा मुद्दा असा की, एखाद्या गाईडचे निधन झाले तर त्याच्याकडील विद्यार्थी 'यूजीसी'च्या नवीन नियमानुसार पीजीला पूर्णवेळ शिकवणाऱ्या प्राध्यापकाकडे वर्ग केले जातात. त्यामुळे 'नेट' परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना गाईड उपलब्ध होत नाहीत. नवीन शैक्षणिक धोरणात संशोधनाला प्राधान्य आहे. त्या धोरणांची अंमलबजावणी करणारी 'यूजीसी' नेमके उलटे फतवे काढत आहे. दुसरी गंभीर समस्या म्हणजे, अनेक वर्षांपासून विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील सहाय्यक प्राध्यापकांच्या जागा भरायला 'यूजीसी'ने परवानगी दिलेली नाही.

यावर्षी जूनमध्ये नऊ लाख आठ हजार विद्यार्थ्यांनी नेट परीक्षा दिली. म्हणजे नेट उत्तीर्ण होणारे विद्यार्थी लाखांत आहेत आणि गाईड प्राध्यापकांच्या जागा रिकाम्या आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे परीक्षाशुल्क, मेहनत आणि भविष्यातील नोकरीची संधी सगळंच हातातून जाणार. मग परीक्षा घेण्याचा उद्देश काय? विद्यार्थ्यांची अशी क्रूर थट्टा का? 'यूजीसी' वर्षातून दोन वेळेला नेटची परीक्षा घेते. यावर्षी जूनमध्ये ११ लाख २१ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरले. खुल्या वर्गासाठी अकराशे पन्नास रुपये परीक्षाशुल्क होते. इतर वर्गासाठीची सवलत लक्षात घेता, सरासरी प्रत्येकी एक हजार रुपये परीक्षाशुल्क धरले तर, 'यूजीसी'ला मिळणारी रक्कम डोळे पांढरे करणारी आहे. ही रक्कम वर्षातून दोन वेळेला मिळते; कारण 'यूजीसी' नेट परीक्षा जून आणि डिसेंबर अशी वर्षातून दोनदा होते. गाईड उपलब्ध करून दिलेले नसताना, निव्वळ आर्थिक फायद्यासाठी 'यूजीसी' नेट परीक्षा घेते, असे म्हणायला मोठाच वाव आहे.

डिसेंबर २०२२ पूर्वी प्रत्येक विद्यापीठे आपापल्या पातळीवर पेट परीक्षा घेऊन, पीएचडीसाठी विद्यार्थी निवडत असत. चांगली रुळलेली ही व्यवस्था 'यूजीसी'ने बालिश फतवा काढून विनाकारण खिळखिळी करून टाकली. नवीन शैक्षणिक धोरणानुसार संशोधनाला प्राधान्य देत, 'यूजीसी'ने सहाय्यक प्राध्यापक आणि 'जेआरएफ'साठी नेट परीक्षा घ्यावी. फक्त पीएचडी करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पेट परीक्षा पूर्ववत विद्यापीठांकडे सोपवावी.

**(लेखिका सामाजिक प्रश्नांच्या अभ्यासक आहेत.)**

Pune, Main
03/07/2024 Page No. 7

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# दहावी, बारावीची पुरवणी परीक्षा १६ जुलैपासून

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे दहावी-बारावीच्या पुरवणी परीक्षा १६ जुलैपासून सुरू होणार आहेत. या परीक्षांसाठीचे प्रवेशपत्र गुरुवारपासून (४ जुलै) उपलब्ध करून देण्यात येणार असून, कोणतेही शुल्क न घेता प्रवेशपत्राची मुद्रित प्रत विद्यार्थ्यांना देण्याची सूचना राज्य मंडळाचे प्रभारी सचिव शैलेंद्र पाटील यांनी दिली.

जुलै-ऑगस्टमध्ये होणाऱ्या दहावी-बारावीच्या पुरवणी परीक्षेची प्रवेशपत्रे सर्व विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी मुद्रित करून विद्यार्थ्यांना द्यायची आहेत. प्रवेशपत्राची मुद्रित प्रत देण्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क न घेण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास पुन्हा मुद्रित प्रत घेऊन त्यावर लाल शाईने द्वितीय प्रत असा शेरा मिळणार आहे.

03/07/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

सकाळ

# 'बीबीए', 'बीसीए'ला शिष्यवृत्ती द्यावी लागेल

## डॉ. टी. जी. सीताराम यांचे प्रतिपादन

**पुणे, ता. ३ :** "बीबीए आणि बीसीए अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने आपल्या कार्यक्षेत्रात घेतला आहे. या अभ्यासक्रमांना आता व्यावसायिक अभ्यासक्रमांचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीप्रमाणेच या अभ्यासक्रमांना राज्य सरकारला शिष्यवृत्ती द्यावी लागेल," असे अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. टी. जी सीताराम यांनी बुधवारी सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी प्रदान सोहळ्यात डॉ. सीताराम प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सोहळ्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, "एआयसीटीईने बीबीए, बीसीए अभ्यासक्रम आपल्या कार्यक्षेत्रात घेतल्यानंतर सुरू झालेला वाद आता मावळत आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून बीबीए, बीसीए अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना एआयसीटीईकडून स्वतंत्र शिष्यवृत्ती देणार आहे. याच धर्तीवर राज्य सरकारकडूनही या अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळेल. काही दिवसांपूर्वी राज्यांच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सचिवांची बैठक झाली होती. त्या बैठकीत शिष्यवृत्ती देण्याबाबत सकारात्मकता दर्शविण्यात आली आहे."

बीबीए, बीसीए अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी नवा कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्याचप्रमाणे त्यांना इंटर्नशिपची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी पोर्टलवर नोंदणी करता येईल, असेही डॉ. सीताराम यांनी सांगितले. यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी देशातील जवळपास दोनशे तंत्र शिक्षण संस्थांना मान्यता दिली आहे. यामध्ये इंजिनिअरिंग कॉलेज यांची संख्या सर्वाधिक आहे. बीबीए, बीसीए अभ्यासक्रमासाठी साधारणतः सहा हजार महाविद्यालयांनी मान्यता घेतल्याचेही त्यांनी नमूद केले.

Pune, Main
04/07/2024 Page No. 4

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

लोकसत्ता

# बीबीए, बीसीए अभ्यासक्रमासाठी ५५०० संस्थांची नोंदणी

### नोंदणीसाठी विलंब शुल्क भरून १५ जुलैपर्यंत पुन्हा मुदतवाढ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून (एआयसीटीई) बीबीए, बीएमएस, बीबीएम, बीसीए अभ्यासक्रमांसाठी आतापर्यंत ५ हजार ५००हून अधिक संस्थांना मान्यता देण्यात आली आहे. मात्र, शिक्षण संस्थांना नोंदणीसाठी पुन्हा मुदतवाढ दिली असून, आता विलंब शुल्क भरून १६ जुलैपर्यंत नोंदणी करता येणार आहे. 'एआयसीटीई'ने संस्था नोंदणीसाठी वारंवार मुदतवाढ दिल्याचे दिसून येत आहे.

बीबीए, बीएमएस, बीबीएम, बीसीए अभ्यासक्रम यंदा 'एआयसीटीई'ने आपल्या अखत्यारित घेतले. तसेच हे अभ्यासक्रम चालवण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांना नोंदणी करून मान्यता घेणे बंधनकारक केले. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी संस्था नोंदणी, मान्यता प्रक्रिया फेब्रुवारीमध्ये सुरू करण्यात आली. २ मे रोजी प्रसिद्ध केलेल्या नोटिशींमध्ये ४ हजार २०० संस्थांना मान्यता दिली होती. त्यानंतरही नोंदणीसाठी मुदतवाढ देण्यात आली.

'एआयसीटीई'ने २८ जून रोजी नोंदणीसाठी मुदतवाढ दिल्याची नोटीस प्रसिद्ध केली. त्यानुसार आतापर्यंत ५ हजार ५०० पेक्षा जास्त संस्थांना 'जसे आहे तसे' तत्त्वावर मान्यता दिली आहे. मात्र संस्थांच्या विनंतीनुसार नोंदणीसाठी पुन्हा संकेतस्थळ सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे नोंदणी न केलेल्या संस्थांना १५ जुलैपर्यंत ५ हजार रुपये विलंब शुल्क भरून नोंदणी करता येणार आहे.

03/07/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

लोकसत्ता

# बीबीए, बीसीए अभ्यासक्रम मान्यतेमध्ये महाराष्ट्र दुसऱ्या स्थानी

### एआयसीटीईचे अध्यक्ष डॉ. टी. जी. सीताराम यांची माहिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** बीबीए, बीसीए अभ्यासक्रमांसाठी देशभरातील सुमारे सहा हजार संस्थांनी मान्यता घेतली आहे. त्यात सर्वाधिक संस्था कर्नाटकातील असून, त्या खालोखाल महाराष्ट्रातील संस्था आहेत, अशी माहिती अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे (एआयसीटीई) अध्यक्ष डॉ. टी. जी. सीताराम यांनी बुधवारी दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी प्रदान समारंभानंतर डॉ. सीताराम यांनी पत्रकारांशी संवाद साधला, त्या वेळी ते बोलत होते. कायद्यानुसारच बीबीए, बीसीए अभ्यासक्रमांना एआयसीटीईच्या अखत्यारित घेण्यात आले. एसबीए, एमसीएच्या धर्तीवर बीबीए, बीसीए अभ्यासक्रमांचीही गुणवत्ता उंचावली पाहिजे. या निर्णयाला विरोध झाला असला, तरी आता विरोध करणाऱ्या संस्थाही मान्यता घेत आहेत. आतापर्यंत देशभरातील सुमारे सहा हजार संस्थांनी जशा आहेत तशा तत्त्वावर मान्यता घेतली आहे. मान्यतेसाठी मुदतवाढही देण्यात आली आहे. बीबीए, बीसीएचा अभ्यासक्रम प्रसिद्ध करण्यात आला आहे, शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना कार्यप्रशिक्षणासाठी संकेतस्थळावर नोंदणी करता येणार आहे, शिष्यवृत्तीही दिली जाणार आहे. तसेच विद्यावेतन देण्याबाबतही चर्चा सुरू आहे, असे डॉ. सीताराम यांनी सांगितले.

बीबीए, बीसीए अभ्यासक्रमाच्या संस्थांची दोन वर्षे तपासणी केली जाणार नाही. मात्र दोन वर्षांत संबंधित संस्थांनी एआयसीटीईच्या निकषांची पूर्तता करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी देशभरातून नव्या तंत्रशिक्षण संस्थांना मान्यता देण्यात आली आहे. त्यात अभियांत्रिकी महाविद्यालयांची संख्या सर्वाधिक आहे. तसेच काही तंत्रशिक्षण संस्था बंद करण्यात आल्या आहेत, असेही डॉ. सीताराम यांनी नमूद केले.

#### अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती...

**बीबीए बीसीए अभ्यासक्रमांना आता व्यावसायिक अभ्यासक्रमांचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीप्रमाणेच या अभ्यासक्रमांना राज्य सरकारला शिष्यवृत्ती द्यावी लागेल. त्याबाबत राज्यांच्या उच्च शिक्षण सचिवांशी चर्चाही झाली आहे. मात्र, त्याबाबत राज्य सरकारांनी निर्णय घेणे आवश्यक असल्याचे डॉ. सीताराम यांनी स्पष्ट केले.**

04/07/2024 | Pune | Page : 17
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

# इतर अभियंतेच 'जगात भारी'

## पदवी प्रदान सोहळ्यात डॉ. सीतारामन यांची 'आयआयटीयन्स'शी तुलना

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'आयआयटी'सारख्या नामांकित संस्था असूनही, त्यातून उत्तीर्ण होणारे एक टक्का इंजिनीअरही 'इस्रो'सारख्या प्रतिष्ठित संशोधन; तसेच उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिसत नाहीत. या संस्थांसोबतच जागतिक कंपन्यांमध्ये लहान शहरांमध्ये इंजिनीअरिंगचे शिक्षण पूर्ण केलेले अभियंते आहेत,' अशी माहिती अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. टी. जी. सीताराम यांनी दिली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ११४व्या पदवी प्रदान सोहळ्यात डॉ. सीतारामन बोलत होते.

''चांद्रयान', 'आदित्य एल १' आदी प्रकल्प यशस्वी करणारे शास्त्रज्ञ 'आयआयटी'तून नाही, तर लहान शहरांमधील इंजिनीअरिंग कॉलेजांमधील आहेत. 'आयआयटीं'मधून दर वर्षी १५ हजार विद्यार्थी उत्तीर्ण होतात. त्याच वेळी इतर इंजिनीअरिंग कॉलेजांमधून सुमारे १५ लाख इंजिनीअर बाहेर पडतात, अशी आकडेवारीही त्यांनी मांडली.

आशिष काळे



**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ११४व्या पदवी प्रदान सोहळा पार पडला.**

**११७ सुवर्णपदके प्रदान**

कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे उपस्थित होते. या वेळी सात हजार विद्यार्थ्यांना पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी, एम. फिल प्रदान करण्यात आली; तसेच ७१ विद्यार्थ्यांना ११७ सुवर्णपदके प्रदान करण्यात आली.

**'प्रवाहात आणणे गरजेचे'**

'देशातील शालेय शिक्षणातील सुमारे २५ कोटी विद्यार्थ्यांपैकी जेमतेम ४.३ कोटी विद्यार्थी उच्च शिक्षणापर्यंत येतात. देशभरात जवळपास एक हजार विद्यापीठे आहेत. त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील ५० टक्के प्रवेश गुणोत्तराचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शिक्षण सोडणाऱ्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे आव्हान आहे. या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणात आणायचे झाल्यास आपल्याला तितकीच विद्यापीठे निर्माण करावी लागतील,' असे डॉ. सीतारामन यांनी सांगितले. डॉ. गोसावी यांनी विद्यापीठाचा आढावा सादर केला.

**''अनुवादिनी'ची संकल्पना'**

'एआयसीटीईने तंत्रशिक्षणातील भाषांचे बंधन दूर करण्यासाठी 'अनुवादिनी' हे अनुवादाचे साधन विकसित केले आहे. या साधनाद्वारे इंग्रजीतील तांत्रिक कागदपत्रे, शैक्षणिक आशय विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषेत उपलब्ध करून देता येणार आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषेत कठीण संकल्पना समजावून घेता येऊ शकतात. त्यांची शैक्षणिक कामगिरी उंचावू शकते. त्यामुळे 'अनुवादिनी' हे साधन उपयोगी ठरणार आहे,' अशी माहिती डॉ. सीतारामन यांनी दिली.

पुणे विद्यापीठातील संस्कृत आणि प्राकृत विभागाची विद्यार्थिनी चैत्राली जोशीने सर्वाधिक, आठ सुवर्णपदके पटकावली. मराठी विभागाची विद्यार्थिनी श्रिया टेंगसेने सात, पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगची विद्यार्थिनी श्रेया गुंजाळने पाच आणि पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कम्प्युटर टेक्नॉलॉजीचा विद्यार्थी प्रतीक अग्रवालने चार सुवर्णपदके प्राप्त केली.

'सध्या देशात संशोधनासाठी सुवर्णकाळ आहे. सरकारकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. 'एआयसीटीई'ने नुकतीच सेंटर फॉर सेल्युलर अँड मोलेक्युलर प्लॅटफॉर्म्ससह 'एआयसीटीई-इंटर इन्स्टिट्यूशनल बायोमेडिकल इनोव्हेशन्स प्रोग्रॅम' (आयबीआयपी) हा प्रकल्प सुरू केला आहे,' असेही सांगण्यात आले.

Maharashtra Times 4.7.2024

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

लोकमत

# जाचक अटी; राज्यातील १४२९ प्राध्यापकांना पदोन्नती मिळेना

## १५ वर्षांपासून प्रश्न प्रलंबित : उच्च शिक्षण विभागाची टोलवाटोलवी

लोकमत विशेष

राम शिनगारे
लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील ११ विद्यापीठांतील तब्बल १ हजार ४२९ प्राध्यापकांना मागील १५ वर्षांपासून हक्काच्या पदोन्नतीसह इतर लाभांपासून वंचित ठेवण्यात आले आहे. त्याचवेळी काही प्राध्यापकांना पदोन्नतीसह इतर दिलेल्या लाभाची वसुली करण्याच्या सूचना उच्च शिक्षण विभागाने दिल्या होत्या. मात्र, त्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाने स्पष्टीकरण दिल्यानंतरही उच्च शिक्षण विभागातील तत्कालीन अधिकाऱ्यांनी जाचक अटी टाकल्या आहेत. त्यामुळे या प्राध्यापकांच्या पदोन्नतीचा मार्ग सुकर होण्याएवजी अधिक खडतर बनला आहे.

ने १ जानेवारी १९९४ ते ११ जुलै २००९ दरम्यान नेमणूक झालेल्या एम.फिल.धारक प्राध्यापकांना राष्ट्रीय पात्रता परीक्षेतून (नेट) सूट देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, मुंबई उच्च न्यायालयातील याचिकेचा दाखला देत उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव विजय साबळे यांनी २७ जानेवारी २०२१ रोजी पत्र काढले. त्यानुसार १४ जून २००६ ते २१ जुलै २००९ या कालावधीतच एम.फिल. पात्रता ग्राह्य धरण्यात आली, तसेच १४ जून २००६ पूर्वी नियुक्ती झालेल्या प्राध्यापकांना पदोन्नतीचे दिलेले लाभ वसूल करण्याचे आदेश दिले. त्यावर एम.फिल. पात्रताधारक संघर्ष समितीने यूजीसीशी पत्रव्यवहार केला.यूजीसीने १९९४ ते २००९ दरम्यानच्या एम.फिल.धारकांना नेटमधून सूट दिल्याचे कळवले. उपसचिव बाविस्कर यांनी पदोन्नती देण्याचे मान्य केले. मात्र, त्यासाठी प्राध्यापकाच्या नावाने यूजीसीकडून सूट मिळालेली असावी, अशी जाचक अट टाकली.

### पदोन्नतीपासून वंचित एम.फिल. पात्रताधारक प्राध्यापक



| विद्यापीठ | प्राध्यापकांची संख्या |
|---|---|
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ | ३२१ |
| सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | १९६ |
| शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर | १०९ |
| पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ | २६ |
| बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ | १२९ |
| स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ | ३७० |
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ | ३० |
| संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ | १२३ |
| मुंबई विद्यापीठ | ७२ |
| एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई | ०३ |
| गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | ५० |
| एकूण | १४२९ |

Hello Chhatrapati Sambhajinagar
Page No. 9 Jul 04, 2024
Powered by: erelego.com

*News Paper Clippings During July 2024*

*Section: Education*

लोकमत



विद्यापीठाच्या चैत्राली जोशी या विद्यार्थिनीने सर्वाधिक आठ सुवर्णपदके मिळविली. डावीकडून डॉ. महेश काकडे, प्रा डॉ.पराग काळकर, प्रा. टी. जी. सीताराम, कुलगुरु सुरेश गोसावी, डॉ. विजय खरे

# संशोधनातून भारतीय अर्थव्यवस्था सक्षम होईल

## प्रा. टी. जी. सीताराम; पुणे विद्यापीठाचा पदवी प्रदान सोहळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'भारताला येत्या पाच वर्षांत ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनविण्यासह जगात पहिल्या तीन अर्थव्यवस्थेत स्थान मिळावे, यासाठी संशोधन आणि विकासाचा मोठा वाटा असणार आहे. युवा पदवीधरांनी त्यांचा अमूल्य वेळ संशोधन आणि विकासासाठी गुंतवावा,' असे आवाहन 'अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद एआयसीटीई'चे अध्यक्ष प्रा. डॉ. टी. जी. सीताराम यांनी केले.

११७ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा १२४व्या पदवी प्रदान सोहळ्यात प्रा. सीताराम यांनी दीक्षांत भाषण दिले. यावेळी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांच्यासह व्यवस्थापन परिषद सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता उपस्थित होते. विद्यापीठाच्या विविध विषयांच्या ११७ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक देण्यात आले.

### चैताली जोशीने पटकावली ८ सुवर्णपदके

विविध परीक्षांमध्ये विशेष प्रावीण्य संपादन केलेल्या ७१ विद्यार्थ्यांना ११७ सुवर्णपदके देऊन सन्मानित करण्यात आले. संस्कृत आणि प्राकृत विभागाची विद्यार्थिनी चैत्राली जोशी हिने सर्वाधिक ८, मराठी विभागाची विद्यार्थिनी श्रीया टेंगसे हिने ७, पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगची विद्यार्थिनी श्रेया गुंजाळने ५ तर पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजीचा विद्यार्थी प्रतीक अग्रवालने ४ सुवर्णपदके मिळविली.

### किती जणांना मिळाली प्रमाणपत्रे

| | |
|---|---|
| पदवी | ४,८१४, |
| पदव्युत्तर पदवी | २,०२० |
| पदविका | ३५ |
| पीएच.डी | २३९ |
| एम. फिल | ३ |

भारत पोहोचला ४०व्या स्थानी

डॉ. सीताराम म्हणाले, देशाची आर्थिक वाढ, रोजगार निर्मिती आणि राष्ट्रीय कल्याणात वाढ करण्यासाठी नवीन उत्पादने आणि सेवांचा विकास झाला पाहिजे. त्यासाठी संशोधन आणि विकासावर गुंतवणुकीला प्राधान्य दिले जात आहे. रिसर्च पेपर पब्लिकेशन, पीएच.डी. आणि पेटंट नोंदणीमध्ये भारत अग्रेसर झाला आहे. ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्स २०२३ मध्ये भारताची क्रमवारी सुधारली असून, ४०व्या स्थानी आहे. पुणे, बंगळुरू, दिल्ली आणि मुंबई शहरात १२५ स्टार्टअपचे युनिकॉर्नमध्ये रूपांतर झाले असल्याचे सांगितले.

**पदवीपेक्षा कौशल्याचे महत्त्व वाढणार**

तुम्ही कोणत्या विद्यापीठातून पदवी प्राप्त केली, याला महत्त्व राहणार नाही. तुमच्याकडे कोणती कौशल्य आहेत, यावर भविष्यात कंपन्या नोकरीची संधी देतील. केवळ भारत नव्हे जगाला कौशल्य आत्मसात केलेले मनुष्यबळ घडवायचे आहे.

विकसित देशात उच्च शिक्षण घेण्याचे प्रमाण ८५ टक्के आहे. भारतात शाळेत प्रवेश घेतलेल्या २६ कोटी ५० लाख विद्यार्थ्यांपैकी केवळ ४ कोटी ३० लाख विद्यार्थी उच्च शिक्षणापर्यंत पोहोचू शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना कौशल्य शिक्षण देणे गरजेचे आहे. उच्च शिक्षणाचे प्रमाण ५० टक्क्यांपर्यंत न्यायचे आहे.

Pune Main
Page No. 3 Jul 04, 2024
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

सकाळ

# 'अभियांत्रिकी'मधील विद्यार्थी संशोधनात अग्रेसर

## डॉ. सीताराम : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा १२४वा पदवीप्रदान सोहळा

**पुणे, ता. ३ : "भारत संशोधन आणि नावीन्यता क्षेत्रात जागतिक पातळीवर चौथ्या क्रमांकावर आहे. परंतु देशातील भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या तुलनेत भारतीय विज्ञान संस्थेत (आयआयएससी) सर्वाधिक संशोधन होत आहे. दरवर्षी देशातील सर्व 'आयआयटी'मधून जवळपास १५ हजार विद्यार्थी पदवीधर होतात, तर मोठ्या शहरांमधील नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयातून त्यापेक्षा अधिक विद्यार्थी पदवीधर होत आहेत. नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी संशोधनात अग्रेसर असल्याचे दिसून येते", असे उद्गार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. टी. जी. सीताराम यांनी काढले.**



**इनडोअर हॉल, खाशाबा जाधव क्रीडा संकुल :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२४व्या पदवी प्रदान समारंभात सुवर्णपदकविजेत्या विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या वेळी (डावीकडून) डॉ. पराग काळकर, डॉ. टी. जी. सीताराम, सुवर्णपदकविजेती विद्यार्थिनी, डॉ. सुरेश गोसावी आणि डॉ. विजय खरे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा १२४वा पदवी प्रदान सोहळा डॉ. सीताराम यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी झाला. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे उपस्थित होते. संशोधन आणि नावीन्यता क्षेत्रात खूप वाव असून विद्यार्थ्यांनी त्यात योगदान द्यावे, असे डॉ. सीताराम यांनी नमूद केले. ते म्हणाले, "भारत गेल्या ४० ते ३५ वर्षांपासून संपूर्ण जगाला चांगले अभियंते आणि व्यवस्थापक देत आहे. जगात अशी एकही कंपनी नाही, ज्यात भारतीय अभियंते आणि व्यवस्थापक नाहीत. देशात अत्यंत प्रतिभावान विद्यार्थी घडत आहेत. यातील काही विद्यार्थी परदेशात शिक्षणासाठी जात आहेत. परंतु, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार होणाऱ्या बदलांमध्ये शिक्षणासाठी परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी करण्याची ताकद आहे."

'एआयसीटीई'ने नुकतीच सी-कॅम्प (सेंटर फॉर सेल्युलर ॲण्ड मोलेक्युलर प्लॅटफॉर्म्स) समवेत सहयोग करून 'एआयसीटीई-इंटर इन्स्टिट्यूशनल बायोमेडिकल इनोव्हेशन्स प्रोग्रॅम' (आयबीआयपी) सुरू केला आहे. या अंतर्गत अभियांत्रिकी आणि वैद्यकीय संस्थांमध्ये एकत्रितरीत्या आंतरविद्याशाखीय शिक्षण, संशोधन आणि इनोव्हेशन करणे शक्य होणार असल्याचेही डॉ. सीताराम यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. गोसावी म्हणाले, "सर्वच क्षेत्रात भारताचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याची मोठी जबाबदारी तुमच्या खांद्यावर आहे. पदवी घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने भारताच्या आंतरराष्ट्रीयीकरणात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ब्रॅण्ड ॲम्बेसिडर म्हणून आपली भूमिका निष्ठेने पार पाडावी". कार्यक्रमात विविध विद्या शाखांमधील ७१ विद्यार्थ्यांना ११७ सुवर्णपदके प्रदान करण्यात आली.

'रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धीमत्ता, मशिन लर्निंग, डेटा सायन्स हे भविष्यातील तंत्रज्ञान नाही; तर हे तंत्रज्ञान सध्या अस्तित्वात असून वापरात देखील आहे. त्या-त्या क्षेत्रातील भाविष्यातील अत्याधुनिक तंत्रज्ञानातील कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे. आगामी काळात रोबोटद्वारे कोणतीही नोकरी, काम अचूक करणे शक्य होणार आहे. स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांसमोर हे नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे आव्हान आहे. शिक्षकांची भूमिका देखील केवळ शिकविण्यापूरती मर्यादित असणार नाही. शिक्षकांनाही नवीन तंत्रज्ञान, त्यातील कौशल्यांचे ज्ञान घ्यावे लागेल", असा सल्ला डॉ. सीताराम यांनी दिला.

### प्रमाण ५० टक्क्यांवर नेण्याचे उद्दिष्ट

■ 'देशात जवळपास २५ कोटी विद्यार्थी हे दरवर्षी शालेय शिक्षण घेतात. दरम्यान, केवळ २८.३ टक्के विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतात. उर्वरित विद्यार्थी कोठे जातात, हा गंभीर मुद्दा आहे. एखाद्या विकसित देशात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण हे ८५ टक्के आहे. भारत विकसित राष्ट्र होण्याकडे वाटचाल करत असताना, निदान आपल्याला २०३५पर्यंत उच्च शिक्षणात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ५० टक्क्यांपर्यंत आणणे आवश्यक आहे. त्यासाठी अधिकाधिक विद्यार्थ्यांना सामावून घेणाऱ्या विद्यापीठांची निर्मिती होणे आवश्यक आहे," असे मत डॉ. सीताराम यांनी व्यक्त केले.

Pune, Main
04/07/2024 Page No. 4

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com



विद्यापीठातील संस्कृत आणि प्राकृत विभागाची विद्यार्थिनी चैत्राली जोशी हिने सर्वाधिक आठ सुवर्णपदके प्राप्त केली. तिचा सन्मान करताना एआयसीटीईचे अध्यक्ष प्रा. टी. जी. सीतारामन, कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे यांच्यासह अन्य मान्यवर.

# उच्च शिक्षणातील टक्का वाढविणे गरजेचे

## प्रा. टी. जी. सीतारामन : विद्यापीठाचा १२४ वा पदवी प्रदान समारंभ उत्साहात

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

देशात सध्या २६.५ कोटी विद्यार्थी शालेय शिक्षणासाठी नोंदणी करतात. परंतु, यापैकी केवळ ४.५ कोटी विद्यार्थीच उच्च शिक्षणासाठी नोंदणी करत आहेत. यामुळे आपल्या देशाचा उच्च शिक्षणातील एकूण नोंदणी प्रमाण केवळ २८.३ आहे. हे प्रमाण जर वाढवायचे असेल, तर सध्या देशात जेवढ्या शैक्षणिक संस्था आहेत, तेवढ्याच नवीन संस्थांची निर्मिती करावी लागणार असल्याचे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे (एआयसीटीई) अध्यक्ष प्रा. टी. जी. सीतारामन म्हणाले. ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी प्रदान समारंभात बोलत होते.

विद्यापीठाचा १२४ वा पदवी प्रदान समारंभ बुधवारी उत्साहात पार पडला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पदवी प्रदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे (एआयसीटीई) अध्यक्ष प्रा. टी. जी. सीतारामन उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे, वित्त व लेखा अधिकारी सीएमए चारुशिला गायके, विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. या समारंभात सात हजार १२५ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

प्रा. टी. जी. सीतारामन म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणात २०३५ पर्यंत उच्च शिक्षणातील एकूण नोंदणी प्रमाण ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हे उद्दिष्ट साध्य करायचे असल्यास आणखी हजार विद्यापीठांची निर्मिती करावी लागणार आहे. हे प्रमाण वाढविण्यासाठी आपण डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक आहे; जेणेकरीन नवीन शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या पद्धतींद्वारे नवीन विद्यार्थी जोडून घेता येतील. वेगाने विकसित होत असलेल्या जगात एआय आणि इतर प्रगत तंत्रज्ञानाने जग व्यापून घेतले आहे. याचा शिक्षण, रोजगार आणि दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी तांत्रिक प्रगतीशी जुळवून घेणे अत्यावश्यक आहे.

डॉ. गोसावी म्हणाले, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या अत्यंत महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय शैक्षणिक प्रकल्पाची सुरुवात देशपातळीवर सुरू असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय पातळीवर या धोरणाची अंमलबजावणी करण्यात देशात शीर्षस्थानावर आहे. या धोरणामुळे नवी पिढी केवळ शिक्षित बनणार नाही, तर ते कुशल बुद्धिवादी व रोजगार प्राप्त करण्याची कौशल्ये मिळविलेले साधन व्यक्ती बनणार आहेत.

राज्यपालांच्या हस्ते विविध परीक्षांमध्ये प्रावीण्य संपादन केलेल्या ७१ विद्यार्थ्यांना ११७ सुवर्णपदके देऊन सन्मानित करण्यात आले. यात विद्यापीठातील संस्कृत आणि प्राकृत विभागाची विद्यार्थिनी चैत्राली जोशी हिने सर्वाधिक ८, मराठी विभागाची विद्यार्थिनी श्रीया टेंगसे हिने ७, तर पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगची विद्यार्थिनी श्रेया गुंजाळने ५ व पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजीचा विद्यार्थी प्रतीक अग्रवालने ४ सुवर्णपदक प्राप्त केले.

विद्यापीठाच्या इनडोअर हॉलमध्ये झालेल्या या सोहळ्यात ४ हजार ८१४ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र, २ हजार २० विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र, ३५ विद्यार्थ्यांना पदविका प्रमाणपत्र, २३९ विद्यार्थ्यांना पीएच. डी., १४ विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी-पदविका प्रमाणपत्र, तर ३ विद्यार्थ्यांना एम.फिल.चे प्रमाणपत्र मिळाले.

Pune Edition Edition
Jul 04, 2024 Page No. 07
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

# Over 7k students conferred degrees at SPPU's 124th graduation ceremony

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, JULY 3

ON THE occasion of the 124th graduation ceremony of Savitribai Phule Pune University, 71 meritorious students from different disciplines were awarded gold medals in the presence of All India Council of Technical Education chairperson TG Sitharam, who was the chief guest for the event.

Sitharam called the convocation a celebration of the completion of four years of National Education Policy 2020, which he said was invoked on July 29, 2020.

"A 16 member executive council has been constituted to distribute Rs 50,000 crores as funding for research and innovation activities in the next five years. This is a golden time for research and innovation in our country which is evolving in an exponential way," he said.

He emphasised Pune as a hub of startups and its role in the economy. "To become the third largest economy in the world, India needs to develop mechanisms to convert the demographic dividend into high quality technical and scientific human resources," said Sitharam.

He spoke about the need for constant upskilling and said even though there are close to 26.5 crore children in school education, only 4.3 crore make it to higher education.

"Most of the developed nations have over 85% gross enrollment ratios whereas ours fall way below mark. Even if we are not able to bring all students into higher education, at least we need to upskill them as that is needed for our developing nation. As per goals set by NEP, we need to increase our GER to 50% by 2035. For that, we need at least 1,000 more universities," said Sitharam.

A total of 7,125 students were awarded degree certificates, of which 4,814 were undergraduate students, 2020 were postgraduates, 35 diploma, three MPhil and 239 PhD students. These students passed out in October/November 2023. A total of 117 gold medals were awarded to 71 meritorious students.

The Indian Express 4.7.2024

# 'मातृभाषेतून शिक्षण द्या'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'इंग्रजी माध्यमातून शिक्षणाच्या आग्रहामुळे आपण मायबोलीचे आणि स्थानिक भाषेचे नुकसान करीत आहोत. आपल्या मातृभाषेचे संवर्धन करायचे असल्यास, आपल्या पाल्यांना मातृभाषेतच शिक्षण द्यायला हवे,' असे मत ज्येष्ठ कन्नड साहित्यिक एस. एल. भैरप्पा यांनी गुरुवारी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठाच्या भाषा व साहित्य प्रशाळेतर्फे 'आंतरभारती संवाद' या कार्यक्रमांतर्गत भैरप्पांसोबतच्या या वार्तालापाचे आयोजन करण्यात आले होते. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि कन्नड या चार भाषांमधून रंगलेल्या या वार्तालापातून उपस्थितांना खऱ्या अर्थाने 'आंतरभारती संवादा'चा प्रत्ययही घेता आला.

कादंबरीकार सहना विजयकुमार आणि डॉ. प्रभाकर देसाई यांनी भैरप्पा यांच्याशी संवाद साधला. या वेळी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर, बागेश्री मंठाळकर आदी उपस्थित होते.

हिंदी विभागप्रमुख डॉ. विजयकुमार रोडे यांनी आभार मानले.



कुलगुरू सुरेश गोसावी यांनी एस. एल. भैरप्पा यांचे स्वागत केले.

> "लेखनाविषयीची विश्वासार्हता वाढण्यासाठी आणि 'सिस्टिमॅटिक नोव्हेलिस्ट' होण्यासाठी स्वतःची शैली आवश्यक असते. इंग्रजी किंवा इतर पाश्चिमात्य भाषांमधील साहित्याचे आकलन करताना साहित्यनिर्मितीचे त्यांचे तंत्र आत्मसात केले, तरी मूळ भारतीय तत्त्वज्ञानाच्या आधारेच लेखन सुरू ठेवले.
>
> – एस. एल. भैरप्पा, ज्येष्ठ कन्नड साहित्यिक

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

लोकमत

# 'सेट'च्या निकालाबाबत अद्याप अस्पष्टता

## परीक्षा दिलेले उमेदवार चिंतेत, सरकार गंभीर आहे का?

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सेट परीक्षा विभागातर्फे राज्य पात्रता परीक्षेचे (सेट) दि. ७ एप्रिलला आयोजन केले होते. मात्र, गेल्या तीन महिन्यांपासून परीक्षेचा निकाल रखडल्याने परीक्षा दिलेल्या उमेदवारांमध्ये अस्वस्थता आहे.

राज्य सरकारने लागू केलेल्या एसईबीसी आरक्षणांचा अंतर्भाव करून निकाल जाहीर करावा का? याबाबत विद्यापीठ प्रशासनाकडून सातत्याने पाठपुरावा करूनही राज्य शासनाकडून उत्तर मिळत नसल्याने निकालास विलंब होत असल्याचे दिसून येत आहे.



सेट परीक्षेचा निकाल एसईबीसी आरक्षणासह जाहीर करावा का? याबाबत राज्य शासनाकडून निर्देश प्राप्त होताच निकाल जाहीर करण्यात येईल.

**- डॉ. विजय खरे, प्रभारी कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राज्य पात्रता परीक्षा विभागातर्फे ३९ वी सेट परीक्षेचे दि. ७ एप्रिल रोजी महाराष्ट्र आणि गोव्यातील १७ शहरातील २८९ परीक्षा केंद्रावर आयोजन केले होते.

यंदा तब्बल १ लाख ९ हजार १५४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. प्रत्यक्ष परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल तयार करण्याचे काम सेट परीक्षा विभागाकडून पूर्ण झाले आहे. मात्र, सेट परीक्षेसाठी एसईबीसी प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी आरक्षण लागू करावे का? राज्य शासनाकडून मार्गदर्शन घेण्यात येत आहे. याबाबत विद्यापीठ प्रशासनातर्फे राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे अशी माहिती विद्यापीठ प्रशासनातर्फे गुरूवार दि. ४ जुलै रोजी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

Pune Main
Page No. 2 Jul 05, 2024
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# अकरावी : दुसऱ्या फेरीला सुरुवात

## ६ जुलैपर्यंत प्रवेशासाठी अर्ज करण्याची संधी

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यानुसार पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांत पहिल्या फेरीतून २५ हजार ३७२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. आता दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेतले जात आहेत. तसेच त्यांच्याकडून पसंतीक्रम नोंदवून घेतले जात आहेत. या विद्यार्थ्यांना ३ ते ६ जुलैपर्यंत यासाठी अर्ज करता येणार आहे. त्यानंतर १० जुलै रोजी संबंधित विद्यार्थ्यांची प्रवेशयादी कनिष्ठ महाविद्यालयस्तरावर प्रसिद्ध केली जाणार आहे.**

आत्तापर्यंत कॅप फेरीतील २० हजार ५६३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, इनहाउस कोट्यातून २ हजार ८९४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे, तर व्यवस्थापन कोट्यातून केवळ १७७ इतक्या विद्यार्थ्यांनी प्रवेश मिळविला आहे. अल्पसंख्याक कोट्यातून १ हजार ७३८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण ९३ हजार ८१७ जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. त्यासाठी ६६ हजार ९३४ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. यातील कला शाखेसाठी १४ हजार ७७८ जागांसाठी केवळ ५ हजार १९७ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. वाणिज्य शाखेच्या ३६ हजार ७२६ जागांसाठी २३ हजार २५१ विद्यार्थ्यांनी, तर विज्ञान शाखेकरिता सर्वाधिक म्हणजेच ३९ हजार २६५ जागांसाठी ३७ हजार ९२१ तर एचएसव्हीसी या अभ्यासक्रमाच्या ३ हजार ४८ जागांसाठी केवळ ५६५ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत.

दरम्यान, ३ जुलैला सकाळी १० वाजल्यापासून ते ६ जुलै रात्री १० वाजेपर्यंत नवीन विद्यार्थी ऑनलाइन नोंदणी करून वैयक्तिक माहिती असणाऱ्या अर्जाचा भाग-१ भरून तो प्रमाणित करून घेऊ शकतात. तसेच महाविद्यालय पसंतीक्रम असणाऱ्या अर्जाचा भाग-२ विद्यार्थ्यांना भरता येणार आहे.




याशिवाय या प्रवेश प्रक्रियेत सुरुवातीपासूनच समाविष्ट असलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय पसंतीक्रम बदलता येतील; अन्यथा मागील फेरीचे पसंतीक्रम कायम राहणार आहेत. दुसऱ्या प्रवेशयादीअंतर्गत महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांना १० जुलै रोजी सकाळी १० वाजल्यापासून १२ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत प्रवेश निश्चित करता येणार असल्याचे देखील स्पष्ट केले आहे.

Pune Edition Edition
Jul 05, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# एसईबीसी आरक्षणामुळे रखडला सेट परीक्षेचा निकाल



- राज्य शासनाकडून आरक्षणाबाबतचे निर्देश प्राप्त झाल्यानंतर निकाल होणार जाहीर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सेट परीक्षेसाठी एसईबीसी प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी आरक्षण लागू करावे किंवा कसे याबाबत राज्य शासनाकडून मार्गदर्शन मागविले असून, याबाबत विद्यापीठाकडून राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. राज्य शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त होताच ७ एप्रिल २०२४ रोजी घेतलेल्या सेट परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात येईल, अशी माहिती विद्यापीठाच्या सेट विभागाने दिली आहे.

महाराष्ट्र व गोवा राज्यांतील प्रमुख १७ शहरांमधील २९८ परीक्षा केंद्रांवर सेट परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी यंदा १ लाख २८ हजार २४३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यातील १ लाख ९ हजार १५४ विद्यार्थी परीक्षेस उपस्थिती होते. हे सर्व विद्यार्थी निकालाच्या प्रतीक्षेत आहेत. परंतु, निकाल कसा जाहीर करावा, यावर शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झाले नाही. त्यामुळे सेट विभागाने प्रकटन प्रसिद्ध केले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सेट परीक्षा विभाग हा महाराष्ट्र शासनाची नोडल एजन्सी, तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार महाराष्ट्र व गोवा राज्यांतील विद्यापीठ आणि वरीष्ठ महाविद्यालयांत सहायक प्राध्यापक पदाची पात्रता परीक्षा घेण्याकरिता प्राधिकृत विभाग आहे.

७ एप्रिल २०२४ रोजी ३९ व्या सेट परीक्षेचे आयोजन सेट विभागामार्फत महाराष्ट्र व गोवा राज्यांतील विद्यार्थ्यांकरिता १७ शहरांमधील विविध महाविद्यालयांत केले होते. प्रत्यक्ष परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल तयार करण्याचे काम सेट परीक्षा विभागाकडून पूर्णत्वास आले आहे. मात्र, परीक्षेचा निकाल जाहीर करताना एसईबीसी प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी आरक्षण लागू करावे किंवा कसे, याबाबत मार्गदर्शन मागविले आहे, असे सेट विभागाने प्रसिद्ध केलेल्या जाहीर प्रकटनात नमूद केले आहे.

Pune Edition Edition
Jul 05, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# मातृभाषेतून शिक्षण गरजेचे

## ज्येष्ठ कन्नड लेखक डॉ. एस. एल. भैरप्पा यांचे स्पष्ट मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** इंग्रजीच्या आग्रहामुळे भारतीय भाषांकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे या भाषांतील शिक्षक-विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण झाली आहे. तर इंग्रजी येणाऱ्यांना आपल्याला सगळे कळते असे वाटते. स्थानिक भाषेतील लेखकही इंग्रजीकडे वळताना दिसत आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी पाल्यांना मातृभाषेत शिक्षण देणे गरजेचे आहे, असे स्पष्ट मत ज्येष्ठ कन्नड लेखक डॉ. एस. एल. भैरप्पा यांनी मांडले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे झालेल्या 'आंतरभारती संवाद' या मुक्तसंवाद कार्यक्रमात डॉ. भैरप्पा बोलत होते. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे, वित्त व लेखा अधिकारी चारूशीला गायके, व्यवस्थापन परिषद सदस्य रवींद्र शिंगणापूरकर, संदीप पालवे, बागेश्री मंठाळकर, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रभाकर देसाई, सहना विजयकुमार, ज्येष्ठ अनुवादिका उमा कुलकर्णी, उमा राव, पाली आणि बुद्धिस्ट अभ्यास विभागप्रमुख डॉ. महेश देवकर, हिंदी विभागप्रमुख डॉ. विजयकुमार रोडे, संस्कृत-प्राकृत विभागप्रमुख डॉ. देवनाथ त्रिपाठी, मराठी विभागप्रमुख डॉ. तुकाराम रोंगटे, परकीय भाषा विभागप्रमुख डॉ. स्वाती आचार्य या वेळी उपस्थित होते.

डॉ. भैरप्पा यांनी आपला लेखनप्रवास या कार्यक्रमात उलगडला. माझ्या मनात कादंबरीकार होण्याचा विचार आल्यावर मी त्याचा अभ्यास सुरू केला.

त्यासाठी दोन वर्ष मी व्रत घेतल्याप्रमाणे महत्त्वाच्या २५ कादंबऱ्या, त्यांचे विश्लेषण करणारी पुस्तके वाचली. त्यामुळे मला सर्जनशील लेखनाची भाषा, पद्धतीची माहिती मिळाली. एका पुस्तकावर समाधानी होणारे लेखक होऊ नका. यशस्वी लेखक, कादंबरीकार होण्यासाठी सर्जनशील लेखन करावे लागेल. त्यासाठी व्यासंग असणे आवश्यक आहे. सर्जनशील लेखनासाठी संशोधनाची बैठक गरजेची आहे, असे त्यांनी सांगितले.

05/07/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# बीबीए, बीसीए, बीएमएस सीईटीसाठी अर्जास मुदतवाढ

### प्रवेश परीक्षा कक्षाची मान्यता : ८ जुलैपर्यंत संधी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे बीबीए, बीएमएस, बीसीए आणि बीबीएम या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अतिरिक्त सीईटी आयोजित करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार इच्छुक उमेदवारांना सीईटी सेलच्या www.mahacet.org या अधिकृत संकेतस्थळावर २९ जून ते ३ जुलै या कालावधीत ऑनलाइन अर्ज करण्याची संधी देण्यात आली होती. त्यास पुन्हा मुदतवाढ देण्यात आली असून, विद्यार्थ्यांना ४ ते ८ जुलैपर्यंत अर्ज करता येणार असल्याची माहिती सीईटीसेलच्या वतीने स्पष्ट केले आहे.

बीबीए, बीएमएस, बीसीए आणि बीबीएम या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी २९ मे रोजी घेण्यात आलेली सीईटी परीक्षा दिलेल्या इच्छुक उमेदवारांनादेखील अतिरिक्त परीक्षेची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

उमेदवारांनी दोन्ही परीक्षा दिल्या असतील, तर त्यापैकी सर्वोत्तम असणारे पर्सेंटाइल प्रवेश प्रक्रियेसाठी ग्राह्य धरण्यात येणार आहेत. त्यासाठी उमेदवारांना आपली सर्वोत्तम पर्सेंटाइलची गुणपत्रिका संगणकीय प्रणालीवर अपलोड करणे आवश्यक असणार आहे.

मागील महिन्यात २९ मे रोजी पार पडलेल्या या परीक्षेला ४८ हजार विद्यार्थी उपस्थित होते. राज्यात १ लाख ८ हजार ७४१ एवढ्या जागा असताना केवळ ४० टक्के जागा भरल्या जातील एवढेच उमेदवार परीक्षेस उपस्थित होते. त्यामुळे उर्वरित ६० टक्के जागा रिक्त राहण्याची भीती व्यक्त केली जात होती. शिवाय हजारो विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे अतिरिक्त सीईटी परीक्षेचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यासाठी अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली, परंतु दिलेल्या मुदतीत अनेक विद्यार्थी अर्ज करण्यापासून वंचित राहिले. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांनी अर्ज करण्यास मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. त्यानुसार सीईटी सेलने मुदतवाढ दिली असून, यानंतर मात्र कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

संबंधित अभ्यासक्रमांसाठी १ लाख ८ हजार ७४१ जागा असताना २९ मे रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेला केवळ ४८ हजार १३५ विद्यार्थी उपस्थित राहिले होते. त्यामुळे अतिरिक्त सीईटीच्या माध्यमातून सीईटीपासून वंचित विद्यार्थ्यांना संधी देण्यात आली आहे.

# पाचवी-आठवी प्रवेशाच्या नोंदणीसाठी १५ जुलैपर्यंत मुदत

### राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या प्रभारी सचिवांची माहिती

**पुणे** : महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळातर्फे पाचवी आणि आठवीसाठी नोंदणी करण्यास मुदतवाढ देऊन १ जुलैपर्यंत संधी देण्यात आली होती. परंतु, त्यास आता अंतिम मुदतवाढ देऊन विद्यार्थ्यांना १५ जुलैपर्यंत अर्ज करण्याची संधी देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाचे प्रभारी सचिव शैलेंद्र पाटील यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अखत्यारित महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ कार्यरत आहे. या मंडळातर्फे पाचवी, आठवीला प्रवेश दिले जातात. त्यानुसार नव्याने नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांना १५ जुलैपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत.

६ ते १९ जुलै या कालावधीत विद्यार्थ्यांना मूळ अर्ज, शुल्क, कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या संपर्क केंद्र शाळेत जमा करावी लागतील. २४ जुलैला संपर्क केंद्र शाळांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, शुल्क, मूळ कागदपत्रे आणि यादी विभागीय मंडळात जमा करायची आहे. अधिक माहिती https:/// msbos.mh-ssc.ac.in या संकेतस्थळावर देण्यात आल्याचे प्रसिद्धिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

Pune Edition Edition
Jul 05, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

सकाळ

# 'परीक्षा पे चर्चा' आता व्हर्च्युअलीसुद्धा

**नवी दिल्ली, ता. ४ (पीटीआय)** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'परीक्षा पे चर्चा' हा खास विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी आयोजित करण्यात येणारा कार्यक्रम लवकरच व्हर्च्युअल पद्धतीने देखील होणार असून राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी) या प्रकल्पावर काम करत आहे. यासाठी स्वतंत्र पोर्टलची स्थापना होणार असल्याचे एनसीआरटीने सांगितले आहे.

सध्या स्पर्धा परीक्षांतील गैरव्यवहारावरून देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आणि अस्वस्थता असल्याच्या पार्श्वभूमीवर आता सरकारकडून हा प्रकल्प हाती घेण्यात आल्याचे मानले जात आहे.

"वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षेतील (नीट) गैरप्रकारामुळे देशभरातील विद्यार्थ्यांच्या मनात संतापाची लाट आहे. त्यामुळे परीक्षेआधी विद्यार्थ्यांशी संवाद साधणाऱ्या पंतप्रधान मोदी यांनी 'नीट'च्या विद्यार्थ्यांशीसुद्धा संवाद साधावा असा उपरोधी सल्ला विरोधी पक्षांकडून देण्यात आला होता.

दरम्यान, या प्रकल्पात तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यास इच्छुक असणाऱ्यांकडून एनसीईआरटी'कडून नुकतेच अर्जही मागविण्यात आले आहेत. या पोर्टलमुळे देशभरातील अनेक विद्यार्थ्यांना एकाचवेळी कार्यक्रमांत भाग घेता येणार आहे.

### अशी असेल 'व्हर्च्युअल' चर्चा

- परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमाचे व्हर्च्युअल पद्धतीने सादरीकरण करण्यासाठी प्लॅटफॉर्मची निर्मिती
- देशभरातील विद्यार्थ्यांना घरबसल्या वर्षभर आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होता येईल अशी व्यवस्था
- विद्यार्थ्यांनी केलेल्या कल्पक प्रकल्पांचे सादरीकरण करण्याची सुविधा
- २डी आणि ३डी च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्षानुभूतीचा आभास
- व्हर्च्युअल प्रदर्शनासाठी सभागृह, प्रेक्षागृह, सेल्फी झोन, प्रश्नमंजुषा कक्ष आणि अक्षर फलकांची निर्मिती
- पंतप्रधानांबरोबर व्हर्च्युअल पद्धतीने सेल्फी काढण्याची सोय
- सभागृह या विभागात पंतप्रधान, संबंधित विभागाचे मंत्री आणि शैक्षणिक क्षेत्राशी निगडित मान्यवरांचे विचार ऐकण्याची संधी
- प्रदर्शन केंद्रावर विद्यार्थ्यांना आभासी बूथ उपलब्ध करून देण्यात येणार, या माध्यमातून ते त्यांनी केलेले कलात्मक आणि कल्पक प्रकल्प सादर करतील आणि इतरांना ते २डी, ३डी पद्धतीने पाहता येतील

Pune, Main
05/07/2024 Page No. 102

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# बीबीए, बीसीए शुल्कासाठी समिती

## 'एआयसीटीई'चे अध्यक्ष प्रा. टी. जी. सीताराम यांची माहिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची (एआयसीटीई) मान्यता घेऊन बीबीए, बीसीए पदवी अभ्यासक्रम सुरू करणाऱ्या महाविद्यालयांनी शुल्काबाबत मनमानी करू नये यासाठी 'एआयसीटीई'ने स्वतंत्र समिती स्थापन केली आहे. या अभ्यासक्रमासाठी कमीत कमी किती शुल्क असावे याबाबत समितीकडून शिफारस केली जाणार असून, त्यानुसार मार्गदर्शक शुल्क जाहीर केले जाणार आहे.

'एआयसीटीई'चे अध्यक्ष प्रा. टी. जी. सीताराम यांनी ही माहिती दिली. 'एआयसीटीई'च्या अधिपत्याखाली या शैक्षणिक वर्षापासून बीबीए, बीसीए अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहेत. मात्र, या अभ्यासक्रमांना आता 'एआयसीटीई'चे निकष लागू होणार असल्याने या अभ्यासक्रमांचे शुल्क वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर, 'एआयसीटीई'कडून या अभ्यासक्रमांचे मार्गदर्शक शुल्क जाहीर करण्यात येणार आहे.

प्रा. सीताराम म्हणाले, 'बीबीए, बीसीएसाठीचा नवा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. तसेच अभ्यासक्रमाच्या अंमलाबाबत मार्गदर्शक सूचना, नियमावलीही केली आहे. त्यात पुढील दोन वर्षे बदल होणार आहे. या काळात शिक्षण संस्थांची तपासणीही केली जाणार नाही. मात्र, त्या पुढील काळात अभियांत्रिकी, एमबीए महाविद्यालयांप्रमाणे तपासणी केली जाईल.

05/07/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

# Why only 2% of colleges in India are autonomous

### UGC Keeps Pushing For It, But Complicated Formalities And Reluctance By Univs To Award The Tag Are Big Hurdles Towards Achieving Independence

Preetu Nair & Hemali Chhapia | TNN

Academic autonomy is under threat. At least in some states of India where the public university and colleges under it seem to be on the warpath over freedom. Of the 45,000-plus colleges across India, only about 995 are autonomous.

The University Grants Commission (UGC) has been promoting autonomy for decades. But it has been an arduous long walk to self-rule. For one, autonomy is not uniformly spread across the country: states like Jharkhand, Manipur, Rajasthan and Goa have the lowest count of autonomous colleges with the largest pool in Tamil Nadu, Maharashtra and Andhra Pradesh.

Secondly, academic autonomy in its truest sense is still uncommon, even though it is a proven fact that academic autonomy has an impact on performance in higher education. It is supposed to allow colleges to function without undue interference, allowing them to do what they do best: offer courses, alter curricula, innovate in teaching-learning and evaluate smartly. Yet, there are not many takers for it.




#### Multiple Issues

From political interference and universities unwilling to let go of their powers to a sheer lack of ambition and confidence in going independent, colleges across the country are reluctant or slow to turn autonomous for a variety of reasons. This despite the fact of UGC's repeated prodding of the states to encourage colleges to embrace independence.

A recent note speaks volumes about what is taking place on the ground. "...Some universities do not allow complete autonomy to the autonomous colleges in the matter of designing syllabus, introduction of new courses, and evolving methods of assessment of students' performance etc. as per provisions of the regulations. Certain universities ask the colleges to sign a MoU/agreement having terms and conditions against the provisions of the UGC regulations," it said.

Several principals in Kerala said universities discourage affiliated colleges from becoming autonomous as they "don't want a high performing college to move out from their ambit". Given limited flexibility, colleges are not permitted to start new programmes or change the existing syllabus by more than 20%. Autonomous institutes are also penalised disproportionately for oversights such as misspelt names in result sheets.

Worse still, despite all instructions having been fulfilled, universities often do not give approval to start new programmes or put colleges through a long-winding process that can take years. Several autonomous colleges have now approached Kerala High Court in order to obtain approval for new programmes. But even after HC's nod, a college will have to pay high fees for getting the syllabus approved. For example, Mahatma Gandhi University charges Rs 57,890 for UG programmes and Rs 1.2 lakh for approving PG programmes from autonomous colleges.

TOI Explains

#### Students At Receiving End

But it is the students that are the real sufferers in a clash of academic institutions. For instance, an autonomous college in north Kerala started five new undergraduate programmes in 2022, strictly adhering to UGC regulations of 2018 and submitting all necessary documents to the University of Calicut. Students admitted in those programmes have entered their fourth semester. But the university has yet to take any steps to give affiliation to or recognise these programmes. Since these programmes are not included in the university's database, the college fears that the students admitted to these courses may be denied degree certificates after completing their course.

Worse still, as the college doesn't have the university's certificate of affiliation for the five new programmes, NAAC has now sought a clarification from the college in this matter.

Such examples point to the difficulties inherent in negotiating an autonomous path for colleges. Given the disconnect between university education and the jobs market, innovative courses through industry and sectoral linkages are clearly the need of the day. However, with state-run universities unwilling to ease up on their jurisdictional powers, the process of reform is likely to remain slow.

### WHAT HAMPERS AUTONOMY HOPES

**DISCRIMINATION**

Though autonomous colleges conduct exams, the degree certificate is awarded by the university. While results of examinations are published and intimated to the universities, there is a delay in issuing provisional and original degree certificates to autonomous colleges, which are penalised for minor mistakes, too. For instance, the university can impose a fine of upto Rs 6,000 if a student's name is misspelt by a college while the mistake is corrected only after much back and forth. Non-autonomous colleges are fined Rs 50 and the mistake is immediately corrected.

**EXTRA WORK**

The faculty of an autonomous college is expected to attend the university's evaluation camps. In case they don't, an explanation is sought. "Our teachers are also asked to do double duty," a college in Thrissur district wrote to UGC. It said they have to evaluate papers for the college, and also of university students studying in affiliated colleges that are not autonomous.

**CIRCUITOUS PROCESSES**

Proposal by an autonomous college for a new course that is not offered by the university has to be first presented to the college's board of studies, which has a university nominee. Then, it is presented before its academic council, which has three university nominees. For final approval, it is presented before the college's governing body, which has a university nominee and a state govt nominee. Yet, when the revised syllabus is forwarded to the university, there is a reluctance to clear it. One reason being that there is often no university board of studies that can study the proposal, thus leaving the college in limbo.

**ADDITIONAL COSTS**

A university charges a one time affiliation fee/annual affiliation for existing programmes. But Calicut University charges higher fees for self-financing courses. While the fees for self-financing courses introduced by autonomous colleges is Rs 1.2 lakh, for govt-aided programmes it is Rs 33,090.

The Times of India 5.7.2024

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

प्रभात
Pune City_07 July 2024_005
07 Jul 2024

### 'दहावी, बारावी परीक्षांनाही पेपरफुटीचा कायदा लागू करा'

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ६** - स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारने विधेयक विधानसभेत सादर केले आहे. त्यामुळे पेपरफुटीच्या विरोधात असणारा कायदा करणे ही स्वागतार्ह बाब आहे. मात्र हा कायदा आता विद्यापीठ पदवी परीक्षा, खासगी विद्यापीठे, राज्य शिक्षण मंडळाद्वारे घेतल्या जाणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षांनाही लागू करण्याची मागणी होत आहे.

राज्यातील शासकीय पदभरतीच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटल्याचे प्रकार अनेकदा निदर्शनास आले आहेत. त्यामुळे या प्रकाराला आळा बसविण्यासाठी कठोर कायदा करण्याची मागणी केली जात होती. नीट-यूजी परीक्षेतील गैरप्रकारानंतर केंद्र सरकारनेही पेपरफुटीविरोधात कायदा केला आहे. त्या धर्तीवर राज्य सरकारनेही पेपरफुटीविरोधातील कायद्याचे विधेयक नुकतेच सादर केले. या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी अधिसभा सदस्य प्रा. धनंजय कुलकर्णी यांनी याबाबतचे निवेदन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले.

प्रभात
Pune City_07 July 2024_005
07 Jul 2024

### 'एमसीए' प्रवेशाला आजपासून सुरुवात

#### प्रवेशासाठी १४ जुलैपर्यंत करता येणार अर्ज

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ६** - मास्टर ऑफ कॉम्प्युटर अॅप्लिकेशन्स अर्थात एमसीए अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचे वेळापत्रक राज्य सीईटी सेलने शनिवारी प्रसिद्ध केले. त्यानुसार या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी १४ जुलैपर्यंत अर्ज करता येणार आहेत. तसेच या प्रवशाची अंतिम गुणवत्ता यादी २२ जुलै रोजी प्रसिद्ध होणार आहे.

राज्य सीईटी सेलने यापूर्वीच एमसीए प्रवेश दि. ६ जुलैपासून सुरू होणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार प्रवेशाचे वेळापत्रकही संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. अर्ज करण्यासाठी ६ ते १४ जुलै मुदत असून, अर्ज निश्चितीसाठी १५ तारखेपर्यंत मुदत आहे. अर्ज सादर करताना सर्व कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. वेळापत्रकानुसार दि. १७ जुलै रोजी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर या अर्जावर दि. १८ ते २० जुलै या दरम्यान हरकती, आक्षेप स्वीकारले जाणार आहेत. त्यानंतर २२ जुलै रोजी अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध होईल. दरम्यान, प्रवेशासाठी किती फेरी होणार आहेत, कधीपासून सुरू होतील, याबाबत अद्याप राज्य सीईटी सेलने म्हटले आहे.

## *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

# पेपरफुटीचा कायदा 'मर्यादित'

## खासगी, अभिमत विद्यापीठांच्या परीक्षांसह दहावी, बारावीच्या परीक्षा वगळल्या

मटा विशेष

**हर्ष दुधे**

harsh.dudhe@timesofindia.com

**पुणे :** राज्य सरकारने पेपरफुटीविरोधात कायदा करण्यासाठी विधिमंडळात विधेयक मांडले आहे. मात्र, त्यामध्ये कायद्याच्या कक्षेतून सरकारी, खासगी आणि अभिमत विद्यापीठांच्या परीक्षा; तसेच राज्य मंडळांसोबतच इतर मंडळांद्वारे घेतल्या जाणाऱ्या दहावी, बारावीच्या परीक्षा वगळल्या आहेत. त्यामुळे पेपरफुटी कायदा ठरावीक परीक्षांपुरता मर्यादित राहणार का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याचप्रमाणे प्रस्तावित कायद्यातील शिक्षेच्या तरतुदी कठोर नसल्याची टीकाही स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांनी केली आहे.

राज्य सरकारकडून विविध सरकारी विभागांमध्ये पदभरती करण्यासाठी स्पर्धा परीक्षा घेण्यात येतात. मात्र, या परीक्षांमध्ये पेपरफुटी होण्याचे प्रकार वाढले आहेत. त्याचप्रमाणे परीक्षेपूर्वीच प्रश्नपत्रिका व्हायरल होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे परीक्षेच्या एकूणच विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काही दिवसांपूर्वीच 'नीट' परीक्षेत झालेल्या गैरप्रकारामुळे देशात विविध ठिकाणी त्याचे पडसाद उमटत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पेपरफुटीच्या विरोधात कायद्याची अंमलबजावणी जून महिन्यातच लागू केली. त्यानंतर राज्य सरकारनेही महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुसूचित मार्गास प्रबंध) अधिनियम २०२४ लागू करण्याची तयारी केली असून, विधेयक विधिमंडळाच्या अधिवेशनात मांडले आहे. मात्र, या विधेयकाचा मसुदा केवळ स्पर्धा परीक्षाकेंद्रित केला आहे. त्याचे कार्यक्षेत्र हे मर्यादित स्वरूपाचे ठेवले आहे. त्यामुळे राज्यातील विविध विद्यापीठांच्या परीक्षा; तसेच मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांना वगळले आहे. या परीक्षांना स्पर्धा परीक्षांच्या तुलनेत किती तरी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी बसतात. या परीक्षांनाही पेपरफुटीचे; तसेच परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका सोशल मीडियावर व्हायरल होण्याचे प्रमाण वाढले आहे.

दहावी-बारावीच्या परीक्षेसोबतच पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षांमध्ये ग्रामीण भागातील गैरप्रकार अजूनही थांबलेले नाहीत. मात्र, कोणताही ठोस कायदा किंवा नियमावली नसल्याने, तात्पुरती मलमपट्टी म्हणून केवळ फौजदारी कारवाई होते. त्यामुळे हा कायदा विस्तृत स्वरूपात करण्याची आवश्यकता आहे.

### 'सरकारने विरोधाभास तातडीने दूर करावा'

'विद्यापीठाच्या परीक्षा आणि दहावी-बारावी परीक्षेची प्रश्नपत्रिका फोडण्याचे गैरप्रकार अनुभवायला मिळत आहेत. केंद्रीय प्रवेश परीक्षा आणि स्पर्धा परीक्षांपेक्षा विद्यापीठ, राज्य मंडळाच्या कार्यक्षेत्रात पेपरफुटी किंवा गैरप्रकार होतात. या कार्यक्षेत्रातील गैरप्रकारांना मोकळीक देण्याचे कोणतेही कारण नाही. राज्य सरकारच्या विद्यमान विद्यापीठ कायद्यात परीक्षा प्रक्रियेतील गैरप्रकाराच्या विरोधातील शिक्षेची तरतूद ही सौम्य स्वरूपात आहे. त्यामुळे राज्य सरकारने हा विरोधाभास तातडीने दूर केला पाहिजे,' अशी मागणी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य आणि अभ्यासक धनंजय कुलकर्णी यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केली आहे.



**"राज्य सरकारने व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी होणाऱ्या केंद्रीय प्रवेश परीक्षा, स्पर्धा परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटीच्या विरोधात; तसेच परीक्षेतील गैरप्रकारांच्या विरोधात गंभीर स्वरूपाचा फौजदारी गुन्हा दाखल करून, दोषी व्यक्तींना कठोर शिक्षा करणारे विधेयक आणले. त्याचे स्वागतच आहे. मात्र, हा कायदा विद्यापीठांच्या पदवी परीक्षा, राज्य मंडळासोबतच इतर मंडळे, प्राधिकरणांकडून घेतल्या जाणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षांसाठीही लागू करावा. त्यासाठी प्रस्तावित विधेयकात आवश्यक दुरुस्ती करावी.**

– धनंजय कुलकर्णी, माजी सिनेट सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Maharashtra Times 8.7.2024

लोकसत्ता

# विद्यापीठातील प्राध्यापक भरतीची रखडपट्टी

## उमेदवारांवर आणखी काही काळ प्रतीक्षा करण्याची वेळ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध विभागांमधील प्राध्यापकांच्या १११ रिक्त जागांसाठी सुरू करण्यात आलेल्या भरती प्रक्रियेची तांत्रिक अडचणींमुळे सहा महिने रखडपट्टी झाली आहे. आतापर्यंत दाखल झालेल्या अर्जांची छाननी प्रक्रिया सध्या सुरू असून, आता सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) घटकांतील उमेदवारांनाही अर्ज भरण्याची संधी दिली जाणार आहे. त्यामुळे पात्रताधारक उमेदवारांना आणखी काही काळ प्रतीक्षाच करावी लागणार असल्याचे दिसून येत आहे.



विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांमध्ये रिक्त असलेल्या जागांपैकी १११ जागांसाठीची भरती प्रक्रिया डिसेंबर २०२३ मध्ये सुरू करण्यात आली. विद्यापीठांमध्ये बऱ्याच वर्षांत भरती झाली नसल्याने पात्रताधारकांचे या भरतीकडे लक्ष लागले होते. त्यामुळे या जागांसाठी विद्यापीठाकडे सुमारे पाच हजार अर्ज दाखल झाले. मात्र त्यानंतर अनेक तांत्रिक अडचणींमुळे ही प्रक्रिया रखडली आहे. लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे सुमारे तीन महिने ही प्रक्रिया ठप्प होती. त्याशिवाय राज्य सरकारने सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) घटकांना आरक्षण लागू केल्याने त्या प्रवर्गातील उमेदवारांना संधी देणे आवश्यक आहे. त्यासाठीची बिंदुनामावली तयार करणे, ती शासनाकडून तपासून घेणे अशी तांत्रिक प्रक्रिया विद्यापीठाकडून पूर्ण करण्यात आली. आता त्या उमेदवारांना ऑनलाइन अर्ज भरण्यासाठीची संधी दिली जाणार आहे. त्यासाठी काही दिवसांची मुदत देण्यात येणार आहे. त्यानंतर त्या अर्जांची छाननी करावी लागणार आहे. तसेच प्रत्येक विषयाची निवड समिती स्थापन करणे आवश्यक आहे. ही सर्व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होऊन मुलाखतीच्या टप्प्यासाठी आणखी काही काळ वाट पहावी लागणार असल्याचे चित्र आहे. राज्यभरातील उमेदवार गेल्या सहा महिन्यांपासून भरतीच्या प्रतीक्षेत आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणूक होणार आहे. त्याची आचारसंहिता लागू होणार आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी तरी भरती प्रक्रिया होणार का, असा प्रश्न पात्रताधारक उमेदवारांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

**"आतापर्यंत दाखल झालेल्या अर्जांची छाननी प्रक्रिया सुरू आहे. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास घटकांतील उमेदवारांना अर्ज भरण्याची संधी दिली जाणार आहे. भरतीसाठीची सर्व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्यावर मुलाखतीचा टप्पा होईल.**

– डॉ. पराग काळकर, प्र कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

09/07/2024 | Pune | Page : 18
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

सकाळ

# विद्यार्थ्यांना घरबसल्या मिळणार शैक्षणिक प्रमाणपत्रे

## गैरसोय टाळण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पोर्टल सुरू

पुणे, ता. ८ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आतापर्यंत शैक्षणिक प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावा लागत होता. या अर्जाची मुद्रित प्रत आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्राकडे सादर करावी लागत होती. या प्रक्रियेत बराच वेळ जात असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत होती. विद्यार्थ्यांची ही गैरसोय टाळण्यासाठी विद्यापीठाने ही प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन आणि कागदविरहित केली आहे. त्यामुळे आता विद्यार्थ्यांना घरबसल्या शैक्षणिक प्रमाणपत्रे मिळू शकणार आहेत.

विद्यापीठाने कागदविरहित प्रक्रियेकडे पाऊल उचलले आहे. त्याचाच एक भाग म्हणजे आता ऑनलाइन अर्ज भरून विद्यार्थ्यांना घरबसल्या शैक्षणिक प्रमाणपत्रे मिळणार आहेत. शैक्षणिक प्रमाणपत्रांसाठी ऑनलाइन पोर्टलचे उद्घाटन विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांच्या हस्ते नुकतेच झाले. विद्यापीठातील विद्यार्थी दरवर्षी मोठ्या प्रमाणात परदेशात उच्च शिक्षणासाठी जातात. मात्र प्रवेश घेताना, तसेच पारपत्रासाठी अर्ज करताना विद्यार्थ्यांना ट्रान्सक्रिप्ट प्रमाणपत्रासह इतर प्रमाणपत्रे अनिवार्य असतात. त्यात ट्रान्सक्रिप्ट प्रमाणपत्र, रँक प्रमाणपत्र, मीडियम प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्र, दुय्यम शैक्षणिक प्रमाणपत्र यांचा समावेश आहे. आतापर्यंत ही कागदपत्रे मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने अर्ज करून, त्याची मुद्रित प्रत आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्राकडे सादर करावी लागत होती. मात्र, आता ही संपूर्ण प्रक्रिया पोर्टलद्वारे ऑनलाइन आणि कागदविरहित पद्धतीने राबविण्यात येणार आहे.

या अंतर्गत विद्यापीठाच्या संगणकीय प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर परीक्षा विभागाकडून त्यासंदर्भातील कार्यवाही पूर्ण केली जाईल आणि विद्यार्थ्यांना घरबसल्या ही प्रमाणपत्रे मिळतील. विशेष म्हणजे या प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यातील अपडेट मेसेज आणि ई-मेलद्वारे मिळणार असल्यामुळे विद्यार्थ्यांना अर्जाचा टप्पा तपासता येणार आहे. विद्यापीठाच्या एज्युटेक फाउंडेशनने निर्माण केलेल्या या पोर्टलचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने केले आहे.

**घरबसल्या शैक्षणिक प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी पोर्टल**
**https://sim.unipune.ac.in/sim_app/Login/Login**

Pune, Main
09/07/2024 Page No. 3

लोकमत

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे 'पेपरलेस'च्या दिशेने एक पाऊल पुढे

# विद्यार्थ्यांना घरबसल्या मिळणार 'ऑनलाइन पोर्टल'द्वारे प्रमाणपत्र

पॉझिटिव्ह स्टोरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा कारभार कागदविरहित 'पेपरलेस' होण्याकडे सुरू आहे. त्यामुळे ऑनलाइन अर्ज भरून विद्यार्थ्यांना घरबसल्या शैक्षणिक प्रमाणपत्रे मिळण्यास मदत होणार आहे. शैक्षणिक प्रमाणपत्रांसाठीच्या 'ऑनलाइन पोर्टल'चे अनावरण करण्यात आले.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थी दरवर्षी मोठ्या प्रमाणात परदेशात उच्च शिक्षणासाठी जात असतात. मात्र, परदेशात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेताना तसेच पारपत्रासाठी (व्हिसा) अर्ज करताना विद्यार्थ्यांना ट्रॉन्सक्रिप्ट प्रमाणपत्रासह इतर प्रमाणपत्रे अनिवार्य असतात. ज्यात ट्रॉन्सक्रिप्ट प्रमाणपत्र, रँक प्रमाणपत्र, मीडियम प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्र, दुय्यम शैक्षणिक प्रमाणपत्र यांचा समावेश आहे.

आतापर्यंत ही कागदपत्रे मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने अर्ज करून, त्याची मुद्रित प्रत आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठाच्या विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्राकडे (स्टुडंट फॅसिलिटेशन सेंटर) सादर करावी लागत. या प्रक्रियेत बराच वेळ जात असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत होती. मात्र, आता ही संपूर्ण प्रक्रिया या पोर्टलद्वारे ऑनलाइन आणि कागदविरहित पद्धतीने राबविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना या https://sim.unipune.ac.in/sim_app/Login/Login पोर्टलद्वारे अर्ज सादर करता येणार आहे.

शैक्षणिक प्रमाणपत्रांसाठीच्या 'ऑनलाइन पोर्टल'चे अनावरण परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अधिसभा सदस्य राहुल पाखरे, पदवी प्रमाणपत्र विभागाचे उपकुलसचिव ज्ञानेश्वर साळुंके आदी उपस्थित होते.



एआय इमेज

### ऑनलाइन माध्यमातून होणार कार्यवाही

विद्यापीठाच्या संगणकीय प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर परीक्षा विभागाकडून त्या संदर्भातील कार्यवाही पूर्ण केली जाणार आहे. विशेष म्हणजे, या प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यातील अपडेट मॅसेज आणि ई-मेलद्वारे मिळणार असल्यामुळे विद्यार्थ्यांना अर्जाचे स्टेटस तपासता येणार आहे.

Hello Pune
Page No. 1 Jul 09, 2024
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# पेपरफुटीविरोधातील कायदा सर्वच परीक्षांना लागू करा

## कायद्यात दुरुस्ती करण्याची मागणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महाराष्ट्र शासनाने नुकताच व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी होणाऱ्या केंद्रीय प्रवेश परीक्षा, स्पर्धा परीक्षांतील पेपरफुटीविरोधात, परीक्षेतील गैरप्रकारांविरोधात गंभीर स्वरूपाचा फौजदारी गुन्हा दाखल करून दोषींना कठोर शिक्षा करणारे विधेयक विधानसभेत सादर केले आहे. असा कायदा करणे स्वागतार्हच आहे. मात्र हा कायदा विद्यापीठ पदवी परीक्षा, खासगी विद्यापीठे, राज्य परीक्षा मंडळाद्वारे घेतल्या जाणाऱ्या दहावी, बारावीच्या परीक्षांसाठीही लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

राज्यातील शासकीय पदभरतीच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटल्याचे प्रकार अनेकदा निदर्शनास आले आहेत. त्यामुळे राज्यात पेपरफुटीविरोधात कठोर कायदा करण्याची मागणी करण्यात येत होती. नीट-यूजी परीक्षेतील गैरप्रकारानंतर केंद्र सरकारनेही पेपरफुटीविरोधातील कायदा केला आहे. त्या धर्तीवर राज्य सरकारनेही पेपरफुटीविरोधातील कायद्याचे विधेयक नुकतेच सादर केले. या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी अधिसभा सदस्य प्रा. धनंजय कुलकर्णी यांनी या संदर्भातील त्रुटी निदर्शनास आणून देत सर्वच परीक्षांना कायदा लागू करण्याची मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली.

कोणत्याही परीक्षेची प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वी फोडणे हा दंडनीय अपराध मानून कडक फौजदारी कारवाई केली पाहिजे. विद्यापीठ आणि दहावी-बारावीच्या प्रश्नपत्रिका फोडण्याचे गैरप्रकार या पूर्वी अनुभवास आले आहेत. केंद्रीय प्रवेश परीक्षा अथवा स्पर्धा परीक्षांपेक्षा विद्यापीठ आणि परीक्षा मंडळाच्या प्रश्नपत्रिका फुटल्यास तो दंडनीय अपराध नाही, असे मानण्याचे काहीच कारण नाही. सध्याच्या विद्यापीठ कायद्यात परीक्षा गैरप्रकार विरोधातील शिक्षा तरतूद सौम्य स्वरूपात आहे. हा विरोधाभास दूर केला पाहिजे. त्यासाठी विद्यापीठ कायद्यात आणि परीक्षा मंडळांच्या कायद्यात आवश्यक दुरुस्ती करावी अथवा प्रस्तावित विधेयकात आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी कुलकर्णी यांनी केली आहे.

09/07/2024 | Pune | Page : 18
Source : https://epaper.loksatta.com

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
Pune City_ 09 July 2024_015
09 Jul 2024

# वेळेत परीक्षा न घेतल्यास कारवाई

## यूजीसीचा शिक्षणसंस्थांना इशारा; प्रमाणपत्रांची अडवणूक नको

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ८ -** नियोजित वेळापत्रकानुसार परीक्षा न घेणाऱ्या आणि विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यास टाळाटाळ करणाऱ्या शिक्षण संस्थांवर विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) आता कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे. वेळेत परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्याच्या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित विद्यापीठ व महाविद्यालयांवर कारवाई करण्याचा इशाराही यूजीसीने दिला आहे. त्यामुळे आता विद्यापीठ व महाविद्यालयांना वेळेत परीक्षा घ्याव्या तर लागतीलच; परंतु प्रमाणपत्राची अडवणूक करणाऱ्या शिक्षण संस्थाही अडचणीत येणार आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोग नियमावली २००८ नुसार विद्यार्थी पात्र झाल्याच्या किंवा होणे अपेक्षित असल्याच्या तारखेपासून १८० दिवसांत पदवी प्रदान केली पाहिजे, अशी तरतूद आहे. याशिवाय विद्यार्थी हक्कांबाबतच्या २०१२ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार उच्चशिक्षण संस्थांनी माहिती पुस्तकातील शैक्षणिक वेळापत्रकात नमूद केल्यानुसार विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेऊन निकाल जाहीर केला पाहिजे. निकाल जाहीर झाल्यापासून १८० दिवसांत पदवी मिळणे हा विद्यार्थ्यांचा हक्क आहे, अशी स्पष्ट तरतूद आहे.

मात्र, काही उच्च शिक्षण संस्था वेळेत परीक्षा घेत नसल्याचे, तसेच पदवी आणि अंतिम प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना देण्यास विलंब करत असल्याचे निदर्शनास आले आहे. या विलंबामुळे विद्यार्थ्यांच्या संधी हुकतात. योग्य आणि गुणवत्तापूर्ण रोजगारापासून ते रोखले जातात, तसेच त्यांच्या पुढील शैक्षणिक भवितव्यालाही फटका बसतो, याकडे यूजीसीने लक्ष वेधले आहे. याबाबतचे परिपत्रक यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी प्रसिद्ध केले.

या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षण संस्थांच्या परीक्षा प्रशासनाने यूजीसी नियमावली आणि मार्गदर्शक सूचनांचे पालन करून वेळेत परीक्षा घ्याव्यात, तसेच विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करावीत.

याचे उल्लंघन झाल्यास कारवाई करण्याचा अधिकार यूजीसीला असल्याचे परिपत्रकात नमूद केले आहे.

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# मुलींना मोफत शिक्षण व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीच

## पारंपरिक अभ्यासक्रमांसाठी योजना लागू नसल्याचे स्पष्ट

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यातील मुलींना शिक्षणात प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून मोफत शिक्षण योजना लागू करण्यात आली आहे. त्यानुसार वार्षिक आठ लाख रुपये किंवा कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलींना या योजनेचा लाभ मिळणार आहे. मात्र, ही योजना केवळ व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीच लागू असून, कला, वाणिज्य, विज्ञान आदी पारंपरिक शाखांतील अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींना या योजनेचा लाभ मिळू शकणार नाही.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग, कृषी व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग यांच्या अखत्यारितील शिक्षण संस्थांमध्ये राबवल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या इतर मागास प्रवर्ग (ओबीसी), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील (एसईबीसी) वार्षिक कौटुंबिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभ देण्यात येतो. व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये मुलींचे प्रमाण ३६ टक्के इतके मर्यादित आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार व्यावसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढविण्यासाठी, मुलींना समप्रमाणात शिक्षणाच्या व्यापक संधी मिळण्यासाठी, महिला सक्षमीकरणाअंतर्गत आर्थिक पाठबळाऐवजी, मुली व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्यापासून वंचित राहू नयेत यासाठी राज्य मंत्रिमंडळाच्या ५ जुलै रोजी झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला होता.

त्यानुसार, राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालये, तंत्रनिकेतने, सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे, सार्वजनिक विद्यापीठांच्या उपकेंद्रांतील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांना शासनाच्या सक्षम प्राधिकरणाद्वारे राबवल्या जाणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यवस्थापन आणि संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) ओबीसी, ईडब्ल्यूएस, एसईबीसी प्रवर्गातील वार्षिक आठ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी कौटुंबिक उत्पन्न असलेल्या नवीन प्रवेशित आणि पूर्वीपासून प्रवेशित मुलींना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी ही योजना लागू राहील. त्यात शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभाऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून देण्यासाठी ९०६ कोटी रुपयांच्या अतिरिक्त आर्थिक भारास मान्यता देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच, महिला आणि बालविकास विभागाने स्पष्ट केलेल्या संस्थात्मक, संस्थाबाह्य या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणारी अनाथ मुले, मुली यांनाही या योजनेचा लाभ लागू करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

उच्च व तंत्रशिक्षण ही योजना लागू करताना खासगी विद्यापीठ आणि स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठात शिकणाऱ्या मुलींना या योजनेचा लाभ मिळणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच ही योजना केवळ व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीच लागू आहे. त्यामुळे पारंपरिक कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखांतील विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना या योजनेचा लाभ मिळणार नसल्याचे दिसून येत आहे.

### योजनेच्या लाभासाठी...

**ईडब्ल्यूएस आरक्षणातून प्रवेश घेतलेल्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत लाभ लागू करताना ईडब्ल्यूएस प्रमाणपत्राऐवजी आई-वडील दोघांच्याही एकत्रित उत्पन्नावर आधारित सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र लागू करण्यात आले आहे. मात्र, जे विद्यार्थी नोकरीत असतील त्यांच्या आई-वडिलांच्या उत्पन्नासोबतच उत्पन्न प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांचेही उत्पन्न विचारात घ्यावे. ईडब्ल्यूएस आरक्षणातून शैक्षणिक प्रवेश घेतलेल्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ प्रथम वर्षासाठी मिळाल्यानंतर ही सवलत अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लागू राहील. त्यांना दुसऱ्या वर्षापासून उत्पन्न प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही. याच तरतुदी संस्थात्मक आणि संस्थाबाह्य वर्गवारीत समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले, मुली यांनाही लागू करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.**

09/07/2024 | Pune | Page : 10
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

लोकमत

# मुलींना यंदापासूनच मिळेल मोफत शिक्षण

### आठ लाखांची उत्पन्न मर्यादा, ९०६ कोटींचा अतिरिक्त बोजा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये आर्थिकदृष्ट्या मागास, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास, इतर मागासवर्ग या प्रवर्गातील मुलींना मोफत शिक्षण देण्याची तरतूद असलेला शासन निर्णय (जीआर) उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सोमवारी जारी केला. पालकांचे उत्पन्न वार्षिक आठ लाख रुपयांपेक्षा अधिक असणार नाही अशी अट त्यात असेल. या निर्णयाची अंमलबजावणी २०२४-२५ या शैक्षणिक सत्रापासूनच करण्यात आली आहे. नवीन प्रवेश घेणाऱ्या आणि आधीपासून प्रवेश घेतलेल्या मुलींसाठीही हा निर्णय लागू असेल. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांचा त्यात समावेश असेल.

आतापर्यंत या समाजघटकांतील मुलींना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के सवलत दिली जात होती. आता ती १०० टक्के करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर वर्षाकाठी ९०६ कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडेल. कारण, माफ केलेल्या शुल्काची प्रतिपूर्ती राज्य सरकार करणार आहे. ईडब्ल्यूएस आरक्षणातून शैक्षणिक प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास, राजर्षी शाहू महाराज शिक्षणशुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ प्रथम वर्षाकरिता मिळाल्यानंतर ही सवलत त्याचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लागू असेल.



मुलींना मोफत शिक्षण देण्याचा शब्द आमच्या सरकारने पाळला आहे. आर्थिक क्षमता नसलेल्या पाल्यांना आता मुलींच्या शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करताना आर्थिक बोजा सहन करावा लागणार नाही. **- चंद्रकांत पाटील,** उच्च व तंत्रशिक्षणमंत्री

### कोणाला लाभ?

राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये, तंत्रनिकेतने, सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रांमधील अभ्यासक्रमांमधील मुलींना या निर्णयाचा लाभ मिळेल. मात्र, खासगी अभिमत विद्यापीठे आणि स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांना तो लागू नसेल.

### अनाथ मुलांनाही मोफत शिक्षण

- याच शासन निर्णयात आणखी एक निर्णय असा घेण्यात आला आहे की, अनाथ मुलींबरोबरच अनाथ मुलांनादेखील मोफत व्यावसायिक शिक्षण दिले जाईल.
- देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना अनाथांना सरकारी नोकऱ्यांमध्ये एक टक्का समांतर आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय झाला होता.

Pune Main
Page No. 9 Jul 09, 2024
Powered by: erelego.com

प्रभात
Pune City_09 July 2024_013
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे 09 Jul 2024
www.dainikprabhat.com

# सरसकट सर्व प्रवर्गातील मुलींना मोफत शिक्षण नाही

प्रभात वृत्तसेवा

**आठ लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या पाल्यांना उच्च शिक्षण मोफत**

पुणे, दि. ८ - व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी मुलींना मोफत शिक्षण देण्याच्या निर्णयावर अखेर शिक्कामोर्तब झाले. वार्षिक उत्पन्न आठ लाख व अथवा त्यापेक्षा कमी असलेल्या पात्र मुलींचे शिक्षण मोफत राहील. सरसकट सर्व प्रवर्गातील मुलींना शिक्षण मोफत नसेल. व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (इब्ल्यूएस), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) आणि इतर मागास प्रवर्गातील (ओबीसी) प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क ५० टक्क्यांएवजी आता १०० टक्के माफ केले जाणार आहे. दरम्यान, बीए, एमए, बीकॉम, एमकॉम बीएस्सी आणि एमएस्सी यासारख्या पारंपरिक अभ्यासक्रमांना ही मोफत शिक्षणाचा निर्णय लागू होणार नसल्याचे स्पष्ट होत आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश घेणाऱ्या इब्ल्यूएस, एसईबीसी, ओबीसी या प्रवर्गातील वार्षिक उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी असलेल्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शुल्काचा लाभ दिला जातो. याच प्रवर्गातील मुलींना आता शंभर टक्के शुल्कमाफीचा लाभ मिळणार आहे. व्यावसायिक शिक्षणामध्ये मुलींचे प्रमाण ३६ टक्के आहे. व्यावसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. तसेच , आर्थिक पाठबळाअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्यापासून मुली वंचित राहू नये, यासाठी नुकतच्या झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुलींना व्यावसायिक शिक्षण मोफत देण्याचा निर्णय झाला. त्याचा अधिकृतरीत्या शासन निर्णय आज प्रसिद्ध झाला.

यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून मोफत शिक्षणाच्या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे. राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित महाविद्यालये, अशंतः अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये, तंत्रनिकेतन, सार्वजनिक विद्यापीठ, शासकीय अभिमत विद्यापीठात मुलींना व्यावसायिक शिक्षण शुल्क शंभर टक्के माफ राहील. पण त्याचे प्रवेश केंद्रीय पद्धतीने होणे अनिवार्य आहे.

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# विद्यार्थ्यांना घरबसल्या मिळणार प्रमाणपत्रे

## कागदविरहित होण्याच्या दिशेने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे पाऊल

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कागदविरहित प्रक्रियेच्या दिशेने पाऊल उचलले आहे. त्याचाच एक भाग म्हणजे आता ऑनलाइन अर्ज भरून विद्यार्थ्यांना घरबसल्या शैक्षणिक प्रमाणपत्रे मिळणार आहेत. विद्यापीठात शुक्रवारी शैक्षणिक प्रमाणपत्रांसाठीच्या 'ऑनलाइन पोर्टल'चे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

याप्रसंगी अधिसभा सदस्य राहुल पाखरे, विद्यावाणीचे माजी संचालक आनंद देशमुख, पदवी प्रमाणपत्र विभागाचे उपकुलसचिव ज्ञानेश्वर साळुंके, बाळासाहेब आंत्रे, विक्रम संगर, तुषार बेलेकर यांच्यासह ट्रॉन्सक्रिप्ट विभागातील सर्व सहकारी उपस्थित होते.



**ऑनलाइन पोर्टलच्या उद्घाटन प्रसंगी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांच्यासह अन्य मान्यवर.**

विद्यापीठातील विद्यार्थी दरवर्षी मोठ्या प्रमाणात परदेशात उच्च शिक्षणासाठी जात असतात. मात्र, परदेशात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेताना तसेच, पारपत्रासाठी (व्हिसा) अर्ज करताना विद्यार्थ्यांना ट्रॉन्सक्रिप्ट प्रमाणपत्रासह इतर प्रमाणपत्रे अनिवार्य असतात. ज्यात ट्रॉन्सक्रिप्ट प्रमाणपत्र, रँक प्रमाणपत्र, मीडियम प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्र, दुय्यम शैक्षणिक प्रमाणपत्र यांचा समावेश आहे. आत्तापर्यंत ही कागदपत्रे मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने अर्ज करून, त्याची मुद्रित प्रत आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्राकडे (स्टुडंट फॅसिलिटेशन सेंटर) सादर करावी लागायची. या प्रक्रियेत बराच वेळ जात असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत होती. मात्र, आता ही संपूर्ण प्रक्रिया या पोर्टलद्वारे ऑनलाइन आणि कागदविरहित पद्धतीने राबविण्यात येणार आहे.

**'ऑनलाइन पोर्टल'चे अनावरण**

याअंतर्गत विद्यापीठाच्या संगणकीय प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर परीक्षा विभागाकडून त्यासंदर्भातील कार्यवाही पूर्ण केली जाईल आणि विद्यार्थ्यांना घरबसल्या ही प्रमाणपत्रे मिळतील. विशेष म्हणजे या प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यातील अपडेट मेसेज आणि ई-मेलद्वारे मिळणार असल्यामुळे विद्यार्थ्यांना अर्जाचे स्टेटस तपासता येणार आहे. विद्यापीठाच्या एज्युटेक फाउंडेशनने निर्माण केलेल्या या https:///sim.unipune.ac.in/simapp/Login/Login पोर्टलचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने केले आहे.

Pune Edition Edition
Jul 09, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

# क्रीडा विद्यापीठ स्थापनेपूर्वीच बोगस?

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशातील ६३ बोगस विद्यापीठांची यादी जाहीर केली असून, त्यात राज्याच्या आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठाचा समावेश आहे. विद्यापीठाला मान्यता मिळाल्यानंतरही लोकपालाची नियुक्ती न केल्यामुळे, 'यूजीसी'ने क्रीडा विद्यापीठाला बोगस विद्यापीठाच्या यादीत टाकले आहे. या यादीत सर्वाधिक समावेश राज्य सरकारी विद्यापीठांचा आहे.

याबाबतचे प्रसिद्धीपत्रक 'यूजीसी'चे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी प्रसिद्ध केले आहे. 'यूजीसी'ने देशभरातील विद्यापीठांना सहा महिन्यांत लोकपाल नियुक्त करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार एक जुलै २०२४पर्यंत ६३ विद्यापीठांनी लोकपाल नियुक्त केल्याची माहिती 'यूजीसी'ला दिली नाही. यात राज्यातून सरकारच्या आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठाचा समावेश आहे. राज्य सरकारने क्रीडा विद्यापीठाची घोषणा तीन वर्षांपूर्वी करूनही हे विद्यापीठ प्रत्यक्ष अस्तित्वात आलेले नाही. ते पुण्यात होणार की छत्रपती संभाजीनगर येथे, याबाबतही शिक्कामोर्तब झालेले नाही. त्यामुळे 'यूजीसी'कडील माहितीत क्रीडा विद्यापीठाचा पत्ता श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल असा दाखविला आहे.

आता विद्यापीठाला बोगस विद्यापीठांच्या यादीत टाकण्यात आल्यामुळे राज्य सरकारची नाचक्की झाली आहे. या यादीत सर्वाधिक ४६ विद्यापीठे ही राज्य सरकारी असून, त्या खालोखाल अभिमत विद्यापीठे ११ आहेत; सहा खासगी विद्यापीठे आहेत. या सर्व विद्यापीठांनी लोकपालाची नियुक्ती करून, ती माहिती तातडीने पाठवावी, असे प्रा. जोशी यांनी पत्राद्वारे सांगितले.

### यादीतील समाविष्ट विद्यापीठे



(चित्र : एआय)

या यादीत 'आयआयएमसी दिल्ली'सोबतच मोरारजी देसाई इन्स्टिट्यूट ऑफ योग, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकल टीचर ट्रेनिंग अँड रिसर्च, पंजाब इंजिनीअरिंग कॉलेज, जोधपूर नॅशनल युनिव्हर्सिटी, ट्रिपल आयटी (भुवनेश्वर), नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ अॅडव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंग टेक्नॉलॉजी अशा विद्यापीठांचा समावेश आहे.

Maharashtra Times 9.7.2024

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

लोकमत

# पॉलिटेक्निक पदविकेसाठी 17 हजार अर्ज




**लोकमत न्यूज नेटवर्क । पुणे :** जिल्ह्यांतील शासकीय तसेच खासगी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये विविध पॉलिटेक्निक पदविका अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी सोमवार, ८ जुलै रोजी दुपारी २ वाजेपर्यंत १६ हजार ९८९ अर्जांची नोंदणी झाली होती. त्यापैकी १३ हजार ८६२ विद्यार्थ्यांनी अर्ज निश्चिती केली आहे. पॉलिटेक्निक पदविका घेत झटपट नोकरी मिळविणे तसेच स्वतःचा व्यवसाय सुरु करता यावा यासाठी दहावी तसेच बारावीनंतर पॉलिटेक्निक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे दिसून येत आहे.

## पुण्यात दोन्ही पॉलिटेक्निक कॉलेजची क्षमता १२९०

पुणे जिल्ह्यांत दोन शासकीय तंत्रनिकेतन, पुणे आणि शासकीय तंत्रनिकेतन अवसरी येथे दोन शासकीय पॉलिटेक्निक कॉलेज आहेत. या दोन्ही पॉलिटेक्निक कॉलेजची प्रवेश क्षमता अनुक्रमे ८७० आणि ४२० अशी एकूण १२९० एवढी आहे.




**१७ हजार विद्यार्थ्यांची नोंदणी**

पुणे जिल्ह्यांतील शासकीय तसेच खासगी पॉलिटेक्निक कॉलेजमधील रिक्त जागांसाठी १६ हजार ९८९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

**९ जुलैपर्यंत करता येणार अर्ज**

दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ९ जुलैपर्यंत ऑनलाइन माध्यमातून अर्ज करता येणार आहे.



**विद्यार्थ्यांचा ओढा कॉम्प्युटरकडे जास्त**

गतवर्षी प्रमाणे यंदाही संगणक शाखेकडे विद्यार्थ्यांचा ओढा असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

**अंतिम यादीनंतर प्रवेश निश्चित**

ऑनलाइन अर्ज नोंदणी करीत कागदपत्रे अपलोड करीत अर्ज निश्चिती केल्यानंतर तंत्रशिक्षण संचालनालयाकडून सुधारित वेळापत्रकानुसार प्रवेशाची अंतिम गुणवत्ता यादी १६ जुलैला प्रकाशित केली जाईल.

इयत्ता दहावीनंतर प्रथम वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वास्तुकला या पदविका (पॉलिटेक्निक) अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना ९ जुलैपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत.

\- डॉ. राजेंद्र पाटील, प्राचार्य, शासकीय पॉलिटेक्निक, पुणे

Hello Pune
Page No. 8 Jul 09, 2024
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During July 2024

## Section: Education

लोकमत

# देशात ६३ विद्यापीठांकडून लोकपाल नियुक्ती नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यार्थ्यांचे शैक्षणिक तसेच इतर प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी देशातील विद्यापीठांमध्ये लोकपाल नियुक्ती गरजेची आहे. लोकपाल नियुक्ती न केल्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने देशातील ६३ विद्यापीठांना डिफॉल्टर म्हणून घोषित केले आहे. या यादीत पुण्यातील बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठाचादेखील समावेश आहे.

यूजीसीतर्फे देशातील केंद्रीय, राज्य तसेच खासगी विद्यापीठांनी यूजीसी नियमावलीनुसार लोकपाल नियुक्त करावेत, यासाठी अनेक वेळा पत्रव्यवहार करण्यात आला होता. मात्र, अद्यापही अनेक विद्यापीठांकडून लोकपालांची नियुक्ती करण्यात आलेली नाही. यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी डिफॉल्टर ६३ विद्यापीठांची यादी जाहीर केली आहे. त्यामध्ये ४६ राज्य विद्यापीठे, ६ खासगी विद्यापीठांसह ११ अभिमत विद्यापीठांचा समावेश आहे. राज्य विद्यापीठांमध्ये सर्वाधिक कर्नाटक आणि ओडिशामधील प्रत्येकी आठ, पश्चिम बंगालमधील ६ विद्यापीठे आहेत.

चंडीगडचे पंजाब अभियांत्रिकी महाविद्यालय, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकल टीचर ट्रेनिंग अँड रिसर्च, गुरू तेगबहादूर विद्यापीठ, उत्तराखंड आयुर्वेद विद्यापीठ, महाराजा सुहेल देव विद्यापीठ आणि लखनौच्या किंग जॉर्ज डेंटल विद्यापीठ, मध्य प्रदेश वैद्यकीय विज्ञान विद्यापीठ, राजा मानसिंग तोमर संगीत आणि कला विद्यापीठ, राजीव गांधी विद्यापीठ, राजमाता विजयराजे सिंधिया कृषी विद्यापीठ, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकल टीचर ट्रेनिंग अँड रिसर्च भोपाळ, प्रताप युनिव्हर्सिटी आणि जोधपूर नॅशनल युनिव्हर्सिटीसह इतर प्रसिद्ध विद्यापीठांचा समावेश आहे.

Pune Main
Page No. 2 Jul 10, 2024
Powered by: erelego.com

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# राष्ट्रीय वैज्ञानिक गोलमेज परिषद पुण्यात

## देश-परदेशातील १३० शास्त्रज्ञांचा सहभाग

**पुणे :** एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्या वतीने १९ ते २१ जुलै या कालावधीत देशात प्रथमच विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित भारतीय शास्त्रज्ञांची तीन दिवसीय 'पहिली राष्ट्रीय वैज्ञानिक गोलमेज परिषद' (एनएसआरटीसी) आयोजित करण्यात आली आहे. 'विकसीत भारत २०४७' ही मध्यवर्ती संकल्पना असलेल्या या परिषदेत देशातील आणि परदेशातील १३० शास्त्रज्ञांचा सहभाग असेल.

विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्या हस्ते १९ जुलै रोजी परिषदेचे उद्घाटन होणार असून वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे (सीएसआयआर) महासंचालक व सचिव डॉ. एन. कलई सेल्वी, माजी महासंचालक डॉ. शेखर मांडे, मुंबई येथील इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे माजी कुलगुरू डॉ. गणपती यादव आणि मद्रास आयआयटीचे प्रा. टी. प्रदीप हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, विद्यापीठाचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल कराड आणि परिषदेचे संयोजक व विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे यांनी मंगळवारी दिली.

10/07/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

***News Paper Clippings During July 2024***

***Section: Education***

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक कागदपत्रे आता ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध

## विद्यापीठाकडून संकेतस्थळाची निर्मिती

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक कागदपत्रे आता ऑनलाइन अर्ज भरून घरबसल्या मिळणार आहेत. त्यासाठी विद्यापीठाकडून खास संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांचा त्यांच्या अर्जाचा प्रवास तपासता येणार असून, प्रत्येक टप्प्याची माहिती लघुसंदेश आणि ई मेलद्वारे मिळणार आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांच्या हस्ते संकेतस्थळाचे अनावरण नुकतेच करण्यात आले. अधिसभा सदस्य राहुल पाखरे, विद्यावाणीचे माजी संचालक आनंद देशमुख, पदवी प्रमाणपत्र विभागाचे उपकुलसचिव ज्ञानेश्वर साळुंके, बाळासाहेब आंत्रे, विक्रम संगर, श्री. तुषार बेलेकर या वेळी उपस्थित होते. या प्रणालीसंदर्भात गेल्यावर्षी विद्यापीठाच्या अधिसभेत या बाबत चर्चा करून निर्णय घेण्यात आला होता.

उच्च शिक्षणासाठी परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना त्या विद्यापीठातील प्रवेशासाठी, पारपत्र, व्हिसासाठी अर्ज करताना ट्रान्सक्रिप्ट प्रमाणपत्रासह इतर प्रमाणपत्रे अनिवार्य असतात. आतापर्यंत ही कागदपत्र मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने अर्ज करून, त्याची मुद्रित प्रत आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्राकडे (स्टुडंट फॅसिलिटेशन सेंटर) सादर करावी लागत होती.

या प्रक्रियेत बराच वेळ जात असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत होती. मात्र आता ही संपूर्ण प्रक्रिया संकेतस्थळाद्वारे होणार असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय टाळली जाणार आहे. विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठाच्या संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर परीक्षा विभागाकडून त्या संदर्भातील कार्यवाही पूर्ण केली जाईल आणि विद्यार्थ्यांना घरबसल्या ही प्रमाणपत्रे मिळणार आहेत. त्यासाठीचे https://sim.unipune.ac.in/sim_app/Login/Login संकेतस्थळाची निर्मिती विद्यापीठाच्या एज्युटेक फाउंडेशनने केली आहे.

महाराष्ट्र पशु व मत
फुटाळा तलाव
प्रवेश
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्या

10/07/2024 | Pune | Page : 03
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

# डिप्लोमासाठी अर्जांचा ओघ सुरूच

### १८ जुलैपर्यंत प्रक्रिया; दीड लाख विद्यार्थी

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'राज्यात 'डिप्लोमा इन इंजिनीअरिंग'ला (पॉलिटेक्निक) प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होत असून, ही संख्या दीड लाखांपर्यंत पोहोचली आहे. त्यामुळे अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली असून, विद्यार्थ्यांना आता १८ जुलैपर्यंत अर्ज करता येणार आहे,' अशी माहिती तंत्रशिक्षण संचालनालयाचे (डीटीई) संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनी दिली आहे.

**■ संख्या वाढणार?**

पॉलिटेक्निकच्या प्रवेशप्रक्रियेसाठी आजपर्यंत जवळपास एक लाख ४७ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी एक लाख १७ हजार ५०० उमेदवारांनी अर्ज निश्चित केले आहेत. राज्यातील ३९० संस्थांत सुमारे एक लाख पाच हजार प्रवेशक्षमता आहे. अनेक विद्यार्थी आजही शैक्षणिक दाखले आणि प्रमाणपत्रांच्या अभावी अर्जनिश्चिती करीत नसल्याचे आढळत आहे. त्यामुळे अर्ज निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या निश्चितपणे वाढणार आहे.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे मान्यता प्रक्रिया आणि त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाकडून (एमएसबीटीई) संलग्नता देण्यासाठी लागणारा वेळ विचारात घेऊन अर्ज करण्याच्या तारखेला अखेरची मुदतवाढ देण्यात आली आहे.

'प्रवेश फेऱ्यांचे, प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंतचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. प्रवेशप्रक्रियेच्या संपूर्ण तपशीलासाठी, उमेदवारांसाठी महत्त्वाच्या सूचना; तसेच अर्ज भरण्यासाठी https://dte.maharashtra.gov.in या वेबसाइटला भेट द्या,' असे डॉ. मोहितकर यांनी सांगितले.

**■ प्रवेशाच्या तीन फेऱ्या**

डिप्लोमा प्रवेशासाठी एकच प्रवेशप्रक्रिया राबवली जाते. ही प्रक्रिया ऑनलाइन असल्याने विद्यार्थ्यांना प्रत्येक पॉलिटेक्निकसाठी वेगळा अर्ज भरण्याची आवश्यकता नाही. वेळापत्रकानुसार प्रवेशाची अंतिम गुणवत्ता यादी २५ जुलैला प्रकाशित केली जाणार आहे. 'कॅप'अंतर्गत प्रवेशाच्या तीन फेऱ्या घेण्यात येणार आहेत.

(चित्र : एआय)




**डिप्लोमा अभ्यासक्रमास वाढता प्रतिसाद का?**

- दहावीनंतर कमी कालावधीत तंत्रशिक्षण घेऊन अभियंता होण्यासाठी तंत्रशिक्षणातील डिप्लोमा अभ्यासक्रम हा एक उत्तम पर्याय आहे.
- डिप्लोमा अभ्यासक्रम दहावीनंतर तीन वर्षांचा असून, अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रात रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध होतात. अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना पात्रतेच्या निकषानुसार सरकारतर्फे विविध शिष्यवृत्ती देण्यात येतात.
- डिप्लोमाच्या शिक्षणानंतर पुढील शिक्षणासाठी अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्षात पात्रतेनुसार प्रवेश घेण्याची संधीही उपलब्ध असते.

Maharashtra Times 10.7.2024

# मराठ्यांच्या इतिहासावर सर्व विद्यापीठांकडून अन्याय

### माजी खासदार प्रदीप रावत यांची टीका

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठ्यांच्या इतिहासावर राज्यातील सर्व विद्यापीठांकडून अन्याय झाला आहे. मोडी, फारसी आणि युरोपियन भाषांतील ऐतिहासिक साधनांचा सखोल अभ्यास करून शास्त्रोक्त पद्धतीने शिवराय आणि मराठ्यांचा गौरवशाली इतिहास जगासमोर आणणे, हे कर्तव्य असतानाही घडले नाही,' अशी टीका माजी खासदार आणि भारत इतिहास संशोधक मंडळाचे अध्यक्ष प्रदीप रावत यांनी केली.

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या ११४व्या वर्धापनदिनानिमित्त रविवारी मंडळात कार्यक्रमाचे आयोजन झाले. या वेळी लेखक श्रीकांत चौघुले, मंडळाचे चिटणीस पांडुरंग बलकवडे, उपाध्यक्ष डॉ. बी. डी. कुलकर्णी, खजिनदार प्रा. नंदकुमार निकम उपस्थित होते. फारसी भाषातज्ज्ञ रोहित सहस्रबुद्धे, दुर्ग अभ्यासक अनिकेत यादव, मोडी लिपीचे तज्ज्ञ राम वाघोले या युवा इतिहास संशोधकांना श्रीकांत चौघुले पुरस्कृत विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आले.

'पुण्यासह राज्यातील अभिलेखागारांमध्ये मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधित कोट्यवधी मोडी आणि फारसी भाषांतील कागद दुर्लक्षित आहेत. त्यावर संशोधन आवश्यक असतानाही विद्यापीठ आणि महाविद्यालयाच्या प्राध्यापकांकडून संशोधन झाले नाही, ही खेदाची बाब आहे. विद्यापीठांसारखा निधीही मंडळाकडे नसताना मंडळाच्या संशोधकांनी ११३ वर्षे लाखो कागदपत्रे प्रसिद्ध केली, हे कार्य कौतुकास्पद आहे,' असे रावत म्हणाले.

चौघुले यांनी मनोगत व्यक्त केले. पांडुरंग बलकवडे यांनी प्रास्ताविक केले. नंदकुमार निकम यांनी सूत्रसंचालन केले.

Maharashtra Times 10.7.2024

## *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

# विद्यापीठाची 'पेट' २४ ऑगस्टला

## अर्जप्रक्रिया आजपासून सुरू

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएचडी प्रवेश परीक्षा (पेट) २४ ऑगस्ट रोजी होणार असून, ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्याची प्रक्रिया आज, बुधवारपासून (१० जुलै) सुरू होणार आहे. परीक्षा देण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना १० ऑगस्टपर्यंत अर्ज करता येणार आहे.

**■ साधारण तीन हजार जागा**

पुणे विद्यापीठाकडून शैक्षणिक विभागांमध्ये आणि संलग्न संशोधन केंद्रांमध्ये पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी 'पेट' घेण्यात येते. साधारण तीन हजार जागांसाठी ही परीक्षा होते. विद्यार्थी या परीक्षेची आतुरतेने वाट पाहत असतात. ही परीक्षा पुणे, नगर आणि नाशिक शहरांतील केंद्रामध्ये २४ ऑगस्ट रोजी ऑनलाइन पद्धतीने आयोजित करण्यात येणार आहे.

याबाबतची सविस्तर माहिती पुणे विद्यापीठाच्या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे रिक्त जागांचा प्रवर्गनिहाय तपशील https://bcud.unipune.ac.in/phd_entrance/Applicant/SearchGuideVacancies.aspx या लिंकवर उपलब्ध आहे.

पुणे विद्यापीठामध्ये पीएचडी प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाइनद्वारे अर्जप्रक्रिया पूर्ण करावी. पीएचडी प्रवेशाविषयी संपूर्ण नियम, मार्गदर्शक सूचना आदी माहिती 'पीएचडी ॲडमिशन ॲंड ट्रॅकिंग पोर्टल' https://bcud.unipune.ac.in/phd/Ph.D_Addmission/index.html या लिंकवर उपलब्ध आहे.

(चित्र : एआय)



### सहभागाचे आवाहन

'विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन पीएचडी प्रवेशाच्या नियमावलीनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाद्वारे पीएचडी प्रवेश परीक्षा (पेट) घेण्यात येत आहे. सर्व इच्छुक विद्यार्थी संशोधकांनी या परीक्षेत मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे,' असे आवाहन कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी केले आहे.

### 'नेट'चे गुण प्रवेशासाठी वापरणार?

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन पीएचडी प्रवेशाच्या नियमावलीनुसार ही प्रवेशप्रक्रिया राबवण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने जाहीर केले आहे. त्यामुळे 'नेट'मधील गुणांचा उपयोग पीएचडी प्रवेशासाठी होण्याची शक्यता आहे. ''नेट'मध्ये चांगले गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची मुलाखत घेण्यात येईल. त्यानंतर त्यांचा पीएचडीसाठी प्रवेश होऊ शकतो,' अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.

Maharashtra Times 10.7.2024

*News Paper Clippings During July 2024*

*Section: Education*

लोकसत्ता

लोकमान्य लोकशक्ती

विद्यार्थ्यांना ७५ टक्के उपस्थिती बंधनकारक

# अकरावी-बारावीच्या वर्गाला दांडी मारण्याच्या प्रकारांना चाप?

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : अभियांत्रिकी, वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांच्या शिकवणी वर्गाला जाण्यासाठी अकरावी-बारावीच्या वर्गाला दांडी मारण्याच्या प्रकारांना आता चाप लागण्याची शक्यता आहे. पुणे विभागीय उपसंचालक कार्यालयाने महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती ७५ टक्के बंधनकारक केली असून, अचानक तपासणीमध्ये कमी विद्यार्थिसंख्या आढळल्यास कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

गेल्या काही वर्षांत इंटिग्रेटेड कोचिंग पद्धतीने मूळ धरले आहे. जेईई, नीट, एमएचटी-सीईटी अशा प्रवेश परीक्षांसाठी वर्षभर खासगी शिकवणीवर्ग चालवले जातात. त्यासाठी खासगी शिकवणीवर्ग आणि महाविद्यालये करार करतात. त्याद्वारे विद्यार्थी शिकवणी वर्गात उपस्थित राहून महाविद्यालयात गैरहजर राहतात. यातून ७५ टक्के उपस्थितीच्या नियमाचे उल्लंघन होत असूनही हे प्रकार सर्रास होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या सहायक संचालक डॉ. ज्योती परिहार यांनी याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले.

माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांची उपस्थिती मंडळ नियमावलीत नियम क्रमांक ८८(१) मधील तरतुदीनुसार नियमित विद्यार्थ्यांची प्रथम आणि द्वितीय सत्रातील हजेरी स्वतंत्रपणे ७५ टक्के असणे आवश्यक आहे. त्यामुळे शैक्षणिक सत्रातील विद्यार्थ्यांची ७५ टक्के उपस्थिती शालेय, राज्य मंडळाच्या परीक्षेसाठी अनिवार्य आहे. त्यामुळे अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत सनियंत्रणाची जबाबदारी संबंधित प्राचार्यांची आहे.

शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये यांची विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत तपासणी करण्यात येणार आहे. तपासणीच्या वेळी उपस्थिती कमी आढळून आल्यास संबंधित विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालयावर कारवाई केली जाईल, असे परिपत्रकाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

10/07/2024 | Pune | Page : 02

Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

### SPPU STARTS ONLINE SERVICE TO GET VARSITY DOCUMENTS

**Dheeraj Bengrut**
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** The Savitribai Phule Pune University (SPPU) has taken a step towards a paperless process under which students will now get educational certificates at home by filling out an online application.

As per the information given by the SPPU, this portal was unveiled by Mahesh Kakade, SPPU director of the examination and evaluation board. It includes Transcript Certificate, Rank Certificate, Medium Certificate, Degree Certificate, Secondary Education Certificate.

"Till now, to get this document, students had to apply online and submit its printed copy along with necessary documents to the Student Facilitation Center of the university. Students were inconvenienced as this process was taking a long time. However, now this entire process will be done online and paperless through this portal," said Kakade.

"After the students fill out the online application along with the necessary documents through the computerised system of the University, the examination department will complete the proceedings in that regard. Students will get these certificates at home," he added.

Hindustan Times 10.7.2024

### घरबसल्या मिळणार विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे

**पेपरलेस होण्याच्या दिशेने पाऊल**


(चित्र : एआय)

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रमाणपत्रे घरबसल्या एका क्लिकवर उपलब्ध होण्यासाठी ऑनलाइन पोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलचे अनावरण विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठाने कागदविरहित (पेपरलेस) प्रक्रियेकडे पाऊल उचलले आहे.

पुणे विद्यापीठात शैक्षणिक प्रमाणपत्रांसाठीच्या 'ऑनलाइन पोर्टल'चे अनावरण करण्यात आले. या प्रसंगी अधिसभा सदस्य राहुल पाखरे, विद्यावाणीचे माजी संचालक आनंद देशमुख, पदवी प्रमाणपत्र विभागाचे उपकुलसचिव ज्ञानेश्वर साळुंके, बाळासाहेब आंत्रे, विक्रम संगर, तुषार बेलेकर यांच्यासह ट्रान्सक्रिप्ट विभागातील सर्व सहकारी उपस्थित होते.

पुणे विद्यापीठातील विद्यार्थी दर वर्षी परदेशात उच्च शिक्षणासाठी जात असतात. मात्र, परदेशात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेताना; तसेच पारपत्रासाठी (व्हिसा) अर्ज करताना विद्यार्थ्यांना ट्रान्सक्रिप्ट प्रमाणपत्रासह इतर प्रमाणपत्रे अनिवार्य असतात. यामध्ये ट्रान्सक्रिप्ट प्रमाणपत्र, रँक प्रमाणपत्र, मीडियम प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्र, दुय्यम शैक्षणिक प्रमाणपत्र यांचा समावेश आहे. आतापर्यंत ही कागदपत्रे मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने अर्ज करून त्याची मुद्रित प्रत आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठाच्या विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्राकडे (स्टुडंट फॅसिलिटेशन सेंटर) सादर करावी लागायची. या प्रक्रियेत बराच वेळ जात असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत होती. मात्र, आता ही संपूर्ण प्रक्रिया या पोर्टलद्वारे ऑनलाइन आणि कागदविरहित पद्धतीने राबवण्यात येणार आहे.

याअंतर्गत विद्यापीठाच्या संगणकीय प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर परीक्षा विभागाकडून त्या संदर्भातील कार्यवाही पूर्ण केली जाईल. त्यानंतर विद्यार्थ्यांना पोस्टाद्वारे घरबसल्या ही प्रमाणपत्रे मिळतील. विशेष म्हणजे, या प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यातील अपडेट, मेसेज आणि माहिती ई-मेलद्वारे मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अर्जाचे स्टेटस तपासता येणार आहे. पाखरे यांनी पोर्टलच्या निर्मितीसाठी विशेष प्रयत्न केले. 'विद्यापीठाच्या एज्युटेक फाउंडेशनने निर्माण केलेल्या https://sim.unipune.ac.in/sim_app/Login/Login पोर्टलचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा,' असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा आणि मूल्यमापन विभागाने केले आहे.

**पोस्टाद्वारे मिळणार घरबसल्या प्रमाणपत्रे**

विद्यापीठाच्या संगणकीय प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर परीक्षा विभागाकडून त्या संदर्भातील कार्यवाही पूर्ण केली जाईल. त्यानंतर विद्यार्थ्यांना पोस्टाद्वारे घरबसल्या ही प्रमाणपत्रे मिळतील. या प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यातील अपडेट, मेसेज आणि माहिती ई-मेलद्वारे मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अर्जाचे स्टेटस तपासता येणार आहे. 'विद्यापीठाच्या एज्युटेक फाउंडेशनने निर्माण केलेल्या https://sim.unipune.ac.in/sim_app/Login/Login पोर्टलचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा,' असे आवाहन परीक्षा आणि मूल्यमापन विभागाने केले.

Maharashtra Times 11.7.2024

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

**मटा अँकर** विविध योजनांद्वारे ८० टक्के जागांचे शुल्क आता राज्य सरकारकडून

# खासगी महाविद्यालये जवळपास अनुदानित

म. टा. प्रतिनिधी, पुणे

(चित्र : एआय)



> मुलींना मोफत शिक्षण देण्याचा फायदा मुलींसोबतच, पालक आणि खासगी संस्थांनाही होणार आहे. खासगी संस्थांवर आर्थिक बोजा वाढू नये, यासाठी सवलतीच्या शुल्काची प्रतिपूर्ती वेळेत करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे सरकारी शिष्यवृत्ती योजनांमध्ये समानता आणण्याची आवश्यकता आहे.
>
> – प्रा. रामदास झोळ, अध्यक्ष, असोसिएशन ऑफ द मॅनेजमेंट ऑफ दी अनऐडेड इनस्टिट्यूट्स इन रुरल एरिया

राज्य सरकारने व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या मुलींना शैक्षणिक शुल्कात आणि परीक्षा शुल्कात १०० टक्के सलवत देण्याच्या निर्णय लागू केला आहे. सध्या खासगी विनाअनुदानित महाविद्यालयांतील ६२ टक्के विद्यार्थ्यांचे शुल्क विविध योजनांच्या माध्यमातून सरकारच भरते. त्यातच आता मुलींच्या प्रवेशासाठी लागणाऱ्या शुल्काची प्रतिपूर्तीही सरकारकडून होणार असल्याने ही महाविद्यालये जवळपास अनुदानित बनली आहेत!

राज्यातील इंजिनीअरिंग, फार्मसी, वैद्यकीय, हॉटेल मॅनेजमेंट, आर्किटेक्चर, कृषी आदी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या खासगी महाविद्यालयांतील साठ टक्के विद्यार्थ्यांना विविध सरकारी योजनेतून शिष्यवृत्तीचा लाभ मिळतो. अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त आणि भटक्या जाती, इतर मागासवर्गीय आणि विशेष मागासवर्गीय या सर्व समाजघटकांसाठी एकूण ५२ टक्के आरक्षण आहे. त्यातच गेल्या काही वर्षांपासून आर्थिक दुर्बल घटकांसाठी दहा टक्के जागा आहेत. यांपैकी मागास घटकांचे पूर्ण, तर इतर, विशेष व आर्थिक मागास घटकांचे निम्मे शुल्क सरकारकडून दिले जाते. अशा रीतीने खासगी विनाअनुदानित महाविद्यालयांतील ६२ टक्के विद्यार्थ्यांचे शुल्क सरकारकडून जाते. त्यात आता मुलींच्या सुमारे १८ टक्के जागांची भर पडू शकते. त्यामुळे खासगी महाविद्यालयांतील ८० टक्के जागांचे शुल्क सरकारकडून जाईल आणि एक प्रकारे ती अनुदानित होतील.

देशात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींचे प्रमाण सध्या ३८ टक्के आहे. त्यांपैकी निम्मे आरक्षित वर्गातील असले, असे मानल्यास त्यांचे शुल्क सध्याही सरकारकडून भरले जाते. याचाच अर्थ आणखी निम्म्या विद्यार्थिनींना सरकारच्या नव्या धोरणाचा लाभ होईल. राज्य सरकारच्या निर्णयामुळे विद्यार्थिनींचे पारंपरिक अभ्यासक्रमांऐवजी व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशासाठी पसंती राहू शकते. विद्यार्थिनींना व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेताना शैक्षणिक शुल्क भरावे लागणार नाही. त्याचप्रमाणे परीक्षांसाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क लागू राहणार नाही. या पार्श्वभूमीवर मुलींचा व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी ओढा वाढत आहे. राज्यातील व्यावसायिक महाविद्यालयांत रिक्त जागांचे प्रमाण सुमारे ३० टक्के आहे. या रिक्त राहणाऱ्या जागांवरही मुलींचा प्रवेश होऊ शकतो.

Maharashtra Times 11.7.2024

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

लोकमत

# मुलींना आता मिळेल उच्च शिक्षण मोफत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या आर्थिक (ईडब्ल्यूएस), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) आणि इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) मुलींना तसेच अनाथ मुलींसह मुलांना मोफत उच्च शिक्षण देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यासंदर्भात राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. मुलींचे शैक्षणिक शुल्क माफ केल्यानंतर या शुल्कांची प्रतिपूर्ती राज्य सरकार करणार आहे.



लोकमत इन्फोस्टोरी

### वार्षिक उत्पन्न आठ लाखापेक्षा कमी

यंदा नव्याने प्रवेश घेणाऱ्या तसेच आधीपासून प्रवेशित मुलींसाठी हा निर्णय लागू असून, शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ पासून त्याची अंमलबजावणी केली जाईल. वरील प्रवर्गातील मुलींच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न आठ लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे, अशी अट घालण्यात आली आहे.




मुलींचा शुल्क माफीचा राज्य सरकारचा निर्णय स्तुत्य आहे. त्यामुळे गरीब, मागास कुटुंबातील मुलींना व्यावसायिक अभ्यासक्रमांचे उच्च शिक्षण घेणे सोपे होणार आहे. जास्तीत जास्त मुलींनी या संधीचा लाभ घ्यावा. विद्यापीठांवरील आर्थिक भार काही अंशी कमी होण्यास मदत होईल.

- डॉ. अरुण अडसूळ, माजी कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### कोठे प्रवेश घेतल्यास मिळणार लाभ

राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित व कायम अनुदानित महाविद्यालये, तंत्रनिकेतने, सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील अभ्यासक्रमांना मुलींना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. मात्र, खासगी अभिमत विद्यापीठे, आणि स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांना हा निर्णय लागू होणार नाही.

### कशासाठी मिळेल मोफत प्रवेश?

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी, पशुसंवर्धन दुग्ध व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतला असेल तर शुल्क माफ केले जाणार आहे.

### यापूर्वीही होती ५० टक्के सवलत

सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास तसेच इतर मागास प्रवर्गातील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कांच्या पन्नास टक्के सवलत दिली जात होती. आता ती १०० टक्के मिळणार आहे.

Hello Pune
Page No. 3 Jul 12, 2024
Powered by: erelego.com

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# कृषी अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांची पाठ

## १७,९०० पैकी ४० टक्के जागा 'रिक्त'ची शक्यता

**बिपीन देशपांडे, लोकसत्ता**



**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत अनेक महाविद्यालयांतील विविध अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांनी पाठ फिरवल्याचे चित्र समोर आले आहे. २०० पेक्षा अधिक कृषी महाविद्यालयांमधील १७ हजार ९०६ जागांपैकी ४० टक्के जागा रिक्त राहण्याची शक्यता आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये कृषी विषयाशी संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रवेशपूर्व परीक्षेबाबतची (सीईटी) अपुरी माहिती, कृषी क्षेत्राकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टिकोन, नोकरीच्या संधींची संदिग्धता, अशी काही कारणे काही विद्यार्थ्यांनी पाठ फिरवण्यामागे असल्याचे सांगण्यात येते. सर्व जागांवर प्रवेश व्हावेत यासाठी समाईक परीक्षेचा दर्जाही काहीसा कमी करावा का, यावरही चर्चा करण्याची गरज असल्याचे मत काही अभ्यासक व्यक्त करतात.

एमजीएमच्या कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नीलेश म्हस्के यांनी सांगितले, की विद्यार्थ्यांचा कृषी अभ्यासक्रमांसाठी कल दिसून येत नाही. या क्षेत्रातही चांगल्या पगाराच्या नोकरीच्या संधी आहेत, हे बारावीपासूनच विद्यार्थ्यांना सांगून, त्यांच्यामध्ये जागृतीची गरज आहे. सीईटीची अट शिथिल करून मार्ग काढला, तर प्रवेशप्रक्रियेसाठी मदत होईल, असे प्रा. डॉ. योगेश पाटील यांनी सांगितले. कृषी परिषदेवरील एका पदाधिकाऱ्याने सीईटी आयुक्तांशी या संदर्भाने पत्रव्यवहार सुरू असल्याची माहिती दिली.

> कृषी अभ्यासक्रमांसाठीच्या जागा रिक्त राहण्याचे प्रमाण वाढत आहे. गतवर्षीही जागा रिक्त राहिल्या होत्या. यावर मंथन सुरू आहे. अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी खुला आणि आरक्षण घटकातील प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या बारावीतील टक्केवारीची अट अनुक्रमे ४५-३५ अशी प्रत्येकी पाच टक्क्यांनी कमी करण्याचा विचार सुरू आहे.
>
> - डॉ. इंद्र मणी, कुलगुरू, वनामकृवि, परभणी

> प्रवेशपूर्व परीक्षा घेण्याचे एक धोरण निश्चित झालेले आहे. ते कृषी महाविद्यालयांमधील अभ्यासक्रमांनाही लागू आहे. त्यानुसार परीक्षा घेतलेली आहे. प्रवेशातील जागा रिक्त राहण्याची काही शक्यता आहे का, याची माहिती घेतली जाईल.
>
> - धनंजय मुंडे, कृषिमंत्री

12/07/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

लोकमत

# पेपरचा स्क्रीनशॉट व्हायरल करणाऱ्या विद्यार्थ्याविरोधात दाखल होणार आरोपपत्र; गैरप्रकारांमागे कारस्थान नव्हते

## यूजीसी-नेटप्रकरणी सीबीआयची माहिती, काही जणांकडून उकळले होते पैसे

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** यूजीसी-नेट परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचा फेरफार केलेला स्क्रीनशॉट टेलिग्रामवर प्रसारित करणाऱ्या शालेय विद्यार्थ्याविरोधात सीबीआय आरोपपत्र दाखल करण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्याच्या या कृत्यामुळे संभाव्य धोके टाळण्यासाठी गृह मंत्रालयाच्या इशाऱ्यानंतर ही परीक्षा रद्द करण्यात आली होती.

यूजीसी-नेटच्या प्रश्नपत्रिकेबाबत जो गैरप्रकार झाला, त्यामागे कोणतेही मोठे कारस्थान नव्हते, असे तपासात आढळले आहे. विद्यार्थ्यांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल असून, तसे आरोपपत्रात नमूद करण्यात येईल. यूजीसीने आपल्या तपासाचा अहवाल केंद्र सरकारला सादर केला आहे.

**अशी केली चलाखी**

स्क्रीनशॉट विद्यार्थ्याने तयार केला. स्क्रीनशॉटची तारीख बदलून १७ जून केली. प्रश्नपत्रिका आपल्याकडे उपलब्ध असल्याचे भासवून त्याने काही जणांकडून पैसेही उकळले होते, असे तपासात आढळून आले.

### नीट : सुनावणी १८ जुलैपर्यंत पुढे ढकलली

नीट-यूजी परीक्षेतील गैरप्रकारांची चौकशी करावी, ही परीक्षा रद्द करून फेरपरीक्षा घ्यावी आदी मागण्यांसाठी केलेल्या याचिकांवरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने गुरुवार, १८ जुलैपर्यंत पुढे ढकलली. केंद्र सरकार व नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) सादर केलेली प्रतिज्ञापत्रे काही पक्षकारांना उपलब्ध झाली नसल्याने सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला.

### गंगाधरच्या सीबीआय कोठडीत ४ दिवसांची वाढ

**लातूर :** 'नीट'मध्ये (नॅशनल एलिजिबिलिटी एंटरन्स टेस्ट) गुणवाढीचे आमिष दाखवून विद्यार्थी-पालकांकडून पैसे उकळल्याप्रकरणी अटकेत असलेल्या आरोपी गंगाधरच्या सीबीआय कोठडीत लातूर न्यायालयाने चार दिवसांची वाढ केली आहे. दोन दिवसांच्या कोठडीत सीबीआयने अनेक धागेदोरे शोधले असून, आता चार दिवसांच्या कोठडीत कसून चौकशी केली जाणार आहे.

Pune Main
Page No. 1 Jul 12, 2024
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# उच्च शिक्षण संस्थेत आता विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय उपचार

## महाविद्यालयांमध्ये ऑन कॉल सेवा उपलब्ध : उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे निर्देश

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**राज्यातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना आता तातडीचे वैद्यकीय उपचार उपलब्ध करून दिले जाणार आहेत. त्यासाठी उच्च शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांचा शासन योजनेतून किंवा इतर उपक्रमांतर्गत विमा काढणे, प्रथमोपचार कक्षाची निर्मिती, दरवर्षी किमान एक प्रथमोपचार प्रशिक्षण आणि वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन, संस्थे-नजीकच्या डॉक्टरांशी सामंजस्य करार करून ऑन कॉल सेवा उपलब्ध करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.**

राज्यातील उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीत असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी व तत्सम अभ्यासक्रमांच्या शिक्षणासाठी विद्यार्थी दररोज किमान सहा ते सात तास उपस्थित असतात. काही विद्यार्थ्यांना या कालावधीत तातडीच्या वैद्यकीय उपचारांची गरज भासू शकते. या वेळी संस्थेने योग्य आणि तातडीने कार्यवाही केल्यास विद्यार्थ्याला तत्काळ वैद्यकीय मदत मिळून अप्रिय घटना टाळता येऊ शकते, असे नमूद करीत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. या




सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीत असलेल्या अनुदानित शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, अनुदानित अभिमत विद्यापीठे, अनुदानित समूह विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, अनुदानित तंत्रशिक्षण महाविद्यालये, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित संस्थांना लागू आहेत.

संस्थेतील सर्व विभागांमध्ये तत्काळ प्रथमोपचारासाठी प्रथमोपचार किट उपलब्ध करावे, वैद्यकीय प्रशिक्षणामध्ये कृत्रिम श्वासोच्छ्वास तसेच इतर तातडीच्या प्रथमोपचारांबाबत प्रशिक्षित करावे, संस्थेनजीकचे शासकीय रुग्णालय, शासकीय आरोग्य केंद्र, खासगी दवाखाने, शासकीय (१०८) व सार्वजनिक रुग्णवाहिकांचे संपर्क क्रमांक ठळक अक्षरांत दर्शनी भागात लावून त्यांच्याशी समन्वय ठेवावा. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी संस्थास्तरावर एक ते दोन समन्वयक नेमून त्यांना प्रशिक्षण द्यावे, संबंधित समन्वयकाने आजारी



विद्यार्थ्यास तत्काळ उपचार मिळण्यासाठी रुग्णालयांशी संपर्क साधून रुग्णालयात भरती करण्यास मदत करावी, विद्यार्थ्यांसाठी तणावमुक्ती कार्यशाळांचे आयोजन करावे, विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी समुपदेशकाची नियुक्ती करावी, असे नमूद करण्यात आले आहे.

My Pune Edition Edition
Jul 12, 2024 Page No. 07
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता

# 'यूजीसी'चा संस्थांना कारवाईचा इशारा

## शुल्क परतावा धोरणाचे पालन न करणाऱ्यांना चाप

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शुल्क परतावा धोरणाचे पालन न करणाऱ्या उच्च शिक्षण संस्थांना विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) कारवाईचा स्पष्ट इशारा दिला आहे. धोरणाचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांच्या अभ्यासक्रमांची संलग्नता रोखणे, स्वायत्तता रद्द करणे अशा प्रकारची कारवाई केली जाणार आहे.

'यूजीसी'चे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले. निश्चित केलेल्या मुदतीपूर्वी प्रवेश रद्द करणाऱ्या विद्यार्थ्यांना शुल्क परत करण्याबाबत गेल्या चार वर्षांमध्ये अनेकदा नोटिसा आणि परिपत्रके प्रसिद्ध करण्यात आली आहेत. तसेच डिसेंबर आणि मेमध्ये झालेल्या बैठकांमध्येही उच्च शिक्षण संस्थांनी शुल्क परतावा धोरण आणि शुल्क परतावा विनाविलंब करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतरही उच्च शिक्षण संस्थांकडून त्याचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर आता विद्यापीठांचे कुलगुरू, महाविद्यालयाच्या प्राचार्यांना शुल्क परताव्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

'यूजीसी'च्या परिपत्रकाबाबत उच्च शिक्षण संस्था अन्वयार्थ लावून शुल्क परताव्यास नकार देत असल्याचे निदर्शनास आले आहे. यूजीसीच्या धोरणाचे उल्लंघन केल्यामुळे ऑक्टोबर २०१८च्या परिपत्रकानुसार कारवाई केली जाऊ शकते. त्यात उल्लंघन करणाऱ्या उच्च शिक्षण संस्थांच्या मुक्त आणि दूरस्थ अभ्यासक्रमांची मान्यता रोखणे, अनुदान रोखणे, स्वायत्तता रद्द करणे, स्वायत्तता अमान्य करणे यासह नियमाचे पालन न केल्याबाबत वृत्तपत्रांत किंवा योग्य माध्यमांत नोटीस प्रसिद्ध करण्याचे 'यूजीसी'ला अधिकार आहेत, असे नमूद करण्यात आले आहे.

13/07/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

प्रभात
Pune City_13 July 2024_013
13 Jul 2024

# बीबीए, बीसीएची अतिरिक्त सीईटी चार ऑगस्ट रोजी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १२ -** बीबीए, बीसीए, बीएमएस, बीबीएम या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अतिरिक्त सीईटी घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार अतिरिक्त सीईटीची तारीख जाहीर करण्यात आली असून, ही सीईटी दि. ४ ऑगस्ट रोजी होणार आहे.

बीबीए, बीसीए अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीईटी अनिवार्य आहे. यापूर्वी या अभ्यासक्रमांसाठीची सीईटी दि. २९ मे रोजी घेण्यात आली होती. मात्र, अनेक विद्यार्थ्यांना सीईटीबाबत माहिती नव्हती. त्यामुळे अनेक जण सीईटी देऊ शकले नाहीत. त्यामुळे आणखी एक सीईटी घेण्यात यावी, अशी मागणी होत होती. या सर्व पार्श्वभूमीवर राज्य सीईटी सेलने अतिरिक्त सीईटी घेण्याचा निर्णय जाहीर करीत विद्यार्थ्यांना दिलासा दिला आहे. ही सीईटी ४ ऑगस्ट रोजी राज्यातील विविध केंद्रांवर घेण्यात येणार आहे.

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# अकरावीची तिसरी फेरी आजपासून

## येत्या २२ जुलै रोजी जाहीर होणार गुणवत्ता यादी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यानुसार पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयात पहिल्या दोन फेऱ्यांपर्यंत ३४ हजार ६८२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. आता तिसऱ्या प्रवेश फेरीसाठी विद्यार्थ्यांना आज (दि.१४ जुलै) पासून अर्ज भरता येणार आहेत.**

तसेच त्यांच्याकडून पसंतीक्रम नोंदवून घेतले जाणार आहेत. विद्यार्थ्यांना १४ ते १७ जुलैपर्यंत यासाठी अर्ज करता येणार आहे. त्यानंतर २२ जुलै रोजी संबंधित विद्यार्थ्यांची प्रवेश यादी कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

केंद्रीय अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेत ३४३ महाविद्यालयांमध्ये १ लाख १९ हजार ७०५ जागा उपलब्ध आहेत. त्यातील ९३ हजार ५८४ जागा केंद्रीय प्रवेशांसाठी (कॅप), तर २६ हजार १२१ जागा कोटा प्रवेशांसाठी आहेत. यापैकी शून्य आणि पहिल्या दोन फेऱ्या मिळून ३४ हजार ६८२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. यामध्ये कॅप फेरीतील २८ हजार ५८९ तर कोटाअंतर्गत ६ हजार ९३ अशा एकूण ३४ हजार ६८२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. तर तिसऱ्या फेरीसाठी आता कॅपच्या ६४ हजार ९९५ आणि कोटा प्रवेशाच्या २० हजार २८ अशा एकूण ८५ हजार २३ जागा प्रवेशासाठी उपलब्ध असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, आज सकाळी १० पासून ते १७ जुलै रात्री १० पर्यंत नवीन विद्यार्थी ऑनलाइन नोंदणी करून वैयक्तिक माहिती असणारा अर्जाचा भाग १ भरून तो प्रमाणित करून घेऊ शकतात. तसेच महाविद्यालय पसंतीक्रम अर्जाचा भाग २ विद्यार्थ्यांना भरता येणार आहे.

याशिवाय या प्रवेश प्रक्रियेत सुरुवातीपासूनच समाविष्ट विद्यार्थ्यांना महाविद्यालय पसंतीक्रम बदलता येतील अन्यथा मागील पसंतीक्रम कायम राहतील. तिसऱ्या यादीत महाविद्यालय मिळालेल्यांना २२ जुलै रोजीपासून २४ जुलै रोजी सायंकाळपर्यंत प्रवेश निश्चित करता येणार आहे.

**विद्यार्थ्यांना १७ जुलैपर्यंत भरता येणार अर्ज**




### अशी असेल प्रवेश प्रक्रिया

- यापूर्वी नोंदणी न केलेल्यांनी नावनोंदणी करून, महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरणे तसेच प्रवेश जाहीर न झालेल्या विद्यार्थ्यांना **पसंतीक्रम बदलण्याची संधी :** १४ ते १७ जुलै (रात्री १०)
- **कोटा प्रवेशासाठी ऑनलाइन प्रक्रिया सुरू :** १४ ते १७ जुलै
- **विद्यार्थ्यांच्या माहिती आधारे गुणवत्ता यादी :** १८ ते १९ जुलै
- **प्रवेशाची तिसरी निवड यादी प्रसिद्धे :** २२ जुलै सकाळी १० वाजता.
- **कागदपत्रे आणि शुल्कांद्वारे प्रवेश निश्चित :** २२ ते २४ जुलै (सायं ६)
- **प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती अपलोड :** २५ जुलै (रात्री ८ पर्यंत)

Pune Edition Edition
Jul 14, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During July 2024

## Section: Education

Pune City_15 July 2024_007
15 Jul 2024
प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

# उच्च शिक्षणसंस्थेत मिळावेत विद्यार्थ्यांना वैद्यकीय उपचार

**शिक्षण विभागाचे निर्देश; विम्यासह प्रथमोपचार कक्षाची निर्मिती**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १४** - विद्यार्थ्यांना तातडीचे वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्याचे निर्देश उच्च शिक्षण विभागाने सर्व शिक्षणसंस्थांना दिले आहेत. उच्च शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांचा शासन योजनेतून किंवा इतर उपक्रमाअंतर्गत विमा काढणे, प्रथमोपचार कक्षाची निर्मिती, दरवर्षी किमान एक प्रथमोपचार प्रशिक्षण आणि वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन, संस्थेनजीकच्या डॉक्टरांशी सामंजस्य करार करून ऑन कॉल सेवा उपलब्ध करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

राज्यातील उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीत असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी व तत्सम अभ्यासक्रमाच्या शिक्षणासाठी विद्यार्थी दररोज किमान सहा ते सात तास उपस्थित असतात. काही विद्यार्थ्यांना या कालावधीत तातडीच्या वैद्यकीय उपचारांची गरज भासू शकते. या वेळी संस्थेने योग्य आणि तातडीने कार्यवाही केल्यास विद्यार्थ्याला तत्काळ वैद्यकीय मदत मिळून अप्रिय घटना टाळता येऊ शकते. याबाबतचे परिपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रसिद्ध केले. या सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारितील असलेल्या अनुदानित शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, अनुदानित अभिमत विद्यापीठे, अनुदानित समूह विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, अनुदानित तंत्रशिक्षण महाविद्यालये, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित संस्थांना लागू आहेत.



संस्थेतील सर्व विभागांमध्ये तात्काळ प्रथमोपचारासाठी प्रथमोपचार किट उपलब्ध करावे, वैद्यकीय प्रशिक्षणामध्ये कृत्रिम श्वासोश्वास, तसेच इतर तातडीच्या प्रथमोपचारांबाबत प्रशिक्षित करावे, संस्थेनजीकचे शासकीय रुग्णालय, शासकीय आरोग्य केंद्र, खासगी दवाखाने, शासकीय (१०८) व सार्वजनिक रुग्णवाहिकांचे संपर्क क्रमांक ठळक अक्षरात दर्शनी भागात लावून त्यांच्याशी समन्वय ठेवावा. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी संस्थास्तरावर एक ते दोन समन्वयक नेमून त्यांना प्रशिक्षण द्यावे. संबंधित समन्वयकांने आजारी विद्यार्थ्यास तत्काळ उपचार मिळण्यासाठी रुग्णालयांशी संपर्क साधून रुग्णालयात भरती करण्यास मदत करावी. विद्यार्थ्यांसाठी तणावमुक्ती कार्यशाळांचे आयोजन करावे. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी समुपदेशकाची नियुक्ती करावी, असेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*



**पुढारी**

www.pudhari.com

# विद्यार्थ्यांना कौशल्य शिक्षणासोबत मिळतोय थेट प्रत्यक्ष कामाचा अनुभव

**शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करण्यावर भर | विद्यार्थ्यांसाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध इंटर्नशिप योजना**

**पुढारी विशेष**

गणेश खळदकर

पुढारी प्रतिनिधी

**पुणे : सध्या विद्यार्थ्यांना कौशल्याचे केवळ पुस्तकी ज्ञान असून, प्रत्यक्ष कामाचा अनुभव शून्य आहे. त्यामुळे माहितीचे ज्ञानामध्ये आणि ज्ञानाचे कार्यानुभवामध्ये रूपांतर करण्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार, शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक कंपन्या पुढे सरसावल्या असून, त्यांनी विद्यार्थ्यांना इंटर्नशिपची कवाडे उघडी केली आहेत. त्यामुळे विद्यार्थी कौशल्य शिक्षण घेत असतानाच औद्योगिक कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेत आहेत.**

पारंपरिक शिक्षणातून नोकरीच्या कोणत्याही संधी निर्माण होत नसल्यामुळे विद्यार्थी कौशल्य शिक्षणाकडे वळत आहेत. परंतु, औद्योगिक कंपन्यांमध्ये हव्या असलेल्या मनुष्यबळासाठी आवश्यक कौशल्ये आणि कौशल्य शिक्षणातून विद्यार्थ्यांना मिळत असलेले ज्ञान, याचा ताळमेळ बसत नसल्याने एकीकडे विद्यार्थ्यांना रोजगारापासून दूर राहावे लागत आहे. तर, दुसरीकडे औद्योगिक कंपन्यांमध्ये मनुष्यबळाची वानवा आहे. हाच गॅप भरून काढण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने इंटर्नशिपच्या विविध योजनांची अंमलबजावणी सुरू केली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर म्हणाले, जे ज्ञान विद्यार्थीवर्गात मिळवत आहेत, त्याचा व्यवहारात आणि व्यवसायामध्ये कसा वापर करायचा, याचे प्रशिक्षण किंवा कार्यानुभव शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना मिळाला, तर त्यांना व्यवसाय आणि नोकरीच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणार आहेत. यासाठी विद्यापीठस्तरावर देखील प्रयत्न करण्यात येत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांनुसार प्रत्येक अभ्यासक्रमाला इंटर्नशिप बंधनकारक करण्यात आली असून, त्यासाठी विद्यापीठाने इंटर्नशिपचे पोर्टल तयार केले आहे. या पोर्टलवर आतापर्यंत ४०० कंपन्यांनी नोंदणी केली आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या घराजवळील कंपन्यांमध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे.

सिम्बायोसिस स्किल अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या प्रो-चान्सलर डॉ. स्वाती मुजुमदार म्हणाल्या, कौशल्य शिक्षणात इंटर्नशिपचे विशेष महत्त्व आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात इंटर्नशिपवर जोर देण्यात आला आहे. विद्यार्थी पदवीधर होण्याअगोदर जवळपास एक वर्ष इंटर्नशिप करीत असतो. विद्यार्थ्यांना विद्यापीठामध्ये कौशल्य मिळतच असते. परंतु, ज्या वेळी विद्यार्थी कंपन्यांमध्ये जातात, त्या वेळी कंपन्यांमध्ये नेमके काय हवे आहे, याची विद्यार्थ्यांना जाणीव होते. तसेच, नवीन कौशल्य आणि तंत्रज्ञानाचा विद्यार्थ्यांना थेट अनुभव घेता येतो. यातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात मोठ्या प्रमाणात बदल झाल्याचे दिसून येते.

**जागतिक युवा कौशल्य शिक्षण दिन**

**कुशल मनुष्यबळासाठी कंपन्यांचा पुढाकार**

## कौशल्यासंदर्भातील उपक्रमांमध्ये खासगी विद्यापीठांना पाठबळ द्यावे

सरकार कौशल्य शिक्षणासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न करीत आहे. यामध्ये कौशल्यासंदर्भातील उपक्रमांमध्ये खासगी विद्यापीठांना पाठबळ देणे गरजेचे आहे. परंतु, राज्य शासनाकडून खासगी विद्यापीठांना पाठबळ देण्याऐवजी त्यांची अडवणूक करण्याचा प्रयत्न केला जात आहे. सार्वजनिक विद्यापीठांमध्ये कितीही अनागोंदी असली तरी सरकारी पातळीवर याकडे दुर्लक्ष केले जाते. परंतु, खासगी विद्यापीठांवर मात्र ताशेरे ओढण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे सार्वजनिक आणि खासगी विद्यापीठांना सरकारने समान न्याय देणे गरजेचे असल्याचे मत कौशल्य क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

" जागतिक कौशल्य दिनाच्या या वर्षीच्या थीममध्ये शांतता आणि शाश्वत विकास, अशी ध्येये ठरविण्यात आली आहेत. केंद्र आणि राज्य शासनस्तरावर कौशल्य विकास मंत्रालय स्थापन करण्यात आले असून, त्यांच्याद्वारे विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. औद्योगिक क्षेत्राला लागणारी कौशल्ये सतत बदलत असल्यामुळे युवकांना त्या बदलणाऱ्या कौशल्याचे प्रशिक्षण वेळोवेळी देणे गरजेचे आहे. केंद्र सरकार, राज्य सरकार, महाविद्यालये यांच्या स्तरावर वेगवेगळी कौशल्ये विद्यार्थ्यांना प्रदान केली जात आहेत. त्याचा फायदा भविष्यात लवकरच दिसणार आहे.

- **प्रा. डॉ. गणेश काकांडीकर**, एमआयटी, पुणे

" भारतातील तरुण मनुष्यबळ सक्षम करण्यासाठी आणि आर्थिक विकास साधण्यासाठी सरकारने काही योजना चालू केल्या आहेत. या सर्व योजना स्किल इंडिया मिशन योजनेंतर्गत आहेत. प्रधानमंत्री कौशल योजना ही यामधील एक अत्यंत महत्त्वाची योजना आहे. या माध्यमातून कंपन्यांसाठी आवश्यक मनुष्यबळ तयार करण्यात येत आहे. प्रधानमंत्री कौशल्य योजनेला पाठबळ म्हणून दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल योजना देखील सुरू केली आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील तरुणांना प्रशिक्षण दिले जात आहे. यासाठी ज्या कंपन्या विद्यार्थ्यांना काम करण्याची संधी देतील, त्यांना काही सवलती सरकारमार्फत दिल्या जाणार आहेत. त्याचबरोबर सरकारकडून देशातील आयटीआयचे नूतनीकरण करण्यात येत असून, त्यांना ई-स्किल इंडिया प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्यात आला आहे.

- **डॉ. सुहास देशमुख**, संचालक, नॅशनल कौन्सिल फॉर व्होकेशनल एज्युकेशन अँड ट्रेनिंग, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली

My Pune Edition Edition

Jul 15, 2024 Page No. 04

Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

# Double the opportunity

A look at the benefits of the recent UGC announcement on allowing biannual admissions in Indian higher education institutions.



GETTY IMAGES/ISTOCKPHOTO

R. W. Alexander Jesudasan

Biannual admissions in higher education has been in vogue in educational institutions abroad for some time. Usually this takes place in July/August (fall semester) and January/February (spring semester). In India, the University Grants Commission (UGC) announced last month that universities and colleges will be allowed to offer admissions twice a year from the 2024-25 academic year. The UGC chairman pointed out that not only does this have the potential to increase the Gross Enrollment Ratio (GER) but will also help make India a global study destination for aspiring overseas students.

**Early stage**

The concept was introduced in 2022-23 for Open and Digital Learning (ODL) and Online Learning (OL) modes. This resulted in nearly two million enrollments in July 2022 and almost 0.5 million in January 2023. These numbers led to the UGC and the All India Council for Technical Education (AICTE) allow biannual admissions in their recent statutory meetings. However, this is not mandatory. Student admissions will now be possible in July-August and January-February in keeping with international standards for both online and physical modes.

The aim is primarily to increase student intake and introduce new programmes in emerging fields. Of course, this will necessitate amendments in the existing rules and regulations.

In a recent communication, the AICTE conveyed its commitment to take measures to substantially increase the GER in higher education by allowing technical institutions to admit students twice annually, as this would enable better utilisation of infrastructure in institutions and also promote employment opportunities. Currently, AICTE does not allow institutions to admit students after mid-September. As a result, many seats in technical institutions go unfilled each year. Also, if those pursuing non-technical programmes desire to switch to technical programmes in a short period of time, they need to wait for a year for admission causing unnecessary stress. Admission to the spring semester will bring a substantial number of overseas students to India, as it will be in sync with their domestic timelines. This new approach also gives students more flexibility and allows them to explore more career options.

**Benefits**

With biannual admissions, students will not have to wait for a year in case they miss the first cycle due to delayed results or personal reasons. As this system is already being followed globally, its adoption by Indian higher education institutions (HEIs) will also help enhance international collaborations and student exchange programmes. The UGC chairman also pointed out another benefit, mainly, better functional flow within HEIs with proper planning of resource distribution such as faculty, laboratories, classrooms, and support services. The move will also allow industries to conduct campus recruitment twice, improving employment opportunities for graduates.

The primary factors that influence the decision of an institution, whether in India or abroad, include lucrative contemporary programmes with relevance to employment prospects, research possibilities, programme quality, availability of the required facilities and affordability. If Indian institutions will look into and take care of these aspects, the exodus of students is likely to be curtailed.

**Way forward**

While Central, State, and Deemed-to-be universities can adopt the recommendations with suitable amendments by their respective statutory bodies, affiliated colleges will need directions from the university they are affiliated to after due presentation in the Academic Council, Senate and Syndicate. HEIs considering implementation of biannual admissions must carefully study the nuances of this process such as workforce requirement for admissions in two sessions, infrastructure, faculty requirement, scheduling exams for both sessions, declaration of results, convocations and concomitant activities such as placements and facilitating graduates for advanced study programmes.

The writer is Pro Vice-Chancellor, Hindustan Institute of Technology & Science (Deemed to be University) Padur, Chennai.

The Hindu, Mumbai, 15.7.2024

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

**कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयातर्फे दरवर्षी १५ जुलैला 'युवा कौशल्य दिन' साजरा होतो. त्यानिमित्त कौशल्य विद्यापीठांच्या उभारणीविषयी माहिती.**

# कौशल्याधारित शिक्षणाचा प्रयोग

**डॉ. अपूर्वा पालकर**

कौशल्य विद्यापीठांची संकल्पना अलीकडच्या काळातली आहे. नुकतीच काही राज्यांनी यांची स्थापना केली आहे. हरियाणा, दिल्ली, गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र ,आसाम यासारख्या राज्यात ही विद्यापीठे आहेत. कौशल्यप्रशिक्षण हे यापूर्वी २००८ला स्थापन झालेल्या 'राष्ट्रीय कौशल्य विकास निगमा'द्वारे प्रमाणपत्र व अनेक योजनांद्वारे दिले जात होते. कौशल्यावर आधारित पदवी व पदव्युत्तर ची संकल्पना कौशल्य विद्यापीठाद्वारे आणण्याचा उत्तम प्रयत्न आता केंद्र सरकारने केला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातही (२०२०) कौशल्यावर भर देण्यात आला आहे. कौशल्य विद्यापीठात ४० टक्के वर्गातील शिक्षण व ६० टक्के कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम देण्याची संकल्पना आहे.

### पदवी अभ्यासक्रम

राज्य सरकारने स्थापित केलेले कौशल्य विद्यापीठ हे राज्यव्यापी विद्यापीठ असणे अपेक्षित आहे. राज्य विधेयकातून यांची निर्मिती झाली आहे. महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने नवी मुंबई, पुणे व नागपूर येथे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम चालू केले आहेत. अभ्यासक्रम तयार करणे, प्रयोगशाळा, वर्गखोल्या, प्राध्यापक, भौतिक सुखसुविधा, अभ्यासमंडळांची स्थापना, विद्यापरिषदेची स्थापना व कौशल्य विद्यापीठाला लागणारे उद्योगजगाशी निगडित 'ऑन द जॉब ट्रेनिंग' अशा अनेक गोष्टी विद्यापीठाच्या स्थापनेपासून करणे आवश्यक होते. त्या करण्यात आल्या. ग्रीनफिल्ड प्रोजेक्ट असलेल्या महाराष्ट्र, आसाम, हरियाणा, गुजरात येथील विद्यापीठांतून किमान पाच वर्षात -म्हणजे एक चार वर्षाची बॅच बाहेर पडल्यावर त्याचे प्रभाव सगळ्यांपर्यंत पोचतील.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात २१अभ्यासक्रमांची निर्मिती करण्यात आली आहे. उद्योग समूहाने ५५ करार केले असून सगळ्या अभ्यासक्रमात उद्योगसमूह विद्यार्थ्यांना 'ऑन द जॉब ट्रेनिंग' देणार आहे. टाटा ट्रेंट, मॅकडोनाल्ड, मेट्रोपोलीस, केपीएमजी, पर्सिस्टन्ट सिस्टिम्स, वर्ल्ड ट्रेड सेन्टर यासारख्या कंपन्यांचा/



संस्थांचा यात समावेश आहे. कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमात डिझाईन थिंकिंगवर भर आहे. विद्यापीठांनी यावर्षी युरोपची नामवंत डिझाईनसंस्था 'रुबिक'बरोबर करार करून जागतिक दर्जाच्या BDes- इंडस्ट्रियल डिझाईन, इंटरॲक्शन डिझाईन अशा कौशल्याधारित अभ्यासक्रमाची निर्मिती केली आहे. विद्यापीठांनी आंतरराष्ट्रीय प्लेसमेंट्ससाठी एनएसडीसी-इंटरनॅशनलबरोबर करार केला असून जपानी, जर्मन या भाषेचे कौशल्यप्रशिक्षण येथे देण्यात येत आहे.

### रोजगारसंधी देणार

प्रशिक्षित विद्यार्थ्यांना त्या देशांमध्ये रोजगार उपलब्ध करून देण्याचे कार्य या केंद्राद्वारे करण्यात येणार आहे. सध्या इथे १०० प्रशिक्षणार्थी भाषेचे कौशल्य प्राप्त करत आहेत. मेकॅट्रॉनिक्स, सिविल अँड कॉन्संट्रेशन मॅनेजमेण्ट, संगणक तंत्रज्ञान, माहिती-तंत्रज्ञान यांसारखे पदवी अभ्यासक्रम चालू केले आहेत. यात प्रायोगिक तत्त्वावर पहिल्यावर्षी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून या वर्षी पूर्ण संख्येत विद्यार्थी प्रवेश घेतील. विद्यापीठांनी 'सेंट्रल युनिव्हर्सिटी प्रवेश चाचणीद्वारा विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. इतर राज्यव्यापी ,शासकीय देशव्यापी प्रवेशपरीक्षेत चांगले गुण मिळविणारे विद्यार्थीही प्रवेश घेऊ शकतील.

कौशल्य विद्यापीठांनी 'I- स्पार्क फौंडेशन'ची स्थापना केली आहे व यात नवोपक्रमांना प्रोत्साहन देणे, मार्गदर्शन करणे, पायाभूत निधी देणे इत्यादी कामे चालू आहेत. विद्यापीठांनी २० महाविद्यालयांत pre-incubation केंद्रांची स्थापना केली असून १०० नवसंशोधकांनी आपले प्रस्ताव विद्यापीठात सादर केले आहेत.

ठाण्यात संत गाडगेबाबा स्वछता अकादमीची निर्मिती विद्यापीठांनी केली असून BBA फॅसिलिटी मॅनेजमेण्ट व इतर प्रमाणपत्र अभ्यासक्रम 'भारत विकास ग्रुप' या कंपनीबरोबर करार करून देण्यात येत आहेत. तीन महिन्यात ३०० लाभार्थींनी याचा उपयोग केला असून त्यांना रोजगार प्राप्त झाला आहे. विद्यापीठाच्या बिग डेटा, आर्टिफिशिअल इंटलिजन्स , सायबर सुरक्षा यांवर आधारित एम.टेक अभ्यासक्रमांना चांगला प्रतिसाद आहे. कौशल्य विद्यापीठ हे पारंपरिक विद्यापीठांना पूरक असून कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमात श्रेयांक दिले जाऊ शकतात. विद्यापीठाने उद्योगक्षेत्रात काम चालू केलेले आहे. विद्यापीठ हे १००% नवीन शैक्षणिक धोरणावर आधारित असून विद्यापीठाने 'प्रोफेसर-ऑफ -प्रॅक्टिस' नेमले आहेत. नुकताच विद्यापीठाचा आकृतिबंध सरकारने मान्य केला असून प्राध्यापकांच्या नेमणुकीचे काम चालू होईल.

### पहिला प्रयोग

'रोम'ची निर्मिती एका दिवसात झाली नव्हती' असे म्हटले जाते. त्याचा अर्थ लक्षात घ्यायला हवा. विद्यापीठांच्या स्थापनेसाठीही काही वर्षे लागतात. कौशल्य विद्यापीठे स्थापन करण्याचा हा पहिला प्रयोग आहे. भारताने कौशल्यक्षेत्रात मोठी झेप घेतली आहे व विविध राज्यांतील कौशल्य विद्यापीठे जगभर भारतीय मनुष्यबळ देण्यात वाटा उचलतील. काळाच्या गरजेनुसार शिक्षणात बदल होणे अपेक्षित आहे. कौशल्य विद्यापीठे 'अप्लाइड युनिव्हर्सिटी'च्या धर्तीवर बदल घडवतील. आज 'वर्ल्ड स्कील डे'च्या निमित्ताने हे बदल जाणून घ्यायला हवेत. या नावीन्यपूर्ण विद्यापीठाची संकल्पना यशस्वी होईल व त्यातून देशाला चांगले मनुष्यबळ लाभेल, यात शंका नाही.

**(लेखिका महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू आहेत.)**

Sakal 15.7.2024

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# सलग तीन दिवस तीन प्रमुख परीक्षा

## नेट, एमपीएससी, यूपीएससी देणारे विद्यार्थी संभ्रमात

लोकसत्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** विद्यापीठ अनुदान आयोगाची राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट), केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) व महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) अशा तीन प्रमुख परीक्षा पुढील महिन्यात २५ ते २७ ऑगस्ट या तीन दिवसांमध्ये होणार आहेत. अनेक विद्यार्थी तिन्ही परीक्षा देतात. अभ्यासाचे नियोजन विस्कळीत होणार असल्यामुळे परीक्षांमध्ये किमान चार दिवसांचे अंतर ठेवावे, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून केली जात आहे.

राज्यात एमपीएससी, यूपीएससी परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. जवळपास दहा ते बारा लाख तरुण-तरुणी परीक्षांची तयारी करत आहेत. मात्र ऑगस्ट महिन्यात यूपीएससीची पूर्वतयारी चाचणी परीक्षा २५ ऑगस्टला, एमपीएससीमार्फत घेण्यात येणारी राज्यसेवा परीक्षा २६ ऑगस्ट रोजी, तर यूजीसी नेट परीक्षा तुकडीनुसार २१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत होणार आहेत. त्यामुळे या तिन्ही परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. कोणती ना कोणती परीक्षा हातून निसटण्याची किंवा त्यावर पाणी सोडावे लागण्याची वेळ येणार असल्याची चिंता अनेक विद्यार्थी बोलून दाखवीत आहेत.

**परीक्षांचे वेळापत्रक**

यूपीएससी पूर्वतयारी चाचणी: २५ ऑगस्ट

एमपीएससी राज्यसेवा परीक्षा: २६ ऑगस्ट

यूजीसी-नेट: २१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर

कोणत्याही दोन परीक्षांमध्ये चार ते आठ दिवसांचे अंतर ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तारखांनुसार अभ्यासाचे नियोजन करता येईल. त्यांची धावपळ होणार नाही.

– तुषार देशमुख, युवा विद्यार्थी असोसिएशन

17/07/2024 | Pune | Page : 01
Source : https://epaper.loksatta.com

लोकमत



# संशोधक विद्यार्थ्यांचा भर पावसात लाँग मार्च सुरू

## पाच दिवस होऊनही सरकार घेईना दखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीएच.डी.साठी नोंदणी केलेल्या संशोधक विद्यार्थ्यांनी बार्टी, सारथी, महाज्योती या संस्थांमार्फत फेलोशिप द्यावी, या मागणीसाठी दि. १२ जुलै रोजी पुणे ते विधान भवन, मुंबई असा पायी लाँग मार्च काढला आहे. भर पावसात सलग पाचव्या दिवशी दि. १६ जुलै रोजी सायंकाळी लाँग मार्च पनवेल शहरात दाखल झाला असून, अनेक हालअपेष्टा सोसत विद्यार्थ्यांची मंत्रालयाच्या दिशेने आगेकूच सुरू आहे.

पीएच. डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांनी फेलोशिपच्या मागणीसाठी गत महिन्यात दि. २४ जून रोजी महात्मा फुले वाडा ते विधान भवन, मुंबई पायी लाँग मार्चला सुरुवात केली होती. मात्र, शिष्टमंडळाला मुख्यमंत्र्यांसोबत चर्चेसाठी मुंबई येथे आमंत्रित केल्यानंतर तोडगा निघण्यापूर्वीच लाँग मार्च स्थगित केला होता. राज्य शासनाने दिलेले आश्वासन न पाळल्याने विद्यार्थ्यांनी पुन्हा दि. १२ जुलै रोजी लाँग मार्चला सुरुवात केली असून, भर पावसात निर्धाराने मुंबईच्या दिशेने पायी मार्गक्रमण करीत आहेत. पावसात भिजल्यामुळे विद्यार्थी आजारी पडले असून, अनेकांवर उपचार सुरू आहेत. मात्र, पाच दिवस झाल्यानंतरही राज्य शासनाने त्याची दखल घेतलेली नाही. मंगळवार, दि. १६ रोजी पनवेल येथे मुक्काम करणार असल्याचे आंदोलक विद्यार्थ्यांनी सांगितले.

संशोधक विद्यार्थी गेल्या पाच दिवसांपासून मुसळधार पावसात भिजत मंत्रालयाकडे निघाले आहेत. परंतु अजूनपर्यंत सरकारने या विद्यार्थ्यांची कसल्याही प्रकारची दखल घेतलेली नाही.

**- सीमा वानखेडे,** संशोधक विद्यार्थिनी, बार्टी

पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांना फेलोशिप गरजेची आहे. आमचा संघर्ष अविरत चालू आहे. राज्य शासनाने सामाजिक न्यायाच्या आधारे तिन्ही संस्थांच्या विद्यार्थ्यांना न्याय देण्याचे काम करून फेलोशिप मंजूर करावी.

**- अक्षय सुरवसे,** संशोधक विद्यार्थी, महाज्योती)

मागील दोन वर्षांपासून आम्ही संघर्ष करत आहोत. परंतु, सरकारने वारंवार आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले आहे.

**- तुकाराम जाधव,** संशोधक विद्यार्थी, सारथी

Pune Main
Page No. 2 Jul 17, 2024
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

# मुलींना प्रवेश नाकारल्यास कारवाई

### चंद्रकांत पाटील यांचा महाविद्यालयांना इशारा

**मटा इम्पॅक्ट**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'राज्य सरकारने मुलींना उच्च शिक्षणात १०० टक्के शुल्क सवलतीचा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे महाविद्यालयांनी मुलींकडून शुल्क न घेता अभ्यासक्रमांना प्रवेश द्यायचा आहे. मुलींना शुल्कासाठी प्रवेश नाकारल्यास महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्यात येईल. तसे परिपत्रक लवकरच प्रसिद्ध केले जाईल,' असा इशारा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मंगळवारी दिला.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आणि शासकीय तंत्रनिकेतन, पुणे यांच्यातर्फे उभारण्यात आलेल्या पहिल्या रोबोटिक्स आणि ऑटोमेशन या विषयातील उत्कृष्टता केंद्राचे (सेंटर ऑफ एक्सलन्स); तसेच कम्प्युटर प्रयोगशाळेचे उद्घाटन पाटील यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. राज्य सरकारने मुलींना उच्च शिक्षणात १०० टक्के शुल्क सवलत देण्याचा निर्णय घेतल्यानंतरही मुलींना प्रवेशासाठी अडचणी येत आहेत. शुल्क भरल्याशिवाय प्रवेश मिळणार नाही, असे सांगून काही ठिकाणी प्रवेश नाकारण्यात येत असल्याचे वृत्त 'मटा'ने मंगळवारी प्रसिद्ध केले.




या पार्श्वभूमीवर पाटील म्हणाले, 'राज्यात ६४२ अभ्यासक्रमांसाठी मुलींना शंभर टक्के शुल्क सवलतीचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमांना मुलींकडून शुल्क न आकारता प्रवेश द्यायचे आहेत. त्यामध्ये बिगरव्यावसायिक, व्यावसायिक, वैद्यकीय अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या निर्णयामुळे मुलींच्या उच्च शिक्षणाचे प्रमाण हे ३६ टक्क्यांहून वाढून ५० टक्के निश्चित होईल.'



> "सरकारकडून शिक्षण संस्थांना सप्टेंबरमध्ये प्रवेशाची रक्कम परत दिली जाईल. संस्थांनी तोवर थांबावे. शुल्कासाठी मुलींना प्रवेश न देणाऱ्या संस्थांची मान्यता रद्द करण्यात येईल.
>
> – चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री

➤ उर्वरित मजकूर...२

# 'मुलींना प्रवेश नाकारल्यास मान्यता रद्द'

➤ पान १ वरून

**पुणे :** 'गुणवत्ता वाढवल्याशिवाय देशातील मनुष्यबळ आणि उत्पादनाला जागतिक पातळीवर मागणी वाढणार नाही. त्या दृष्टीने शासकीय तंत्रनिकेतनच्या माध्यमातून उत्तम दर्जाचे शिक्षण आणि प्रशिक्षण विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले पाहिजे. सरकारी संस्थांनी उद्योगांसोबत सहकार्य वाढवून विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध करून द्याव्यात,' असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मंगळवारी सांगितले.

आमदार सिद्धार्थ शिरोळे, राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक, तंत्रशिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. दत्तात्रय जाधव, सचिव डॉ. महेंद्र चितलांगे, प्राचार्य डॉ. राजेंद्र पाटील या वेळी उपस्थित होते. या कार्यक्रमावेळी बहुउद्देशीय संगणक प्रयोगशाळेचेही उद्घाटन करण्यात आले.

पाटील म्हणाले, 'केंद्र सरकार सरकारी तंत्रशिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी निधी देण्यास तयार आहे. त्यामुळे सरकारी तंत्रनिकेतन संस्थांनी नव्या कल्पना समोर आणाव्यात. त्यानुसार उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व सहकार्य करण्यात येईल.' डॉ. नाईक यांनी एमएसबीटीईची माहिती दिली.

### गडचिरोलीमध्ये हजारो कोटींचा खनिजसाठा

'राज्य सरकारकडून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी ४६ हजार कोटी रुपये खर्च होणार आहेत. याबाबत विरोधकांनी कितीही आरडाओरडा केला केला, तरी राज्याची आर्थिक स्थिती चांगली आहे. जीएसटी आणि मुद्रांकांकडून येणारे उत्पन्न वाढत आहे. खनिजाचे मोठे साठे सापडत आहेत. गडचिरोली जिल्ह्यात असाच एक मोठा खनिजसाठा सापाडला आहे. त्याद्वारे सरकारला पुढील काही वर्षांत हजार कोटी रुपयांचा महसूल मिळणार आहे,' असे चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

Maharashtra Times 17.7.2024

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# विद्यापीठाची संलग्नता न घेताच विद्यार्थ्यांना प्रवेश

## सर्व उच्च शिक्षण संस्थांना ३१ जुलैपर्यंत हमीपत्र सादर करण्याचे निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची संलग्नता नसतानाही काही उच्च शिक्षण संस्थांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण संस्थेच्या (एआयसीटीई) अखत्यारितील अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आल्याचे समोर आले आहे. अभ्यासक्रम चालवण्यासाठी विद्यापीठाची संलग्नता अनिवार्य असल्याने ३१ जुलैपर्यंत हमीपत्र सादर करण्याचे निर्देश विद्यापीठाने सर्व उच्च शिक्षण संस्थांना दिले आहेत. विद्यापीठाच्या संलग्नता कक्षाने या बाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. विद्यापीठ कायद्यातील तरतुदीचे आणि विद्यापीठ, राज्य शासनाच्या आदेशाचे, निर्देशाचे पालन करण्यात येईल, असे हमीपत्र संलग्नीकरणासाठी अथवा मान्यतेसाठी महाविद्यालय, संस्थांना



अर्ज करणे आवश्यक आहे. मात्र, काही संस्था विद्यापीठाची संलग्नता नसतानाही एआयसीटीईअंतर्गत असलेल्या अभ्यासक्रमाला प्रवेश दिले आहेत. स्वतः अभ्यासक्रम न चालविता सामंजस्य करार करून अभ्यासक्रम चालवणे, पूर्ण वेळ शिक्षक व प्राचार्यांची नियुक्ती रीतसर न करणे, विद्यापीठाची मान्यता न घेणे आणि पुरेशा भौतिक सुविधा नसणे, अशा तक्रारी विद्यापीठाकडे दाखल झाल्या आहेत. ही बाब महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमाच्या कलम १०८ मध्ये नमूद केल्यानुसार संलग्नीकरणच्या शर्तीचा भंग करणारी असल्याचे परिपत्रकाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

महाविद्यालय व संस्थांना एआयसीटीई, यूजीसी व महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, परिपत्रके व नियमाचे पालन करणे आवश्यक आहे. तसेच संबंधित अभ्यासक्रमास विद्यापीठाची मान्यता घेणे अनिवार्य आहे. संलग्न महाविद्यालये, परिसंस्थांच्या प्राचार्य, संचालकांनी शंभर रुपयांच्या मुद्रांकावर नोटरी केलेले हमीपत्र विद्यापीठाकडे सादर करावे. त्यानंतर २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचे संलग्नता पत्र देण्यात येईल, असेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

17/07/2024 | Pune | Page : 14
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# शालेय अभ्यासक्रम आराखड्यावर ३९०० हरकती, सूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) तयार केलेल्या अभ्यासक्रम आराखड्यावर सुमारे ३ हजार ९०० हरकती, सूचना दाखल झाल्या आहेत. या हरकती-सूचना विचारात घेऊन अभ्यासक्रम आराखडा अंतिम करण्यात येत असून, आराखड्यातील मनुस्मृतीचा संदर्भ काढून टाकला जाणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शालेय अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात येणार आहे. त्यासाठी 'एससीईआरटी'ने तिसरी ते बारावीसाठी अभ्यासक्रम आराखडा तयार करून जाहीर केला. नव्या धोरणात देशातील पारंपरिक, प्राचीन ज्ञानाची विद्यार्थ्यांना ओळख करून देण्यासाठी भारतीय ज्ञानप्रणाली या घटकाचा समावेश करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने राज्यासाठीच्या आराखड्यात विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या विषयांचे शिक्षण, शाखानिहाय शिक्षणाची पद्धती मोडीत काढणे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला, शारीरिक शिक्षणाचे अध्यापन अशा विविध तरतुदींसह प्रत्येक विषयांच्या अभ्यासक्रमांत भारतीय ज्ञानप्रणालीवर आधारित घटकांचा समावेश करण्याचे प्रस्तावित करण्यात आले.

भाषा विषयांच्या अभ्यासासाठी विद्यार्थ्यांनी मनाचे श्लोक आणि भगवद्गीतेच्या अध्यायाचे पाठांतर, विद्यार्थ्यांना भगवद्गीतेतील ज्ञानयोग, आत्मज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग यांची ओळख करून देण्याबाबत सुचवण्यात आले होते. त्याशिवाय या आराखड्यात मनुस्मृतीतील श्लोकाचा संदर्भ देण्यात आल्याने हा आराखडा वादात सापडला होता. या वादाला राजकीय वळणही आले होते. या विरोधात आंदोलनेही झाली होती, तसेच आराखड्यातील धार्मिक शिक्षणाचा आग्रह, मनुस्मृतीचा उल्लेख यासह विविध तरतुदींवर आक्षेप घेण्यात आले होते. अभ्यासक्रम आराखडा जाहीर करताना या अभ्यासक्रम आराखड्यावर शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, अभ्यासक अशा विविध घटकांकडून हरकती-सूचना मागवण्यात आल्या होत्या.



> अभ्यासक्रम आराखड्यावर सुमारे ३ हजार ९०० हरकती-सूचना प्राप्त झाल्या आहेत. प्रत्येक हरकत-सूचना विचारात घेऊन अभ्यासक्रम आराखडा अंतिम करण्यात येत आहे. त्याबाबतचे काम अंतिम टप्प्यात आहे. आराखडा अंतिम करून तो सुकाणू समितीला सादर केला जाणार आहे. अभ्यासक्रमातून मनुस्मृतीचा संदर्भ काढून टाकला जाणार आहे. – **राहुल रेखावार**, संचालक, 'एससीईआरटी'

17/07/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# शाळांमध्ये महावाचन उत्सव, अमिताभ बच्चन सदिच्छादूत

## २२ जुलै ते ३० ऑगस्टदरम्यान आयोजन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५मध्ये राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये 'महावाचन उत्सव २०२४' हा उपक्रम २२ जुलै ते ३० ऑगस्ट या कालावधीत राबवण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांची सदिच्छादूत (ब्रँड ॲम्बेसिडर) म्हणून निवड करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

शालेय शिक्षण विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वाचन अत्यंत आवश्यक आहे. वाचनामुळे त्यांच्या अभ्यासाच्या गतीमध्ये वाढ होते. वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासात भर पडते. त्या अनुषंगाने राज्यातील सर्व शाळांमध्ये महाराष्ट्रातील वाचन चळवळ हा उपक्रम राबवण्याचा निर्णय २२ नोव्हेंबर २०२३ रोजी घेण्यात आला होता. या उपक्रमात ६६ हजार शाळा आणि ५२ लाख विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. रीड इंडिया सेलिब्रेशन या संस्थेच्या सहकार्याने हा उपक्रम घेण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्ष २०२४-२५मध्ये राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये 'महावाचन उत्सव २०२४' हा उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

वाचन संस्कृतीला प्रोत्साहन, विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण करणे, मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी संस्कृतीशी विद्यार्थ्यांची नाळ जोडणे, विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला आणि भाषा संवाद कौशल्याला चालना देणे, दर्जेदार साहित्य आणि लेखकांचा परिचय करून देणे, ही उद्दिष्टे समोर ठेवून 'महावाचन उत्सव २०२४' हा उपक्रम राबवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांची उपक्रमाचे सदिच्छादूत म्हणून निवड करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. उपक्रमात तिसरी ते बारावीच्या सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित आहे. त्यासाठी तिसरी ते पाचवी, सहावी ते आठवी, नववी ते बारावी असे तीन गट करण्यात आले आहेत. सहभागी सर्व विद्यार्थी वाचन केलेल्या पुस्तकावरील त्यांचे विचार लिखित आणि चित्रफितीच्या स्वरुपात 'महावाचन उत्सव २०२४'च्या संकेतस्थळावर अपलोड करतील. तसेच तालुकास्तरावर ग्रंथप्रदर्शनही आयोजित करण्यात येईल. समग्र शिक्षा अभियानाअंतर्गत तीन कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

17/07/2024 | Pune | Page : 03
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

नवभारत

# कुलसचिव पर मचा घमासान

## पुणे यूनिवर्सिटी : डॉ. मनोहर के नाम पर भड़के छात्र और कर्मचारी

■ पुणे, ब्यूरो. सावित्रीबाई फुले पुणे यूनिवर्सिटी में कुलसचिव पद पर चयन का मामला विवादों में फंस गया है. देश के प्रतिष्ठित और नामी इस यूनिवर्सिटी के कुलसचिव पद के लिए 11 जुलाई को इंटरव्यू हुआ था. इस इंटरव्यू के बाद पुणे के एक नामी कॉलेज के विवादित डॉ. मनोहर सानप के चयन होने की संभावना जताई जा रही है. डॉ. मनोहर सानप का कुलसचिव पद पर चुने जाने की संभावना को देखते हुए कुछ विद्यार्थियों और कर्मचारी संगठनों ने इसका खुलकर विरोध किया है. उन्होंने चेतावनी दी है कि अगर सानप का कुलसचिव पद पर चयन होता है तो हम सड़क पर उतरकर इसका विरोध करेंगे. इसी बीच खबर है कि यूनिवर्सिटी के कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी विदेश दौरे पर निकल गए है.

### उत्पीड़न और आर्थिक अनियमितता का आरोप

अधिकृत रूप से सानप के नाम की घोषणा होने से पूर्व ही उनके नाम को लेकर विवाद शुरू हो गया है. सानप के खिलाफ एक महिला प्रोफेसर ने अनुसूचित जाति आयोग से गंभीर शिकायत की है. इसमें मानसिक रूप से प्रताड़ित करने और आर्थिक अनियमितता का आरोप हैं. इस मामले में एससी आयोग ने भी सानप के खिलाफ प्रधानाचार्य से सिफारिश की है. पुणे यूनिवर्सिटी की शिकायत निवारण समिति ने भी इस मामले में सुनवाई की है. विरोधियों का आरोप है कि अगर सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय ऐसे महिला उत्पीड़क और भ्रष्टाचार के आरोपों से घिरे व्यक्ति को कुलसचिव पद पर नियुक्त करती है तो यह सवाल उठता है कि पुणे यूनिवर्सिटी आखिर किस दिशा में जा रहा है. एक ओर, विद्वता की बातें करने वाले कुलगुरु ऐसी घटनाओं पर ध्यान नहीं दे रहे हैं. तो क्या कुलगुरु स्वतंत्र निर्णय लेने में सक्षम नहीं हैं या उन पर किसी का दबाव है?

### क्या प्र-कुलगुरु पर भी आरोप लगे थे?

पुणे विश्वविद्यालय लगातार विभिन्न नकारात्मक घटनाओं के कारण बदनामी का सामना कर रहा है. इससे विश्वविद्यालय की छवि धूमिल हो रही है. लेकिन पुणे विश्वविद्यालय के मैनेजमेंट को इससे कोई फक्र नहीं पड़ता है. कुछ महीने पहले प्र-कुलगुरु के पद को लेकर विवाद खड़ा हुआ था. पुणे विश्वविद्यालय के विद्यमान प्र-कुलगुरु पर आर्थिक अनियमितता के आरोप लगने के बाद भी उनकी नियुक्ति सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय के प्र-कुलगुरु पद पर की गई थी.

### कुलगुरु विदेश यात्रा पर रवाना

इस संदर्भ अधिक जानकारी के लिए कुलगुर. से बात करने के लिये कुलगुरु ऑफिस में फोन किया गया तो पता चला कि कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी विदेश यात्रा पर गये है. इस नियुक्ति को लेकर क्या पुणे विश्वविद्यालय के कुलगुरु और मैनेजमेंट में अनबन है? क्या कुलसचिव नियुक्ति को लेकर नाराज है. सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय के कुलगुरु गोसावी अचानक विदेश यात्रा पर क्यों निकल गये? इस तरह के कई सवाल यूनिवर्सिटी गलियारे में घूम रहे हैं.



### मेरे बारे में फैलाई जा रही गलत अफवाह- डॉ. मनोहर

- विद्यमान प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे भी कुलसचिव पद के स्ट्रांग उम्मीदवार थे, क्योंकि प्रभारी कुलसचिव पदभार ग्रहण करने के बाद उन्होंने अच्छा काम किया है.
- उनसे बात करने के बाद पता चला कि उन्होंने इंटरव्यू ही नहीं दिया है. इसकी वजह बताते हुए उन्होंने कहा कि प्रोफेसर और कुलसचिव दोनों पद में 'सैलरी डिफरेंस' होने के कारण उन्होंने इंटरव्यू नहीं दिया है.

*हमारे शैक्षणिक क्षेत्र में बहुत सारे रथी, महारथी हैं, जिन पर कोई आरोप नहीं है. उनकी छवि भी स्वच्छ है. ऐसा होने के बावजूद पुणे विश्वविद्यालय का मैनेजमेंट ऐसे व्यक्ति को पुणे विश्वविद्यालय के महत्वपूर्ण पदों पर नियुक्त करता है. तो यह गंभीर मामला है. इसका हमारी शैक्षणिक व्यवस्था पर बुरा असर पड़ने वाला है.*

*-सोमनाथ लोहार, अध्यक्ष, राविकॉं, पश्चिम महाराष्ट्र*

*संभावित कुलसचिव पद के लिये मेरे नाम पर चर्चा हो रही है, लेकिन इसके बारे मे मुझे पुणे विश्वविद्यालय से कोई जानकारी प्राप्त नहीं हुई है. अधिकृत घोषणा होने से पहले मेरे बारे मे गलत अफवाह फैलाई जा रही है. ये गलत बात है. इसे लेकर मैं अपने वकील की राय लूंगा.*

*- डॉ मनोहर सानप, कुलसचिव पद के उम्मीदवार*

Pune plus Edition Edition
Jul 17, 2024 Page No. 1
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

# विद्यापीठ कुलसचिव नियुक्तीचे प्रयत्न वादात

## कर्मचारी आणि शैक्षणिक संघटना आक्रमक

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिवपदासाठी योग्य उमेदवार मिळत नसावा म्हणूनच शैक्षणिकदृष्ट्या अत्यंत हुशार आणि कार्यमग्न असणाऱ्या कारभारी मंडळींनी एका ठरावीक व्यक्तीला कुलसचिवपदाच्या खुर्चीवर बसवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. संबंधित व्यक्तीवर महिलांना त्रास देण्याचा आरोप असून, त्याची पुढे चौकशीही झाली आहे. त्यामुळे या व्यक्तीला कर्मचारी आणि शैक्षणिक संघटनांनी विरोध केला आहे. असे असताना कुलगुरू, प्र-कुलगुरू आणि अधिकार मंडळ संबंधित व्यक्तीची निवड करतात का, याकडे लक्ष लागले आहे.

विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांचा कार्यकाळ संपल्यानंतर सुमारे एक वर्षापासून पूर्णवेळ कुलसचिवांची नियुक्ती झालेली नाही. विद्यापीठाची कुलसचिव निवड प्रक्रिया सुरू असून, त्यासाठी मुलाखतीची निवड प्रक्रिया १० आणि ११ जुलै रोजी झाली आहे. आता विद्यापीठाच्या कारभारी मंडळींना शैक्षणिकदृष्ट्या पात्र आणि कोणत्याही प्रकारे समाजात प्रतिमा मलीन नसलेल्या योग्य व्यक्तीची निवड करायची आहे. त्यामुळे कुलसचिवपदी कोणाची वर्णी लागणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली होती. मात्र, कुलसचिवपदावर एका ठरावीक व्यक्तीची निवड होणार असल्याची चर्चा शैक्षणिक वर्तुळात आहे. संबंधित व्यक्तीच्या विरोधात महिलेला त्रास देण्याची तक्रार असून, गंभीर आरोप आहेत. याबाबत राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगानेही ठपका ठेवला आहे. अशा व्यक्तीची कुलसचिव म्हणून निवड होणार असल्यास, कर्मचारी संघटनांच्या वतीने तीव्र स्वरूपात आंदोलन करण्यात येईल, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कर्मचारी संघाच्या वतीने सुनील धीवार यांनी सांगितले.

### वादग्रस्त व्यक्तीची निवड का?

'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिवपदी वादग्रस्त व्यक्तीची निवड करून विद्यापीठाला नक्की काय सिद्ध करायचे आहे? महिलांच्या तक्रारी आणि विविध आरोप असलेले व्यक्ती विद्यापीठाला प्रशासकीय अधिकारी म्हणून हवेत का? पारदर्शक व्यक्तिमत्त्वाचे अधिकारी विद्यापीठाला का सापडत नाही,' असे प्रश्न युवासेनेचे सहसचिव कल्पेश यादव यांनी उपस्थित केले आहे. विद्यापीठ चुकीच्या व्यक्तीची निवड करणार असेल, तर आंदोलन उभे केले जाईल, अशा इशारा यादव यांनी दिला आहे.



### विचार करून निर्णय घेण्याची मागणी

'विद्यापीठाला भ्रष्टाचारी व अत्याचारी कुलसचिव हवा आहे का,' असा सवाल स्टुडंट हेल्पिंग हँड संघटनेचे कुलदीप आंबेकर यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर आणि अधिकार मंडळाने व्यवस्थित विचार करून कुलसचिवपदाचा निर्णय घ्यावा. संबंधित व्यक्तीची नियुक्ती झाल्यास, त्याचा त्रास सर्वांनाच होण्याची शक्यता अभ्यासकांकडून वर्तविण्यात येत आहे.

Maharashtra Times 18.7.2024

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

# UGC warns edu institutes over non-refund of fees

## Non-compliance with rule may draw stringent action

Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

The University Grant Commission (UGC) has warned of strict action against higher education institutions and colleges that do not follow the fee refund policy. Actions such as suspension of affiliation, cancellation of autonomy, or invalidation of courses of institutions will be taken in case of violation of this policy.

The UGC secretary Professor Manish Joshi released a circular in this regard. Notices and circulars have been issued several times over the past four years for non-refund of fees to students who cancel admission before the stipulated deadline. Also, in the meetings held in December and May, a decision was taken regarding the fee refund policy and prompt refund of fees by higher education institutions.

Since it has been noticed that the institutes are not following it even after that, the vice-chancellors of the universities, the principals of the colleges have now been given clear instructions regarding fee refund.

### The UGC circular says

It has been pointed out that higher education institutions are refusing to refund fees by misinterpreting the UGC circular. This matter is worrying. Violation of UGC policy may lead to action as per the October 2018 circular. Actions such as blocking recognition of open and distance courses of violating higher education institutions, non-acceptance of applications, withholding of grants, cancellation of autonomy, and invalidation of autonomy can be taken. The UGC has the power to issue notices in newspapers or other media to the higher education institutions concerned for non-compliance with the rules.




Pune Mirror 18.7.2024

## *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# प्राध्यापक भरतीबाबत 'यूजीसी'कडून पुन्हा निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** देशभरातील विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, महाविद्यालयांना प्राध्यापक भरती करण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) २०१९ ते २०२१ या कालावधीत पाच वेळा सूचना दिल्या होत्या. त्यानंतर आता नव्याने निर्देश देण्यात आले असून, प्राध्यापक भरती प्रक्रियेबाबतची माहिती ३१ जुलैपर्यंत पाठवण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी याबाबतचे परिपत्रक दिले. विद्यापीठे, महाविद्यालये, उच्च शिक्षण संस्थांतील प्राध्यापकांच्या जागा रिक्त राहिल्याने त्याचा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवर परिणाम होतो. शिक्षण संस्थांमधील प्राध्यापक टंचाई हा चिंताजनक विषय असल्याचे नमूद करून 'यूजीसी'ने हस्तक्षेप करून प्राध्यापक भरती करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, अद्यापही भरतीप्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्यामुळे आता पुन्हा एकदा प्राध्यापक भरती करण्याचे स्मरण यूजीसीने करून दिले आहे. तसेच त्याबाबतची माहिती सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

राज्यातही विद्यापीठे, महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. अलीकडेच राज्य शासनाने मान्यता दिलेल्या २०८८ पदांवर प्राध्यापक भरती प्रक्रिया राबवण्यात आली. त्याशिवाय विद्यापीठांतील रिक्त जागा भरण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. त्याबाबतची प्रक्रिया सुरू आहे.

18/07/2024 | Pune | Page : 12
Source : https://epaper.loksatta.com

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
Pune City_18 July 2024_002
18 Jul 2024

# वर्षातून दोनदा बोर्डाच्या परीक्षा घेण्याबाबत अद्याप निर्णय नाही

**नवी दिल्ली, दि. १७ - नवीन राष्ट्रीय अभ्यासक्रम फ्रेमवर्कमध्ये शिफारस केल्यानुसार बोर्ड परीक्षांच्या दोन फेऱ्यांचे वेळापत्रक जानेवारी-फेब्रुवारी, मार्च-एप्रिल आणि जून या कालावधीत घेण्याबाबत सीबीएसई संदिग्ध आहे. सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन दुसरा पर्याय शोधत आहे तो म्हणजे द्विवार्षिक परीक्षांचा समावेश असलेली सेमिस्टर प्रणाली. सध्या १० वी आणि१२ वीच्या बोर्डाच्या परीक्षा फेब्रुवारी-मार्चमध्ये घेतल्या जातात.**

अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सल्लामसलत सुरू आहे आणि वर्षातून दोनदा बोर्ड परीक्षा कधी आणि कोणत्या स्वरूपात राबवली जाईल याबद्दल अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.

ज्या तीन संभाव्य पर्यायांवर चर्चा झाली आहे ते म्हणजे सेमिस्टर पद्धतीने परीक्षा आयोजित करणे, जानेवारी-फेब्रुवारीमध्ये पहिली बोर्ड परीक्षा आणि दुसरी मार्च-एप्रिलमध्ये परीक्षा किंवा जूनमध्ये बोर्ड परीक्षांचा दुसरा सेट पूरक किंवा सुधारणेसह आयोजित करणे. आमचे शैक्षणिक कॅलेंडर ज्या प्रकारे डिझाइन केले आहे, तसेच स्पर्धा परीक्षांचे वेळापत्रक आणि सीबीएसई शाळा देशभरात आणि अगदी परदेशात पसरलेल्या असल्याने भौगोलिक आव्हाने पाहता, सेमिस्टर पद्धत कमी व्यवहार्य वाटते, असे अधिकारी पुढे म्हणाले.

प्रक्रियेत उमेदवारांची यादी भरणे, केंद्र अधिसूचना, रोल नंबर जारी करणे, प्रात्यक्षिक आयोजित करणे, सिद्धांत परीक्षा, निकाल जाहीर करणे, पडताळणी आणि पुनर्मूल्यांकन यापासून सुरुवात करून किमान दोन परीक्षा घेण्यासाठी ३१० दिवसांचा कालावधी लागतो अशी माहिती बोर्डाने दिली आहे.सीबीएसईसमोर आता आव्हान आहे की दुसऱ्या फेरीसाठी मोठ्या कसरतीची प्रतिकृती कधी आणि कशी करायची.

फेब्रुवारीपूर्वी परीक्षा आयोजित करणे देखील स्वतःची आव्हाने आहेत कारण काही राज्यांमध्ये कठीण हिवाळा आहे. सध्या, बोर्ड परीक्षांचे वेळापत्रक १५ फेब्रुवारीच्या आसपास सुरू होते, त्यामुळे तारखांमध्ये लक्षणीय अंतर प्रदान करण्यासाठी त्यानुसार काम करावे लागेल,असे अधिकारी म्हणाले. २०२४ -२५ शैक्षणिक सत्रापासून द्विवार्षिक बोर्ड परीक्षा सुरू करण्याची मंत्रालयाची सुरुवातीची योजना होती.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी गेल्या ऑक्टोबरमध्ये एका मुलाखतीत सांगितले की, वर्षातून दोनदा बोर्डाच्या परीक्षेला बसणे विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक असणार नाही.

विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा जेईई प्रमाणेच वर्षातून दोनदा (वर्ग १० आणि १२ बोर्ड) परीक्षेला बसण्याचा पर्याय असेल. ते सर्वोत्तम गुण निवडू शकतात; परंतु ते पूर्णपणे ऐच्छिक असेल, कोणतीही सक्ती नाही.

बोर्डाच्या परीक्षेत सुधारणा करण्याचा हा पहिलाच प्रयत्न नाही.२००९ मध्ये इयत्ता १० वी साठी सातत्यपूर्ण आणि व्यापक मूल्यमापन सुरू करण्यात आले होते; परंतु २०१७ मध्ये ते रद्द करण्यात आले आणि बोर्डाने वर्षाच्या शेवटच्या परीक्षांच्या जुन्या मॉडेलवर परत केले. कोविड महामारीच्या काळात इयत्ता१० आणि १२ च्या बोर्ड परीक्षांचे दोन टर्ममध्ये एक-वेळचे उपाय म्हणून विभाजन करण्यात आले होते, परंतु वर्षाच्या शेवटी परीक्षांचे जुने स्वरूप यावर्षी पुन्हा सुरू झाले.

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# 'यूजीसी' ५ वर्षांत २२ हजार पुस्तकांची करणार निर्मिती

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षण मंत्रालय आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने पाच वर्षांमध्ये भारतीय भाषांमध्ये २२ हजार पुस्तके विकसित करण्याचा प्रकल्प सुरू केला आहे. 'अस्मिता' नावाचा हा प्रकल्प असून, उच्च शिक्षण सचिव संजय मूर्ती यांच्या हस्ते तो सुरू करण्यात आला.

या उपक्रमाची माहिती देताना शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी समाज माध्यमावर म्हटले आहे की, अस्मिता, बहुभाषिक शब्दकोश आणि रिअल-टाइम ट्रान्सलेशन आर्किटेक्चर या तीन महत्त्वाच्या उपक्रमांचा उद्देश भारतीय भाषांमध्ये शिक्षण प्रदान करणे, विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कार्यात सक्षम करणे आणि भारताच्या भाषापरंपरांचे जतन आणि संरक्षण करणे, हा आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने या उपक्रमांमुळे २२ अनुसूचित भाषांमध्ये शैक्षणिक संसाधनांचा सर्वसमावेशक पल तयार करण्यात. भाषिक विभाजन कमी करण्यात, सामाजिक एकता आणि एकात्मतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि आमच्या तरुणांना सामाजिकदृष्ट्या जबाबदार जागतिक नागरिकांमध्ये बदलण्यात मदत होईल, असेही त्यांनी म्हटले आहे. यूजीसीचे अध्यक्ष जगदीश कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकल्पाचा उद्देश उच्च शिक्षणातील एक मजबूत इकोसिस्टिम तयार करणे आहे.

**शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची समाज माध्यमाद्वारे माहिती**

प्रत्येक भाषेत पुस्तकलेखन प्रक्रियेसाठी एक मानक कार्यप्रणाली (एसओपी) तयार केली आहे. या अंतर्गत आणि साहित्यिक चोरी तपासणे, अंतिम रूप देणे, डिझाइन करणे, प्रूफ-रीडिंग आणि ई-प्रकाशन आदी कार्ये केली जाणार आहेत. हा उपक्रम भारतीय भाषा समितीच्या सहकार्याने सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन लँग्वेजेसद्वारे विकसित केला जाईल. हा शब्दकोश भारतीय शब्दांचा संग्रह असेल. आयटी, उद्योग, संशोधन यांसारख्या नवीन युगातील विविध डोमेनसाठी वाक्यांश असेल.

Pune Edition Edition
Jul 18, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# प्राध्यापक भरती करण्याबाबत यूजीसीकडून सहाव्यांदा निर्देश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

देशभरातील विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, महाविद्यालयांना प्राध्यापक भरती करण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) २०१९ ते २०२१ या कालावधीत पाचवेळा सूचना दिल्या होत्या. त्यानंतर आता नव्याने निर्देश देण्यात आले असून, प्राध्यापक भरती प्रक्रियेबाबतची माहिती ३१ जुलैपर्यंत पाठवण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी याबाबतचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.




विद्यापीठे, महाविद्यालये, उच्च शिक्षण संस्थांतील प्राध्यापकांच्या जागा रिक्त राहिल्याने त्याचा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवर परिणाम होतो. शिक्षण संस्थांमधील प्राध्यापकांची कमतरता हा चिंताजनक विषय असल्याने यूजीसीने हस्तक्षेप करून प्राध्यापक भरती करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, अद्यापही भरती प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्यामुळे आता पुन्हा एकदा प्राध्यापक भरती करण्याचे स्मरण यूजीसीने करून दिले आहे. तसेच, त्याबाबतची माहिती सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

राज्यातही विद्यापीठे, महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. अलीकडेच राज्य शासनाने मान्यता दिलेल्या २ हजार ८८ पदांवर प्राध्यापक भरती प्रक्रिया राबवण्यात आली. त्याशिवाय विद्यापीठांतील रिक्त जागा भरण्यासही मंजुरी देण्यात आली असून, त्याबाबतची प्रक्रिया सुरू असल्याचे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Edition Edition
Jul 18, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता

# शुल्कमाफी देण्याचे विद्यापीठ प्रशासनाचे आदेश

### विद्यार्थिनींना शुल्क भरण्यापासून दिलासा

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग आणि संलग्नित महाविद्यालयांतील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना १०० टक्के शुल्क माफी देण्याचे आदेश विद्यापीठ प्रशासनाने दिले. त्यामुळे विद्यार्थिनींना शुल्क भरण्यापासून दिलासा मिळणार आहे.

राज्य सरकारने अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन अशा विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना शिक्षण शुल्कात आणि परीक्षा शुल्कात १०० टक्के सवलत



देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांच्या आत, तसेच प्रवेश हा केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे झालेला असणे या मुख्य अटी आहेत. कला, वाणिज्य, विज्ञान अशा पारंपरिक अभ्यासक्रमांना शुल्क सवलतीची योजना ही २०१७ पासून लागू असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली होती. असे असतानाही शुल्क भरण्यासाठी तगादा लावण्याचे प्रकार होत आहेत.

तसेच विद्यार्थिनींना प्रवेश नाकारले जात आहेत. या पार्श्वभूमीवर निर्णयांच्या अंमलबजावणीबाबत विद्यापीठाने शैक्षणिक विभाग आणि महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या. त्यानुसार सक्षम प्राधिकरणाकडून राबवण्यात येणाऱ्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना शुल्कात ५० टक्क्यांऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

19/07/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

लोकमत

# जपानमध्येही मराठी प्रसारासाठी बालभारतीची पुस्तके पाठविणार

### एदोगावा भारतीय सांस्कृतिक केंद्र आणि टोकियो मराठी मंडळाशी करार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : अमेरिकेपाठोपाठ आता जपानमध्येही महाराष्ट्रातील शाळांप्रमाणे मराठी भाषेचे धडे मिळणार असून, त्यासाठी पहिली ते पाचवी इयत्तेची पाठ्यपुस्तके बालभारतीकडून पुरवली जाणार आहेत. जपानमधील टोकियो मराठी मंडळ आणि एदोगावा इंडिया कल्चरल सेंटरमार्फत हे वर्ग सुरू करण्यात येणार आहेत.

यासाठी कल्चरल सेंटर आणि मराठी मंडळ या संस्थांशी शालेय शिक्षण विभागाने करार केला आहे. या करारानुसार त्या देशातील मराठी शिकण्याची आवड असणाऱ्यांची माहिती संकलित करण्याबरोबरच त्यांना पुस्तकांची उपलब्धता, अध्यापन आणि परीक्षेची यंत्रणा निर्माण




करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर एदोगावा इंडिया कल्चरल सेंटर आणि टोकियो मराठी मंडळ यांच्यामार्फत पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडून (बालभारती) पाठ्यपुस्तकांचा पुरवठा करण्यात येणार आहे. आवश्यकता भासल्यास पुस्तकांमध्ये २० टक्के बदल करण्याचे अधिकार बालभारतीला असतील.

#### प्रश्नपत्रिकाही पुरविणार

- जपानमधील मराठी शिकणाऱ्यांसाठी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका तयार करणे, तसेच शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेवर (एससीईआरटी) सोपविण्यात आली आहे. या वर्गातील पाचवी इयत्ता उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.
- विशेष म्हणजे शासनाच्या मदतीशिवाय आणि संबंधित परदेशी संस्थेच्या आर्थिक पाठबळावर या कराराची अंमलबजावणी होणार असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.
- या कराराच्या संनियंत्रणासाठी समन्वय समितीची नियुक्तीदेखील करण्यात आली असून खुद्द राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे संचालक त्याच्या अध्यक्षस्थानी आहेत. या समितीमध्ये जपानमधील दोन्ही संस्थांच्या प्रतिनिधींसह एकूण नऊ सदस्यांचा समावेश आहे. या समितीकडून दर महिन्याला या मराठी वर्गांच्या कामकाजाचा आढावा घेतला जाईल. आवश्यकतेनुसार शासन मान्यतेने उपक्रमात बदल करण्यात येणार आहे.

Pune Main
Page No. 13 Jul 19, 2024
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

लोकमत

# दोन हजार महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र उभारणार

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यातील २ हजार महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्रांची स्थापना करण्यात येईल, असे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत सांगितले

राज्यातील एक हजार महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांची स्थापना करण्यात येणार असल्याचे कौशल्य विकास विभागाकडून सांगण्यात आले होते, परंतु आत्तापर्यंत १,९५८ महाविद्यालयांनी याकरिता अर्ज दाखल केले आहेत. या पार्श्वभूमीवर येणाऱ्या काळामध्ये अधिक महाविद्यालयांना या उपक्रमात सामावून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे लोढा यांनी सांगितले. या आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रावर पुढील महिन्यापासून प्रशिक्षण कार्यक्रमदेखील सुरू होणार आहे. पहिल्या टप्प्यात एक हजार केंद्रे उभारण्यात येतील. प्रत्येक कौशल्य विकास केंद्रात प्रतिवर्षी साधारण १५० युवक-युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामुळे संपूर्ण राज्यात प्रतिवर्षी साधारण १,५०,००० युवक-युवतींना मोफत प्रशिक्षण मिळणार आहे.

Pune Main
Page No. 13 Jul 19, 2024
Powered by: erelego.com

# कुलसचिवांचे नाव जाहीर का होत नाही?

## नियुक्ती प्रक्रियेत जाणीवपूर्वक विलंब होत असल्याची तक्रार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव पदासाठी १० आणि ११ जुलै रोजी पात्र उमेदवारांच्या मुलाखतीची प्रक्रिया झाल्यानंतर, अजूनही कुलसचिवाचे नाव जाहीर का होत नाही, अशी चर्चा शैक्षणिक वर्तुळात सुरू झाली आहे. त्याचप्रमाणे ही प्रक्रिया अत्यंत गुप्त असल्यावरही, निवड झालेल्या व्यक्तीचे नाव जाहीर होण्यापूर्वी बाहेर कसे येते, असाही प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या एकूणच पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव निवडीची प्रक्रिया सुरू आहे. या प्रक्रियेच्या अंतर्गत मुलाखतीची प्रक्रिया १० आणि ११ जुलै रोजी पार पडली. या प्रक्रियेतून एका ठरावीक व्यक्तीची निवड करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या व्यक्तीच्या विरोधात महिलांनी तक्रारी केल्या असून, त्याची चौकशीही झाली आहे. मात्र, याच व्यक्तीला कुलसचिवपदाच्या खुर्चीवर बसविण्याचा चंग काही मंडळींनी बांधला आहे. त्यामुळे विद्यापीठातील कर्मचारी संघटना आणि विद्यार्थी संघटना आक्रमक झाल्या असून, त्यांनी संबंधित व्यक्तीची निवड करू नका, यासाठी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांना निवेदन दिले आहे. याबाबत विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य धनंजय कुलकर्णी यांनी राज्यपाल रमेश बैस यांना पत्र पाठवले आहे.

पात्र उमेदवारांपैकी योग्य व्यक्तीची निवड होण्यासाठी राजकारण खेळले जाऊ नये, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या निवड प्रक्रियेबाबतची विश्वासार्हता संशयास्पद होते. निवड प्रक्रियेनंतर निवड समितीचा अहवाल २४ तासांत तयार होऊन नियुक्ती प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक असताना, ती लांबली गेली. त्यामुळे आरोप-प्रत्यारोपांसाठी वेळ मिळाला. निवड प्रक्रियेनंतर कुलगुरू डॉ. गोसावी परदेशात गेले. डॉ. गोसावी आल्यानंतर ही निवड प्रक्रिया पूर्ण होणार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, कुलसचिव म्हणून निवड होणाऱ्या व्यक्तीचे नाव संघटनांना समजते आणि वाद उभा राहतो, हे टाळण्यासाठी प्रयत्न होणे अपेक्षित आहे. त्यासाठी कुलसचिवांची नियुक्ती तातडीने होण्याची आवश्यकता असल्याचे धनंजय कुलकर्णी यांनी सांगितले.




### 'कुलसचिवांची नियुक्ती तातडीने व्हावी'

कुलसचिव नियुक्ती प्रक्रिया पूर्णच होऊ नये, यात संबंधित घटकांचे हितसंबंध गुंतले आहेत का? याबाबत खात्री करून घेण्याची आवश्यकता आहे. कुलसचिवपदाची दीर्घकाळ लांबलेली निवड प्रक्रिया त्वरित पूर्ण व्हावी. परिणामी विद्यापीठाला नियमित कुलसचिव मिळेल आणि त्याकामाला योग्य न्याय देता येईल. पर्यायाने विद्यापीठ कायदा तरतुदींचे पालन होईल, अशी अपेक्षा धनंजय कुलकर्णी यांनी राज्यपाल बैस यांना लिहिलेल्या पत्रात व्यक्त केली आहे.

Maharashtra Times 19.7.2024

***News Paper Clippings During July 2024***

***Section: Education***

# विद्यार्थिनींना शुल्कात शंभर टक्के सवलत द्या

## पुणे विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग, कॉलेजांना आदेश




**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग आणि संलग्न कॉलेजांमध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना १०० टक्के शुल्क सवलत देण्यात यावी, असे आदेश विद्यापीठ प्रशासनाने महाविद्यालयांना दिले आहेत. त्यामुळे विद्यार्थिनींना व्यावसायिक अभ्यासक्रमांचे भरमसाठ शुल्क भरण्यापासून थोडा दिलासा मिळणार आहे.

राज्य सरकारने इंजिनीअरिंग, मॅनेजमेंट, फार्मसी, हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना शिक्षण शुल्कात आणि परीक्षा शुल्कात १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थिनींच्या पालकांचे एकूण उत्पन्न लाखांच्या आत हवे; तसेच प्रवेश हा केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे झालेला असावा, अशा मुख्य अटी घातल्या आहेत.

बीए, बीकॉम, बीएस्सी अशा बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांना शुल्क सवलतीची योजना २०१७पासून लागू आहे; तरीही विद्यार्थिनींना शुल्क भरण्यासाठी तगादा लावला जात असून, पैसे नसल्याने विद्यार्थिनींना प्रवेश नाकारले जात आहेत. याबाबत 'मटा'ने वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर पुणे विद्यापीठाला जाग आली आणि निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शैक्षणिक विभाग आणि कॉलेजांना सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यापीठाच्या सूचनेनुसार सक्षम प्राधिकरणाकडून राबविण्यात येणाऱ्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना शुल्कात ५० टक्क्यांऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करण्यात यावेत, अशा सूचना शैक्षणिक विभाग आणि कॉलेजांना देण्यात आल्या आहेत. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी प्रसिद्ध केले आहे.

Maharashtra Times 19.7.2024

## *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
Pune City_19 July 2024_001
19 Jul 2024
www.dainikprabhat.com

# विद्यार्थिनींना विनाशुल्क प्रवेश

## पुणे विद्यापीठाचे परिपत्रक : १०० टक्के शुल्कमाफी

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १८ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग आणि संलग्न महाविद्यालयात विविध पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना १०० टक्के शुल्कमाफी करण्याच्या आदेशाचे परिपत्रक पुणे विद्यापीठाने काढले आहे. यामुळे महाविद्यालये आणि शिक्षण संस्थांना मुलींना विनाशुल्क प्रवेश देणे अनिवार्य राहणार आहे. राज्य शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क शंभर टक्के माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व तंत्रशिक्षण विभागाकडून परिपत्रक अद्याप प्राप्त झाले नव्हते. त्यावरून काही शिक्षण संस्थांकडून मुलींना मोफत प्रवेश देण्यावरून दिरंगाई होत होती. आता मात्र विद्यापीठाने अधिकृत परिपत्रक प्रसिद्ध केल्याने आता शिक्षणसंस्थांना त्याची अंमलबजावणी करावी लागणार आहे.**




मोफत शिक्षणाचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थिनींच्या पालकांचे एकूण उत्पन्न आठ लाखांच्या आत हवे. तसेच प्रवेश हा केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे झालेला असावा, अशा अटी आहेत. त्यातच बी.ए, बी.कॉम, बी.एस्सी अशा बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांना शुल्क सवलतीची योजना ही २०१७ पासून लागू आहे. मात्र, असे असतानाही विद्यार्थिनींना शुल्क भरण्यासाठी तगादा लावण्यात येत असून, विद्यार्थिनींना पैसे नसल्याने प्रवेश नाकारण्याचे प्रकार सुरू आहेत. त्यावर आता या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शैक्षणिक विभाग आणि महाविद्यालयांना सूचना दिल्या आहेत.

(पान २ पहा) ▸▸

### आज मंत्रालयात बैठक

व्यावसायिक शिक्षण मुलींना मोफत देण्याच्या निर्णयावरून काही महाविद्यालये व शिक्षणसंस्था संभ्रमात आहेत. तसेच पालकांमध्येही या निर्णयाबाबत स्पष्टता नाही. या सर्व पार्श्वभूमीवर हा संभ्रम दूरण्यासाठी उद्या (दि.१९) मंत्रालयात प्रधान सचिवांनी बैठक बोलावली आहे. यात सर्व उच्च शिक्षण विभाग, तंत्रशिक्षण व वैद्यकीय शिक्षण विभागाचे संचालक उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत मोफत शिक्षणाची कार्यपद्धती निश्चित केली जाणार आहे. त्यामुळे या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

प्रभात
Pune City_19 July 2024_002
19 Jul 2024

पान १ वरून

## विद्यार्थिनींना विनाशुल्क प्रवेश

विद्यापीठाच्या सूचनेनुसार सक्षम प्राधिकरणाकडून राबविण्यात येणाऱ्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना शुल्कात ५० टक्क्यांऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करण्यात यावे, अशा सूचना शैक्षणिक विभाग आणि महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत. याबाबतच परिपत्रक विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी प्रसिद्ध केले आहे.

**अशीही एक शक्यता**

मुलींना ५० टक्क्यांऐवजी १०० टक्के शुल्कमाफीचा निर्णय झाला. यापूर्वी ५० टक्के शुल्क माफ असताना जी कार्यपद्धती होती, त्याचप्रमाणे अंमलबजावणी होणार आहे. पूर्वी विद्यार्थिनी प्रवेश घेत असताना केवळ ५० शुल्क भरायचे आणि उर्वरित ५० टक्के शुल्क राज्य शासनाकडून थेट महाविद्यालयाच्या बँक खात्यावर जमा करायचे. त्या पद्धतीने आता विद्यार्थिनींकडून कोणतेही शिक्षण शुल्क न घेता प्रवेश द्यावे लागणार आहे, हे स्पष्ट होत आहे.

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

# शैक्षणिक संस्थांचे मानांकन आणि महाराष्ट्र

**कोणत्या शिक्षण संस्थेत गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळते, हे जाणून घेणे हा प्रत्येक विद्यार्थी आणि पालकांचा अधिकार आहे. 'नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क'कडून दिले जाणारे मानांकन त्यादृष्टीने महत्त्वाचे आहे. या संदर्भात महाराष्ट्राच्या स्थितीवर दृष्टिक्षेप टाकणारा लेख.**



(प्रातिनिधिक छायाचित्र)

**▸ डॉ. शैलेंद्र देवळाणकर**

नवीन शैक्षणिक वर्ष लवकरच सुरू होत आहे. सर्वच सामाईकप्रवेशपरीक्षांच्यानिकालांचाहाकाळआहे. या परीक्षांमधील गुणांच्या आधारावर प्रवेशाची प्रक्रिया पार पडते. अशा वेळी सर्वच पालकांपुढे आणि विद्यार्थ्यांपुढे एक कळीचा प्रश्न असतो, तो म्हणजे उच्च शिक्षणासाठी कोणत्या शिक्षणसंस्थेत प्रवेश घ्यायचा? कोणत्या शिक्षण संस्थेत गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळते, हे जाणून घेणे हा प्रत्येक विद्यार्थी आणि पालकांचा अधिकार आहे. याउलट आपली गुणवत्ता वाढवणे आणि दर्जेदार शिक्षण देणे हे प्रत्येक शिक्षणसंस्थेचे कर्तव्य आहे. देशातील शिक्षणसंस्था कशा पद्धतीचे संशोधन करताहेत, त्यांचा शैक्षणिक आलेख कसा आहे याचा एकूणच लेखाजोखा मानांकनाच्या प्रक्रियेतून घेतला होतो. उपरोक्त सर्व गोष्टींची पूर्तता करणाऱ्या देशातील सर्वोच्च शैक्षणिक संस्था कोणत्या आहेत हे ठरवण्यासाठी नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) ही प्रक्रिया पार पाडली जाते.

या प्रक्रियेची सुरवात २९ सप्टेंबर २०१५ मध्ये स्मृती इराणी या मनुष्यबळविकास मंत्री असताना झाली. त्यापूर्वी गुणवत्तेच्या आधारावर शैक्षणिक संस्थांचे मानांकन करण्याचे काम प्रामुख्याने क्यूएस रँकिंग, टाइम्स रँकिंग यांसारख्या पाश्चिमात्य संस्था करत. परंतु त्यांचे निकष हे प्रामुख्याने पश्चिमी दृष्टिकोनातून असल्यामुळे भारतीय शिक्षणसंस्थांचे नेमके प्रतिबिंब त्यात उमटत नसे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे विद्यापीठांना संलग्न शेकडो महाविद्यालये हा प्रकार पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये नाहीये. तेथे एकल विद्यापीठे आहेत. याउलट आपल्याकडे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासारख्या विद्यापीठाला ८००हून महाविद्यालये संलग्न आहेत. दोन्ही ठिकाणचे निकष वेगवेगळे असल्याने आपल्याकडील संस्थांचा समावेश जागतिक क्रमवारीत पहिल्या ५००मध्येही होताना दिसत नसे.

केवळ भारतच नव्हे चीनमधील संस्थाही या पाश्चिमात्य संस्थांच्या क्रमवारीत येत नसत. त्यामुळे चीनने २००० पासून 'शांघाय रँकिंग'ची सुरवात केली. पश्चिमी देश आशियायी संस्थांचे रँकिंग करत असतील तर आता आशियायी देश पश्चिमी संस्थांचे रँकिंग करतील, या उद्देशाने याची सुरवात झाली. शांघाय रँकिंगमध्ये आंतरराष्ट्रीय संस्थांचेही मानांकन केले जाते. भारतात २०१५ पूर्वी काही खासगी पातळीवर अशा प्रकारचे मानांकन केले जात असे, पण त्यात पारदर्शकता नव्हती. त्यामुळे केंद्राने पारदर्शी प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार २०१५-१६ पासून 'एनआयआरएफ'ची प्रक्रिया सुरू झाली. या रँकिंगमध्ये १२ प्रकारच्या प्रवर्गात मानांकनाची सुविधा आहे. विद्यापीठे, महाविद्यालये, संशोधन संस्था, तसेच विषयनिहाय जसे विधी महाविद्यालये, कृषी, वैद्यकीय महाविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र, दंतचिकित्सा महाविद्यालये आदींचा समावेश आहे.

## एनआयआरएफचे पाच प्रमुख निकष :

१) **शिकवणे आणि शिकणे :** यात प्रामुख्याने शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे प्रमाण किती आहे , हे तपासले जाते. याखेरीज 'पीएच.डी.'चे विद्यार्थी किती आहेत, कोणकोणत्या विषयावर संशोधन केले जाते, शिक्षक कोणकोणत्या प्रकारचे आहेत का, ते कायमस्वरूपी आहेत की तात्पुरत्या स्वरूपाचे आहेत, कोणकोणते विषय शिकवले जातात आणि यावर शैक्षणिक संस्था किती निधी खर्च करते, याचा विचार निकषांतर्गत केला जातो.

२) **संशोधन :** संबंधित महाविद्यालयांकडून अथवा विद्यापीठाकडून,प्राध्यापकांकडून कोणकोणत्या विषयांवर संशोधनपर लेख प्रसिद्ध होतात, हे तपासले जाते. त्यासाठी ठरवून दिलेल्या संशोधनपत्रिका ,इंडेक्समध्येच ते प्रकाशित होतात का, हे पाहिले जाते. याखेरीज सायटेशन्स, पेटंट नोंदणी तपासली जातात. नोंदणी झालेल्या पेटंटचा काही उपयोग होतो आहे का, हे पाहिले जाते. कारण संशोधन हा उच्च शिक्षणाचा गाभा आहे.

३) **पदवीनंतरच्या फलनिष्पत्तीचा आढावा :** कोणत्याही शिक्षणसंस्थेतून पदवीप्राप्त करणाऱ्या उमेदवारांना संबंधित क्षेत्रात किती मागणी आहे, त्यांना रोजगार मिळतो का, त्यांना दिलेले शिक्षण उपयुक्त आहे का, समाज आणि उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊन शिक्षण दिले जाते का, त्या आधारावर संशोधन केले जाते का, याची पडताळणी केली जाते.

४) **सर्वसमावेशकता :** यामध्ये तीन प्रकार आहेत. पहिला प्रकार म्हणजे शिक्षणसंस्थेत परदेशातील विद्यार्थी किती प्रमाणात येतात, त्यांच्या प्रवेशासाठी आवश्यक असणारी प्रक्रिया त्या संस्थेत आहे का, विद्यार्थिनींची संख्या किती आहेत, दिव्यांगांसाठी सुविधा कोणत्या आहेत, हे पाहिले जाते.

५) **सार्वजनिक प्रतिमा :** यामध्ये सदर शैक्षणिक संस्थेविषयी समाजामध्ये काय भावना आहेत, काय मते आहेत हे तपासले जाते. ही गोष्ट महत्त्वाची असते. कारण लोकसमुदायाचा विश्वास संपादन करणे हे गुणवत्तेशिवाय शक्य नसते.

या पाच निकषांच्या आधारावर 'एनआयआरएफ'चे गुणांकन केले जाते. यासाठी प्रक्रिया कठोर असल्याने यात पारदर्शकता अधिक आहे. कोणत्याही संस्थेने दिलेल्या माहितीची पुनःपडताळणी करण्याची संस्थात्मक संरचना एनआयआरएफकडे आहे. ती माहिती त्या शिक्षणसंस्थेने आपल्या संकेतस्थळावर अपलोड करणे सक्तीचे केले जाते. जेणेकरून काही आक्षेप असल्यास समोर येऊ शकते.

'एनआयआरएफ'मध्ये देशातील ८,५०० शिक्षण संस्थांमधील सर्वांत आघाडीच्या १०० संस्थांची निवड केली जाते. याखेरीज विद्यापीठनिहाय, महाविद्यालयनिहाय, संशोधन संस्थानिहाय रँकिंग काढले जाते. यापैकी ओव्हरऑल मानांकनामध्ये महाराष्ट्रातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा समावेश पहिल्या दहा संस्थांमध्ये होता. पण आता ओवर ऑल आणि विद्यापीठ प्रवर्गातील रँकिंग देखील खाली आली आहे. हाच प्रकार मुंबई विद्यापीठाच्या बाबतीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठही पहिल्या १०० संस्थांच्या यादीतून बाहेर पडले आहे. ही घसरण चिंताजनक आहे. या पार्श्वभूमीवर आयआयटी चेन्नईचे उदाहरण आदर्श आहे. २०१८-२०२३ अशी सलग पाच वर्षे आयआयटी चेन्नई पहिल्या स्थानावर आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगलोर (आयआयएस) ही संस्था संशोधनात सातत्याने पहिल्या स्थानावर आहे. हे सातत्य टिकविण्यामागील प्रयत्नांचा तुलनात्मक अभ्यास गरजेचा आहे. महाराष्ट्राबाबत विचार करता संशोधनाची गुणवत्ता, माहितीचे अचूक आणि पद्धतशीर संकलन यावर जोर द्यायला हवा. आयआयटी आणि आयआयएस यांच्या तुलनेत आपल्या विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या अधिक असल्याने शिक्षक-विद्यार्थी प्रमाण बिघडते.

अनेक प्राध्यापक आपापल्या महाविद्यालयीन स्तरावर संशोधनपत्रिका प्रकाशित करतात. परंतु त्याचे संकलन व्यवस्थित केले जात नाही. याखेरीज उद्योगप्रधान अभ्यासक्रम कोणकोणते आहेत, विद्यापीठांमधून, महाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या किती पदवीधरांना, कोणकोणत्या स्तरावर नोकऱ्या मिळालेल्या आहेत, या सर्वांची माहितीही संकलित स्वरूपाच असणे गरजेचे आहे. केवळ पेटंट नोंदणी नाही तर त्याचा व्यावसायिक उपयोग व्हायला हवा. याखेरीज समाजातील प्रतिमानिर्मितीबाबत आपल्याकडे मोठी अनास्था आहे. राष्ट्रीय पातळीवरील संस्था याबाबत गांभीर्याने प्रयत्न करताना दिसतात. यामध्ये आपल्या माजी विद्यार्थ्यांना, स्थानिक प्रतिष्ठित लोकांना चांगला अभिप्राय देण्याचे आवाहन केले जाते. तसे प्रयत्न आपल्याकडच्या संस्था करत नाहीत. वस्तुतः एनआयआरएफ ही सातत्यपूर्ण प्रक्रिया असल्याने विद्यापीठांनी यासाठी एक स्वतंत्र कायमस्वरूपी 'सेल' तयार करणे आवश्यक आहे. त्या सेलच्या माध्यमातून सातत्यपूर्ण प्रयत्न केले पाहिजेत.

**(लेखक महाराष्ट्र राज्याचे उच्च शिक्षण संचालक आहेत.)**

**(लेखातील मते वैयक्तिक)**

### राज्याचा स्वागतार्ह पुढाकार

■ राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी नुकतेच 'एनआयआरएफ'च्या धर्तीवर राज्यस्तरावर 'एसआयआरएफ'च्या निर्मितीची आणि मानांकनाची घोषणा केली. हा अत्यंत स्वागतार्ह पुढाकार आहे. अशी यंत्रणा उभी करणारे महाराष्ट्र हे देशातील पाहिले राज्य असणार आहे. त्यामुळे राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये सकारात्मक स्पर्धात्मकतेचे वातावरण निर्माण होऊन 'एनआयआरएफ'साठी त्यांची तयारी वाढेल.

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता

### साहाय्यक प्राध्यापकांचीच उपेक्षा का?

'विद्यार्थ्यांसाठी 'लाडका भाऊ' योजने'ची घोषणा ही बातमी (१८ जुलै) वाचली. घड्याळी तासिका तत्त्वावर काम करणारे साहाय्यक प्राध्यापक वार्षिक लाख-दीड लाख उत्पन्नावर काम करतात. त्यांनाही कायमस्वरूपी प्राध्यापकांऐवढीच मेहनत घ्यावी लागते. एक तासिका सकाळी आणि दुसरी दुपारी असल्यामुळे घड्याळी तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांचाही दिवस महाविद्यालयातच जातो. तेही नेट/ सेट परीक्षा उत्तीर्ण झालेले असतात. परीक्षेचा निकाल लागतो, तेव्हा त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होतो, मात्र त्यानंतर घड्याळी तासिका तत्त्वावर काम करू लागताच वास्तव समोर येते.

या परिस्थितीविरोधात 'नेट, सेट, पीएचडीधारक संघर्ष समिती'मार्फत आम्ही लढा देत आहोत. साहाय्यक प्राध्यापक यांना दरमहा ५० हजार रुपये मासिक वेतन द्यावे. म्हणजे प्राथमिक शाळेच्या शिक्षकाएवढे तरी वेतन द्यावे, ही आमची प्रमुख मागणी आहे. परंतु सरकारने आमच्या या मागणीकडे लक्ष दिलेले नाही. समान काम समान वेतनाची तर आम्ही अपेक्षाच सोडली आहे. त्यासाठी सरकारने स. प्राध्यापकांच्या जागांवर भरती करावी, असा उपाय वेळोवेळी सुचवला आहे. आमचा न्यायालयीन लढादेखील सुरू आहे. अनेक आंदोलने केली आहेत. मात्र सरकारकडून अद्याप कोणतेही सकारात्मक पाऊल उचलण्यात आलेले नाही. सरकार बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना जर दरमहा सहा हजार रुपये देत असेल तर आम्ही साहाय्यक प्राध्यापक (घड्याळी तासिका) म्हणून काम करूनही आम्हाला योग्य वेतन का दिले जात नाही? यात हास्यास्पद परंतु तेवढीच गंभीर बाब म्हणजे काही साहाय्यक प्राध्यापक १८-१८ वर्षे घड्याळी तासिका तत्त्वावर काम करत आहेत. त्यांचे वार्षिक उत्पन्न दीड लाखांच्या आसपास आहे. घर चालविण्याचा वार्षिक खर्च एक लाख रुपये एवढा गृहीत धरला, तर हाती उरतात वर्षाकाठी ५० हजार. आता त्यांच्या बारावी उत्तीर्ण मुलांनी त्यांना विचारले की वर्षाकाठी तुमच्या हाती केवळ ५० हजार रुपये उरतात आणि मला तर वार्षिक ७२ हजार रुपये मिळतात. मग तुम्ही महाविद्यालयात कशासाठी जाता? अशा वेळी वडिलांनी मुलांना काय उत्तर द्यावे? हा गुंता सोडविण्यासाठी सरकारने घड्याळी तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या साहाय्यक प्राध्यापकांना मासिक ५० हजार रुपये वेतन देण्याचा कायदा करावा.



■ **प्रा. आदित्य भांगे**
(सदस्य नेट, सेट, पीएचडीधारक संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्य)

19/07/2024 | Pune | Page : 06
Source : https://epaper.loksatta.com

### प्राध्यापकांची रिकामी पदे तातडीने भरा; यूजीसीने पुन्हा सुनावले

**३१ जुलैपूर्वी माहिती सादर करण्याचे आदेश**

**पुणे** : विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांमधील प्राध्यापकांच्या रिकाम्या पदांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. त्यातच आता विद्यापीठ अनुदान मंडळाने सर्व विद्यापीठे व अभिमत विद्यापीठे व विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांना प्राध्यापकांची रिकामी पदे भरण्याबाबत निर्देश दिले आहेत. तसेच येत्या ३१ जुलै पर्यंत प्राध्यापकांच्या रिकामी पदासंदर्भातील स्थिती यूजीसीच्या पोर्टलवर भरावी, अशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे राज्य शासन याबाबत गांभीर्याने निर्णय घेणार का? हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने सर्व विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे व विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांमधील रिक्त पदे भरण्याबाबत वेळोवेळी निर्देश दिले आहेत. ४ जून २०१९, ३१ जुलै २०१९, ७ ऑगस्ट २०१९, ५ सप्टेंबर २०१९, २२ ऑक्टोबर २०१९, २६ नोव्हेंबर २०२१ या तारखांना पत्रक काढून प्राध्यापकांची पदे भरण्याबाबत सूचना दिल्या आहेत. युजीसीने आता सहाव्यांदा प्राध्यापकांची रिकामी पदे भरण्यासंदर्भात सर्व विद्यापीठांच्या कुलपतींना व सर्व महाविद्यालयांच्या संस्थाचालकांना व प्राचार्यांना आदेश दिले आहेत, यूजीसीचे सचिव मनीष जोशी यांनी या संदर्भातील पत्र प्रसिद्ध केले आहे.

यूजीसीच्या पत्रकानुसार सर्व विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे, तसेच विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांनी गांभीर्याने पावले उचलत प्राध्यापकांची रिकामी पदे भरावीत. त्याचप्रमाणे भरती प्रक्रियेची स्थिती विद्यापीठात अनुदान आयोगाच्या http://www.ugc.ac.inluamp/ या पोर्टलवर सादर करावी, असे पत्रकात नमूद केले आहे.

महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांमध्ये रिक्त २ हजार ८८ पदांच्या भरतीची प्रक्रिया नुकतीच राबविण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील १११ पदांची भरती प्रक्रिया लवकरच सुरू केली जाणार आहे. मात्र, महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची काही हजार पदे रिक्त आहेत. त्यामुळे राज्याच्या उच्च शिक्षण विभागाकडून या पदांच्या भरती प्रक्रियेबाबत निर्णय घेतला जाणार आहे का? याबाबत उत्सुकता आहे. काही दिवसांपूर्वी राज्यातील महाविद्यालयांमधील शंभर टक्के रिक्त पदांवर प्राध्यापक भरती प्रक्रिया राबवावी, या मागणीसाठी प्राध्यापक संघटनेने उच्च शिक्षण संचालक कार्यालयासमोर आंदोलनही केले होते.

Kesari 19.7.2024

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

# कुलसचिवांची नियुक्ती तातडीने व्हावी;

## नियुक्ती प्रक्रियेत जाणीवपूर्वक विलंब

**पुणे** : कुलसचिव नियुक्ती प्रक्रिया पूर्णच होऊ नये, यात संबंधित घटकांचे हितसंबंध गुंतले आहेत का? याबाबत खात्री करून घेण्याची आवश्यकता आहे. कुलसचिव पदाची दीर्घकाळ लांबलेली निवड प्रक्रिया त्वरित पूर्ण व्हावी. परिणामी विद्यापीठाला नियमित कुलसचिव मिळेल आणि त्याकामाला योग्य न्याय देता येईल. पर्यायाने विद्यापीठ कायदा तरतुदींचे पालन होईल. अशा मागणी विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य धनंजय कुलकर्णी यांनी राज्यपाल रमेश बैस पत्राद्वारे केली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव निवड प्रक्रिया सुरू आहे. या निवड प्रक्रियेच्या अंतर्गत मुलाखतीची प्रक्रिया १० आणि ११ जुलै रोजी पार पडली. या प्रक्रियेतून एका ठराविक व्यक्तीची निवड करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या व्यक्तिच्या विरोधात महिलांनी तक्रारी केल्या असून,



त्याची चौकशीही झाली आहे. मात्र, याच व्यक्तीला कुलसचिव पदाच्या खुर्चीवर बसविण्याचा चंग काही मंडळींनी बांधला आहे. त्यामुळे विद्यापीठातील कर्मचारी संघटना तसेच विद्यार्थी संघटना आक्रमक झाल्या असून, त्यांनी संबंधित व्यक्तीची निवड करू नका, यासाठी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांना निवेदन दिले आहे. याबाबत विद्यापीठाचे माजी अधिसभा सदस्य धनंजय कुलकर्णी यांनी राज्यपाल रमेश बैस यांना पत्र पाठवले आहे.

पात्र उमेदवारांपैकी योग्य व्यक्तीची निवड होण्यासाठी राजकारण खेळले जाऊ नये, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या निवड प्रक्रियेबाबतची विश्वासाहर्ता संशयास्पद होते. निवड प्रक्रियेनंतर निवड समितीचा अहवाल २४ तासात तयार होऊन नियुक्ती प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक असताना, ती लांबली गेली. त्यामुळे आरोप-प्रत्यारोपांसाठी वेळ मिळाला. निवड प्रक्रियेनंतर कुलगुरू डॉ. गोसावी परदेशात गेले. डॉ. गोसावी आल्यानंतर ही निवड प्रक्रिया पूर्ण होणार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, कुलसचिव म्हणून निवड होणाऱ्या व्यक्तिचे नाव संघटनांना समजते आणि वाद उभा राहतो, हे टाळण्यासाठी प्रयत्न होणे अपेक्षित आहे. त्यासाठी कुलसचिवांची नियुक्ती तातडीने होण्याची आवश्यकता असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले.

Kesari 19.7.2024

सकाळ

# शिक्षणसेवक नको, 'शिक्षक' हवे

## पद रद्द करण्यासाठी नवनियुक्त शिक्षकांचे मुख्यमंत्र्यांना साकडे

**पुणे, ता. १९ :** नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (२०२०) 'शिक्षणसेवक' पद नाही. त्यामुळे या पदावर नियुक्ती करण्याची प्रक्रिया बंद करण्याची सूचना धोरणात केली आहे. त्यानुसार राज्य सरकारनेही उमेदवारांना थेट शिक्षक पदावर नियुक्ती द्यावी, अशी मागणी नवनियुक्त शिक्षकांनी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

देशभरातून 'शिक्षणसेवक' किंवा 'पॅरा टीचर्स' (अपात्र, कंत्राटी शिक्षक) नियुक्त करण्याची प्रक्रिया बंद करण्यात येईल, असे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात स्पष्टपणे नमूद केले आहे. राज्यात सन २००० पासून शिक्षणसेवक पद्धत अस्तित्वात आली आहे. त्यानुसार शिक्षणसेवकांची नियुक्ती करण्यात येते. राज्यात तब्बल दहा-बारा वर्षांनंतर पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरतीची प्रक्रिया सध्या सुरू आहे. त्यात पात्र उमेदवारांना शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती मिळाली असून अनेक उमेदवार पदावर कार्यरत आहेत. सध्या नियुक्त झालेल्या शिक्षकांचे वय ३० ते ३५ वर्षांच्या दरम्यान आहे. या शिक्षकांना आता तीन वर्षे शिक्षणसेवक म्हणून तुटपुंज्या मानधनावर काम करावे लागणार आहे. याद्वारे शिक्षकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचे नवनियुक्त शिक्षकांचे म्हणणे आहे. हे लक्षात घेऊन शिक्षणसेवक पद रद्द करावे आणि सेवा कालावधीतील पूर्ण वेतन, भत्ते आणि सेवेचे लाभ पूर्वलक्षी प्रभावाने द्यावेत, अशा मागणीसाठी नवनियुक्त शिक्षकांनी मुख्यमंत्र्यांना साकडे घातले आहे.

> " सरकार एकीकडे पैशांची खैरात वाटत आहे; मात्र शिक्षण सेवकांकडून वेठबिगारी करून घेण्याचे काम सुरू आहे. गुजरातच्या धर्तीवर राज्यात ही योजना लागू केली; पण तिथली आर्थिक स्थिती सुधारताच ही योजना रद्द केलेली आहे. राज्य सरकारने अजूनही त्यात बदल केलेले नाहीत. नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करून शिक्षणसेवक वेठबिगारी रद्द करावी.
>
> **- संदीप कांबळे,** अध्यक्ष, युवा शैक्षणिक व सामाजिक न्याय संघटना

Pune, Pune-Today
20/07/2024 Page No. 3

## *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

प्रभात
Pune City_ 20 July 2024_015
20 Jul 2024

# शिक्षण सप्ताह विविध उपक्रमांनी साजरा होणार

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १९** - राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०च्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त २२ ते २८ जुलै या कालावधीत शिक्षण सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. यात प्रत्येक दिवशी विशिष्ट उपक्रम राबविण्याला प्राधान्य देण्यात येणार आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयामार्फत शिक्षण सप्ताह साजरा करण्याबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत. शिक्षण सप्ताहात शिक्षण व विकासाच्या विविध पैलूंचा समावेश आहे. हा शिक्षण सप्ताह विद्यार्थी, शिक्षक, धोरणकर्ते व भागधारक यांच्यामध्ये सहकार्य वाढविणारा ठरणार आहे. २२ जुलै रोजी अध्ययन अध्यापन साहित्य दिवस, २३ जुलैला मुलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवस, २४ जुलैला क्रीडा दिवस, २५ जुलैला सांस्कृतिक दिवस, २६ जुलैला कौशल्य व डिजिटल उपक्रम दिवस, २७ जुलैला मिशन लाईफच्या दृष्टीक्षेपात इको क्लब उपक्रम व शालेय पोषण दिवस, २८ जुलैला समुदाय सहभाग दिवस याप्रमाणे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.



शिक्षण सप्ताहामधील उपक्रमांची अंमलबजावणी नेमून दिलेल्या कालावधीत पूर्ण करावी. शिक्षण सप्ताहादरम्यान आयोजित उपक्रमांची छायाचित्रे व माहिती अपलोड करावी, अशा सूचना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार यांनी राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाधिकारी, महापालिका, नगरपालिका, नगर पंचायतीचे प्रशासन अधिकारी यांना देण्यात आलेल्या असून त्याची अंमलबजावणी करावी लागणार आहे.

प्रभात
Pune City_ 20 July 2024_005
20 Jul 2024

# राज्यातील शाळांमध्ये महावाचन उत्सव

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १९** - राज्यातील सर्व शाळांमध्ये महावाचन उत्सव-२०२४ हा उपक्रम दि. २२ जुलै ते ३० ऑगस्ट या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. यासाठी 'रीड इंडिया सेलिब्रेशन' संस्थेने पुढाकार घेतला आहे. या उपक्रमाकरिता ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड करण्यात येणार आहे.

वाचन हे व्यक्तिमत्त्व विकासाचे एक महत्वाचे साधन आहे. वाचनामुळे ज्ञानवृद्धी होते, विचाराधी क्षितिजे विस्तारित होतात, आणि व्यक्तीमध्ये सर्जनशीलता वाढते, विविध साहित्य, कथा, कादंबऱ्या, आत्मचरित्रे, आणि शैक्षणिक पुस्तकांचे वाचन करून व्यक्ती नवीन माहिती आणि दृष्टिकोन प्राप्त करते, वाचनाच्या सवयीमुळे भाषिक कौशल्ये सुधारतात, आणि व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होते. त्कीच्या विकासासाठी आणि समाजाच्या व राष्ट्राच्या उन्नतीसाठी वाचन संस्कृती समाजात रुजविणे आवश्यक आहे. सन २०२४-२५ या वर्षात स्टार्स या केंद्र पुरस्कृत योजनेतर्गत महावाचन उत्सव - २०२४ या उपक्रमास ८ कोटी ७५ लाख रुपये इतका निधी उपलब्ध आहे. इयत्ता ३ री ते ५ वी इयत्ता ६ वी ते ८ वी व इयत्ता ९ वी ते १२ वी अशा तीन इयत्तानिहाय वर्गवारी निश्चित करण्यात येत आहेत.

### उपक्रमाची उद्दिष्टे

- वाचन संस्कृतीला प्रोत्साहन
- विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण करणे
- मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीशी विद्यार्थ्यांची नाळ जोडणे
- दर्जेदार साहित्य, लेखक, कवींचा विद्यार्थ्यांना परिचय करुन देणे
- विद्यार्थ्यांच्या भाषा, संवाद, कौशल्य विकासास चालना देणे

## *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# मुलींना मोफत उच्चशिक्षण कागदावरच!

## आदेशात स्पष्टता नसल्याने संस्था, विद्यार्थी, पालकांची कोंडी

**पुढारी विशेष**

**प्रवीण मस्के**
पुढारी प्रतिनिधी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सरकारने व्यावसायिक अभ्यासक्रम शिकणाऱ्या मुलींना उच्चशिक्षण व परीक्षा शुल्क शंभर टक्के माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा जीआर काढला आहे. मात्र, यामध्ये सुस्पष्टता नसल्याने शैक्षणिक संस्था, मुलींसह पालकांची कोंडी झाली आहे. राज्यातील हजारो मुलींचे चालू शैक्षणिक वर्षातील प्रवेश अडचणीत येण्याची शक्यता आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने ५ जुलै रोजी आदेश काढून अभियांत्रिकी, फार्मसी, एमसीए, एमबीए, विधी, शारीरिक शिक्षण यासह इतर व्यावसायिक अभ्यासक्रम शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस), सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग (एसईबीसी), इतर मागास प्रवर्गातील (ओबीसी) मुलींना यंदाच्या वर्षापासून शुल्कमाफी दिली जाणार आहे. उच्चशिक्षण व परीक्षा शुल्क शंभर टक्के माफ होणार आहे. यासाठी पालकांचे वार्षिक उत्पन्न ८ लाखांपेक्षा कमी असणे महत्त्वाचे आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार व्यावसयिक शिक्षणातील मुलींचा टक्का वाढावा, या उद्देशाने हा निर्णय घेतला आहे. यासाठी राज्य सरकारच्या तिजोरीवर सुमारे ९०० कोटी रुपयांचा आर्थिक भार पडणार आहे.

सध्या अभियांत्रिकी, फार्मसीसह विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्या आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांची प्रवेशाची लगबग, तर पालकांकडून कागदपत्रांची जुळवाजुळव सुरू आहे. राज्य सरकारच्या मोफत व्यावसायिक शिक्षण देण्याचा आदेश स्पष्ट नसल्याची तक्रार सुरू झाली आहे. मुलींची शैक्षणिक फी कशी मिळणार, कोणता विभाग देणार, याबाबत कोणत्याही सूचना नाहीत. त्यामुळे प्रवेश घेताना अडचणी येत असल्याचे पालक, महाविद्यालयांतील शिक्षकांचे म्हणणे आहे.

ईडब्ल्यूएस, एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील मुलींना मोफत उच्चशिक्षण मिळणार आहे. मराठा समाजातील मुलींना केवळ केंद्र सरकारचा ईडब्ल्यूएस दाखला मिळतो. परंतु, राज्य सरकारकडून मिळणारा ईडब्ल्यूएस दाखला मिळत नसल्याने अडचणीत भर पडली आहे. एसईबीसीचे दाखले काढण्यासाठी अर्ज केले असून, ते वेळेत मिळत नसल्याच्या पालकांच्या तक्रारी आहेत. स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसेस (एसओपी) निश्चित नसल्याने महाविद्यालयांपुढे पेच निर्माण झाला आहे. शासन आदेश झाल्याने पालक शैक्षणिक संस्थांना फी द्यायला तयार नाहीत. दुसरीकडे, पैशाशिवाय काही महाविद्यालये प्रवेश देत नसल्याचे समजते. परिणामी, विद्यार्थी, पालक भांबावून गेले आहेत.

> मुलींना उच्चशिक्षण मोफत देण्याचा सरकारचा निर्णय स्तुत्य आहे; परंतु यामध्ये स्पष्टता नसल्याने संभ्रमावस्था आहे. ईडब्ल्यूएसचे दाखले मिळत नसल्याने पाल्याचा प्रवेश कसा घेणार, हा प्रश्न आहे. विद्यापीठाने यासंदर्भात शासनस्तरावर पाठपुरावा करून स्पष्ट आदेश महाविद्यालयांना द्यावा. जेणेकरून प्रवेशातील अडचणी दूर होतील.
>
> \- **निवेदिता माने**, पालक

> मुलींना उच्चशिक्षण मोफत देण्याचा राज्य सरकारचा निर्णय झाला आहे. त्यास शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता घेण्यात आली आहे. लवकरच विद्यापीठ संलग्न सर्व महाविद्यालयांना याची परिपत्रकाद्वारे माहिती कळविली जाणार आहे.
>
> \- **डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

- **'ईडब्ल्यूएस'चे दाखले मिळत नसल्याने अडचणी**
- **'एसओपी' निश्चित नसल्याने महाविद्यालयांपुढे पेच**
- **फीची रक्कम शासन कधी देणार याबाबत संभ्रम**
- **शासनाच्या तिजोरीवर ९०० कोटी रुपयांचा भार**

Pune Edition Edition
Jul 20, 2024 Page No. 07
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

**लोकमत**

# प्राध्यापकांची भरती करा, 'यूजीसी'चे सहाव्यांदा निर्देश

## भरती प्रक्रियेची माहिती ३१ जुलैपर्यंत पाठवा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** देशभरातील विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, महाविद्यालयांना प्राध्यापक भरती करण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) २०१९ ते २०२१ या कालावधीत पाच वेळा सूचना दिल्या होत्या. आता नव्याने निर्देश देण्यात आले असून, प्राध्यापक भरती प्रक्रियेबाबतची माहिती ३१ जुलैपर्यंत पाठविण्याचे निर्देश दिले आहेत.

यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी परिपत्रक जारी केले आहे. विद्यापीठे, महाविद्यालये, उच्च शिक्षण संस्थांतील प्राध्यापकांच्या जागा रिक्त राहिल्याने त्याचा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवर दुष्परिणाम होतो. शिक्षण संस्थांमधील प्राध्यापक टंचाई हा चिंताजनक विषय असल्याचे नमूद करून 'यूजीसी'ने प्राध्यापक भरतीच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, अद्यापही भरती प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्यामुळे आता पुन्हा एकदा प्राध्यापक भरती करण्याचे स्मरण यूजीसीने करून दिले आहे. तसेच त्याबाबतची माहिती सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

राज्यातही विद्यापीठे, महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. राज्य शासनाने मान्यता दिलेल्या २०८८ पदांवर प्राध्यापक भरती प्रक्रिया राबविण्यात आली.

Pune Main
Page No. 5 Jul 22, 2024
Powered by: erelego.com

**सकाळ**

# प्राध्यापकांची पदे भरण्याच्या सूचना

**पुणे, ता. २१ :** राज्यातील विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांतील कायमस्वरूपी प्राध्यापकांची जवळपास ६० टक्के पदे रिक्त आहेत. समाजातील सर्व स्तरांवरून आवाज उठविल्यानंतरही प्राध्यापक भरती बद्दल सरकार अवाक्षरही काढताना दिसत नाही. अनेक ठिकाणी भरती प्रक्रिया रखडली असून, विद्यापीठ अनुदान आयोगानेही याची गंभीर दखल घेतली आहे. येत्या ३१ जुलैपर्यंत प्राध्यापकांच्या रिक्तपदासंदर्भातील स्थिती पोर्टलवर भरावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

यूजीसी सर्व विद्यापीठे व अभिमत विद्यापीठे व विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांना प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत निर्देश दिले आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने सर्व विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे व विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांमधील रिक्त पदे

ज्ञान-विज्ञान विमुक्तये
UGC
University Grants Commission

भरण्याबाबत वेळोवेळी निर्देश दिले आहेत. ४ जून २०१९, ३१ जुलै २०१९, ७ ऑगस्ट २०१९, ५ सप्टेंबर २०१९, २२ ऑक्टोबर २०१९, २६ नोव्हेंबर २०२१ या तारखांना पत्रक काढून प्राध्यापकांची पदे भरण्याबाबत सूचना दिल्या आहेत. युजीसीने आता सहाव्यांदा प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात सर्व विद्यापीठांच्या कुलपतींना व सर्व महाविद्यालयांच्या संस्थाचालकांना व प्राचार्यांना आदेश दिले आहेत, युजीसीचे सचिव मनीष जोशी यांनी या संदर्भातील पत्र प्रसिद्ध केले आहे.

**विद्यापीठातील पदभरती रखडली?**

**राज्यातील विविध महाविद्यालयांमध्ये रिक्त २ हजार ८८ पदांच्या भरतीची प्रक्रिया नुकतीच राबविण्यात आली. मात्र, हा आकडा तुटपुंजा आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सहायक प्राध्यापकांच्या २००हून अधिक रिक्त पदांपैकी फक्त १११ पदांची भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र, चार महिन्यांनंतरही ती रखडल्याचे दिसते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्राध्यापकांची रखडलेली भरती शैक्षणिक वर्तुळासाठी चिंतेची बाब आहे.**

Pune, Main
22/07/2024 Page No. 5

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

सकाळ

# खासगी विद्यापीठांवर राहणार करडी नजर

## राज्य सरकारकडून नव्याने समिती स्थापन

**पुणे, ता. २१ :** राज्यातील खासगी विद्यापीठांमध्ये जमा होणाऱ्या निधीचा तपशील, नियमाप्रमाणे कुलगुरूंची नियुक्ती केली का?, विद्यापीठ प्राधिकरणाच्या बैठका आणि वार्षिक अहवाल सरकारला सादर होतात का?, विद्यार्थ्यांचे प्रवेश गुणवत्तेच्या आधारे काटेकोरपणे होत आहेत का?, हे पाहण्यासाठी आता राज्य सरकारने पुन्हा एकदा नव्याने समिती स्थापन केली आहे. या समितीला अहवाल सादर करण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी दिला आहे. हा अहवाल सादर झाल्यानंतर राज्य सरकार काय कार्यवाही करणार, याकडे शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचे लक्ष लागले आहे.



महाराष्ट्र खासगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम २०२३ मधील कलम ५१ नुसार तरतुदी, नियम, परिनियम किंवा आदेशातील तरतुदींचे सर्व स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांकडून पालक केले जात असल्याची खात्री करण्यासाठी प्रशासकीय व शैक्षणिक कामकाजाचे निरीक्षण करण्यासाठी २७ फेब्रुवारी २०२४ रोजी राज्य सरकारने समिती स्थापन केली होती. या समितीचा कालावधी संपुष्टात आला आहे. तरी देखील संबंधित विद्यापीठांबाबत अहवाल सरकारला मिळाला नाही. म्हणूनच राज्यस्तरीय लेखा समितीचे माजी अध्यक्ष ॲड. सचिन पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली नव्याने समिती नेमली आहे. तंत्र शिक्षण संचालक विनोद मोहितकर हे सदस्य, तर प्रभारी उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर हे समन्वयक आणि सदस्य सचिव आहेत.

### शिफारशीही करणार

खासगी विद्यापीठांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये वाढ होण्यासाठी, तसेच विद्यापीठांच्या शैक्षणिक व प्रशासकीय बाबींविषयी समितीमार्फत शिफारशी केल्या जाणार आहेत. या अनुषंगाने विविध मुद्यांचा सर्वकष विचार करून दोन महिन्यांत अहवाल सादर करण्याचे आदेश उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिले आहेत.

### समिती काय तपासणार?

- खासगी विद्यापीठांमधील कुलगुरू यांची नियुक्ती नियमानुसार आहे का?
- शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियुक्त्या आणि वेतन नियमानुसार दिले जाते का?
- निश्चित आरक्षणानुसार विद्यार्थ्यांचे प्रवेश होतात का?
- राज्यातील विद्यार्थ्यांना ४० टक्के जागा राखीव आहेत का?
- लोकपालाची नियुक्ती केली आहे का?

Pune, Pune-Today
22/07/2024 Page No. 1

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# शंभर टक्के मिळालेल्यांचीही पदविकेला पसंती

## अभियांत्रिकी प्रवेशप्रक्रियेत ८१ ते ९० टक्के गुण मिळालेले विद्यार्थी सर्वाधिक

लोकसत्ता प्रतिनिधी



**पुणे :** राज्यातील तंत्रनिकेतनांतील पदविका अभ्यासक्रमाला दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांनीही पसंती दिली आहे. यंदाच्या प्रवेशप्रक्रियेत १०० टक्के गुण मिळवलेल्या १४ विद्यार्थ्यांचा समावेश आहे, तर ९१ ते ९९ टक्के गुण मिळवलेले १० हजार २९६ विद्यार्थी पदविका प्रवेशास इच्छुक आहेत.

तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनी ही माहिती दिली. दहावीनंतरच्या प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी तंत्रशिक्षण संचालनालयाने शनिवारी तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर केली. त्यामध्ये सुमारे सव्वा लाख विद्यार्थ्यांपैकी १४ विद्यार्थी १०० टक्के गुण मिळवलेले असून, ८१ ते ९० टक्के गुण मिळवलेले ३७ हजार ९३२, तर ७१ ते ८० टक्के गुण मिळवलेले ३६ हजार ५५३ विद्यार्थी आहेत. या प्रवेशासाठी यंदा १ लाख ५५ हजार ३०२ विद्यार्थ्यांनी नावनोंदणी केली. त्यांपैकी १ लाख २७ हजार ९७२ विद्यार्थ्यांचे अर्ज सुविधा केंद्रांद्वारे निश्चित करण्यात आले आहेत. गुणवत्ता यादीमध्ये एकूण ८४ हजार ४६३ मुलगे आणि ४३ हजार ५०९ मुली आहेत. संचालनालयाकडून अंतिम गुणवत्ता यादी २५ जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. पहिल्या केंद्रीभूत प्रवेश फेरीसाठीचे पसंतीक्रम २६ ते २९ जुलै या कालावधीत विद्यार्थ्यांना ऑनलाइन भरता येणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार झालेले पहिल्या फेरीचे जागावाटप संचालनालयाकडून ३१ जुलै रोजी प्रसिद्ध केले जाणार आहे. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत प्रवेशाच्या तीन फेऱ्या घेण्यात येणार आहेत.

गुणवत्ता यादीमध्ये १४ विद्यार्थी १०० टक्के गुण मिळवलेले, १० हजार २९६ विद्यार्थी ९१ ते ९९ टक्के गुण मिळवलेले, ३७ हजार ९३२ विद्यार्थी ८१ ते ९० टक्के गुण मिळवलेले, तर ३६ हजार ५५३ विद्यार्थी ७१ ते ८० टक्के गुण मिळवलेले आहेत. त्यामुळे पदविका अभ्यासक्रमात सर्वाधिक विद्यार्थी ८१ ते ९० टक्के गुण मिळवलेले असल्याचे दिसून येते.

> राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार कौशल्य अभ्यासक्रमांना महत्त्व आले आहे. रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता असे विविध अभ्यासक्रम उपलब्ध होत आहेत. विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढविण्यावर भर दिला जात आहे. उत्कृष्टता केंद्रांची निर्मिती केली जात आहे. याचा परिणाम म्हणून गुणवंत विद्यार्थी पदविका अभ्यासक्रमांकडे वळत आहेत.
>
> - डॉ. विनोद मोहितकर, तंत्रशिक्षण संचालक

23/07/2024 | Mumbai(Pune) | Page : 2
Source : https://epaper.loksatta.com

लोकमत

साहित्यमूल्य नसलेल्या कवितेची निवड झालीच कशी ? अनेकांचा सवाल

# 'जंगलातील मैफल'वर साहित्यविश्वात झाला 'शोर'; मराठीप्रेमींची जोरदार टीका

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** बालभारतीची पुस्तके ही तावून-सुलाखून तज्ज्ञ मंडळीची समिती नेमून निवडली जातात; परंतु पहिलीच्या पुस्तकामध्ये एका कवयित्रीच्या कवितेने सोमवारी दिवसभर चर्चाचर्वण झाले आणि त्या कवितेवर सोशल मीडियावर चांगलाच खल पाहायला मिळाला. कवितेमध्ये यमक जुळवण्यासाठी कोणतेही शब्द ओढून-ताणून बसविल्याची टीका साहित्य क्षेत्रातील तज्ज्ञांनी केली. त्या कवितेला अजिबात साहित्यमूल्य नसल्याचे बोलले गेले आणि बालभारतीमध्ये तिची निवड कशी केली, यावर शंका उपस्थित करण्यात आली.

### तिसरीत असताना लिहिलेली कविता !

ज्या कवितेमुळे सोमवारी दिवसभर हंगामा झाला, ती जंगलात ठरली मैफल ही कविता कवयित्रीने स्वत: तिसरीत असताना लिहिली होती. वेगवेगळ्या प्राण्यांची माहिती, वाद्यांची माहिती आणि कवीचं वय या निकषांवर ही कविता शैक्षणिक समितीने निवडली असल्याचे खुद्द कवयित्रीनेच सोशल मीडियावर यापूर्वी जाहीर केले आहे.

बालभारतीच्या पहिलीच्या पुस्तकामध्ये 'जंगलात ठरली मैफल' ही कविता आहे. त्या कवितेमध्ये यमक जुळवताना अनेक परभाषेतील शब्द वापरण्यात आले. त्यात इंग्रजी आणि हिंदी शब्द आहेत. काहींचे म्हणणे आहे, की इतर भाषेतील शब्द वापरले, तर काही हरकत नाही; पण कवितेमध्ये यमक जुळविण्यासाठी जे काही केले आहे, त्यामुळे कवितेचे साहित्यमूल्यच नष्ट झालेले आहे. कवितेमध्ये अक्कल हा शब्द वापरण्याची शक्कल कवयित्रीने केली आहे. त्याची कीव वाटत असल्याची प्रतिक्रिया एका वाचकाने व्यक्त केली आहे. कवितेमध्ये यमक जुळविण्याच्या प्रयत्नामध्ये चांगलाच 'शोर' झाल्याची 'कोटी' एकाने केली आहे.

फेसबुकवर 'मराठी शाळा आपण टिकवल्या पाहिजेत', या ग्रुपचे सदस्य संदीप जोशी यांनी ही कविता पोस्ट केली. ती व्हायरल झाली. साहित्यविश्वात आणि सोशल मीडियावर या कवितेवरून 'पाऊस' पडला.



> बालसाहित्य म्हणून ही कविता सुमार दर्जाची आहे. बालभारतीच्या पुस्तकात तिचा समावेश झाला, ही शोकांतिकाच आहे. कविता निवडताना त्यासाठी समिती असते. कवितेत केवळ यमक जुळविण्यासाठी प्रयत्न केला आहे. चांगल्या बालकवितांची वानवा नाहीय. पूर्वीच्या कवींनी अतिशय सुंदर कविता केल्या आहेत.
>
> - माधव राजगुरु, अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी बालकुमार संस्था (माजी संचालक, बालभारती)

> लहान मुलांना कविता ऐकताना ती एका तालात असली की, त्यांच्या लक्षात राहते. त्याचा विचार करून बालभारतीमध्ये कविता समाविष्ट केल्या जातात. या कवितेत आक्षेपार्ह असे काहीच नाही. इंग्रजी शब्द आहेत. ते आजच्या मुलांना दैनंदिन जीवनात वापरता येणारे आहेत. त्यावरील टीका अयोग्य आहे.
>
> - कृष्णकुमार पाटील, संचालक, बालभारती

Pune Main
Page No. 2 Jul 23, 2024
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

लोकमत

# आठवा वेतन आयोग, जुनी पेन्शन योजनेचा सरकारपुढे प्रस्ताव नाही

## वेतन आयोगासंदर्भात दोन निवेदने आली; पण सरकारला घाई नाही | अटल पेन्शन योजनेसारख्या अनेक योजना आहेत : अर्थ राज्यमंत्री चौधरी

हरीश गुप्ता
लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आठवा वेतन आयोग स्थापन करण्याचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नसल्याचे राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ) सरकारने स्पष्ट केले आहे. तसेच, जुनी पेन्शन योजनादेखील (ओपीएस) लागू केली जाणार नाही, असेही सरकारने म्हटले.

आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेसाठी दोन निवेदने प्राप्त झाल्याचे सरकारने म्हटले आहे. मात्र, सध्या हे शक्य नसल्याचे लोकसभेत आनंद भादुरिया यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी स्पष्ट केले आहे. दर दहा वर्षांनी केंद्रीय वेतन आयोग स्थापन केला जातो. सध्याच्या वेतन संरचना, भत्ते आणि केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांचे फायदे तपासले जातात आणि महागाईसारख्या घटकांवर आधारित आवश्यक बदल सुचविले जातात.

अनेक राजकीय पक्ष आणि काही राज्यांच्या मागणीनुसार जुनी पेन्शन योजना परत आणण्याचा विचार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. खासदार प्रणिती शिंदे यांनी यासंदर्भातील प्रश्न विचारला होता. त्यावर सरकारने सांगितले की, अटल पेन्शन योजनेसारख्या अनेक योजना आहेत, ज्या ९ मे २०१५ रोजी सुरू करण्यात आल्या होत्या.

ज्याचा उद्देश सर्व भारतीयांसाठी सार्वत्रिक सामाजिक सुरक्षा व्यवस्था निर्माण करणे आहे.



### मनमोहन सिंगांच्या काळात दिला होता सातवा आयोग

सातव्या वेतन आयोगाची स्थापना माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी २८ फेब्रुवारी २०१४ रोजी केली होती. त्याच्या शिफारशी १ जानेवारी २०१६ पासून लागू झाल्या.

### आठवा वेतन आयोग कधी आहे अपेक्षित?

- नेहमीच्या दहा वर्षांच्या अंतरानुसार, आठवा केंद्रीय वेतन आयोग १ जानेवारी २०२६ पासून सुरू होण्याचा प्रस्ताव आहे आणि ही प्रक्रिया सुरू व्हायला हवी; पण त्यासाठी सरकारला घाई नाही.
- **आठव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या स्थापनेसाठी दोन निवेदने प्राप्त झाली आहेत. सध्या असा कोणताही प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन नाही, असे चौधरी यांनी सांगितले.**
- केंद्र सरकारसह राज्यांचे कर्मचारीदेखील आठव्या वेतन आयोगाच्या प्रतीक्षेत आहेत.

Nagpur Main
Page No. 3 Jul 23, 2024
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# 'एबीसी आयडी'त 'एमआयटी एडीटी' विद्यापीठ अव्वल

**पुणे: पुढारी वृत्तसेवा**

पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) वतीने तयार करण्यात आलेल्या आधार क्रमांकाइतक्याच महत्त्वाच्या अ‍ॅकॅडेमिक बँक ऑफ क्रेडीट (एबीसी) क्रमांकांच्या नोंदणीत येथील एमआयटी आर्ट, डिजाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठाने राज्यातील खासगी विद्यापीठांच्या यादीत अव्वल क्रमांक पटकाविला आहे.

आंतरविद्याशाखीय शिक्षण आणि ऐच्छिक विषयांतील श्रेयांकांच्या हस्तांतरासाठी हा आयडी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असून त्यासाठीच युजीसीकडून विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर आपली नोंद करण्याचे आवाहन करण्यात आले होते. युजीसीच्या या आवाहनाला उत्तमरित्या प्रतिसाद देत एमआयटी एडीटी विद्यापीठाने तब्बल १५,५६६ हून अधिक खात्यांची नोंदणी तसेच त्यामध्ये २८,२०२ हून अधिक क्रेडिट्सचा अंतर्भाव करून राज्यातील खासगी विद्यापीठांच्या यादीत बाजी मारली. या यादीत एमआयटी विश्वशांती विद्यापीठ (खाती-१५,१७६, क्रेडिट- ५५६१) दुसऱ्या तर अमेठी विद्यापीठ (खाती-७१५८, क्रेडिट-११५९८) तिसऱ्या क्रमांकावर आहे.

आतापर्यंत देशभरातील एक हजार ५९७ संस्थांमधील दोन कोटींहून अधिक विद्यार्थ्यांनी एबीसी आयडी तयार केला आहे. यामध्ये महाराष्ट्रात देशात सर्वांधीक ४० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सर्वच विद्यापीठे, शैक्षणिक संस्था आणि महाविद्यालयांनी 'एबीसी' खात्यामध्ये विद्यार्थ्यांचे गुण भरण्यास सुरवात केली आहे. त्यात राज्यातील खाजगी विद्यापीठेही कुठेही मागे राहिलेली नाहीत. नुकत्याच झालेल्या आभासी बैठकीत यूजीसीने एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या कामगिरीची नोंद घेत कौतुक देखील केले आहे, अशी माहिती विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक डॉ. ज्ञानदेव नीलवर्ण यांनी दिली आहे.

या कामगिरीनंतर विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा कुलगुरू प्रा. डॉ. मंगेश कराड, कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड, प्र. कुलगुरू डॉ. अनंत चक्रदेव, डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. मोहित दुबे, कुलसचिव डॉ. महेश चोपडे, कुलगुरूंचे सल्लागार डॉ. शिवशरण माळी यांनी परीक्षा विभागाचे अभिनंदन केले आहे.

### एबीसी आयडी म्हणजे काय?

ज्याप्रमाणे आपण बँकेतील खात्यात जमा केलेली रक्कम आपण कोठेही आणि केव्हाही काढू शकतो. अगदी तसेच विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेले श्रेयांक (क्रेडिट) या आयडीच्या माध्यमातून अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटमध्ये जमा होतील. विद्यार्थ्याला जेव्हा पदवी प्राप्त करायची असेल, तेव्हा शैक्षणिक संस्था या श्रेयांकाचा वापर करू शकते. विद्यार्थी संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन आयडी ओपन करू शकतात.

My Pune Edition Edition
Jul 23, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com

## News Paper Clippings During July 2024

## Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# अकरावीसाठी १३ हजार विद्यार्थ्यांना तिसऱ्या यादीत प्रवेश जाहीर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील तिसऱ्या फेरीत १३ हजार २७३ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. त्यातील ५ हजार ४३ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले असून, २४ जुलैपर्यंत विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे. परंतु, तिसऱ्या फेरीत प्रवेशासाठीच्या कटऑफमध्ये काही प्रमाणात वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे. केंद्रीय अकरावी प्रवेश प्रक्रिया समितीच्या सदस्य सचिव डॉ. ज्योती परिहार यांनी ही माहिती दिली.**

यंदा ३४० कनिष्ठ महाविद्यालयांतील १ लाख १९ हजार ७०५ जागांवर प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. तिसऱ्या फेरीत केंद्रीभूत प्रवेशांसाठी ६५ हजार ३७ जागा उपलब्ध होत्या. या फेरीच्या गुणवत्ता यादीमध्ये कला शाखेसाठी १ हजार २७६, वाणिज्य शाखेसाठी ४ हजार ९९४, विज्ञान शाखेसाठी ६ हजार ९२८, व्यावसायिक शिक्षण शाखेसाठी १७५ विद्यार्थ्यांना प्रवेश

### २४ जुलैपर्यंत घेता येणार प्रवेश



जाहीर झाला. आत्तापर्यंत केंद्रीभूत प्रवेशांद्वारे २९ हजार ९८३, कोट्यातून ६ हजार ५०८ अशा एकूण ३६ हजार ४९१ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे, तर एकूण ८३ हजार २१४ जागा रिक्त आहेत.

प्रवेश प्रक्रियेत आत्तापर्यंत एक शून्य आणि दोन फेऱ्या पूर्ण झाल्या आहेत. परंतु, तिसऱ्या फेरीतील प्रवेशासाठी पात्रता गुणांमध्ये वाढ झाल्याचे चित्र आहे. उदाहरणार्थ दुसऱ्या फेरीत डॉ. श्यामराव कलमाडी महाविद्यालयात कला शाखेसाठी ४४८, वाणिज्य शाखेसाठी ४५३, विज्ञान शाखेसाठी ४६८ गुण आवश्यक होते. तिसऱ्या फेरीत कला शाखेसाठी ४५७, वाणिज्य शाखेसाठी ४५६, विज्ञान शाखेसाठी ४८४ गुण आवश्यक असल्याचे दिसून आले. बीएमसीसीमध्ये दुसऱ्या फेरीत असलेले ४७८ पात्रता गुण तिसऱ्या फेरीत ४८२ गुणांवर पोहचले. शिवाजीनगरच्या मॉडर्न महाविद्यालयात दुसऱ्या फेरीत कला शाखेसाठी ३३७, वाणिज्य शाखेसाठी ४३७, विज्ञान शाखेसाठी ४४७ गुण आवश्यक होते. तर, तिसऱ्या फेरीतील पात्रता गुण कला शाखेसाठी ४००, वाणिज्य शाखेसाठी ४३६, विज्ञान शाखेसाठी ४५० गुणांवर पोहोचले. सिम्बायोसिस महाविद्यालयात तिसऱ्या फेरीत कला आणि वाणिज्य शाखेसाठी ४६९ पात्रता गुण आहेत, तर दुसऱ्या फेरीत कला शाखेसाठी ४६५, वाणिज्य शाखेसाठी ४६६ गुण आवश्यक होते.

क्रीडा कोट्यातून महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्यांच्याकडे जिल्हा क्रीडाधिकारी किंवा विभागीय क्रीडा उपसंचालक यांचे प्रमाणित प्रमाणपत्र असल्याची खात्री करून प्रवेश द्यावा. स्वातंत्र्यसैनिकांच्या पाल्यांना आरक्षणाचा लाभ देताना जिल्हाधिकारी, जिल्हा सैनिक मंडळाचे प्रमाणपत्र असल्याची खात्री करावी, अशा सूचना डॉ. परिहार यांनी महाविद्यालयांना केल्या आहेत.

Pune Edition Edition
Jul 23, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता

# शिक्षणाची उंच उडी

उच्चशिक्षणासाठी १० लाखांपर्यंत कर्ज, कौशल्यविकास प्रशिक्षणासाठी १.४८ लाख कोटींची तरतूद आदी अनेक योजना जाहीर करून शिक्षण क्षेत्रात उंचच उंच भरारीचा इरादा केंद्र सरकारने जाहीर केला आहे.

## उच्च शिक्षणासाठी १० लाखांपर्यंत कर्ज

**पीटीआय, नवी दिल्ली**

**केंद्रीय अर्थमंत्री** निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पामध्ये शिक्षणाची सांगड रोजगाराशी घालण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शिक्षणासाठी एकूण तरतूद १ लाख २५ हजार ६३८ कोटी रुपये इतकी आहे. शिक्षण आणि रोजगारासह कौशल्य विकासासाठी एकूण १.४८ लाख कोटींची तरतूद केल्याचे अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात सांगितले. त्याच वेळी प्राथमिक शिक्षण, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण तसेच उच्च शिक्षण यासाठी स्वतंत्रपणे किती तरतूद असेल हे स्पष्ट झालेले नाही.

विविध शैक्षणिक संस्थांच्या निधीमध्ये कपात किंवा वाढ दिसून येत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) अनुदानामध्ये तब्बल ६० टक्क्यांनी कपात केली आहे. मागील वर्षी त्यासाठी ६,४०९ कोटींची तरतूद होती ती २,५०० कोटींपर्यंत कमी केली आहे.

**देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी कर्ज**

जे तरुण सरकारी योजना आणि धोरणांचा लाभ घेण्यास पात्र नाहीत त्यांना मदत म्हणून देशांतर्गत शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षणासाठी १० लाख रुपयांपर्यंत कर्जासाठी आर्थिक साहाय्य केले जाईल. त्यासाठी दरवर्षी थेट एक लाख विद्यार्थ्यांना ई-व्हाउचर दिले जातील, तसेच व्याजदरात तीन टक्क्यांची सवलत दिली जाईल.

हब आणि स्पोक प्रणालीमध्ये एक हजार 'आयटीआय'चे अद्ययावतीकरण करण्याचा प्रस्ताव आहे. उद्योगांच्या गरजा डोळ्यांसमोर ठेवून दृष्टीने नवीन अभ्यासक्रम आखले जातील.



"शिक्षण क्षेत्रासाठी केलेल्या सर्वंकष आणि ठोस उपाययोजनांचा विद्यार्थी, शिक्षण संस्था आणि उद्योग या सर्व संबंधितांना फायदा होईल. यामुळे आपल्या युवकांच्या आकांक्षा पूर्ण होतील, लोकांना उदरनिर्वाहाच्या अधिक संधी उपलब्ध होतील, अधिक दर्जेदार शिक्षण व कौशल्ये मिळतील आणि पुढील पाच वर्षांमध्ये ४.१ कोटींपेक्षा जास्त नोकऱ्या तयार होतील. - **धर्मेंद्र प्रधान**, शिक्षणमंत्री

- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानामध्ये ६० टक्क्यांची कपात.
- 'आयआयटी' व 'आयआयएम'च्या निधीमध्ये कपात, केंद्रीय विद्यापीठांच्या निधीत वाढ.
- उच्च शिक्षणासाठी १.२० लाख कोटींची तरतूद, मागील वर्षाच्या तुलनेत ९,००० कोटींची कपात.
- शैक्षणिक संस्थांमध्ये संशोधन आणि नवकल्पनांसाठी तरतुदीमध्ये १६१ कोटींची वाढ.
- १,००० 'आयटीआय'चे अद्ययावतीकरण
- शालेय शिक्षणासाठीच्या तरतुदीमध्ये ५३५ कोटींची वाढ.
- जागतिक दर्जाच्या संस्थांसाठी १,३०० कोटींवरून १,८०० कोटींपर्यंत वाढ.
- केंद्रीय विद्यालये, नवोदय विद्यालये, 'एनसीईआरटी', प्रधानमंत्री श्री शाळा आणि राज्य सरकारे व केंद्रशासित प्रदेशांच्या मदत अनुदानामध्ये वाढ.



24/07/2024 | Pune | Page : 10
Source : https://epaper.loksatta.com

---

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

"भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. गरीब, महिला, तरुण आणि शेतकरी यांच्या विकासाला सरकारचे सर्वोच्च प्राधान्य आहे. रोजगार, कौशल्यविकास, लघु व मध्यम उद्योग आणि मध्यमवर्गीय ही अर्थसंकल्पाची मुख्य संकल्पना आहे. शिक्षणासाठी १ लाख २५ हजार ६३८ कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी माफक व्याजावर दहा लाखांचे कर्ज, युवकांना पहिल्या नोकरीत अर्थसाह्य, शिक्षण, कौशल्यविकास व रोजगारवाढीसह अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत करण्याचे उद्दिष्ट निश्चित करणारा हा संतुलित अर्थसंकल्प आहे. पाच वर्षांत २० लाख युवकांना कौशल्यविकास प्रशिक्षण, एक हजार औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांचे अद्ययावतीकरण, उद्योग क्षेत्राच्या गरजेनुसार अभ्यासक्रमाची रचना यामुळे उद्योग, व्यवसाय आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळेल.

- **राजेश पांडे**, सल्लागार समिती सदस्य, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र

24/07/2024 | Pune | Page : 20
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

सकाळ

# बालभारतीच्या कवितेवरून 'शोर' कायम

## हिंदी-इंग्रजी शब्द, दर्जावरून टीकेची झोड

■ सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. २३ : बालभारतीच्या इयत्ता पहिली मराठीच्या पाठ्यपुस्तकातील कवितेवरून होणारा 'शोर' मंगळवारीही कायम राहिला. 'जंगलात ठरली मैफल' अशा शीर्षकाच्या या कवितेत वापरलेल्या हिंदी-इंग्रजी शब्दांवरून आणि कवितेच्या दर्जावरून अनेकांनी टीकेची झोड उठवली आहे.**




### दीपक केसरकर यांचे मात्र समर्थन

■ राज्याचे शालेय शिक्षण व मराठी भाषामंत्री दीपक केसरकर यांनी मात्र या कवितेचे समर्थन केले आहे. "'वन्स मोअर' या शब्दाला पर्यायी मराठी शब्द आहे का? यमक जुळवण्यासाठी इंग्रजी शब्द वापरला तर त्याचा बाऊ करण्याचे कारण नाही. आपण 'टेबल' हा इंग्रजी शब्द वापरतोच", अशी प्रतिक्रिया केसरकर यांनी व्यक्त केली.

कवयित्री आणि बालसाहित्यकार डॉ. संगीता बर्वे म्हणाल्या, "लहान मुलांच्या कविता आशयघन असायला हव्यात. त्यांना त्यातून गंमत वाटायला हवी. यमक जुळल्याने मुलांना गंमत वाटते, पण म्हणून त्यालाही दर्जा असावा. पाठ्यपुस्तकांसाठी याच नव्हे तर कोणत्याही कवितेची निवड काळजीपूर्वक करायला हवी. राज्यातील सर्व बालसाहित्यकारांचे साहित्य त्यासाठी समोर ठेवून निवड करावी."

### कवितेच्या गुणवत्तेवर चर्चा अपेक्षित : भारत सासणे

■ ज्येष्ठ साहित्यिक व बालसाहित्यकार भारत सासणे म्हणाले, "मुळात ही प्राथमिक पातळीवरची सामान्य अशी कविता आहे. त्यामुळे पहिल्या इयत्तेच्या किंवा दुसऱ्या इयत्तेच्या मुलांसाठी ती योग्य आहे का, याचा वेगळा विचार करायला हवा.

■ त्यामध्ये असलेल्या इंग्रजी किंवा हिंदी शब्दांमुळे या कवितेचा दर्जा खालावत नाही; तर एकूणच कविता सामान्य असल्यामुळे तिच्या गुणवत्तेवर चर्चा होणे अपेक्षित आहे."

### समाजमाध्यमांवर टीकेचा महापूर

■ समाजमाध्यमांवर तर या कवितेवरील टीकेचा महापूर पाहायला मिळाला. 'इयत्ता पहिलीमध्येच असताना मुलांना भाषेची शिसारी यावी किंवा त्यांच्या भाषेचे वाटोळे व्हावे म्हणून पाठ्यपुस्तक नियामक मंडळ उत्साहाने काम करत असते. कवितेला यमक, मीटर आणि आशय यांचा अजिबात त्रास होऊ नये, याची काळजी कवयित्रीने घेतलेली आहे', अशी उपहासात्मक टीका मिलिंद शिंत्रे यांनी केली. तर रोहन नामजोशी यांनी 'काय सुंदर कविता आहे ही, कवितेतल्या मोराने वन्स मोअरसुद्धा दिला आहे. या कवितेला मान्यता देणाऱ्यांची कीव येते', अशा शब्दांत प्रतिक्रिया व्यक्त केली. अनेकांनी मीम्सचा आधार घेत टीका केली.

Pune, Main
24/07/2024 Page No. 5

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

लोकमत

# शिक्षण खात्यामध्ये होतोय मनमानी कारभार?

### यूजीसीच्या नियमांची पायमल्ली, 'पुक्टो'चा आरोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्याच्या उच्चशिक्षण विभागातील अधिकारी हे भारतीय संविधान आणि विद्यापीठ अनुदान आयोग २०१८ नियमावलीसह उच्च तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली करीत आहेत, असा आरोप पुणे विद्यापीठ व महाविद्यालयीन अध्यापक संघटने (स्पुक्टो)च्या पदाधिकाऱ्यांनी केला. तसेच प्राध्यापक भरतीसह इतर मागण्यांसाठी येत्या १६ ऑगस्ट रोजी राज्यातील अकृषी विद्यापीठांवर मोर्चाचे आयोजन केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पुणे श्रमिक पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत पुक्टोचे जिल्हा सरचिटणीस प्रा. डॉ. प्रवीण ताटे देशमुख, अध्यक्ष प्रा. डॉ. रमेश गायकवाड, उपाध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजी भोसले, प्रा. डॉ. व्ही. एम. शिंदे उपस्थित होते. राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांत प्राध्यापकांच्या ६० टक्के जागा रिक्त आहेत. एनईपीनुसार विद्यार्थ्यांचे परीक्षण करणे गरजेचे आहे. त्यामुळे राज्य सरकारने सीएचबी धोरण रद्द करावे. सहायक प्राध्यापकांसारखे वेतन द्यावे. सध्या शिक्षण क्षेत्रातील अनुदानित धोरण मोडीत काढून मोठ्या प्रमाणात खासगीकरण होत आहे. आगामी काळात गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे कठीण होणार आहे, असे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

Pune Main
Page No. 7 Jul 24, 2024
Powered by: erelego.com

लोकमत

# कुलसचिव पद निवड; वातावरण तापले

### कर्मचारी संघटनांनी घेतली कुलगुरूंची भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिवपदी निवड करण्यासाठी पात्र उमेदवारांच्या मुलाखती पार पडून दोन आठवड्यांचा कालावधी झाला. मात्र, अद्याप कुलगुरूंनी कुलसचिवपदी निवड केलेल्या व्यक्तीचे नाव जाहीर केले नाही. कुलसचिव निवडीवरून विद्यापीठात वातावरण तापले असून, कुलगुरूंवर राजकीय दबाव असल्याची चर्चाही शैक्षणिक वर्तुळातून सुरू आहे.

विद्यापीठाचे कुलसचिव पदावर मागील सुमारे आठ ते दहा महिन्यांपासून पूर्णवेळ कुलसचिवांची नियुक्ती केलेली नाही. कुलसचिव पदासाठी निवडप्रक्रिया सुरू असून, पात्र उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या आहेत. मात्र, कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी हे सुमारे आठ दिवस ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर गेले असल्याने नियुक्तीच्या प्रक्रियेला 'ब्रेक' लागला होता. कुलगुरू शुक्रवारी दि. १९ रोजी परतल्यानंतर पुढील काही दिवसांत निवडीचा निर्णय घेतील अशी अपेक्षा होती. मात्र, मंगळवार, दि. २३ जुलै रोजी उशिरापर्यंत नियुक्ती झालेली नव्हती.

**युवासेनेकडून उपोषण**

विद्यार्थ्यांचे वसतिगृह प्रवेश तसेच सुरक्षेचे प्रश्न ऐरणीवर आहेत. त्यामुळे कुलसचिवपदी योग्य व्यक्तीची तातडीने निवड करावी यासाठी युवासेना (ठाकरे गट) शहरप्रमुख राम थरकुडे यांनी मुख्य इमारतीसमोर ठिय्या देत उपोषण केले. दरम्यान, पुढील एक दिवसात कुलसचिव नियुक्ती प्रक्रिया पूर्ण करू असे पत्र दिल्यानंतर आंदोलन स्थगित केले.

### कुलगुरुंचे मौन

कुलसचिव निवड समितीने पात्र उमेदवारची निवड केली असून, संबंधित उमेदवाराला नियुक्तीचे पत्रही देण्यात आले असल्याची चर्चा दिवसभर विद्यापीठात सुरु होती. याबाबत कुलगुरुंशी संपर्क साधला असता त्यांनी मौन बाळगले.

### पुणे विद्यापीठ कर्मचारी संघाने घेतली भेट

विद्यापीठ कर्मचारी संघ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे पदाधिकारी सुनील धिवार, संतोष मदने यांच्यासह सुमारे पन्नास ते साठ सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष तसेच अधिसभा सदस्य डॉ. हर्ष गायकवाड यांनीही विद्यापीठाचे कुलगुरुंना भेटून निष्कलंक आणि चारित्र्यवान कुलसचिव निवडावा अशी विनंती केली.

### महिलांचा अनादर करणाऱ्या व्यक्तीसाठी अट्टाहास का?

स्त्री शिक्षण आणि महिला सबलीकरणासाठी काम करणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिवपदी स्त्रियांचा अनादर केल्याप्रकरणी आरोप असलेल्या व्यक्तीची निवड केली जाणार असल्याचे बोलले जात आहे. वादग्रस्त व्यक्तीची निवड करण्याचा अट्टाहास प्रशासनातील काही व्यक्तींकडून होत आहे. या व्यक्तीची निवड झाल्यास समाजातून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होतील, त्यास सर्वस्वी विद्यापीठ जबाबदार असेल, असे पत्र युवासेने सहसचिव कल्पेश यादव यांनी कुलगुरुंना दिले.

Hello Pune
Page No. 4 Jul 24, 2024
Powered by: erelego.com

*News Paper Clippings During July 2024*

*Section: Education*

लोकमत

# शिक्षणासाठी १.४८ लाख कोटींची तरतूद

## कौशल्य विकासाला प्राधान्य; एक कोटी युवकांना इंटर्नशिपसाठी साह्य

**केंद्रीय अर्थसंकल्पात शिक्षण, रोजगारासाठी १.४८ लाख कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सरकारने नऊ प्राधान्यक्रम निश्चित केले आहेत. शेतीला पहिले आणि कौशल्यविकासाला दुसरे प्राधान्य दिले आहे.**

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थसंकल्पात शिक्षण, रोजगार आणि कौशल्य यांसाठी १.४८ लाख कोटींची तरतूद करण्यात आली आहे. स्थानिक शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी दहा लाख रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी अर्थसाह्य केले जाणार आहे.

कौशल्यविकासासाठी केंद्र सरकार राज्य सरकारांबरोबर नव्याने एक योजना राबविणार आहे. या अंतर्गत पाच वर्षांत वीस लाख युवकांना कौशल्य प्रशिक्षित करण्यात येणार आहे. एकूण एक हजार आयटीआय अद्ययावत करण्यात येणार आहेत. एक कोटी युवकांना इंटर्नशिपची घोषणा करण्यात आली आहे. एकदा सहा हजार रुपयांचे साह्य आणि दर महिन्याला पाच हजार रुपये युवकांना याद्वारे मिळणार आहेत. दरम्यान, विद्यापीठ अनुदान आयोगासाठीच्या तरतुदीत आश्चर्यकारकरीत्या ६०.९९ टक्के घट करून अडीच हजार कोटींची तरतूद करण्यात आली. ही तरतूद ६,४०९ कोटी रुपये इतकी होती.याच वेळी केंद्रीय विद्यापीठांसाठी चार हजार कोटींची वाढ करण्यात आली होती.

### शिक्षणासाठी तरतूद वाढविली

**३२,००० कोटी**




**शिक्षणासाठी १.४८ लाख कोटींची तरतूद आहे. ती १.१६ लाख कोटींची होती.**

एक्स्पर्ट ॲनालिसीस

## प्राधान्यक्रमांत शिक्षण क्षेत्राचा विसर

**केंद्र** सरकारने जे ९ प्राधान्यक्रम ठरविले आहेत. त्यामध्ये शिक्षण क्षेत्राचा समावेश नाही, ही निराशाजनक आणि चिंतेची बाब आहे. पायाभूत शिक्षण आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंमलबजावणी, हायर एज्युकेशन कमिशन, नॅशनल रिसर्च फाउंडेशन यासाठी भरीव तरतूद अपेक्षित होती. केंद्राच्या प्राधान्यक्रमांमध्ये सर्वसमावेशक मनुष्यबळ विकास आणि सामाजिक न्याय याला तिसरे स्थान असून, त्यात शिक्षणासाठीही तरतूद असावी, अशी अपेक्षा आहे. पाचशे टॉप कंपन्यांमध्ये एक कोटी युवकांना इंटर्नशिपची संधी देणे, एक हजार ट्रेनिंग इन्स्टिट्यूट अद्ययावत करणे आणि वीस लाख युवकांना कौशल्यशिक्षण देणे चांगले उपक्रम आहेत. शैक्षणिक कर्जाच्या व्याजदरात ३ टक्के सूट देणे चांगली बाब आहे. मात्र, शिक्षण ही सरकारची जबाबदारी आहे. मूळात शिक्षण घेण्यासाठी कर्ज घेण्याची वेळ येऊ नये. अनुदानित, सरकारी विद्यापीठे आणि शासकीय महाविद्यालयांच्या सक्षमीकरणासाठी अर्थसंकल्पात तरतूद केल्याचे दिसत नाही.

**डॉ. भूषण पटवर्धन**
माजी उपाध्यक्ष, यूजीसी

Pune Main
Page No. 10 Jul 24, 2024
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

# Study In India & Get ₹10 Lakh Cheap Higher Education Loan

## 1 Crore Paid Internships Over 5 Years

TEAM TOI

The Union Budget, presented by FM Nirmala Sitharaman, revealed a mixed bag of allocations for the education sector, with some areas receiving substantial increases while others faced cuts. The minister announced a significant increase for PM Poshan scheme and govt support for loans up to Rs 10 lakh for higher education in domestic institutions.

Govt announced plans to upgrade 1,000 Industrial Training Institutes (ITIs), aligning course content with industry skill requirements. Furthermore, the Budget aims to provide internships to one crore youth, with interns receiving a stipend of Rs 5,000 and a one-time assistance of Rs 6,000. The costs for this initiative will be covered by companies through their corporate social responsibility (CSR) funds.

The PM Poshan scheme received a significant boost of over Rs 800 crore, with its allocation rising from Rs 11,600 crore in 2023-24 to Rs 12,467.4 crore in 2024-25. This increase aims to enhance nutritional support for school children.



A CREDIT-ABLE PATH TO EMPLOYMENT

Centre's total allocation for education, employment, and skill development stood at Rs 1.5 lakh crore. This comprehensive Budget includes financial assistance for student loans, digital learning, and skill development initiatives. Govt will provide loans up to Rs 10 lakh for higher education in domestic institutions, with e-vouchers offering a 3% interest subvention to 1 lakh students annually.

"The 3% interest subsidy will reduce the overall cost of the loan for students, making higher education more affordable and decreasing the long-term financial burden on them. While this initiative encourages students to study in domestic institutions, it will potentially improve the quality and reputation of local universities and colleges as well," said Prof Manojranjan Nayak, founder president of Siksha 'O' Anusandhan, Odisha.

Grants for central universities saw a significant increase of over Rs 4,000 crore, bringing the allocation to Rs 15,928 crore for 2024-25. Additionally, the FM announced the establishment of a new medical college in Bihar, enhancing the region's healthcare education infrastructure. Digital learning and artificial intelligence (AI) also received significant attention. The budget for Centres of Excellence (CoE) in AI was increased from Rs 35 crore to Rs 255 crore, underscoring govt's commitment to advancing technology-driven education.

Student aid for higher education saw an enhancement of Rs 493 crore, up from Rs 1,320 crore to Rs 1,813.2 crore. Additionally, funding for research, innovation and apprenticeships was prioritised, with an increase of Rs 162 crore for research (from Rs 193.4 crore to Rs 355 crore) and a boost in National Apprenticeship Training Scheme from Rs 460 crore to Rs 600 crore. On the flip side, the budget for education saw a reduction of Rs 9,090.4 crore from the revised estimate of 2023-24, bringing the allocation down to Rs 1,20,627.8 crore for 2024-25. This 6.8% increase from the previous year's Budget estimate still reflects a reduction when considering the revised figures.

Welcoming Budget 2024-25 as pivotal milestone on India's path to becoming a developed nation by 2047, Union education minister Dharmendra Pradhan said the document is a testament of govt's relentless focus and concrete measures for the well-being and empowerment of 'garib, mahila, yuva and annadata'.

## UGC funds slashed, new panel on cards

Big cuts in the budget to allocations of statutory and regulatory bodies – from Rs 6,809 crore to Rs 2,900 crore — indicated that the Higher Education Commission of India as envisaged in NEP 2020 might see light of day.

The funding for University Grants Commission (UGC) was notably slashed by almost 61%, dropping from Rs 6,409 crore to Rs 2,500 crore, which is likely to impact various higher education initiatives and projects under its purview.

On the other hand, grants for central universities saw a significant increase of over Rs 4,000 crore, bringing the allocation to Rs 15,928 crore for 2024-25, while student aid for higher education went up by Rs 493 crore and allocation for research-innovation was increased by Rs 162 crore.

"State universities take care of 90% of enrolment and they need more funds and infrastructure. I urge the government to give more funds to UGC," said Vinay Pathak, president, of Association of India Universities. TNN

The Times of India 24.7.2024

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# ३२ नवीन महाविद्यालयांची भर

## उच्च व तंत्र शिक्षण विभागाची मान्यता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** कला, विज्ञान, वाणिज्य आणि विधि यांसारख्या पारंपरिक अभ्यासक्रमांव्यतिरिक्त कौशल्याधारित अभ्यासक्रमांवर मुंबई विद्यापीठाचा भर आहे. मात्र असे असताना मुंबई विद्यापीठाअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून पारंपरिक अभ्यासक्रमांसाठीची ३२ नवीन महाविद्यालये सुरू करण्यास राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने मान्यता दिली आहे.

एकीकडे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये संलग्नता प्रक्रिया संपविण्यावर भर आहे, मात्र दुसरीकडे मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या एकूण ९०४ महाविद्यालये मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असून संलग्नित महाविद्यालयांची संख्या उत्तरोत्तर वाढत असल्यामुळे विद्यापीठासमोर प्रशासकीय नियोजनाचे आव्हान असणार आहे.

### 'मुंबई विद्यापीठाच्या बृहत आराखड्याशी विसंगत'

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना संलग्नता प्रक्रिया ही २०३० पर्यंत संपविण्याची तरतूद आहे. असे असताना नवीन महाविद्यालयांना मान्यता देणे चुकीचे असून विद्यापीठाच्या बृहत आराखड्याशी विसंगत आहे, असे मत मुंबई विद्यापीठ शिक्षक संघटनेचे (बुक्टु) सरचिटणीस प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी व्यक्त केले.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्यानुसार राज्यातील २३१ संस्थांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन महाविद्यालये सुरू करण्यासाठी अंतिम मान्यता देण्याचा निर्णय राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतला असून याबाबतचा शासन निर्णयही नुकताच जारी करण्यात आला आहे. मुंबईतील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाला (एसएनडीटी) सर्वाधिक ८२ महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून २३१ संस्थांना कला, विज्ञान, वाणिज्य या पारंपरिक शाखांसह विधि (तीन व पाच वर्षीय अभ्यासक्रम), लेखा आणि वित्त, माहिती तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान आदी विविध व्यावसायिक अभ्यासक्रम नवीन महाविद्यालयात सुरू करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे.

नवीन ३२ महाविद्यालयांपैकी १२ महाविद्यालये ही विधि महाविद्यालये आहेत. ६ मुंबई शहर, ठाण्यात १३, पालघरमध्ये ७, रायगड जिल्ह्यात ४ आणि रत्नागिरी जिल्ह्यात २ नवीन महाविद्यालयांचा समावेश आहे.

25/07/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

सकाळ

# पुरवणी परीक्षा न दिलेल्यांना पुन्हा संधी

## राज्यातील अतिवृष्टीमुळे राज्य शिक्षण मंडळाचा निर्णय

**पुणे, ता. २५ : राज्यात अनेक ठिकाणी झालेल्या मुसळधार पावसामुळे गुरुवारी दहावी-बारावीच्या पुरवणी परीक्षा केंद्रापर्यंत पोचू न शकलेल्या, परीक्षा देऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्या-त्या विषयाची पुन्हा परीक्षा घेण्यात येईल. याबाबत लवकरच सविस्तर माहिती देण्यात येईल, असे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने स्पष्ट केले आहे.**

राज्यात दहावी आणि बारावीची पुरवणी परीक्षा १६ जुलैपासून सुरू झाली आहे. दहावीच्या परीक्षेसाठी २८ हजार ९७६ विद्यार्थ्यांनी, तर बारावीच्या परीक्षेसाठी ५६ हजार ८४५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. राज्य मंडळाच्या नियोजित वेळापत्रकाप्रमाणे दहावीचा 'विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग एक' या विषयाचा पेपर गुरुवारी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत होता. तर, फक्त पात्र दिव्यांग परीक्षार्थींसाठी 'शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र' विषयाचा पेपरही या दिवशी होता. बारावीचा 'गणित आणि संख्याशास्त्र' विषयाचा पेपर सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत होता. राज्यात अनेक भागांत नियोजित वेळापत्रकाप्रमाणे दहावी-बारावी परीक्षेच्या संबंधित विषयांचा पेपर झाला. परंतु, मुसळधार पावसामुळे परीक्षा देऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा संबंधित विषयाची परीक्षा देण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे राज्य सरकारनेही जाहीर केले आहे.

" दहावी आणि बारावीची पुरवणी परीक्षा सुरू आहे. याबाबत शालेय शिक्षण आयुक्तांशी बोलून निर्णय घेण्यात येईल. विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, याची पुरेपूर काळजी घेतली जाईल. हवामान खात्याच्या अंदाजावरून शाळांच्या सुट्टीबाबत योग्य निर्णय जाहीर केला जाईल. ज्या विद्यार्थ्यांना पुरवणी परीक्षेला जाता आले नाही, त्यांची राज्य मंडळाकडून स्वतंत्र परीक्षा घेतली जाईल. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ दिले जाणार नाही.

\- **अजित पवार**, उपमुख्यमंत्री

" दहावी-बारावीच्या पुरवणी परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी नियोजित वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा झाली. परंतु, मुसळधार पावसामुळे पेपर देऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा संबंधित पेपर देण्याची संधी मिळणार आहे.

\- **शरद गोसावी,**
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

Pune, Main
26/07/2024 Page No. 2

## *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

# कौशल्य शिक्षणावर उड्या

## अकरावीऐवजी आयटीआय, पॉलिटेक्निक प्रवेशाकडे विद्यार्थ्यांचा ओढा

मटा विशेष

हर्ष दुधे

Harsh.Dudhe@timesofindia.com

**पुणे** : कमी पैशात शिक्षण, त्यातही शिष्यवृत्ती, उच्च शिक्षणाची हमी आणि आता विद्यावेतन (स्टायपेंड) मिळणार असल्याने विद्यार्थ्यांचा कल अकरावीला प्रवेश घेण्यापेक्षा 'आयटीआय डिप्लोमा' आणि 'डिप्लोमा इन इंजिनीअरिंग'ला (पॉलिटेक्निक) प्रवेश घेण्याकडे आहे. यंदा अकरावी प्रवेशासाठी उपलब्ध जागांपेक्षा खूपच कमी अर्ज आले असून, पहिल्या तीन फेऱ्यांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या घटली आहे. त्याचवेळी पॉलिटेक्निक आणि आयटीआय प्रवेशासाठी क्षमतेपेक्षा अधिक अर्ज आले आहेत. ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून कौशल्यावर आधारित याच अभ्यासक्रमांना पसंती मिळत असल्याचे चित्र दिसून येते आहे.

दहावीनंतर विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याचे वेध लागतात. त्यातही अकरावी आणि बारावी करून, इंजिनीअरिंग, बीए, बीकॉम, बीएस्सी, बी-फार्म, बी-टेक (ॲग्री) अशा अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी उत्सुक असायचे. हा ट्रेंड चार वर्षांपूर्वीपर्यंत कायम होता. मात्र, चार वर्षांपासून या ट्रेंडमध्ये बदल होत असल्याचे चित्र आहे. त्याचा परिणाम थेट अकरावी प्रवेशांवर झाला आहे. अकरावीला प्रवेश घेणारे विद्यार्थी हळूहळू पॉलिटेक्निक आणि आयटीआयला प्रवेश घेण्याला पसंती देत आहेत. कौशल्य शिक्षणाला आलेले महत्त्व, प्रतिष्ठा; तसेच रोजगाराची संधींबरोबरच पॉलिटेक्निक किंवा आयटीआय करूनही इंजिनीअरिंग करता येते, याचाही विचार विद्यार्थी आणि पालक करतात. ही परिस्थिती केवळ मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, अमरावती यांच्याबरोबरच लहान शहरांमध्येही त्याचे प्रतिबिंब उमटत आहे.

### अकरावीच्या ३३ टक्के जागांवरच प्रवेश

अकरावी प्रवेशासाठी मुंबईसह (महानगर क्षेत्र) पुणे-पिंपरी चिंचवड, नाशिक, नागपूर, अमरावती अशा महापालिका क्षेत्रांमधील १७२२ ज्युनिअर कॉलेजांमध्ये प्रवेशासाठी सहा लाख १८ हजार ६६० जागा उपलब्ध होत्या. तिसऱ्या प्रवेश फेरीच्या अखेर दोन लाख २० हजार १२५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहे. त्यामुळे उपलब्ध जागेच्या सुमारे ३३ टक्के जागांवर प्रवेश झाले आहेत. अशीच परिस्थिती राज्यातील इतर शहर आणि तालुक्यांमध्ये आहे. त्याच वेळी पॉलिटेक्निक आणि आयटीआय प्रवेशासाठी प्रवेशक्षमतेच्या अधिक अर्ज आले आहेत. त्यामुळे चांगल्या सरकारी आणि खासगी पॉलिटेक्निकमध्ये प्रवेश घेण्यासाठी चुरस पाहायला मिळेल.

### पॉलिटेक्निकला १०० टक्क्यांचे १४ विद्यार्थी

राज्यात सरकारी आणि खासगी पॉलिटेक्निक प्रवेशासाठी सुमारे एक लाख पाच हजार जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी एक लाख २७ हजार ९७२ जणांनी शुल्क भरून अर्जाची प्रक्रिया पूर्ण केली असून, त्यात १०० टक्के गुणांचे १४ विद्यार्थी आहेत. प्रवेश प्रक्रियेत प्रवेशासाठी गुणवत्ता यादी ३१ जुलैला जाहीर होईल, असे तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनी सांगितले.

**१,०५,०००**
राज्यातील पॉलिटेक्निकच्या जागा

**१,२७,९७२**
पॉलिटेक्निकच्या प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण केलेले विद्यार्थी

**१,३६,९२६**
आयटीआय प्रवेशासाठी उपलब्ध जागा

**१,५०,००० +**
आयटीआय प्रवेशासाठी दाखल अर्जांची संख्या

**६७,४४८**
पहिल्या फेरीत प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या

**३० हजार ९५४**
'आयटीआय'साठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी




### आयटीआय, पॉलिटेक्निकला पसंती का?

- सरकारी 'आयटीआय'मध्ये शिक्षण मोफत, तर खासगीत कमी शुल्क. दर महिन्याला ५०० रुपये स्टायपेंड. इंटर्नशिपमधून नोकरीची संधी.
- सरकारी पॉलिटेक्निकमध्ये नाममात्र शुल्क. खासगी पॉलिटेक्निकमध्येही तुलनेने कमी शुल्क. शिष्यवृत्तीची सुविधा.
- दोन्ही अभ्यासक्रम यशस्वी पूर्ण केल्यानंतर, रोजगाराची हमी. नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीची संधी.
- 'आयटीआय'साठी खासगी क्लासची गरजच नाही. पॉलिटेक्निकसाठी असलेल्या क्लासचे शुल्क कमी.
- '१०+२'चा दर्जा मिळाल्याने आयटीआय केल्यानंतर, पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश; तसेच पॉलिटेक्निकला थेट द्वितीय वर्ष प्रवेश
- पॉलिटेक्निक केल्यानंतर, इंजिनीअरिंगच्या थेट द्वितीय वर्षात प्रवेश.

"दोन वर्षांचा आयटीआय केल्यानंतर, खासगी क्षेत्रासोबतच रेल्वे विभागासारख्या सरकारी विभागात नोकरीच्या संधी आहेत. त्याचप्रमाणे शिक्षणासाठी शुल्क कमी आहे. पुढे शिकायचे झाल्यास, पॉलिटेक्निकला प्रवेश मिळतो. त्यामुळे हा सर्व विचार करून, अकरावीऐवजी प्रवेशासाठी आयटीआयची निवड केली.

\- पवन बावस्कर, विद्यार्थी

"पुणे विभागात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी ११० पॉलिटेक्निकमध्ये प्रवेशासाठी ३४ हजार ७२७ जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी ४१ हजार ११४ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत अर्जांमध्ये वाढ झाल्यामुळे, पॉलिटेक्निकला प्रवेश घेण्याकडे कल वाढत असल्याचे चित्र आहे.

\- दत्तात्रय जाधव, सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय

"आयटीआय प्रवेशासाठी अद्याप तीन फेऱ्या शिल्लक असून आणखी बऱ्याच विद्यार्थ्यांना त्यासाठी प्रवेश घेण्याची संधी आहे.

\- दिगंबर दळवी, संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय

"पॉलिटेक्निकला प्रवेश घ्यायचा आहे, ही मुलीची इच्छा आहे. अकरावी-बारावी प्रवेश घेतल्यानंतर, क्लासेससाठी भरमसाठ खर्च येतो. त्यानंतर प्रवेश परीक्षा द्यावी लागते. त्यापेक्षा पॉलिटेक्निकचा पर्याय चांगला आहे. इंजिनीअरिंगच्या थेट द्वितीय वर्षात प्रवेश मिळेल.

\- नीलेश कांबळे, पालक

Maharashtra Times 26.7.2024

## *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

प्रभात
City_27 July 2024_005
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
27 Jul 2024
www.dainikprabhat.com

# कुलसचिव नियुक्तीचा तिढा सुटणार का?

## विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची आज होणार बैठक

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २६** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव पदाच्या नियुक्तीवरून विद्यापीठाच्या कुलगुरूंवर चहुबाजूंनी दबाव वाढला आहे. वरिष्ठ पातळीवरून कुलसचिव पदासाठी एका प्राध्यापकाचे नाव निश्चित झाले आहे. मात्र, त्या व्यक्तीबाबत कुलगुरूंकडे तक्रारीचा ओघ वाढत असल्याने नियुक्ती जाहीर करण्यास विलंब होत आहे. त्यातच उद्या (दि.२७) विद्यापीठाची व्यवस्थापन परिषदेची बैठक आहे. या बैठकीत नियुक्तीचा तिढा सुटणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



विद्यापीठाचे प्रशासन प्रमुख म्हणून कुलसचिव हे पद महत्त्वाचे आहे. त्यासाठी मुलाखती झाल्या. त्यातून एका व्यक्तीची निवड करण्याचा अधिकार कुलगुरूंचा आहे. मात्र, ज्या व्यक्तीची नियुक्ती जाहीर होणार होती, त्यांचे नाव गोपनीय ठेवले जाते. असे असताना जाणूनबुजून त्यांचे नाव बाहेर आणले का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या निवडीवरून राजकारण होत असल्याची चर्चाही विद्यापीठ वर्तुळात रंगली आहे.

तथापि, कुलसचिव पदाची निवड पारदर्शीपणे अपेक्षित आहे. मात्र, कुलसचिव म्हणून एका व्यक्तीची निवड करण्याचा निर्णय वरिष्ठ पातळीवर घेण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी करताना कुलगुरूपुढे मोठे संकट उभे राहिले आहे. ज्यांची निवड जाहीर होणार होती, त्यांच्याबाबत विद्यार्थी संघटना, कर्मचारी संघटना आणि काही अधिसभा सदस्यांचा विरोध वाढत आहे. त्यामुळे ही निवड कशी जाहीर करायची, असा प्रश्न विद्यापीठापुढे आहे.

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# मराठा आरक्षणानुसारच सेट परीक्षेचा निकाल

## निकाल लवकरच होणार जाहीर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र व गोवा राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयात सहायक प्राध्यापकपदाच्या पात्रतेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सेट विभागातर्फे घेतल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय पात्रता परीक्षेसाठी 'सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास संवर्गाकरिता अधिनियम २०२४'मधील तरतुदीनुसार एसईबीसी आरक्षण लागू करण्यात आले आहे. त्यामुळे सेट परी-क्षेचा निकाल आता मराठा आरक्षणानुसार लवकरच जाहीर केला जाणार असल्याची माहिती विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी दिली आहे.

विद्यापीठाच्या सेट विभागातर्फे ७ एप्रिल २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सेट परीक्षेसाठी मराठा आरक्षण लागू करावे, अशी मागणी काही विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे केली होती. त्यावर विद्यापीठाने राज्य शासनाकडे अभिप्राय मागविला होता. गेल्या काही महिन्यांपासून राज्य शासनाकडून त्यावर उत्तर प्राप्त होत नव्हते, अखेर राज्य शासनाने यावर निर्णय दिला आहे. त्यामुळे सेट परीक्षेचा निकाल जाहीर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सेट परीक्षेच्या निकालासाठी मराठा आरक्षण लागू करण्यात आले असले, तरी मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका व भविष्यातील इतर निर्णयांच्या अधीन राहून एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी आरक्षण निश्चित करून निकाल जाहीर केला जाणार आहे. सेट परीक्षेच्या निकालासाठी एसईबीसी आरक्षण लागू करण्याची वेळ आली, तर विद्यापीठाकडे त्याबाबतचा उपलब्ध डेटा असावा, या दृष्टिकोनातून विद्यापीठाने एसईबीसी आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविले होते. १९ जुलै ते २५ जुलै या कालावधीपर्यंत अर्ज भरण्यास मुदत देण्यात आली होती. परंतु, महाराष्ट्रातील विविध ठिकाणी अतिवृष्टीमुळे व काही विद्यार्थ्यांना मुदतीत अर्ज भरणे शक्य न झाल्यामुळे विद्यापीठाच्या सेट विभागाने २७ व २८ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत यासंदर्भातील अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ दिली आहे.

Pune Edition Edition
Jul 27, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

सकाळ

# सेट परीक्षेला एसईबीसी आरक्षण लागू

## ऑगस्टच्या प्रारंभी निकाल; विद्यार्थ्यांसह पालकांना दिलासा

**पुणे, ता. २६ : सहाय्यक प्राध्यापक पदाच्या राज्यस्तरीय पात्रता परीक्षेचा अर्थात सेटचा निकाल तीन महिन्यांपासून रखडला होता. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास संवर्गाचे (एसईबीसी) आरक्षण लागू करण्याच्या मागणीमुळे विलंब झाल्याचे स्पष्टीकरण राज्य सरकारने दिले होते. अखेर आरक्षण लागू झाले असून, निकाल ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होईल.**

महाराष्ट्र व गोवा या राज्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे ही परीक्षा घेतली जाते. त्यासाठी एसईबीसी संवर्गाकरिता अधिनियम २०२४ मधील तरतुदीनुसार आरक्षण लागू करण्यात आले. सात एप्रिल रोजी झालेल्या या परीक्षेसाठी मराठा आरक्षण लागू करावे, अशी मागणी काही विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे केली होती. त्यावर विद्यापीठाने राज्य शासनाकडे अभिप्राय मागविला होता. गेल्या काही महिन्यांपासून राज्य शासनाकडून उत्तर प्राप्त होत नव्हते. अखेर शासनाने यावर निर्णय दिला. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांना दिलासा मिळाला आहे.

### विद्यापीठाची पूर्वतयारी

राज्य सरकारचे स्पष्टीकरण येण्याआधीच सेट विभागाने एसईबीसी आरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक तयारी केली होती. या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले होते. १९ ते २५ जुलै या कालावधीपर्यंत अर्ज भरण्यास मुदत देण्यात आली होती. परंतु अतिवृष्टी व इतर कारणांमुळे काही विद्यार्थ्यांना मुदतीत अर्ज भरणे शक्य झाले नाही. त्यामुळे २७ व २८ जुलै रोजी सायंकाळी सहा वाजेपर्यंत अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

> सेटच्या निकालासाठी एसईबीसी आरक्षण लागू करण्यासंदर्भात स्पष्टीकरण आले आहे. उमेदवारांकडून एसईबीसी संवर्गाचा अर्ज भरून घेण्यासाठी मुदत देण्यात आली होती. ती मुदत आणखी दोन दिवस वाढविली आहे. उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ऑगस्टच्या पहिल्याच आठवड्यात निकाल जाहीर केला जाईल.
> **- डॉ. विजय खरे,** कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune, Main
27/07/2024 Page No. 2

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# तुमचे यश समाजोपयोगी बनवा : पांडे

## आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठीचा पदवी प्रदान सोहळा उत्साहात

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**यश ही वैयक्तिक कामगिरी नाही. तुमचा यशाचा समाजाला उपयोग व्हायला हवा. जर तो होत असेल, तरच तुम्ही यशस्वी झालात, असे समजा, असे मत केंद्रीय राखीव पोलिस दलातील आयडी मॅनेजमेंटचे पोलिस उपमहानिरीक्षक कृष्णकांत पांडे यांनी व्यक्त केले.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय केंद्राच्या वतीने आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात पुण्याचे अतिरिक्त पोलिस आयुक्त डॉ. अमोल राजगुरू, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव आणि आंतरराष्ट्रीय केंद्राचे संचालक डॉ. विजय खरे, अधिसभा सदस्य रवींद्र शिंगणापूरकर उपस्थित होते.

पांडे म्हणाले, शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान मिळविणे नाही, तर कौशल्य आत्मसात करणे हे होय. वेगाने बदलणाऱ्या जगात टिकायचे असेल, तर ज्ञान आणि कौशल्याची सांगड घालता आली पाहिजे. मात्र, हे सर्व करत असताना आपल्या मूल्यांशी तडजोड करू नये.

डॉ. गोसावी म्हणाले, आत्तापर्यंत तुम्ही सर्व या विद्यापीठाचे विद्यार्थी होता. मात्र, यापुढे तुम्ही सर्व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे ॲम्बेसिडर आहात. या विद्यापीठातून, पुणे शहरातून मिळालेला अनुभव, शिकवण तुमच्या मायदेशी जाऊन तिथे सामायिक करून विद्यापीठाचे नावलौकिक करा, असे आवाहन डॉ. गोसावी यांनी केले. तसेच, सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. परदेशात शैक्षणिक प्रवास सुरू करताना प्रत्येक आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्याला कल्चरल शॉक बसतो. मात्र, या सर्वातून मार्ग काढून विद्यार्थ्यांनी इथली संस्कृती आत्मसात करत त्यांचा हा प्रवास अविस्मरणीय बनवला असल्याचे प्रा. (डॉ.) विजय खरे या वेळी म्हणाले. याप्रसंगी काही विद्यार्थ्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले.



### विविध देशांतील ४८ जणांना पदवी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दरवर्षी विविध देशांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने ज्ञानार्जनासाठी येतात. २०२२-२०२४ या शैक्षणिक वर्षात पदवी, पदव्युत्तर पदवी मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव तसेच पदवी प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. या कार्यक्रमात विविध देशांतील ४८ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी वितरित करण्यात आली. यात अफगाणिस्तान, मॅडागास्कर, मॉरिशस, थायलंड, तुर्कमेनिस्तान, बांगलादेश, साऊथ सुदान आणि नेपाळ या देशांतील विद्यार्थ्यांचा समावेश होता.

Pune Edition Edition
Jul 27, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

# विद्यापीठ देणार 'ब्लॉकचेन'चे धडे

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'बीएस्सी ब्लॉकचेन टेक्नोलॉजी'च्या पदवी अभ्यासक्रमाला सुरुवात झाली असून, 'बीएस्सी ब्लॉकचेन टेक्नोलॉजी' हा पदवी अभ्यासक्रम सुरू करणारे पुणे विद्यापीठ देशातील पहिले राज्यस्तरीय विद्यापीठ आहे. या अभ्यासक्रमाला विद्यार्थी आणि पालकांचा उत्स्फूर्त मिळाला असून, प्रवेश मर्यादा पूर्ण झाली आहे.

डिजिटल व्यवहाराच्या सुरक्षित माहितीसाठ्याचे तंत्रज्ञान म्हणजे ब्लॉकचेन टेक्नॉलॉजी. या अभ्यासक्रमाची सुरुवात म्हणून विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागात 'ब्लॉकचेन' क्षेत्रातील तज्ज्ञांचे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. 'सध्याचे युग हे डेटा युग आहे. 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञान आत्मसात करून विद्यार्थ्यांनी स्वतःच्या विकासासोबतच समाज आणि देशासाठी डेटा सुरक्षा पोहोचवण्यात योगदान द्यावे, असे आवाहन डॉ. अभ्यंकर यांनी केले.

या कार्यक्रमात 'झो' या 'ब्लॉकचेन' प्लॅटफॉर्मचे प्रतिनिधी फारूक चिस्ती यांनी विद्यार्थांना वेब ३ प्लॅटफॉर्मची; तसेच डिजिटल करन्सीची ओळख करून दिली. 'ब्लॉकचेन' क्षेत्रात असणाऱ्या रोजगाराच्या संधींची ओळख करून देऊन आणि त्या संधीपर्यंत पोहोचण्यासाठीच्या नेटवर्किंमध्ये विद्यार्थ्यांना जोडण्यात आले. जगभरातील डेटा सुरक्षेच्या दृष्टीने 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञान महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. फक्त देशातच नाही, तर जगभरात खासगी आणि सरकारी अशा सर्वच क्षेत्रात 'ब्लॉकचेन डेव्हलपर' आणि 'ब्लॉकचेन आर्किटेक्चर्स'ची मागण वाढत आहे. ही गरज ओळखूनच 'बीएस्सी ब्लॉकचेन टेक्नॉलॉजी'च्य पदवी अभ्यासक्रमाला सावित्रीबा फुले पुणे विद्यापीठाने मान्यत देण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतल होता, असे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी सांगितले.

> “ विद्यार्थ्यांसाठी नावीन्यपूर्ण, रोजगाराभिमुख अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्याचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा सातत्याने प्रयत्न असतो. 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञान डेटा सुरक्षेमध्ये महत्त्वपूर्ण असल्याने तंत्रज्ञानाची गरज दिवसेंदिवस वाढत जाणार आहे.
>
> – डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू

> भविष्यातील संधी ओळखून या अभ्यासक्रमाला मिळालेला प्रतिसाद उल्लेखनीय आहे. विद्यापीठ अशा इंडस्ट्री ओरिएंटेड कोर्सेसचा समावेश करण्यावर भर देत आहे.
>
> – डॉ. पराग काळकर, प्र-कुलगुरू

> 'इंडस्ट्री ४.०'मध्ये समावेश असलेल्या तंत्रज्ञानाची क्षमता ओळखून विद्यार्थ्यांनी स्वतःला अपग्रेड करीत रहावे.
>
> – डॉ. विजय खरे, प्रभारी कुलसचिव

Maharashtra Times 28.7.2024

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

# विद्यापीठ देणार आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

## नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम शिकण्याची संधी

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून आपत्ती व्यवस्थापनाचे शिक्षण आणि प्रशिक्षण देणारा शैक्षणिक विभाग सुरू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. या विभागाच्या माध्यमातून आपत्ती व्यवस्थापनाशी निगडित अभ्यासक्रम सुरू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम शिकण्याची संधी मिळणार आहे.

हवामान बदलामुळे नैसर्गिक संकटांची संख्या वाढत आहे. त्याचवेळी शहरांचा विकासही झपाट्याने होत आहे. मात्र, हा विकास शास्त्रशुद्ध पद्धतीने होत नसल्याने, शहरात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचणे, नद्या-ओढ्यांना पूर येणे अशा समस्या वाढत आहे. अशा परिस्थितीत काम करणाऱ्या; तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी मनुष्यबळाची कमतरता आहे. त्यातच पुणे आणि परिसरात गेल्या काही वर्षांत पावसामुळे पूर आल्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे.

राज्यातही अवेळी येणाऱ्या वादळांची संख्या वाढत आहे. उन्हाळा आला की, दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण होते. या परिस्थितीत मदतीचे आणि आपत्ती व्यवस्थापनाचे काम करणाऱ्या कुशल मनुष्यबळाची कमतरता आहे. ही अडचण दूर करण्यासाठी पुणे विद्यापीठाने आपत्ती व्यवस्थापनाचा शैक्षणिक विभाग सुरू करण्याच्या दृष्टीने पावले उचचली आहेत. याबाबत युवासेनेचे राज्य सहसचिव कल्पेश यादव यांनी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांना निवेदन देऊन आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक्रम सुरू करण्याची मागणी केली होती. या वेळी यादव यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेकडेही विद्यापीठ प्रशासनाचे लक्ष वेधले. त्यानंतर डॉ. गोसावी यांनी आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि त्यामार्फत अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले.

**“ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आपत्ती व्यवस्थापनाचे शिक्षण आणि प्रशिक्षण देण्यासाठी शैक्षणिक विभाग सुरू करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्यात येतील. यातून आपत्ती व्यवस्थापनाच्या वेळी लागणारे कुशल मनुष्यबळ निर्माण होईल. ही संपूर्ण प्रक्रिया शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्याचा विद्यापीठाचा आहे.**

– डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



**“ शहरात पावसाचे पाणी शिरल्याने पूरस्थिती निर्माण होणे, मोठ्या आगीच्या दुर्घटना, दुष्काळजन्य परिस्थिती, पर्यटनाच्या ठिकाणी अडकलेल्या पर्यटकांना बाहेर काढणे अशा अनेक घटनांमध्ये नागरिकांना मदतीची आवश्यकता असते. महाराष्ट्रात आपत्ती व्यवस्थापनाचा अभ्यासक्रम चालवणाऱ्या शैक्षणिक संस्थांची संख्या अत्यल्प आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी पुढाकार घ्यावा.**

– कल्पेश यादव, सहसचिव, युवासेना

Maharashtra Times 28.7.2024

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

लोकमत

# महावाचनाचा महाखेळ आणि वाचन चळवळीचा खेळखंडोबा

**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**
ज्येष्ठ साहित्यिक

**दोन** वर्षांपासून दरवर्षीच्या तीन दिवसांसाठी १० कोटी खर्चाची महाविश्व मराठी संमेलने घेऊन झाल्यावर यात नवी भर सरकारच्या महावाचन महोत्सवाच्या शासन निर्णयाने घातली गेली आहे. दीड महिना हा महाउत्सव साजरा करायचा आहे. त्यासाठी दीड महिन्यात ८ कोटी ७० लाख खर्च व्हायचे आहेत. महा हा उत्सव असू शकतो, वाचन महा कसे असू शकते, ते तर अगोदर सरकारने आम्हाला समजावून सांगावे, अशी चुकीची मराठी वाचायला लावण्यापासून या उत्सवाची सुरुवात होते आहे.



महाअभिनेते अमिताभ बच्चन त्यांचे ब्रॅण्ड ॲम्बेसेडर नेमले गेले आहेत. १५० वर्षांच्या महाराष्ट्रातील समृद्ध आणि सातत्याने चाललेल्या वाचन चळवळीशी नाते तोडून सरकार वाचन चळवळीसाठी नवा घरठाव करायला निघाले आहे. १५० वर्षांत महाराष्ट्राला वाचन संस्कार करता आला नाही, असे सरकारचे मत झालेले दिसते. या क्षेत्रातील वाचन चळवळीसाठी सतत राबलेल्या संस्था, बारा हजार सार्वजनिक ग्रंथालये, ग्रंथालीची वाचन चळवळ, हजारो ग्रंथप्रदर्शने, विभागीय आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने, बाल साहित्य संमेलने, बालकुमार साहित्य संमेलने, नंतर वर्षांहून अधिक चालणारी मुलांचे मासिक, आनंद, शासनाचेच किशोर अशी मासिके, शासनाचीच जिल्हा आणि विभागीय ग्रंथालये, शालेय ग्रंथालये, अनेक प्रकाशक, वर्तमानपत्रे, त्यांच्या पुरवण्या, नियतकालिके, लेखक हे जे निरंतर वाचन संस्कार करणारे घटक आहेत, त्यांना जणू १५० वर्षांत महाराष्ट्राला वाचन संस्कारित करता आलेले नाही, असा समज यामागे आहे का?

रीड इंडिया नामक कार्पोरेट संस्था आणि महाअभिनेता यांच्याकडून ८ कोटी ७० लाख रुपये खर्च करून केवळ दीड महिन्यात इन्स्टंट वाचन संस्कार करून घेण्याचा महाखेळ करून दाखविला जाणार आहे. प्रत्येक गोष्ट ही 'उत्सव' म्हणूनच, करमणूक प्रधानच शासनाला का कराविशी वाटते, हा प्रश्न सध्या निर्माण होतो आहे. वाचन संस्कृती हे काही उत्सवी, व्यासपीठीय, करमणूक प्रधान कार्य नाही. तो एक संस्कार आहे व ती करणारी ही चळवळ आहे, याचे भान बाळगले जाणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा संस्कारासाठी लोकप्रिय अभिनेत्यांची नव्हे, तर असंख्य सेवाभावी संस्था, कार्यकर्ते यांची गरज आहे.

महाराष्ट्रातील वाचन संस्कृती ही वर उल्लेख केलेल्या विविध घटकांनी गेल्या १५० वर्षांत रुजवत समृद्ध करत आणली आहे, यात शासनाच्या संबंधित खात्यांचा वाटाही मोठा राहिला आहे. असे असताना त्यांचा यासाठी सहभाग नाकारून, मान्यवर लेखक, लेखन विश्वाचा सहभाग, उपयोग करून घेण्याचे नाकारून सिनेक्षेत्रातील लोकप्रिय अभिनेत्यांना ब्रॅण्ड ॲम्बेसेडर करण्याची मुळात गरजच काय?

वाचन चळवळीसाठी अगोदर गाव तिथे ग्रंथालय, शालेय ग्रंथालये समृद्ध करणे, तिथे अगोदर ग्रंथपाल नेमणे, ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या व्यथा आणि वेदना समजून घेणे आवश्यक आहे. मुक्तद्वार अभ्यासिका वाढवायला हव्यात. विद्यार्थ्यांना तिथे बसून अभ्यास/वाचन करण्याची सोय आवश्यक आहे. आज पुस्तकांच्या किमती भरमसाठ आहेत. सामान्य माणसाला मुलांना पुस्तके विकत घेऊन देता येतील, परवडतील अशा स्वस्त दरात उत्तम पुस्तके उपलब्ध करून देण्यावर खर्च करण्याची गरज आहे. त्या दृष्टीने दीर्घकालीन उपाययोजना करणे आवश्यक आहे. पुस्तकांचे गाव ही योजना मुळात ग्रंथालय संचालनालयाला राबवायला देण्याची योजना होती. ते काम राज्य मराठी विकास संस्थेकडे सोपवले गेले. मग ही योजनाही राज्य मराठी विकास संस्थेच्यामार्फत, खरे तर ग्रंथालय संचालनालयामार्फतच राबविले जाणे आवश्यक आहे. साहित्य संमेलनाला दरवर्षी अनुदान याच अटी, नियमानुसार ते दिले जाते, मग याबाबत ते लागू का नाही? ती तरतूद निर्णयातच असायला हवी. या निधीच्या खर्चाचे अंकेक्षण कोण करणार ते शासन निर्णयात नमूद नाही. तेही नमूद असणे आवश्यक आहे. हे सरकारला आम्ही म्हटले आहे, पण पत्रांना उत्तरही न देणे, संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ, अनुभवी, कार्यकर्ते, संस्था जणू अस्तित्वातच नाहीत, अशा पद्धतीने त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे सतत दिसत आहे. करदात्यांच्या पैशाची अशी प्रदर्शनखोर उधळण थांबावी, म्हणून नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करत करदात्यांच्या एका संस्थेच्या निर्मितीची तयारी चालविली आहे, याचे तरी भान महाराष्ट्र सरकारने आता तरी राखावे, अशी अपेक्षा आहे.

Pune Main
Page No. 9 Jul 28, 2024
Powered by: erelego.com

# अण्णा भाऊंचे अनमोल साहित्य लवकरच भेटीला

## आणखी तीन खंड प्रकाशनाच्या वाटेवर

**संजीव भागवत : सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. २८ : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावरील तब्बल ३० कादंबऱ्यांच्या खंडाचे सहा भाग आणि कथासंग्रहाच्या चौथ्या खंडाचे दोन असे एकूण आठ भाग गतवर्षी प्रकाशित झाले होते. त्यानंतर आता आणखी तीन खंड प्रकाशनाच्या वाटेवर आहे. त्यासाठीची बहुतांश तयारी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने समितीकडून करण्यात आली असून लवकरच ते वाचकांना उपलब्ध होणार आहेत.

समितीकडून नव्याने प्रकाशित केल्या जाणाऱ्या साहित्य प्रकारांपैकी लोकशाही अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यांपैकी कथासंग्रह खंड ५, भाग ३, नाटक, लोकनाट्ये खंड ६ आणि समग्र शाहीरी वाङ्मय खंड ७ या तीन खंडांचा समावेश आहे. यात पहिल्यांदाच अण्णा भाऊ साठे यांच्या शासकीय स्तरावर अप्रकाशित साहित्यांपैकी काही कथांचा समावेश आहे. त्यात सोन्याचा मणी, बुद्धाची शपथ, गुल आदी कथांचा समावेश असल्याचे समितीकडून सांगण्यात आले.

समितीने यापूर्वी प्रकाशित केलेल्या सहा खंडाना मोठा प्रतिसाद मिळाला. याच धर्तीवर ऑगस्ट महिन्यात कथा, लोकनाट्ये, नाटक आणि शाहीरी वाङ्मयाचे तीन खंड प्रकाशित केले जाणार आहेत.
- डॉ. संजय शिंदे, सदस्य सचिव, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती



### कोणत्या खंडात काय?

- कथासंग्रह खंड ५ आणि भाग ३ मध्ये एकूण ३८ कथांचा समावेश आहे. यात 'आधुनिक आश्वत्थामा', 'चालतं मढं', 'माहेरची वाट', 'मरी आईचा गाडा', 'सावळा मांग', 'काडीमोड', 'येडा नाऱ्या', 'तीन भाकरी', 'रामाची सीता' या कथेसह 'भूतावरील भूताचा मळा', 'भूताचा बाण', 'भुताची सोबत', 'भूताचा वाडा', 'भोळं भूत' या कथांचा समावेश आहे.
- नाटक, लोकनाट्ये खंड ६ मध्ये 'अकलेची गोष्ट', 'पेंग्याचे लगीन', 'देशभक्त घोटाळे', 'खापऱ्या चोर', 'पुढारी मिळाला', 'बिलंदर बुडवे', 'निवडणुकीत घोटाळा' आदी १३ वगनाट्य तर 'इनामदार' नाटक आहे.
- समग्र शाहीरी वाङ्मय खंड ७ मध्ये एकूण १० पोवाडे, १३ शाहीरी वाङ्मय आणि ८ प्रवास वर्णनांचा समावेश आहे. पोवाड्यांमध्ये 'नानकिंग नगरापुढे स्टालिनग्राडचा पोवाडा', 'बर्लिनचा पोवाडा', 'बंगालची हाक', 'पंजाब दिल्लीचा दंगा', 'तेलंगणचा संग्राम' आदी पोवाड्यांचा समावेश आहे.

Sakal 29.7.2024

## *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

लोकमत

# पुणे विद्यापीठ विद्यार्थ्यांना देणार आपत्ती व्यवस्थापनाचे धडे !

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आपत्ती व्यवस्थापनाचे शिक्षण आणि प्रशिक्षण देणारा शैक्षणिक विभाग स्थापन करण्यास विद्यापीठ प्रशासन सकारात्मक आहे. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम शिकण्याची संधी मिळणार आहे.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आपत्ती व्यवस्थापनाचे शिक्षण आणि प्रशिक्षण देण्यासाठी शैक्षणिक विभाग सुरू करण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्यातून आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ निर्माण होईल.

**- डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

शहराचा विकास वेगाने होत असताना दुसरीकडे हवामान बदलामुळे नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागत आहे. मात्र, हा विकास शास्त्रशुद्ध पद्धतीने नसल्याने, शहरात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात रस्त्यावर सखल भागात पाणी साचणे, नद्या-ओढ्यांना पूर येणे आदी समस्या वाढत आहेत. अशा परिस्थितीत काम करणारे तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी मनुष्यबळाची कमतरता आहे. त्यातच पुणे आणि परिसरात गेल्या काही वर्षांत पावसामुळे पूर आल्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे.

राज्यात अवेळी येणारी वादळे, उन्हाळ्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होते. या परिस्थितीत मदतीचे आणि आपत्ती व्यवस्थापनाचे काम करणाऱ्या कुशल मनुष्यबळाची कमतरता आहे. या संदर्भात युवासेनेचे राज्य सहसचिव कल्पेश यादव यांनी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांना निवेदन दिले. त्यामध्ये अतिवृष्टीमुळे शहरात घरांत पावसाचे पाणी शिरल्याने नागरिकांना मदत करणे, पूरस्थिती निर्माण होणे, मोठ्या आगीच्या दुर्घटना, दुष्काळजन्य परिस्थिती, पर्यटनाच्या ठिकाणी अडकलेल्या पर्यटकांना बाहेर काढणे अशा अनेक घटनांमध्ये नागरिकांना मदतीची आवश्यकता असते. तसेच महाराष्ट्रात आपत्ती व्यवस्थापनाचा अभ्यासक्रम चालवणाऱ्या शैक्षणिक संस्थांची संख्या अत्यल्प असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी पुढाकार घ्यावा. आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक्रम सुरू करण्याची मागणी केली होती, तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेकडेही विद्यापीठ प्रशासनाचे लक्ष वेधले.

Pune Main
Page No. 2 Jul 29, 2024
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# कुलसचिवपदासाठी विद्यापीठाचा बालहट्ट!

## वादग्रस्त व्यक्तीलाच पदावर बसविण्यासाठी तक्रारकर्त्यांची बोलावली बैठक

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिवपदी वादग्रस्त व्यक्तीची नेमणूक करण्याचे जवळपास निश्चित झाले आहे. त्यामुळे नियुक्तीवरून निर्माण झालेल्या वादावर तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी विद्यापीठातर्फे समिती स्थापन करण्यात आली आहे. संबंधित व्यक्तीविरोधात ज्या तक्रारकर्त्यांनी विद्यापीठ प्रशासनाकडे तक्रार केली आहे, अशा तक्रारकर्त्यांना आज मंगळवारी (दि. ३०) दुपारी पावणेबारा वाजता आपले म्हणणे सादर करण्याची संधी देण्यात आली. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत वादग्रस्त व्यक्तीची नेमणूक करायची, असा बालहट्टच विद्यापीठ प्रशासनाचा असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

विद्यापीठाच्या कुलसचिवपदाच्या मुलाखती १० आणि ११ जुलैला घेण्यात आल्या. आता जुलै महिना संपणार आहे. तरीदेखील विद्यापीठाच्या कुलसचिवपदावर कोणाचीही नियुक्ती झालेली दिसून येत नाही. मुलाखतीच्या दिवसापासूनच विविध व्यक्ती, संस्था व संघटनांनी कुलसचिवपदासाठी नियुक्त केल्या जाणाऱ्या संभाव्य उमेदवाराबाबत लेखी तक्रार देण्यास सुरुवात केली. या तक्रारीमध्ये काही गंभीर स्वरूपाचे आरोप करण्यात आले. त्यावर विद्यापीठाने विधी विभागाचा सल्ला घेतला. विधी विभागाच्या सल्ल्यानुसार आता एका समितीच्या माध्यमातून या सर्व तक्रारींची शहानिशा करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या माजी अधिसभा सदस्य यांच्यासह राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संघटनांचे प्रतिनिधी यांनी विद्यापीठाकडे संभाव्य कुलसचिवपदाच्या उमेदवाराबाबत आक्षेप घेत लेखी निवेदने दिली होती. या सर्व निवेदनांवर समितीच्या माध्यमातून संबंधित व्यक्तीच्या तक्रारी जाणून घेतल्या जातील. त्यामुळे या तक्रारीवर अंतिम निर्णय झाल्यानंतरच कुलसचिव नियुक्तीबाबत पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

युवासेना (ठाकरे) सहसचिव कल्पेश यादव, स्टुडंट हेल्पिंग हँड्सचे कुलदीप आंबेकर, विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुनील धिवार यांच्यासह अन्य लोकांना आपले म्हणणे मांडण्यासाठी विद्यापीठाने पत्र आणि ई-मेलद्वारे आमंत्रित केले आहे. यावरून वादग्रस्त उमेदवाराचीच नियुक्ती कोणत्याही परिस्थितीत करायची, यावर विद्यापीठ प्रशासन ठाम असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**आज दुपारी पावणेबारा वाजता मांडता येणार म्हणणे**

### वादग्रस्त व्यक्तीवगळता एकही उमेदवार पात्र नाही का?



विद्यापीठातील कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव आदी पदांच्या नेमणुका होत असताना राजकीय हस्तक्षेप केला जातो, हे काही लपून राहिलेले नाही. कुलसचिवपदासाठी एका वादग्रस्त व्यक्तीची नेमणूक राजकीय हस्तक्षेपातून होत असल्यामुळे आंदोलने करण्यात आली. तरीदेखील त्याच व्यक्तीची नेमणूक करण्यासाठी विद्यापीठ प्रशासन अडून बसले आहे. कुलसचिवपदासाठी तब्बल ३६ उमेदवार स्पर्धेत आहेत. त्यामुळे वादग्रस्त व्यक्तीवगळता एकही उमेदवार कुलसचिवपदासाठी पात्र नाही का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. यातूनच विद्यापीठ प्रशासनाच्या पारदर्शकतेवर देखील प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

Pune Edition Edition
Jul 30, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

# कुलसचिव निवडीच्या वादाला नवे वळण

## आक्षेप ऐकून घेण्यासाठी विद्यापीठातर्फे समितीची नियुक्ती

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव निवड होण्याआधीच संभाव्य नावावरून उद्भवलेल्या वादाला आता वेगळेच वळण लागले आहे. चर्चेत असलेल्या नावावर घेण्यात आलेले आक्षेप ऐकून घेण्यासाठी स्वतंत्र समिती नियुक्त करण्यात आली असून, मंगळवारी (३० जुलै) समितीकडून संबंधितांचे आक्षेप ऐकून घेतले जाणार आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव पदाच्या मुलाखती काही दिवसांपूर्वी घेण्यात आल्या. त्यानंतर या पदासाठीचे संभाव्य नाव चर्चेत आले. त्यानंतर संबंधित उमेदवाराबाबत असलेल्या तक्रारी समोर येऊ लागल्या. त्यात गंभीर स्वरुपाच्या आरोपांचाही समावेश होता. संबंधित व्यक्तीची निवड न करण्याबाबत विविध संघटनांनी विद्यापीठाला निवेदने दिली. त्यामुळे अद्याप कुलसचिव पदासाठीची निवड जाहीर करण्यात आलेली नाही. विद्यापीठाने विधी विभागाचा सल्ला घेऊन आक्षेप घेणाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी समिती नेमण्यात आली आहे. या समितीच्या अहवालानंतर निवड जाहीर होऊ शकते. कुलसचिवांची निवड होण्यापूर्वीच समिती नेमण्याची कार्यपद्धती चुकीची आहे. कुलसचिवांची निवड कायद्यानुसार झाली पाहिजे, असे माजी अधिसभा सदस्य प्रा. धनंजय कुलकर्णी यांनी सांगितले.

30/07/2024 | Pune | Page : 18
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
City_30 July 2024_015
30 Jul 2024
www.dainikprabhat.com

# कुलसचिव नियुक्तीचा घोळ संपेना

## विद्यापीठातर्फे समिती स्थापन; तक्रारदारांशी आज चर्चा

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २९** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव पदाच्या नियुक्तीवरून आता नवीन पॅटर्न पुढे येत आहे. कुलसचिव म्हणून ज्या व्यक्तींची निवड केली जाणार आहे, त्यांच्या विरोधात आक्षेप घेणाऱ्या सर्व तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी विद्यापीठातर्फे समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीसमोर आपले म्हणणे मांडण्यासाठी उद्या (दि. ३०) दुपारी बारा वाजता सर्व तक्रारदारांना विद्यापीठात बोलावण्यात आले आहे.



विद्यापीठाच्या कुलसचिव पदाच्या मुलाखतीनंतर एका व्यक्तीची निवड जाहीर केली जाणार होती. मात्र, या नियुक्तीवरून विविध संस्था, संघटनांकडून लेखी तक्रारी येण्यास सुरुवात झाली. या तक्रारींमध्ये काही गंभीर स्वरूपाचे आरोप करण्यात आले आहेत. त्यावर विद्यापीठाने विधी विभागाचा सल्ला घेतला. विधी विभागाच्या सल्ल्यानुसार आता एका समितीच्या माध्यमातून या सर्व तक्रारींची शहानिशा करण्यात येणार आहे.

विद्यापीठाचे माजी अधिसभा सदस्य यांच्यासह राजकीय व सामाजिक क्षेत्रांत काम करणाऱ्या संघटनांच्या प्रतिनिधींनी संभाव्य कुलसचिवपदाच्या उमेदवाराबाबत आक्षेप घेत निवेदने दिली होती. या सर्व निवेदनांवर समितीच्या माध्यमातून संबंधित व्यक्तीच्या तक्रारीवर जाणून घेतल्या जातील. त्यामुळे या तक्रारीवर अंतिम निर्णय झाल्यानंतर कुलसचिव नियुक्तीबाबत पुढील निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
City_30 July 2024_005
30 Jul 2024
www.dainikprabhat.com

# 'सेट'चा निकाल पुढील आठवड्यात

## 'एसईबीसी' आरक्षण लागू होण्याचा मार्ग मोकळा

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २९** - सहायक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असलेल्या राज्यस्तरीय पात्रता परीक्षा अर्थात 'सेट' परीक्षेच्या निकालाचा मार्ग मोकळा झाला आहे. या परीक्षेसाठी एसईबीसी आरक्षण लागू केले जाणार आहे. त्यामुळे हा निकाल ५ ऑगस्ट रोजी जाहीर होण्याची चिन्हे आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सेट विभागातर्फे गोवा आणि महाराष्ट्र राज्यात सेट परीक्षा घेतली जाते. ही परीक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट विभागातर्फे ७ एप्रिल २०२४ रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेसाठी मराठा आरक्षण लागू करावे, अशी मागणी काही विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे केली होती. त्यावर विद्यापीठाने राज्य शासनाकडे अभिप्राय मागवला होता. गेल्या काही महिन्यांपासून राज्य शासनाकडून त्यावर उत्तर प्राप्त होत नव्हते. अखेर राज्य शासनाने त्यावरील निर्णय विद्यापीठास कळविला आहे. या परीक्षेस 'सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास संवर्गाकरिता अधिनियम २०२४' मधील तरतुदीनुसार एसईबीसी आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. हे आरक्षण लागू केले असले, तरी मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या रीट याचिका व अन्य निर्णयाच्या अधीन राहून निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

# *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

सकाळ

### मोफत उच्च शिक्षणासाठी ऑनलाइन पोर्टल सुरू

मुंबई, ता.२९ : राज्यातील मुलींना मोफत उच्च शिक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने नुकताच घेतला आहे. आता या योजनेसाठी ऑनलाइन पोर्टल सुरू करण्यात आले आहे. पात्र लाभार्थींनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावा, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

मुलींना मोफत उच्च शिक्षण योजनेसाठी महाडीबीटी पोर्टल सुरू झाले आहे. महाडीबीटी पोर्टलhttps://mahadbt.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावा, असे आवाहन पाटील यांनी केले.

Pune, Main
30/07/2024 Page No. 4

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### शिक्षकांना मिळणार हक्काचे दस्तऐवज

- आवश्यक कागदपत्रे देण्याचे शिक्षण संचालकांचे शैक्षणिक संस्थांना निर्देश

पुणे : पुढारी वृत्तसेवा

राज्यातील शैक्षणिक संस्था किंवा संबंधित संस्थेतील मुख्याध्यापकांकडून शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रावरून मोठ्या प्रमाणात अडवणूक केली जात असल्याचे उघडकीस आले आहे. परंतु, आता माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालयाचे संचालक महेश पालकर यांनी विभागीय उपसंचालक आणि माध्यमिकचे शिक्षणाधिकारी यांना संबंधित कर्मचाऱ्यांना कागदपत्रे देण्यासंदर्भात निर्देश दिले आहेत. त्यामुळे राज्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची कागदपत्रे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

खासगी अनुदानित व अंशतः अनुदानित संस्थांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना काही महत्त्वाची कागदपत्रे संस्था व मुख्याध्यापकामार्फत देणे बंधनकारक असूनही दिले जात नाहीत. त्यामुळे अंशतः अनुदानित, विनाअनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना संस्था व मुख्याध्यापक यांनी संबंधित कागदपत्रे दिली आहेत किंवा नाही याची पाहणी करून कागदपत्रे दिली नसल्यास संबंधित कर्मचाऱ्यांना तत्काळ देण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यामुळे संस्थाचालक तसेच मुख्याध्यापकांना संबंधित कर्मचाऱ्यांना कागदपत्रे देणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**संस्थांना द्यावी लागणार ही कागदपत्रे**

- प्रथम नियुक्ती आदेश प्रत (१९८१ नियम ९ (५) अनुसूची ड)
- नियुक्ती आदेश जोडपत्र (ब) (१३/१०/२००० शिक्षकेत्तर व शिक्षण सेवक)
- प्रथम मान्यता आदेश प्रत (परिविक्षाधिन कालावधी शिक्षण सेवक, शिक्षकेत्तर सेवक)
- सेवा सातत्य आदेश प्रत
- दुय्यम सेवापुस्तक
- वेतन प्रमाणपत्र
- वरिष्ठ, निवडश्रेणी मान्यता आदेश प्रत
- पदोन्नत्ती आदेश व मान्यता प्रमाणपत्र प्रत
- भविष्य निर्वाह निधी परतावा ना परतावा आदेशाची प्रत
- नॉमिनेशन आदेश प्रत

Pune Edition Edition
Jul 30, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# विद्यापीठात कन्व्हेशन सेंटरचा प्रकल्प उभारणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आवारात एका नामांकित उद्योगपतीने तब्बल दीडशे ते दोनशे कोटी रुपयांचा कन्व्हेशन सेंटरचा प्रकल्प उभा करण्याची तयारी दर्शविली आहे. त्यावर विद्यापीठाच्या अधिकार मंडळात गेल्या काही महिन्यांपासून चर्चा केली जात आहे. परंतु, या प्रकल्पाला व्यवस्थापन परिषदेतील काही सदस्यांनी विरोध केला, तर हा प्रकल्प विद्यापीठात उभा राहिला, तर विद्यापीठातील संशोधनाला चालनाच मिळेल. त्यामुळे प्रकल्पाचा पूर्ण अभ्यास करून व सारासार विचार करून मगच त्याला मान्यता दिली जाईल, असे विद्यापीठाच्या इतर काही व्यवस्थापन परिषद सदस्यांनी सांगितले आहे.**



- **एका बड्या उद्योगपतीच्या नावाने उभा राहणार प्रकल्प**
- **प्रकल्पाला व्यवस्थापन परिषद सदस्यांचा विरोध**

विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यामागील ८ ते ९ एकर जागेत कन्व्हेशन सेंटर प्रकल्प उभा करण्याचा प्रस्ताव आहे. काही दिवसांपूर्वी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी या उद्योगपतींची भेटही घेतली. त्यात प्राथमिक चर्चा करण्यात आली. त्यावर दोन दिवसांपूर्वी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक होती. मात्र, बैठक सुरू होण्यापूर्वी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या कार्यालयात बंद दाराआड दीड ते दोन तास काही महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. त्यानंतर व्यवस्थापन परिषदेची बैठक सुरू झाली. त्यात उद्योगपतींकडून आलेला प्रकल्प चर्चेसाठी मांडण्यात आला. परंतु, त्यांची सर्व कागदपत्रे आणि केला जाणारा करार वाचल्याशिवाय त्यास मंजुरी दिली जाणार नाही, असे मत अनेक सदस्यांनी मांडले. दरम्यान, कुलसचिवनियुक्तीचा वाद पेटलेला असताना व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत त्यावर चर्चा होण्याऐवजी प्रकल्पावर जास्त चर्चा करण्यात आल्यामुळे काही सदस्यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली आहे. तसेच बैठकीपूर्वी त्यावर चर्चा करण्यात आली होती का? असा प्रश्न उपस्थित केला आहे.

> “ एका उद्योगपतीच्या नावे करावयाच्या प्रकल्पासाठी घनदाट झाडी असलेली ७ ते ९ एकर जमीन देण्याच्या ठरावाची लगबग कुलगुरू कार्यालयाकडून सुरू आहे. आमची भूमिका आहे की, करारनाम्याची मूळ कॉपी पहिल्याशिवाय आणि त्यातील विद्यापीठहिताच्या सुधारणा झाल्याशिवाय आम्ही मंजुरी देणार नाही. काल व्यवस्थापन सभेत यासाठी तत्त्वतः मंजुरी देण्याचा घाट घातला गेला होता. पण, मी त्याला स्पष्ट विरोध केला आहे. पुढे योग्य वेळी त्यावर सविस्तर भूमिका मांडेल.
>
> - **सागर वैद्य**, सदस्य, व्यवस्थापन परिषद, सावित्रीबाई फुले विद्यापीठ

My Pune Edition Edition
Jul 30, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

**पुढारी**

स्थापना १९३९

www.pudhari.com

# तक्रारकर्त्यांचीच बडदास्त!

## विद्यापीठात जेवणाची मेजवानी देत घेतल्या ऐकून तक्रारी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच नियुक्त न झालेल्या कुलसचिवपदावरील व्यक्तीविरोधात तक्रारी केलेल्या लोकांना सुनावणीसाठी बोलावण्यात आले. त्यांना सोयीसुविधांनी युक्त रूममध्ये ठेवण्यात आले. जेवणाची मेजवानी देत तक्रारी ऐकून घेण्यात आल्या. तब्बल ३० हून अधिक तक्रारकर्त्यांची बडदास्त ठेवण्यात आली. त्यामुळे काहीही झाले तरी वादग्रस्त व्यक्तीलाच कुलसचिवपदी बसविण्याचा बालहट्ट विद्यापीठ प्रशासन पुढे रेटत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

कुलसचिवपदी वादग्रस्त व्यक्तीची नेमणूक करण्याचे जवळपास निश्चित झाले आहे. त्यामुळे नियुक्तीवरून निर्माण झालेल्या वादावर तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी विद्यापीठातर्फे एका निवृत्त न्यायाधीशांची एकसदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली. ज्या तक्रारकर्त्यांनी विद्यापीठ प्रशासनाकडे तक्रार केली अशा तक्रारकर्त्यांना मंगळवारी (दि. ३०) दुपारी पावणेबारा वाजता आपले म्हणणे सादर करण्याची संधी देण्यात आली. परंतु, या वेळी केवळ निवेदन आपणच दिले आहे का? निवेदनावर आपलीच स्वाक्षरी आहे का? अशा फुटकळ प्रश्नांच्या माध्यमातून तक्रारी ऐकण्याचा फार्स करण्यात आला. ज्या वादग्रस्त व्यक्तीविरोधात ३० हून अधिक लोकांच्या तक्रारी आहेत, अशा व्यक्तीलाच कुलसचिव करण्यासाठी एवढी कसरत करण्याची वेळ विद्यापीठ प्रशासनावर आल्यामुळे राजकीय हस्तक्षेपाचा कळसच विद्यापीठात झाला असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

> गेल्या वर्षभराचा घटनाक्रम पाहिला, तर पूर्णवेळ कुलसचिवाची नियुक्ती होऊच नये, अशीच काहींची इच्छा असल्याचे दिसून येते. आता तर मुलाखतीच्या दिवसापासून या प्रक्रियेतला घटनाक्रम पाहिला, तर तो विद्यापीठाच्या देदीप्यमान इतिहासाला काळिमा फासणारा आहे. विद्यापीठ घटकांशी संबंधित संघटना, लोकप्रतिनिधी यांच्याबद्दल प्रतिमा मलिन करणारा नरेटिव्ह सेट केला जातोय. मीडिया ट्रायल, संघटना ट्रायल घेऊन यापुढे पदभरती केली जाणार असेल, तर कायदेशीर निवड प्रक्रिया, समित्यांचे काय? या सर्व प्रकरणात कुलगुरूंचे वर्तन संशयास्पद वाटते. त्यांच्या समितीने निवड केलेल्या व्यक्तीचे नाव जाहीर होण्यापूर्वीच बाहेर गेले आहे का आणि कसे? या प्रकाराला अनेक कंगोरे आहेत, असे दिसतेय.
>
> **- सागर वैद्य,**
> व्यवस्थापन परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> कुलसचिव निवडीसंदर्भात निर्माण झालेल्या वादावर विद्यापीठाने स्थापन केलेल्या समितीसमोर भूमिका स्पष्ट केली. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव असलेल्या विद्यापीठाच्या कुलसचिवपदी अनेक आरोप असलेल्या व्यक्तीची नियुक्ती का केली जाऊ नये, याची कारणे समिती समोर मांडली तसेच पुरावे सदर केले. विद्यापीठाच्या कुलसचिवपदी स्वच्छ चारित्र्याच्या व्यक्तीची निवड व्हावी, चारित्र्यहीन व्यक्तीची निवड होता कामा नये, हीच आमची मुख्य मागणी आहे. कुलसचिवपदी निवड न झालेल्या व्यक्तीची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून निवड करण्याचा हा प्रयत्न तर नाही ना, अशी शंका येते.
>
> **- कल्पेश यादव,**
> (युवासेना सहसचिव)

> कुलसचिव नियुक्ती प्रकरणात कुलगुरूसुद्धा हतबल झाले असल्याचे आज भेटल्यानंतर मला जाणवत होते. ते म्हणतात स्वत:हून अशा व्यक्तीने यात आले नाही पाहिजे. परंतु, करणार काय? त्यांची इच्छा आहे कलंकित व्यक्ती नको. पण, काहींच्या दबावतंत्राने तेही नाउमेद झाले आहेत. सदर प्रकरणात संबंधित वादग्रस्त व्यक्तीची निर्दोष मुक्तता व्हावी, यासाठी गुप्त समिती निर्माण केली आहे, असा आमचा स्पष्ट आरोप आहे. राज्यपाल महोदयांनी यात लक्ष घालावे; अन्यथा भविष्यात अशा नियुक्तींचा पायंडा पडेल.
>
> **- कुलदीप आंबेकर,**
> अध्यक्ष स्टुडंट हेल्पिंग हँड्स

> विद्यापीठ प्रशासनाने कुलसचिवपदासाठी अधिकृत निवड समितीव्दारे मुलाखती घेतल्या. निवड समितीचा अहवाल आजपर्यंत गोपनीय आहे. तरी दि. १२ जुलै २०२४ पासून समाज माध्यमे, वर्तमानपत्रांतून प्रस्तावित कुलसचिवाविरोधात विविध आरोप करून सदर नियुक्ती रद्द करण्याची मागणी करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर कुलसचिव निवड समितीचा अहवाल गोपनीय न राहता तो सार्वजनिक झाला आहे का? याची प्रथम चौकशी होणे आवश्यक आहे. विद्यापीठ प्रशासन विद्यापीठ रचनेत कोणत्याही पदावर नियुक्त नसलेल्या व्यक्तीची कुठल्याही आरोपाची चौकशी करू शकते का? प्रस्तावित कुलसचिव व्यक्तीचे नाव अधिकृत पद्धतीने माहीत नसताना त्यावर संघटना, संस्था, व्यक्तींनी केलेल्या आरोपांची चौकशी कायदेशीर ठरेल का? विद्यापीठ कायदाअंतर्गत कोणत्या तरतुदीखाली चौकशी होत आहे? चौकशी समितीसमोर ज्याच्यावर आरोप करण्यात येत आहेत, त्यांना आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाणार आहे का?
>
> **- धनंजय कुलकर्णी,**
> माजी अधिसभा सदस्य.

My Pune Edition Edition
Jul 31, 2024 Page No. 06
Powered by: erelego.com

*News Paper Clippings During July 2024*

*Section: Education*

लोकमत

# एसईबीसी आरक्षणासह सेटचा निकाल

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील राज्य पात्रता परीक्षा सेट विभागाच्या वतीने दि. ७ एप्रिल रोजी ३९व्या सेट परीक्षेचे आयोजन केले होते. यात एसईबीसी आरक्षणाचा अंतर्भाव करीत सेट परीक्षेचा निकाल जाहीर केला जाणार आहे.

दरम्यान, यात एसईबीसी प्रवर्गासाठी आरक्षण लागू करावे किंवा कसे? याबाबत सेट परीक्षा विभागातर्फे राज्य सरकारसोबत पत्रव्यवहार करण्यात आला होता. तसेच नव्याने सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या



मागासवर्गासाठी आरक्षण अधिनियम, २०२४ एसईबीसी प्रवर्गात समाविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांकडून त्यांच्या प्रवर्गाची माहिती विभागाकडून ऑनलाइन मागविण्यात आली.

एसईबीसी प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या आरक्षणाबाबत महाराष्ट्र शासनाकडून मार्गदर्शक सूचना मिळताच ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत सेट परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात येईल, अशी माहिती विभागातर्फे देण्यात आली.

सहायक प्राध्यापक पदाच्या पात्रतेसाठी दि. ७ एप्रिल रोजी आयोजित राज्य पात्रता परीक्षा यंदा तब्बल १ लाख ९ हजार १५४ विद्यार्थ्यांनी दिली होती.

एसईबीसी आरक्षणाचा अंतर्भाव करण्यावरून तब्बल चार महिन्यांपासून रखडलेला सेट परीक्षेचा निकाल लागणार आहे.

Pune Main
Page No. 2 Jul 31, 2024
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2024*

### *Section: Career*



लोकमत

लोकमत
epaper.lokmat.com

# एज्यु कनेक्ट

पुणे, गुरुवार, दि. १८ जुलै २०२४

७

काही टिप्स
प्रा. शरद मनसुख
करिअर मार्गदर्शक

## कला शाखेच्या विद्यार्थ्यांना अमर्याद संधी

कला शाखेतून पदवी आणि पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना एमपीएससी, युपीएससी, एनजीओ, बीएसडब्ल्यू/एमएसडब्ल्यू, शासकीय सेवा व सरळ सेवा भरती, प्रसार माध्यमे, कायदे / विधी विभाग, शिक्षण व आरोग्य, ग्रामीण विकास क्षेत्र, परराष्ट्र खाते, कमर्शियल आर्ट, पर्यटन क्षेत्र, पुरातत्त्व विभाग, जाहिराती, विमाक्षेत्र व राज्यशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास व भूगोल, मराठी, हिंदी, इंग्रजी इ. विशेष विषयामध्ये विविध प्रकारच्या नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.

करिअर म्हणजे 'एक बुद्धिवान व कौशल्यवान व्यक्ती बनून आपल्या आवडी व मार्केटमधील गरजांचा अंदाज घेऊन आपली सर्वोत्तम क्षमता सिद्ध करणे होय'. कला, वाणिज्य व विज्ञान या पारंपरिक विद्या शाखांमध्ये करिअरसाठी खूप संधी असते; मात्र समाजात विशेषत: पालक वर्गात प्रत्येक शाखेविषयी अत्यंत त्रोटक माहिती असते. कला शाखा म्हटले की, डी.एड्. किंवा बी. एड्. करून फक्त शिक्षक होता येते व वाणिज्य शाखेमध्ये बँकेत नोकरी करणारेच प्रवेश घेतात तसेच विज्ञान शाखा म्हटले की वैद्यकीय, इंजिनिअरिंग क्षेत्रात करिअर करणाऱ्यांनी प्रवेश घ्यावा. हा मूळ दृष्टिकोन बाजूला ठेवून वरील पारंपरिक शाखेत वेगवेगळ्या क्षेत्रात करिअरच्या भरपूर संधी आहेत.

### करिअर निवडीसाठी महत्त्वाचे तीन घटक

पहिला महत्त्वाचा घटक म्हणजे आवड होय. आवड म्हणजे तुम्हाला कोणत्या क्षेत्रात कार्य करण्याची मनापासून इच्छा आहे. आवड असेल तर तुम्ही त्या क्षेत्रात उत्तम कार्य करू शकता. तसेच दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे क्षमता होय. एखाद्या पदासाठी किंवा क्षेत्रासाठी कार्य करण्याची सर्वोत्तम क्षमता आपल्यामध्ये असणे फार गरजेचे आहे. तिसरा महत्त्वाचा घटक म्हणजे पात्रता होय. कोणत्याही क्षेत्रात यशस्वीपणे वाटचाल करण्यासाठी आवश्यक असते ती म्हणजे पात्रता.

### पर्यटन क्षेत्रातही करा करिअर

पर्यटन क्षेत्रात गाईड, मार्गदर्शक, ट्रॅव्हल्स अँण्ड टुर्सकरिता चांगली संधी आहे. हजारो वर्षांची परंपरा व इतिहास असणाऱ्या महाराष्ट्रात व भारतात पुरातत्त्व शास्त्र व विभागात उत्खनन, हेरिटेज क्षेत्र, संशोधन क्षेत्र, इतिहास संशोधक म्हणून करिअर करता येईल.

## कला शाखेतील पदवीधरांना संधी

### स्पर्धा परीक्षेतून अधिकारीपदाला गवसणी

दहावीनंतर कला शाखेमध्ये प्रवेश घेतल्यानंतर बारावी तसेच बीए पदवी प्राप्त केल्यानंतर विविध क्षेत्रात कला शाखेतील विद्यार्थ्यांना अनेक संधी उपलब्ध आहेत. विशेषत: स्पर्धा परीक्षेची आवड असणारे विद्यार्थी हे एमपीएससीद्वारे पोलिस उपनिरीक्षक (पीएसआय), विक्रीकर अधिकारी (एसटीआय), मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी, नायब तहसीलदार व तहसीलदार , शिक्षणाधिकारी, पोलिस उपअधीक्षक, उपजिल्हाधिकारी अशी विविध पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे आयोजित परीक्षेतून प्राप्त करू शकतात आणि ज्या विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाचे विविध पदाचे आकर्षण आहे ते युपीएससीद्वारे आयएएस, आयपीएस, आयएफएस, अन्य भारतीय केंद्रीय सेवेची निवड करू शकतात.

### शिक्षक, प्राध्यापक व्हा अन् मुलांना घडवा

ज्ञानदानाच्या पवित्र क्षेत्रात प्राथमिक शिक्षकासाठी बारावीनंतर डी. एड्. आणि माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक होण्यासाठी बी.ए., किंवा एम.ए. नंतर बी.एड्. करून माध्यमिक व ज्युनिअर कॉलेजसाठी संधी मिळू शकते तसेच सिनिअर कॉलेजमध्ये प्राध्यापक होण्यासाठी कला शाखेतील विविध विषयांत सेट व नेट या राज्य व राष्ट्रीय पात्रता परीक्षा पास होऊन किंवा पीएच.डी. पदवी प्राप्त करून करिअर करता येते.

### नोकरीसह समाजसेवा करण्याची संधी

एनजीओमध्ये कार्य करण्याची आवड असणाऱ्यासाठी खासगी क्षेत्र, निमशासकीय क्षेत्र, मानव अधिकार क्षेत्र इत्यादी ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात संधी आहेत. समाजसेवेची मनापासून आवड असणारे उमेदवार बीएसडब्ल्यू / एमएसडब्ल्यू या पदवी घेऊन शासकीय व निमशासकीय क्षेत्र, खासगी कंपनी क्षेत्रात कार्य करून नोकरीसह समाजसेवा करू शकतात.

### भाषातज्ज्ञ व्हा आणि लेखन करा

केंद्र शासनाच्या परराष्ट्र खात्यांमध्ये भाषातज्ज्ञ, परकीय भाषातज्ज्ञ, भाषा अनुवादक म्हणून कार्य करण्याची संधी आहे. विशेषत: मराठी व हिंदी, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणाऱ्या व निरीक्षण, कल्पना विस्तार यांची आवड असलेल्या लेखकांना कथा, पटकथा, संवाद लेखक, विनोदी लेखक व दैनंदिन मालिका, चित्रपट व वेबसिरीज, ओटीटीमध्ये लेखनाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. जाहिरातीचे हे युग आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रात छोट्या, मोठ्या व्यवसायापासून ते प्रत्येक उत्पादन व वस्तूसाठी जाहिरात करावी लागते. त्यामुळे जाहिरात लेखक, सल्लागार, संकल्पना तज्ज्ञ, प्रकल्प सहायक म्हणून संधी आहे.

### पत्रकारिता अन् वकिलीत संधी

प्रिंट मीडिया अर्थात वर्तमानपत्रासाठी वार्ताहर व इलेक्ट्रॉनिक मीडिया म्हणजे टीव्ही, विविध न्यूज चॅनेलसाठी रिपोर्टर किंवा पत्रकार म्हणूनही कार्य करू शकता. राजकीय, आर्थिक, मनोरंजन, क्रीडा क्षेत्रातील पत्रकार म्हणून विशेष संधी आहे. एलएलबी किंवा एलएलएम पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेऊन वकिली क्षेत्रात स्वत:चा वेगळा ठसा उमटवू शकता व न्यायाधीश पदापर्यंत पोहोचता येते व खासगी क्षेत्रात कायदेशीर सल्लागार म्हणून वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये संधी प्राप्त करणे सोपे आहे.

Hello Pune
Page No. 7 Jul 18, 2024
Powered by: erelego.com

***News Paper Clippings During July 2024***

***Section: Miscellaneous***

सकाळ

# नियतकालिकांचे नियमन

**वाचनसंस्कृतीत नियतकालिकांनी फार महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते. त्यांचे हे महत्त्व लक्षात घेऊन त्याच्या नियमनासाठी नव्याने झालेले कायदे समजून घेणे आवश्यक आहे.**

**भालचंद्र कुलकर्णी**

आजच्या मोबाईलच्या जमान्यात खरंच पुस्तकं आणि नियतकालिकांचा वाचक राहिला आहे का? आजच्या तरुण पिढीला वाचनाची आवड राहिली आहे का? हल्ली कुणी वाचतच नाही इथपासून ते पुस्तक प्रदर्शनात काही कोटींची पुस्तके विकली गेली इथपर्यंतच्या बातम्या आणि चर्चा आपल्या कानावर पडताना दिसतात. पण वाचनसंस्कृतीत नियतकालिकांनी फार महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते. त्यांचे हे महत्त्व लक्षात घेऊन त्याच्या नियमनासाठी नव्याने झालेले कायदे समजून घेणे आवश्यक आहे. सद्यःस्थितीत देशभरात विविध भाषेतील सुमारे दीड लाख नियतकालिकांची नोंदणी झालेली असली तरी त्यातील केवळ ३५ ते ४० हजार नियतकालिके नियमितपणे सुरू असतात, तर सुमारे तीन हजारांहून अधिक पुस्तक प्रकाशनसंस्था आणि तितकीच पुस्तक वितरकांची मोठी यंत्रणा महाराष्ट्रात कार्यरत आहे, अशीही आकडेवारी आहे. हे सगळेच आकडे वाचन चळवळीच्या सुदृढतेचा भक्कम पुरावा देतात. तर दुसरीकडे डिजिटल आणि समाजमाध्यमांचा मोठा प्रेक्षकवर्गदेखील वाढताना दिसतो.

ई-बुक, किंडल, ई-पेपरसारख्या डिजिटल माध्यमांकडे तरुण पिढीचा असणारा कल एकीकडे आणि दुसरीकडे पुस्तके, नियतकालिके आणि दैनिक वृत्तपत्रांसारख्या मुद्रित माध्यमांच्या असलेल्या मोठ्या खपांची आकडेवारी असा हा काहीसा संमिश्र आलेख. भविष्यात मात्र वाचक की प्रेक्षक अशा संमिश्र पातळीवरच माध्यमांचे आर्थिक व्यवस्थापन तरले जाणार आहे, हे नक्की. भारतात वाचन चळवळीचा प्राचीन उज्ज्वल इतिहास आहे. पूर्वी फक्त मुद्रित माध्यमच होते. इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा विचार करायचा झाला तर रेडिओचे प्रसारण होते. भारतात १९३० च्या दशकात सुरू झालेली आकाशवाणी (रेडिओ) आणि त्यानंतर १९६० च्या दशकात सुरू झालेले दूरचित्रवाणी (टेलिव्हिजन) आणि पुढे १९९५ पासून सुरू झालेले इंटरनेट या माध्यमांचा विचार करता मुद्रित माध्यमांची मोठी परंपरा भारतात आहे.

सर्वच प्रकारच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सर्वच माध्यमांमध्ये आमूलाग्र बदल होताना दिसत आहेत. मुद्रितमाध्यमेदेखील आता अत्याधुनिक अशा नवनवीन तंत्रज्ञानामुळे वेगवान आणि सुबक, सुंदर होत आहेत, वाचकांच्या पसंतीस उतरत आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ब्रिटिशांनी भारतात सुरू केलेले अनेकविध कायदे, नियमांचा सातत्याने आढावा घेण्याचे काम नेहमीच होत असते. कालसुसंगत नसलेले व अनावश्यक असे अनेक ब्रिटिशकालीन सुमारे १८०० हून अधिक कायदे गेल्या दहा वर्षात केंद्र सरकारने पूर्णपणे रद्द केले आहेत, तर अनेकविध कायद्यांमध्ये आमूलाग्र सुधारणा केल्या आहेत.

आता माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने मुद्रित माध्यमांसाठीचा कायदा पूर्णपणे बदलला आहे, तर बातम्या प्रसारित करणाऱ्या सर्वच डिजिटल माध्यमांवर (प्रामुख्याने यू-ट्यूब न्यूज चॅनल्स, न्यूज पोर्टल्स, न्यूज ॲप्स, स्थानिक केबलवाहिन्या, दूरचित्रवाणीवरील न्यूज वाहिन्या इ.) माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत विविध प्रकारची बंधने, नियमावली आणि नोंदणीप्रक्रियादेखील नव्याने आणली आहे. मुद्रित माध्यमांसाठी आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे सुरु झालेली समाजमाध्यमे यांच्यासाठी स्वातंत्र्य आणि जबाबदारीची जाणीव करून देणाऱ्या कायद्याच्या तरतुदी आणि बंधने आता काळानुरूप बदलू लागली आहेत, सर्वंकष, सक्षम व अधिक कडक होऊ लागली आहेत.

अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली होणाऱ्या स्वैराचारावर, दुरुपयोगावर कायद्याचे लक्ष यापुढे अधिक कडक राहणार आहे. पुस्तके आणि वृत्तपत्रांची छपाई आणि प्रकाशनाचा परवाना देणारा ब्रिटिशकालीन असलेला सन १८६७ चा 'प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट' (PRB Act,१८६७) नुकताच रद्द करून त्याजागी 'प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ पिरिऑडिकल्स ॲक्ट (PRP Act, २०२३) आणला आहे. त्याची अंमलबजावणी १ मार्च २०२४ पासून देशभरात सुरु झाली आहे. वृत्तपत्रांच्या जागी आता नियतकालिके (Periodicals) हा शब्द नव्या कायद्यात आला आहे. यापूर्वीच्या कायद्यानुसार स्थानिक जिल्हा प्रशासनाद्वारे (जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत) पाठवले जाणारे अर्ज, कागदपत्रे आणि त्यातल्या किचकट व वेळखाऊ प्रक्रियेमुळे सर्वच प्रकाशक त्रासले गेले होते. या नव्या कायद्याने पूर्णपणे ऑनलाइन प्रक्रियेमुळे नवीन नियतकालिकासाठीची शीर्षक (टायटल) मंजुरी व त्याची नोंदणी एकाच टप्प्यात करण्यात आली आहे.

दैनिकांपासून वार्षिक दिवाळी अंकांपर्यंत सर्वच प्रकारच्या नियतकालिकांची नोंदणी प्रेस सेवा पोर्टलद्वारे करणे प्रकाशकांना बंधनकारक करण्यात आले आहे, तर पुस्तकांच्या बाबतीत ISBN (इंटरनॅशनल स्टँडर्ड बुक नंबर) आणि संशोधन पत्रिकांच्या (रिसर्च जर्नल) बाबतीत ISSN (इंटरनॅशनल स्टँडर्ड सिरीयल नंबर) ची नोंदणी करण्याचे बंधन पूर्वीपासून आहे, जे देखील आता पूर्णपणे ऑनलाइन झाले आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून आजही मुद्रित माध्यमांमध्ये प्रामुख्याने दैनिक वृत्तपत्रांकडे पाहिले जाते, तर विविध विषयांना वाहिलेली नियतकालिके ही वैचारिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, मनोरंजन अशा क्षेत्रांसाठी आवर्जून वाचली जात आहेत, मात्र नियतकालिकांना आर्थिक व्यवस्थापनाचा मोठ्या प्रमाणावर फटका बसतोय, तो प्रामुख्याने समाज माध्यमांच्या वेगवान प्रभावाचा, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे. असे असूनही फेसबुक, यू-ट्यूब, इन्स्टाग्राम इ.च्या जमान्यात वाचन चळवळीचे वाहक म्हणून मुद्रितमाध्यमे टिकून आहेत, ती त्यांच्या विश्वासार्हतेच्या बळावर आणि वाचकांच्या भक्कम पाठबळावरच!

**(लेखक मराठी नियतकालिक परिषदेचे संस्थापक आहेत)**

## दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र



**■ भारतातील दीड लाख नोंदणीकृत नियतकालिकांपैकी सर्वाधिक उत्तरप्रदेशमध्ये (सुमारे २२ हजार) तर दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र (सुमारे २० हजार) आहे. देशात तब्बल १४५ भाषांमधील नियतकालिके असून यामध्ये सर्वाधिक नियतकालिके हिंदी भाषेतील (सुमारे ५८ हजार), त्यानंतर इंग्रजी (सुमारे २० हजार), मराठी (सुमारे १२ हजार), उर्दू (सुमारे ७ हजार) तर प्रत्येकी ६ हजारांच्या आसपास कन्नड, गुजराती, तेलगु, तमिळ, बंगाली, मल्याळम या भाषांमधील आहेत. संस्कृत भाषेत सुमारे १५० तर देशातील ग्रामीण बोलीभाषांतील नियतकालिकांचे प्रमाण खूपच नगण्य आहे. महाराष्ट्रात विविध भाषेतील सुमारे २० हजार नियतकालिकांमध्ये मराठी (१२ हजार), इंग्रजी (४ हजार), हिंदी (३ हजार), गुजराती व उर्दू (प्रत्येकी ६००), संस्कृत (१२) व उर्वरीत विविध भाषांमधील आहेत. राज्यात सुमारे आठ हजार नियतकालिके प्रसिद्ध होतात, ज्यामधील दैनिकांची संख्या तब्बल तीन हजारांच्या आसपास आहे.**

Pune, Main
31/07/2024 Page No. 7

# *Upcoming Events*

## August 2024

| MON | TUE | WED | THU | FRI | SAT | SUN |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 *Sahityaratna Anna Bhau Sathe Jayanti*  | 2 | 3 *Krantisinh Nana Patil Jayanti*  | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 *Sadbhavana Diwas* | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |




*Other than the Photos of Modern College Pune-5 and Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.Com*